# तृतीय वर्ष कला

## सत्र - VI (CBCS)

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. IX

# व्यावसायिक मराठी

## विषय कोड : 86684

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक डॉ. डी. टी. शिर्के**
स्थानापन्न कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
स्थानापन्न प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, (आयडॉल)
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. वनश्री फाळके**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
श्री. पी. एल. श्रॉफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
चिंचणी, ता. डहाणू, जि. पालघर

: **प्रा. डॉ. मधुकर मोकाशी**
श्रीमायबोली, इमारत क्र. १८, गजानन सोसायटी,
पाटस रोड, दौंड, जि. पुणे

: **प्रा. डॉ. गोपाळ गावडे**
विभाग प्रमुख, मराठी विभाग,
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

: **प्रा. डॉ. राजेंद्र आचार्य**
मराठी विभाग,
डी. जी. तटकरे महाविद्यालय,
ता. माणगाव, जि. रायगड

: **प्रा. डॉ. बाळासाहेब सुतार**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मालकापूर,
शाहूवाडी, जि. कोल्हापूर

**एप्रिल २०२३, मुद्रण - १, ISBN-978-93-95130-81-3**

**प्रकाशक** : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | वृत्तपत्र माध्यमासाठी लेखन | ०१ |
| २) | आकाशवाणी माध्यमासाठी लेखन | २१ |
| ३) | दूरचित्रवाणी व समाज माध्यमासाठी लेखन | |
| ३.१) | दूरचित्रवाणीसाठी मुलाखत लेखन | ६७ |
| ३.२) | दूरचित्रवाणीवरील मालिकेसाठी संवाद लेखन | ७९ |
| ३.२) | ई-मेल लेखन, ब्लॉग लेखन व विकिपीडिया लेखन | ९४ |


❖❖❖❖

## सत्र – ६ वे श्रेयांकने- ३ व्याख्याने-४५
## व्यावसायिक मराठी

***उद्दिष्टे (Objective)***

१) विद्यार्थ्यांच्या लेखनक्षमतेचा व सर्जनशीलतेचा विकास करणे

२) मुद्रित दृक श्राव्य माध्यमांसाठी आवश्यक लेखन कौशल्य शिकवणे

३) माध्यमांमधील रोजगाराच्या संधीचा परिचय करून घेणे

४) व्यावसायिक लेखनासाठी मराठी भाषेचे उपयोजन करणे

५) आधुनिक समाजमाध्यमांचा विशेष परिचय कार्य व उपयुक्तता याबाबत जाणून घेणे

६) ब्लॉग लेखनाचे स्वरूप लक्षात घेऊन ते लेखन तंत्र अवगत करणे

७) ईमेल लेखनाचे स्वरूप लक्षात घेऊन ते लेखनतंत्र अवगत करणे

**घटक १ : वृतपत्र माध्यमासाठी लेखन (तासिका १५) श्रेयांकन १**

१:१ वृत्त लेखन
१:२ पुस्तक परीक्षण लेखन
१:३ नाट्य व चित्रपट समीक्षा लेखन

**घटक २ : आकाशवाणी माध्यमासाठी लेखन (तासिका १५) श्रेयांकन १**

२:१ श्रुतिका लेखन
२:२ नभोनाट्य
२:३ जाहिरात लेखन

**घटक ३ : दूरचित्रवाणी व समाज माध्यमासाठी लेखन (तासिका १५) श्रेयांकन १**

३:१ दूरचित्रवाणीसाठी मुलाखत लेखन
३:२ दूरचित्रवाणी मालिकेसाठी संवाद लेखन
३:३ ईमेल लेखन, ब्लॉगलेखन, विकिपीडियासाठी लेखन

***साध्ये (Outcome)***

*१) विद्यार्थ्यांच्या लेखन क्षमतेचा आणि सर्जनशीलतेचा विकास होईल*

*२) विविध माध्यमांसाठी आवश्क लेखनाच्या प्रकारांचा परिचय होईल आणि त्यासाठी आवश्क कौशल्ये आत्मसात होतील*

*३) लेखन कौशल्ये आत्मसात करून माध्यामामधील रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील*

**संदर्भ ग्रंथ –**


१) व्यावहारिक मराठी : संपा. स्नेहल तावरे
२) व्यावहारिक मराठी : ल.रा नशिराबादकर
३) व्यावहारिक मराठी : मोकाशी सयाजी, नेमाडे रंजना
४) ओळख माहिती तंत्रज्ञानाची : एम.एस.आय.टी. महाराष्ट्र राज्य
५) संगणक युग : अच्युत गोडबोले
६) वृत्तविद्या : स.ह देशपांडे
७) नभोवाणी कार्यक्रम तंत्र आणि मंत्र : पुष्पा काणे
८) आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या विश्वात : दीपक शिकरपूर, उज्वल मराठे
९) वाळंबे, मो. रा. सुगम मराठी व्याकरण, नितीन प्रकाशन पुणे
१०) जोशी चंद्रहास, मराठी लेखन दर्शन, मेहता पब्लिकेश हाऊस, पुणे
११) मराठी भाषा उगम आणि विकास, मेहता पब्लिकेश हाऊस, पुणे
१२) केळकर अशोक, वैखरी, मॅजिस्टिक प्रकाशन पुणे.
१३) नसीराबादकर, ल.रा., व्यावहारिक मराठी, फडके प्रकाशन, कोल्हापूर
१४) डॉ. शेकडे,सुभाष, व्यावहारिक मराठी अध्यापनाच्या दिशा, ऋतू प्रकाशन, अहमदनगर, २०१२.
१५) उपयोजित मराठी : डॉ. संजय लांडगे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
१६) अनिवार्य मराठी : डॉ. लीला गोविलकर, केसागर पब्लिकेशन, पुणे.
१७) मराठी कोश व संदर्भसाधने यांची समग्र सूची (इ.स १८००-२००३) संपादक डॉ. वसंत विष्णू कुलकर्णी, राज्य मराठी विकास संस्था, २००७

# १

## वृत्तपत्र माध्यमासाठी लेखन

**घटक रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ वृत्तलेखन

१.२.१ व्याख्या

१.२.२ वृत्तलेखनाचे स्वरूप

१.२.३ वृत्त लेखनाची पद्धती

१.२.४ वृत्तलेखनासाठीच्या महत्त्वाच्या गोष्टी

१.३ पुस्तकपरीक्षण लेखन

१.३.१ ग्रंथपरीक्षकांचे गुण

१.३.२ ग्रंथपरीक्षण कसे करावे?

१.३.३ वेगवेगळ्या साहित्य- प्रकारांतील ग्रंथपरीक्षण

१.४ नाट्य व चित्रपटसमीक्षा

१.४.१ व्याख्या

१.४.२ नाट्यसमीक्षेचे स्वरुप

१.४.३ नाट्यसमीक्षेविषयी काही अभ्यासकांची मते

१.४.४ नाट्यसमीक्षकाचे गुण

१.४.५ नाट्यप्रयोगाचे समीक्षा लेखन करण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी / नाट्यसमीक्षा लेखन कसे करावे

१.४.६ चित्रपटसमीक्षा

१.४.७ चित्रपटसमीक्षेचे स्वरुप

१.५ समारोप

१.६ संदर्भ ग्रंथ

१.७ सरावासाठी प्रश्न

## १.० उद्दिष्टे

१) विद्यार्थ्यांच्या लेखनक्षमतेचा व सृजनशीलतेचा विकास करणे.

२) वृत्तपत्र माध्यमांसाठी आवश्यक लेखन प्रकारांचा परिचय करून देणे व त्या संदर्भातील कौशल्यांचा विकास करणे.

३) मुद्रित दृक-श्राव्य माध्यमांसाठी आवश्यक लेखन कौशल्य शिकविणे.

४) माध्यमांमधील रोजगाराच्या संधीचा परिचय करून देणे.

५) व्यावसायिक लेखनासाठी मराठी भाषेचे उपयोजन करणे.

६) आधुनिक समाजमाध्यमांचा विशेष, परिचय व उपयुक्तता याबाबत जाणून घेणे.

## १.१ प्रस्तावना

मराठी शब्दबंधानुसार एखाद्या साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण, मूल्यमापन करणारे लेखन म्हणजे समीक्षा अथवा समीक्षण होय. एखाद्या संहितेवरील खंडनमंडनात्मक युक्तिवादात्मक, स्वतःचे मत व्यक्त करणाऱ्या स्पष्टीकरणास अथवा विस्ताराने केलेल्या निरूपणास मराठीत 'टीका' असाही शब्दप्रयोग योजला जातो. ग्रंथांशिवाय, नाटक, चित्रपट, संगीत, नृत्य अशा कृतींचेही समीक्षण केले जाते. एखाद्या परिस्थितीचे, साहित्यकृतीचे, कलाकृतीचे, संगीताचे तसेच सामाजिक व राजकीय स्थितीचे अवलोकन करून त्यावर प्रामाणिक मत नोंदवणाऱ्या व्यक्तीला 'समीक्षक' असे म्हणतात. क्रीडा क्षेत्रातील समीक्षेस मराठीत 'समालोचन' असे म्हणतात. समीक्षेसाठी सिंहावलोकन, समालोचन, पुनरावलोकन, परीक्षण, भाष्य, टीका अशा समकक्ष संज्ञा देखील मराठीत वापरल्या जातात. इंग्रजीत Review असा शब्द वापरला जातो. त्याचा शब्दशः अर्थ पुनरावलोकन असा होतो. त्याच क्षेत्रातील लोकांकडून जो Review होतो त्यास इंग्रजीत Peer review अशी संज्ञा उपलब्ध आहे, जी शब्दशः 'समीक्षा' शब्दाशी मिळती जुळती आहे. समीक्षा ही नेहमीच कमी शब्दांत असते. सदरच्या घटकामध्ये आपण ग्रंथपरीक्षण, नाट्य समीक्षा, चित्रपट समीक्षा अशा समीक्षेच्या प्रांतातील बाबींचा विचार करणार आहोत. तत्पूर्वी वृत्तपत्र म्हणजे काय? वृत्तपत्र लेखन याविषयी थोडक्यात विचार करता येईल. वृत्तपत्र हे आजच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहे. आज आकाशवाणी, दूरदर्शन सारख्या वाहिन्यांची वेगाने प्रगती झाली आहे. तसेच उपग्रह या सर्वांमुळे जगभरात घडणाऱ्या घटनांची माहिती आपल्याला क्षणार्धात मिळते आहे. आज एकविसाव्या शतकातही वृत्तपत्रांचे स्थान आणि महत्त्व तसेच टिकून राहिलेले दिसते. वृत्तपत्रे ही केवळ माहिती देणे किंवा बातम्या पुरविणे एवढ्यावरच मर्यादित न राहता ती अधिक विश्लेषक, शिक्षक, सत्यशोधक, मार्गदर्शक, मूल्यरक्षक, समन्वयक, सर्व समाजव्यवहारांची निरीक्षक व टीकाकार अशा सर्वच बाजूने काम करत असल्याचे दिसून येते. वृत्तपत्रामध्ये विविध प्रकारचे लेखन दिसते. त्यामध्ये वृत्तलेखन, अग्रलेख, स्तंभलेखन, वाचकांचा पत्रव्यवहार, वैचारिक लेख, पुस्तक परीक्षण, चित्रपट व नाटयसमीक्षा अशा पद्धतीचे लेखन दिसते. यातील वृत्तलेखन, पुस्तक परीक्षण व नाटय-चित्रपटसमीक्षा लेखन कसे करावे याची माहिती घेऊ. सर्वप्रथम अशा या वृत्तपत्रांविषयी सविस्तर माहिती आपण पाहणार आहोत.

## १.२ वृत्तलेखन

'वृत्तपत्र' या शब्दावरुन आपल्या लक्षात येते की, वृत्त देणारे पत्र म्हणजे वृत्तपत्र होय. वृत्त म्हणजे बातमी. एखादी घटना कोठे घडली?, केव्हा घडली?, कसे घडली?, काय घडले? हे जाणून घेण्याची प्रत्येकामध्ये एक स्वाभाविक, उपजत अशी प्रवृत्ती असते. या प्रवृत्तीमधूनच वार्तांचा जन्म होतो. वृत्तांचा जन्मच वार्ता देण्यासाठी झाला. वृत्तपत्र हे ज्ञान व माहिती मिळविण्याचे प्रमुख माध्यम आहे. जनसंवादाचे ते एक महत्त्वाचे साधन आहे. वृत्तपत्र म्हणजे, 'आजूबाजूला, जवळजवळ आणि जे जे काही घडले त्यातून प्रातिनिधिक, अपवादात्मक असे जे असेल त्याची निवड करून आपल्या ध्येयधोरणानुसार केलेली नोंद.' अशी वृत्तपत्राची व्याख्या करता येते. वृत्तपत्राला जगाचा एक दिवसाचा इतिहास असेही संबोधतात. वृत्तपत्रे आपल्यासमोर चालू घडामोडी, त्यासंबंधीची मतमतांतरे आणि दृष्टिकोन मांडत असतात.

वृत्त म्हणजे बातमी. ज्याला इंग्रजी मध्ये 'न्यूज' हा शब्द वापरला जातो. आपल्या सभोवतालच्या परिसरात सर्वदूर ज्या घटना-घडामोडी घडतात, काही वेगळेपणाने नवीन कार्यक्रम सादर होतात, काही नवीन समजते अशा घटना-घडामोडींची ती देणे म्हणजे बातमी होय. समाजातील नवे-जुने, स्थिती-गती, ताण-तणाव असे काही ना काही घडत असते. आपल्या सभोवताली वेगळेपणाने दिसून येणाऱ्या कोणत्याही बदलाला बातमीचे मूल्य प्राप्त होते. मानवी विचार-प्रवृत्ती, कार्यात, वागण्यात जे काही बदल दिसून येतात त्याला बातमी असे म्हटले जाते. बातमीही आपल्या जीवनातील एक अतिशय महत्त्वाचा घटक आहे. कारण जगामध्ये कोठे काय घडले? हे आपल्याला बातमीद्वारे कळते. म्हणूनच वस्तूस्थितीचे चित्रण करणारी बातमी तयार करणे, बातमी लेखन करणे हे महत्त्वाचे कौशल्य ठरते. बातमी घडून गेलेल्या घटनांची, त्याचप्रमाणे घडणाऱ्या नियोजित कार्याची असते. बातमीमध्ये आपल्याला काय घडले? कधी घडले? कुठे घडले कोण कोण उपस्थित होते? इत्यादी प्रश्नांची उत्तरे मिळतात. बातमी लेखनामध्ये जसे घडले तसे यथातथ्य वर्णन करायला हवे. शालेय स्तरावर साजरे झालेले कार्यक्रम, राबविलेले उपक्रम, उदा. विविध दिन, (मराठी भाषा दिन, वाचन प्रेरणा दिन इ.) स्नेहसंमेलन, वृक्षारोपण, सहल, विविध स्पर्धा वगैरे इ. माहिती देऊन बातमीलेखन केले जाते. तसेच कोणती घटना बातमी होऊ शकते याविषयी जॉन बी. बोगार्ट यांनी उदाहरण दिले आहे, "कुत्रा माणसाला चावला ही बातमी होऊ शकत नाही. पण माणूस कुत्र्याला चावला ही घटना मात्र बातमी होऊ शकते." म्हणजे बातमी होण्यासाठी त्या घटनेत काहीतरी वेगळेपण असावे लागते. राजकीय, सामाजिक, न्यायालीन व गुन्हेगारीविषयक, शिक्षण-क्रीडा, कामगार जगातल्या, करमणूक क्षेत्रातल्या, व्यापारविषयक, औद्योगिक अशा अनेक क्षेत्रातल्या बातम्या वर्तमानपत्रात द्यावयाच्या असतात, त्यासाठी बातम्या मिळवाव्या लागतात. बातमी मिळवणे ही एक कला असते. तत्पूर्वी वृत्तपत्र म्हणजे काय हे पाहण्यासाठी काही व्याख्यांचा विचार आपण इथे करू.

### १.२.१ व्याख्या :

१. वृत्त म्हणजे बातमी होय.

२. वृत्त / बातमीला ऊर्दूमध्ये खबर आणि इंग्रजीमध्ये न्यूज (NEWS) असे म्हणतात.

३. (NEWS)= N–(North), E–(East),W–(West), S–(South) या प्रमाणे चारही दिशांनी म्हणजे चोहोंकडून चालू स्थितीची माहिती सामान्यातल्या सामान्य लोकांपर्यंत पोहोचविणे.

४. एखादी घटना किंवा प्रसंग लोकांना कळावा म्हणून त्याची वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याजोगी माहिती म्हणजे 'बातमी' होय.

५. कै. मा. कृ. शिंदे - "एखादी घटना लोकांना कळावी म्हणून तिची वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्याजोगी माहिती म्हणजे बातमी."

### १.२.२ वृत्तलेखनाचे स्वरूप :

**शीर्षक :**

बातमीला योग्य समर्पक शीर्षक द्यावे. संपूर्ण बातमीचा अर्क बातमीच्या शीर्षकात असतो. शीर्षक आकर्षक असावे. ते वाचताक्षणी वाचकांना बातमीच्या आशयाची ओळख झाली पाहिजे. बातमीविषयी वाचकाच्या मनात कुतूहल व बातमी वाचण्याची उत्कंठा वाचकांच्या मनात झाली पाहिजे.

**वृत्ताचा स्त्रोत :**

शीर्षकानंतरच्या ओळीत हा वृत्ताचा स्त्रोत दिलेला असावा. बातमी कोणी दिली या भागात सांगितले जाते.

उदा. 'आमच्या वार्ताहरांकडून' , 'आमच्या प्रतिनिधींकडून ', 'एक्सप्रेस वृत्तसंस्थेकडून' इ.

**स्थळ व दिनांक :**

बातमीत सांगितलेली घटना कोठे व कधी घडली हे यात सांगितलेले असते. बातमीच्या सुरूवातीलाच हा तपशील येतो. तद्नंतर लागलीच बातमीला सुरूवात करावी.

उदा. राजूर, दि. २२ जून. , मुंबई, दि. २२ जून. , पुणे, दि.२२ जून इत्यादी.

**वृत्ताचा शिरोभाग :**

बातमीचा पहिला परिच्छेद म्हणजे बातमीचा शिरोभाग होय. बातमीचा अत्यंत महत्त्वाचा भाग या शिरोभागात लिहिलेला असावा. म्हणजे वाचकाची बातमी वाचण्याची उत्कंठा शिरोभाग वाचल्यावर पूर्ण होते.

**सविस्तर वृत्त :**

शिरोभागानंतरच्या परिच्छेदात वृत्त सविस्तर द्यावे. बातमीचा मागचा पुढचा संदर्भ या भागात स्पष्ट करावा. बातमीला पूर्णत्व द्यावे.

१. घटनेचा अचूक योग्य तपशील द्यावा.

२. प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचेच लेखन करावे. स्वतःच्या मनाचे अवास्तव लेखन नसावे.

३. बातमी घडून गेलेल्या घटनांवर आधारित असल्याने बातमीचे भूतकाळांत लेखन करावे.

४. बातमी लेखन करताना तटस्थ भूमिका असावी. स्वतःची मते व्यक्त करू नये. थोडक्यात, बातमी ही वस्तुस्थितीदर्शक असावी.

५. एखाद्या समारंभाची बातमी असल्यास आयोजन कोणी केले, अध्यक्ष कोण होते, पाहुणे कोण आले होते यांचा उल्लेख असावा.

६. बातमी लेखनात कोणाच्याही भावना दुखावणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**वृत्त लेखनाची पद्धती :**

बातमी मिळवणे जसे महत्त्वाचे असते, तसेच बातमी लिहिणेसुद्धा तेवढेच महत्त्वाचे असते. कारण बातमी वाचणारा वाचकवर्ग हा वेगवेगळ्या स्तरातला असतो. जसे-आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीने वेगवेगळ्या स्तरातले, नागरिकत्वाची जाणीव असलेले- नसलेले, सुशिक्षित- कमी शिकलेले, जुन्या–नव्या विचाराला धरून चालणारे, राजकीय मते आणि धर्मविषयक जाणिवा असणारे असे. त्यामुळे एखादी बातमी एखाद्याच्या जीवनाशी, व्यवसायाशी संबंधित असेल, तर दुसऱ्याचा त्या बातमीशी काहीही संबंध नसेल. एखादी बातमी एखाद्याच्या मनावर परिणाम करुन जाईल, तर दुसऱ्याला ती क्षुद्र वाटू शकते. उदा. सरकारी नोकरी करुन सुरक्षित जीवन जगणाऱ्या अविवाहित स्त्रीला जी बातमी महत्त्वाची वाटेल ती बातमी चार मुलांच्या रगाड्यात अडकून पडलेल्या गृहिणीला महत्त्वाची वाटेलच असे नाही. म्हणून बातमी लिहिताना समाजाच्या (वाचकांच्या) गरजांचा आणि आकलन शक्तीचा विचार करणे आवश्यक असते.

**१.२.४ वृत्तलेखनासाठीच्या महत्त्वाच्या गोष्टी :**

१) बातमीचा मथळा कमीत कमी (चार ते पाच शब्दात) शब्दात बातमीचा महत्त्वाचा आशय व्यक्त करणारा, वाचकांचे लक्ष वेधून घेईल असा सोप्या भाषेत असावा. उदा. आभाळ फाटून मुंबईत हाहाकार: वाहतूक उद्ध्वस्त.

२) बातमी इतकी अचूक, परिपूर्ण आणि साधार असावी, की ती वाचल्यानंतर वाचकांच्या मनात कसलीही शंका राहू नये. प्रत्येक बातमीच्या अंतरंगात त्या घटनेची पार्श्वभूमी आणि तपशील दिला तर बातमी परिपूर्ण रीतीने समजते आणि वाचकांच्या मनात कोणतेच प्रश्नचिन्ह राहत नाही. बऱ्याचदा बातमीमध्ये पूर्वसंदर्भ द्यावा लागतो.

३) बातमी मांडणीचा क्रम हा अतिशय महत्त्वाचा असतो. बातमीत सर्वात महत्त्वाची गोष्ट (घटना / सरकारी निर्णय / धक्का देणारी घडामोड) प्रथम सांगावयाची असते आणि नंतर त्या बातमीचा वृत्तांत द्यायचा असतो.

४) बातमीत स्थल, काल आणि व्यक्ती यांचा उल्लेख असावा. एखादा नेता किंवा प्रसिद्ध व्यक्ती यांचा संदर्भ असल्यास त्याच्या नावाला बातमीत योग्य ते महत्त्व द्यावे. काही वेळा मथळा थोडक्यात देऊन त्यात महत्त्वपूर्ण व्यक्तींचा नामोल्लेखही आवश्यक असतो.

५) निवेदनाची मांडणी : बातमीचा मथळा प्रारंभी दिल्यानंतर मथळ्याचे स्थूल स्पष्टीकरण द्यावे. त्यानंतर वक्ता कोठे, कोणत्या सभेत, कोणत्या श्रोत्यांपुढे, कोणत्या निमित्ताने बोलत होता त्याची माहिती द्यावी. अध्यक्ष स्थानी कोण होते, शिवाय कोणत्या प्रमुख व्यक्ती त्याप्रसंगी उपस्थित होत्या ( व्यक्ती तितक्या महत्त्वाच्या असल्यास) त्यांचाही

उल्लेख करावा. आणि त्यानंतर'......../ प्रमुख पाहुणे/ मंत्री महोदय पुढे म्हणाले', अशी शब्दसंहिता वापरुन नवीन परिच्छेदाला सुरुवात करावी; आणि त्यात भाषणाचा सारांश द्यावा. वक्त्याच्या पूर्ण नावाचा उल्लेख प्रारंभी एकदा आल्यानंतर पुढे केवळ आडनाव अथवा ज्या लोकप्रिय नावाने वक्ता परिचित असेल त्या नावाचा उल्लेख करावा. त्यामुळे शब्दांची पुनरावृत्ती टळेल.

६) बातमी वस्तुनिष्ठपणे लिहावी. घटनेचे वृत्त जसे घडले तसे द्यावे. काही बातम्यांचा अन्वयार्थ देणे योग्य असते.

७) बातमी वाचल्यानंतर संपूर्ण घटना/ प्रसंग वाचकांपुढे साक्षात झाला पाहिजे. यासाठी संबंधित घटनेचा तपशील पूर्ण व काटेकोरपणे दिला जावा. काय, केव्हा, कोठे, कोणी व का यासहा 'क' काराची उत्तरे वाचकाला मिळाली पाहिजेत, अशा पद्धतीने बातमी लिहावी.

८) बातमी ही सामान्य वाचकासाठी असल्यामुळे ती सर्वांना समजेल अशा पद्धतीने तिचे लेखन करणे आवश्यक असते. साध्या आणि सोप्या भाषेत अचूक बातमी तयार करणे महत्त्वाचे. त्यासाठी दोन व्यवधाने सांभाळावी लागतात.

अ) बातमी ज्या विषयावर असेल त्याविषयातील तज्ज्ञांना बातमी वाचून तिच्यामुळे त्याविषयावर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी.

ब) अगदी  सामान्यातील सामान्य वाचकाला समजेल अशा सोप्या भाषेत मांडणी झाली पाहिजे.

९) वर्तमानपत्रातील बातमी लालित्यपूर्ण आणि आलंकारिक भाषा येथे कटाक्षाने टाळावी.

१०) नेमक्या सुबोध आणि अर्थपूर्ण शब्दांचा वापर बातमीत आवश्यक असतो. वर्तमानपत्रातील मोजकी जागा आणि अत्यंत थोडा वेळ याकडे लक्ष ठेवून बातमी लिहिली पाहिजे. बातमी तपशील असावा, बातमीत अकारण पाल्हाळ आणि शब्द जंजाळ असणाऱ्यांना जॉन रे यांनी पुढील सूचना दिली आहे- He that uses many words for explaining of any subject both, like the cuttle fish, hide himself, for the most part in his own ink.

११) बातमी लेखनाविषयी नियम पाळावेत,.

१२) बातमी लिहीत असताना पुढील पथ्ये पाळावीत.

अ) बातमीत व्यक्ती/ संस्था यांची बदनामी होईल असा मजकूर लिहू नये.

ब) बातमीतील विधाने सत्य आणि नि:संदीग्ध असावीत.

क) घटस्फोट, बलात्कार, क्रूर आणि हिडीस घटना याविषयीच्या बातम्या तारतम्य राखून आणि संयमपूर्ण भाषेत दिल्या पाहिजेत.

१३) बातमीचा मसुदा स्वच्छ हवा. त्यात खाडाखोड नसावी.

१४) चौकटीतील बातमी :- ज्यात काहीतरी जगावेगळा, वैशिष्ट्यपूर्ण किंवा हृदयस्पर्शी किंवा विनोदी आशय असतो, अशा प्रसंगांच्या, घटनांच्या बातमीला शाब्दिक मथळा देता येईल असे नाही. मानवी मन प्रवृत्ती या दृष्टीने ती बातमी महत्त्वाची असते, म्हणून

तिला Human Interest Story असे म्हणतात. अशी बातमी चौकटीत देण्याची पद्धत आहे.

१५) बातमीच्या लेखनाइतकेच वृत्तपत्रातील तिच्या मांडणीला (Lay-Out) आणि मुद्राक्षर रचनेलाही महत्त्व असते. मुद्रणाचे तंत्र आता इतके विकसित झाले आहे, की मुद्राक्षरांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेची मदत घेऊन बातमीची वाचनीयता (Readability) आणि परिणामकारकता वाढवता येते. त्यासाठी बातमी लेखकाला मुद्राक्षरचनाशास्त्राचीही (Typography) माहिती असावयास हवी.

## १.३ पुस्तकपरीक्षण लेखन

मराठीमध्ये पुस्तकपरीक्षणाची सुरुवात इंग्रजी कालखंडापासून झाली असे म्हटले जाते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या ग्रंथपरीक्षणात्मक व ग्रंथकार मीमांसापर लेखनाची नोंद आढळते. प्राचीन मराठी काव्यग्रंथांचे परीक्षण हा सर्वच समकालीन समीक्षकांचा आवडता विषय राहीला आहे. विशेषत: विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी, 'निबंधमाले'तून ग्रंथपरीक्षणाची जी स्वतंत्र परंपरा निर्माण केली ती केवळ काव्य रसिकांच्या भूमिकेतूनच आधुनिक मराठी 'ग्रंथपरीक्षणाचा' पाया श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी घातला. विविध ज्ञानविस्तारातून त्यांनी 'संगीत सौभद्र', 'तोतयाचे बंड', 'रागिणी व तिची भावंडे', इ. ललित कलाकृतींचे त्यांचे ग्रंथ परीक्षण त्यावेळी खूपच गाजले. ग्रंथपरीक्षक हा लेखक व वाचक या दोघांनाही मार्गदर्शक ठरतो, अशी श्री. कृ. कोल्हटकरांची श्रद्धा होती.

कथाकथन, स्वभावलेखन भाषाशैली या दृष्टीने होणारी ग्रंथपरीक्षणे ग्रंथपरीक्षकांची वैयक्तिक पुनर्निर्मित कलाकृतीच होय. नाट्यकृतीची संहिता, व्यक्तिदर्शन, संघर्ष, रसवता, वाङ्मयीन शैली संवाद इ. कडे कलात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी केलेल्या ग्रंथपरीक्षणात चिकित्सेला काव्यात्मकतेची जोड मिळाल्याचे निदर्शनास येते. उदा. आधुनिक कविपंचक. संविधानक, स्वभावलेखन, भाषाशैली उलगडून दाखवण्यात ग्रंथपरीक्षकाचे हृदय उत्कृष्टरीतीने प्रतिबिंबित होऊ शकते. न. चिं. केळकर यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांच्या प्रस्तावनेत कलाकृतीचे भावसौंदर्य उलगडून दाखवताना मधुर भाषाशैलीचा प्रत्यय येतो. प्रा. ना. सी. फडके हे देखील या बाबतीत सौंदर्य शोध व रसग्रहण यांवर भर देतात. साहित्यकृतीत व्यक्त झालेल्या भावभावना, विशिष्ट अनुभव कलात्मक पातळीवरुन घ्यावा असेही प्रा. दि. के. बेडेकर सुचवतात. सत्य, मांगल्य, प्रेम यांप्रमाणे कल्पनारम्य भाव समजून घेतले तर ग्रंथपरीक्षणेही एक कला मानता येईल. वा. ल. कुलकर्णी हे ग्रंथातीलही एक कलासौंदर्याचा शोध घेण्यास प्राधान्य देत होते. विशेषत: श्री.कृ.कोल्हटकर, न. चिं. केळकर, वा. म. जोशी, हरिभाऊ व कृ. प्र. खाडिलकर यांच्या ग्रंथरचनेचे परीक्षनात्मक समालोचन, रसिकता, वर्ण्यविषयाबद्दल आस्था व आस्वादक्षमवृत्ती, चोखंदळपणा, सहृदयता या पातळीवरुनच केल्याचे वाचायला मिळते.

### **१.३.१ ग्रंथपरीक्षकांचे गुण** :

१) ग्रंथपरीक्षणात साहित्यकृतीचे मूल्यमापन समाविष्ट असते. लेखकाने जे लिहिले आहे, त्या कलाकृतीची सर्वांगीण ओळख सामान्य रसिक वाचकांना करून देण्याची आस्था ग्रंथ परीक्षकांजवळ हवी.

२) ग्रंथपरीक्षकाला रसिकता, अभ्यासपूर्ण विद्वत्ता, पांडित्य, लेखक - कवीच्या व्यक्तिमत्त्वाचे पूर्ण ज्ञान (ओळख) व संबंधित साहित्यकृतीची रचनेचे - निर्मितीचे संकल्पनांचे योग्य भान पाहिजे. म्हणजे साहित्यकृतीचे रसग्रहण करण्याची क्षमता हवी.

३) ग्रंथ परीक्षकाला साहित्यकृतीचे रहस्य उलगडून दाखवण्याची विवेचक बुद्धी, साहित्य व्यवहार, वाङ्मयीन संप्रदाय यांचा परस्परांशी असणारा अनुबंध लक्षात घेऊन कलाकृतीचे मूल्यमापन अपेक्षित आहे.

४) ग्रंथ परीक्षकाने आपली मते रसिक वाचकांवर लागू नयेत. वाचकांनाही सहृदयता, अभ्यासू वृत्ती, विचारशक्ती असते याविषयी विश्वास बाळगावा. त्या दृष्टीने अधिक निर्दोष, सर्वांगीण परिपूर्ण ग्रंथपरीक्षण करण्याची क्षमता बाळगण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येते.

५) ग्रंथपरीक्षक बहुश्रुत, चौखंदळ, अभिरुची संपन्न असणे आवश्यक आहे.

६) ग्रंथ परीक्षक पुराणमताभिमानी, संकुचित तसेच ज्ञान - विज्ञान शाखेत नवे विचार - नवे प्रवाह याबाबतीत मागासलेला, पूर्वग्रहदूषित नसावा.

७) कलाकृतीचे अंतरंग उलगडून दाखवताना आवश्यक अशी एकाग्रता, किमान तटस्थवृत्ती बाळगण्यात गैर काहीच नाही.

८) साहित्यकृतीसह कवी, लेखकाच्या पूर्वपरंपरेचे भान, समाज, भाषा, संस्कृती यांच्याशी असणारा ग्रंथकाराचा अनुभव समजावून घेणारा ग्रंथ परीक्षक आपले कार्य चोख बजावतो, याकडे लक्ष वेधण्यात येते.

९) ग्रंथपरीक्षकाने आपले ज्ञान सतत अद्ययावत व परिपूर्ण ठेवावे. आपली अभिरुची, चिंतन - मनन निर्दोष राहण्याइतपत साहित्यव्यवहारात दक्षता बाळगण्यास रसिक व कवी, लेखक यामध्ये त्यांना मानाचे स्थान राहील.

१०) ग्रंथ परीक्षकाला सर्व शास्त्र कला याविषयीचे सर्वसाधारण ज्ञान हवे. देश काल परिस्थिती, संस्कृती, लोकसाहित्य, लोकसंस्कृती, वाङ्मयीन वाद, वाङ्मयीन परंपरा याविषयी साधक-बाधक माहिती पाहिजे. ग्रंथपरीक्षणात योग्य वेळी तारतम्यतेने, विवेचक समतोलबुद्धीने या संकल्पनांचा उपयोग करण्याचे कौशल्य असल्यास ग्रंथ परीक्षण अधिक परिपूर्ण, निर्दोष व वस्तुनिष्ठ होईल.

### १.३.२ ग्रंथपरीक्षण कसे करावे?

#### १. ग्रंथकाराची ओळख / परिचय :-

ग्रंथ परीक्षणासाठी सुरुवातीलाच ग्रंथकार कोण? कोणत्या संप्रदायाशी संबंधित, त्यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन विशेष यासह त्यांना मिळालेले पुरस्कार, मानसन्मान यांचा थोडक्यात निर्देश करणे योग्य ठरते. उदा. “सुप्रसिद्ध ग्रामीण लेखक सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमी प्राप्त कलाकृती 'बारोमास'.” या ओळखीतून त्यांच्याशी संबंधित ग्रंथाचे अंतरंग काय आहे याचाही अंदाज वाचक रसिकांना येतो.

**२. ग्रंथाचे अंतरंग :-**

ज्या ग्रंथाचे परीक्षण करावयाचे त्याचा आशय आणि विषयासंबंधी समर्पकतेने विवेचन करावे लागते. जेणेकरून रसिक, वाचकाची ग्रंथासंबंधी जिज्ञासा जागृत होईल. शिवाय त्या संबंधित टीका - टिपण्णी, मते - मतांतरे याचीही उकल झाली पाहिजे. तसेच ग्रंथातील विविध प्रकरणे, विभाग, खंड, पूर्वार्ध - उत्तरार्ध यांचीही नोंद, परीक्षण विषयाच्या अनुषंगाने घेणे श्रेयस्कर ठरते. ग्रंथ विषयाचे वेगळेपणही सांगितले जाते.

**३. ग्रंथलेखन शैली / वाङ्मयीन सौंदर्य विशद करणे:-**

ग्रंथपरीक्षणात लेखकाचे व्यक्तिमत्त्व, पुस्तक लिहिण्यामागची प्रेरणा, भूमिका सांगून आस्वादक्षम वाङ्मयीन सौंदर्य उलघडून दाखवले पाहिजे. ग्रंथातील जमेच्या बाजू लिहिताना, रस, अलंकार, कल्पना सौंदर्य, प्रतिमा, प्रतीक, शब्दसौंदर्य यांचाही उल्लेख करावा लागतो. काही वेळा काव्यपंक्तीही उद्धृत करून त्यांचे ग्रंथातील स्थान व महत्त्व स्पष्ट करून सांगण्यात येते.

**४. ग्रंथांचे सामर्थ्य व मर्यादा:-**

ग्रंथपरीक्षणात ही एक महत्त्वाची बाजू असून वाङ्मयीन व्यवहारात या ग्रंथाची दखल का घ्यावी लागते हे नमूद करावे. सद्य:स्थितीतील ग्रंथाचे वेगळेपण, त्याचे प्रकाशन विश्वातील स्थान, तसेच प्रस्तावनाकार यांनी लिहिलेल्या विचारांचाही परामर्श घ्यावा. याशिवाय ग्रंथातील दोष, त्रुटी, उणिवा, मर्यादा यांचे सुधारणा विवेचन करणे, याशिवाय ग्रंथाची तांत्रिक बाजू उदा. मुद्रणदोष, कालविसंगती, बाइंडिंग, मुखपृष्ठ, ग्रंथातील आकृती, चित्रे व दिलेला तपशील यांचाही यथायोग्य मूल्यमापनाचा मजकूर समाविष्ट करावा लागतो.

**५. संकीर्ण :-**

यामध्ये ग्रंथलेखक व प्रकाशक, आवृत्ती, पृष्ठसंख्या, किंमत, पुस्तक मिळण्याचे ठिकाण नमूद करावे लागते. आणखी एक म्हणजे ग्रंथपरीक्षणाचा सुरुवातीचा मथळा आकर्षक, ग्रंथविषयानुरूप योग्य शब्दात लक्षवेधी सुटसुटीत असावा. त्या वाक्यातच ग्रंथ परीक्षणाचा मध्यवर्ती आशय समाविष्ट असतो.

**१.३.३ वेगवेगळ्या साहित्य- प्रकारांतील ग्रंथपरीक्षण :**

**१) कथासंग्रह :-** कथा लोकप्रिय, रसिकप्रिय वाङ्मयप्रकार मानला जातो. मानवी भावभावना, मनोविकार, भावसंघर्ष यांचे समग्रतेने दर्शन कथासंग्रहात आढळते. कथा - लघुकथा, नवकथा, दीर्घकथा तसेच रचनेनुसार वर्गीकरण करताना ग्रामीण, दलित, विज्ञानकथा, स्त्रीवादी असेही दुसऱ्या बाजूने विषयानुसार परीक्षण करता येते. कथेतील संघर्ष, व्यक्तिचित्रे, भाषाशैली, जीवनानुभव यांचाही समग्रतेने शोध घ्यावा.

**२) काव्यसंग्रह :-** काव्यसंग्रहाचे परीक्षण मात्र चोखंदळ साक्षेपाने करावे लागते. त्यातील काव्यविषय, काव्यपंक्ती, अनुभूती पारखून घ्यावी लागते. ग्रामीण - दलित, स्त्रीवादी, नवकाव्य, गद्यकाव्य, खंडकाव्य, भावगीत संग्रह, आधुनिक काव्य, चारोळी काव्य, नाट्यगीत याविषयीचे काव्यसंग्रह परीक्षणार्थ घेताना निवडक काव्यपंक्ती, आशयविषय,

लेखनशैलीनुसार विचार करावा लागतो. कवितेतील 'काव्यमयता', 'काव्यदर्शन', वाङ्मयीन सौंदर्याला धरून उलगडून दाखवल्यास परीक्षण औचित्यपूर्ण होऊ शकते.

**३) कादंबरी :-** कादंबरीतील जीवनपट अतिभव्य विशाल असतो. कथानकाची संमिश्र गुंतागुंत, पात्रांची गर्दी, समग्र जीवनदर्शन, संघर्षपूर्ण कथानक, जीवनविषयक तत्त्वज्ञानविचार, सौंदर्य, प्रदेश, स्थळकाळ, वातावरण, वाङ्मयीन सौंदर्य इत्यादी सर्व घटकांच्या आधारे ग्रंथ परीक्षणास वाव राहतो. तसेच कादंबरी लेखन प्रकारानुसार ग्रामीण, दलित, वैज्ञानिक, प्रादेशिक, संज्ञाप्रवाही तथा नवकादंबरी लेखनाचे संकेत परीक्षणासाठी विचारात घेताना अनुवादित, भाषांतरित कादंबऱ्यांचे परीक्षण, मूल्यमापनाचे संकेतही विचारात घ्यावे लागतात.

**४) नाटक :-**नाट्यकृतीचे परीक्षण १) संहिता आणि २) प्रयोग या दोन्ही दृष्टीने करता येते.

**१) संहिता:-** संहितेनुसार विचार करताना नाट्य विषयाचे कथानक, संघर्ष, पात्र, संवादलेखन, स्वगत, सूचकता यांना प्राधान्य देण्यात येते. याशिवाय नाट्यप्रकारानुसार संगीत, सामाजिक, दलित, पथनाट्य, ऐतिहासिक पौराणिक असेही रचना - प्रकार विषय प्रकार उपलब्ध आहेत.

**२) प्रयोग :-** नाट्यप्रयोगाचे परीक्षण विचारात घेत असताना, नाट्यकलावंत, त्यांचा अभिनय, संगीत, नेपथ्य, स्वगत रचना या सर्वांना वगळून नाट्यप्रयोगाचे परीक्षण होऊ शकत नाही.

**५) चरित्रग्रंथ :-** चरित्र नायकाचे जीवन, कर्तृत्व, आगळेवेगळे गुण - विशेष त्यांचे अलौकिक, अद्वितीय लोकोत्तर कार्य, त्यांच्या आदर्शाचे भारावलेपण या गोष्टी चरित्र लेखकाने ग्रंथातून नमूद केलेल्या असतात. याशिवाय चरित्रनायकांच्या जीवनातील सत्य घटना, स्थळ - काळ - वातावरण, व्यक्ती यांचा सच्चा आलेख, वस्तुनिष्ठ चित्रण चरित्र लेखनात आले असल्याची खात्री करून घ्यावी.

**६) आत्मचरित्रग्रंथ :-** यामध्ये 'मी, मला, माझे' यावर आधारित लेखकाने स्वतःच्याच शब्दात लिहिलेली स्वतःची जीवनचरित्र कहानी असते. साहजिकच अशा वेळेत आत्मप्रदर्शन, आत्मगौरव व मत समर्थन याविषयी अधिक भांडवल करून लेखन होणे अपेक्षित नाही. सामाजिक स्थिती, कौटुंबिक खाजगी जीवन, व्यावसायिक जीवन तसेच समकालीन व्यक्ती घटना प्रसंग यांचे दर्शन प्रामाणिक आहे का? याचाही विचार करावा लागतो.

**७) वैचारिक, समीक्षा ग्रंथ** :- समाजात विचारवंत, तत्त्ववेते, समीक्षक, मान्यवर मंडळी प्रबोधनपर लेखन करतात. साहित्य - समाज – संस्कृती, इतिहास, सौंदर्यशास्त्र, राजकारण, सामाजिक स्थिती, स्त्री - जीवन यासह विविध विषयांवरील साहित्यसंशोधन, टीका यावरील ग्रंथांनाही प्रकाशनात वावर राहतो. लेखकांचा जीवनविषयी दृष्टिकोन, संबंधित विषयाचे ज्ञान, त्यांचा व्यासंग, सखोल चिंतन, विद्वत्ता यांचेही दर्शन घडते. धर्म, नीतिविषयक विचारांचे विवेचन पौर्वात्य, पाश्चात्त्य संस्कृतीचे तुलनात्मक दर्शन घडविणारी भाष्यकार मंडळी ही ग्रंथ लेखन करतात.

**८) ललितगद्य :-** या प्रकारामध्ये प्रामुख्याने व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, ललित लेखन, लघुनिबंध, आठवणी, हलकेफुलके रोचक गद्य यांचा ग्रंथपरीक्षणात समावेश होतो. वेगवेगळ्या स्तरातील वैशिष्ट्यपूर्ण स्मरणीय व्यक्तीदर्शने, त्यांचे गुणविशेष यासह प्रवासवर्णनपर ग्रंथ लेखनात प्रवासाची प्रेरणा, भूमिका, स्थळकाल प्रदेश, भेटलेली माणसे, वैशिष्ट्यपूर्ण स्थळदर्शन, प्रवासातील गमती-जमती, सांस्कृतिक परंपरा या संदर्भात दोन प्रदेशांचे तुलनात्मक विवेचन, समाजव्यवस्था, राजकीय पद्धती, याविषयी प्रगती, लेखकात असलेले विविध अनुभव सदरच्या लेखनासाठी विचारात घ्यावे लागतात. वाहतुकीच्या सोयी, निवास-भोजन व्यवस्था, टुरिस्ट गाईड, प्रादेशिक लोकसंस्कृती यासह लोकसंस्कृतीचाही संदर्भ ग्रंथ परीक्षणात येऊ शकतो.

**९) संतसाहित्य :-** संशोधन साहित्यांचा समावेश होतो. त्या दृष्टीने भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, दासबोध, एकनाथी भागवत यांसह वेगवेगळ्या धार्मिक विषयावरील ग्रंथांचे परीक्षण करताना प्रतिपाद्य विषय, मूलगामी टीका समजणे फारच चांगले. धर्म, सांस्कृतिक, पंथीयविषयक दृष्टिकोन, तत्त्वज्ञान, सांप्रदायिक दृष्टी विचारात घ्यावी लागते. त्यावेळेचे स्थळ, काल, वातावरण भाषिक विशेष समकालीन लेखनाचे ग्रंथरचनेचे विशेष गद्य - पद्य शैली इतर पूर्वानुगामी ग्रंथाचा व ग्रंथकर्त्याचा प्रभाव व संबंधित लेखकाचे व्यक्तीविशेष याचीही दखल ग्रंथ परीक्षणात घेण्यात येते

**१०) संकीर्ण विषयावरील लेखन:-** यामध्ये विशेषतः शास्त्रीय वाङ्मय, इतिहास यासह कलाविषयक- शिल्पकला, संगीत, चित्रपट, नाट्यविषयक, विषय ग्रंथलेखनाचा परामर्श घेण्यात येतो. विज्ञान, तंत्रज्ञान, खगोलशास्त्र, अंतराळ विज्ञान, शास्त्रज्ञांची चारित्रे, त्यांचे जीवन कार्य यावर भर देत असतो. मानवी संस्कृतीची जडणघडण होण्यात या शास्त्रांचा मोठा हातभार असतो. व्यक्तिमत्त्वविकास, पाककलाकौशल्य व्यवस्थापनशास्त्र, यासह कोशवाङ्मय, चरित्रकोश विषयावरील निवडक - दर्जेदार उपयुक्त ग्रंथांचा परिचय, परीक्षण जाणकारांकडून करून देण्याचा प्रघात आहे.

उदा. 'मराठी कादंबरी', 'आशय आणि आविष्कार' - डॉ. दत्ता घोलप

अक्षर वाङ्मय प्रकाशनाने प्रकाशित केलेला डॉ. दत्ता घोलप यांचा 'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार' ग्रंथ म्हणजे मराठी साहित्य विश्वातील नव समीक्षकांना एक वेगळा मार्गदर्शक ठरणारा असा ग्रंथ. ग्रंथातील गांभीर्याची ओळख गणेश विसपुते यांच्या मुखपृष्टाने होते.

कादंबरी वाङ्मय प्रकार हा एका विस्तृत अवकाशाला मांडणारा वाङ्मयप्रकार म्हणून ओळखला जातो. समाज, संस्कृती, भाषा यांचा अन्वयार्थ कादंबरीमध्ये लावला जातो. साठोत्तरी काळामध्ये मराठी कादंबरी ही अधिकाधिक जीवनाभिमुख होत गेली. किंबहुना समाजातील जीवनसत्त्वच या पटामध्ये मांडले गेले. मराठी कादंबरी ही तिचा आशय तिच्या रूपबंधाचा आधार घेत आकारास आली. कादंबरी फक्त आकृतीबंधाने आकार घेत नाही तर सामाजिक-सांस्कृतिक आशयातून ती आविष्कृत होत असते. मराठी कादंबरी ज्या समाजामध्ये घडते तो समाज महाराष्ट्रीय समाज आहे. म्हणूनच महाराष्ट्रातील सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीने विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

कादंबरीतून आविष्कृत होत असलेली शैली आणि जीवनानुभव यामध्ये अंतर असते. आकृतिबंधाच्या दृष्टीने प्रयोगशील असते. प्रयोगशीलता आशयभारित असते. या दृष्टीने गेल्या पंचवीस वर्षात मराठी कादंबरीचे रूप कसे बदलत गेले, कोणता आविष्कार प्रकट झाला, कोणते समाजवास्तव मांडले गेले याविषयीचे चिकित्सक विवेचन सदर ग्रंथातून आले आहे.

'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार' या ग्रंथातून दत्ता घोलप यांनी मराठी कादंबरीच्या आशय आणि आविष्काराच्या दृष्टीने अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये कलावाद आणि जीवनवाद यांना बाजूला सारून तसेच कलाकृतीचा आशय आणि आविष्कार यांना स्वतंत्र ठेवून कलाकृतीचा विचार करणे योग्य होत नाही हे साठोत्तरी काळामध्ये मराठी समीक्षेतून दिसते. सुरुवातीपासूनच मराठी समीक्षा ही सामाजिक-सांस्कृतिक चष्म्यातून आकलन करून घेणारी होती मात्र साठनंतरच्या काळात ती अधिकाधिक गडद होत गेली. या स्वरूपाचा विचार सदर ग्रंथाच्या आधारे दत्ता घोलप यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी कादंबरीचे आशयसूत्र आणि रुपबंधाच्या आधारे विवेचन करणाऱ्या या ग्रंथाचे विभाजन दोन भागांमध्ये केले आहे. पहिल्या विभागांमध्ये एकूण सहा लेख असून दुसऱ्या विभागांमध्ये आठ लेखांचा समावेश केलेला आहे. कादंबरीचा आकृतिबंध आणि समाज यांना केंद्रवर्ती ठेवून केलेले विवेचन वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. ग्रंथातील विवेचनाचा मुख्य रोख नव्वदोत्तर कादंबरी मीमांसा करण्याकडे आहे. या ग्रंथातील अकरा लेख हे नव्वदोत्तर मराठी कादंबरीची मीमांसा करणारे आहेत. एकूण चौदा लेखांचा हा ग्रंथ दोन विभागामध्ये विभागलेला आहे. यातील पहिल्या विभागांमध्ये 'आजची मराठी कादंबरी: सांस्कृतिक परिप्रेक्ष', '१९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील प्रयोगशीलता', 'कादंबरी वर्तमानाचे नवे रचित', 'नेमाडे प्रभावातील मराठी कादंबरी', 'भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचे आविष्कारविशेष', 'स्वातंत्र्यपूर्व मराठी ग्रामीण कादंबरी' अशा एकूण सहा लेखांचा अंतर्भाव केलेला आहे. एकूणच भारतीय संस्कृतीच्या अनुषंगाने विचार करून महाराष्ट्रातील समाज संस्कृती नजरेसमोर ठेवून आपले विवेचन केलेले दिसते.

तर दुसऱ्या विभागांमध्ये 'जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवरील आशयघन आविष्कार', 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ : सांस्कृतिक परिप्रेक्ष', 'समकालीन समाज वास्तवाचा पारदर्शी लेखाजोखा : आगळ',' 'ब-बळीचा', ‘कृषीजन संस्कृतीच्या मूल्य व्यवस्थेची पुनर्मांडणी', 'समकालीन भारतीय समाज वास्तवाची फॅन्टसी : 'उजव्या सोंडेच्या बाहुल्या', ‘इन्किलाब विरुद्ध जिहादची कथनव्यवस्था’, ‘ग्राम समूहाच्या स्थित्यंतराचे तळदर्शन’, ‘‘चारीमेरा’ : कृषी संस्कृतीतील कृषीव्यवस्थेतील भू-सांस्कृतिक बदलाचा वेध' असे एकूण आठ लेख आहेत. या विभागांमध्ये मुख्यतः कादंबरीला केंद्रवर्ती ठेवलेले दिसते. नव्वदोत्तरी काळातील समाज वास्तवाच्या चष्म्यातून मराठी कादंबऱ्याकडे पाहिलेले दिसते.

मराठी ग्रामीण कादंबरीची समीक्षा एक विशिष्ट भूमिका घेऊन त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीतील ग्रामीण कादंबरीतील प्रारंभीची कादंबरी, तिची निर्मिती, वाटचाल त्यातील स्थित्यंतरे यांचा शोध घेतलेला दिसतो. १८८८ मधील कृष्णराव भालेराव यांची 'बळीबा पाटील' यांचे योगदान त्यांनी स्पष्ट करून पुढे १९५० पर्यंतच्या

काळातील मराठी कादंबरीचा विचार, तिचे स्वरूप तिची सामाजिकता, संस्कृतिकता याविषयीचा सविस्तर अभ्यास यामध्ये मांडला आहे. यातूनच प्रारंभापासून स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत ग्रामीण कादंबरीचे स्वरूप उलगडताना दिसते. यामध्ये त्यांनी ग्रामीण कादंबरीच्या मर्यादासुद्धा दाखवून दिलेल्या आहेत. गेल्या अर्धशतकांमध्ये कादंबरी लेखन करणारे, देशीवादाची मांडणी करणारे मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे भालचंद्र नेमाडे. नेमाडे यांच्या साहित्याचे अनुकरण करणारा एक 'नेमाडपंथी' वर्ग उदयास आलेला दिसतो. त्यांच्या साहित्याच्या संदर्भात आरोप-प्रत्यारोप करणारी बरीच समीक्षा मराठीमध्ये उपलब्ध आहे. याचे तटस्थ निरीक्षण करणाऱ्या ग्रंथामध्ये डॉ. दत्ता घोलप यांच्या या ग्रंथाचा अंतर्भाव करावा लागेल. यादृष्टीने नेमाडे प्रवाहातील, प्रभावातील कादंबरी, भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांचे आविष्कार विशेष 'हिंदूः जगण्याची समृद्ध अडगळ: सांस्कृतिक परिप्रेक्ष' या लेखांमधून नेमाडे यांच्या कादंबरी लेखनाचा प्रभाव तपासताना तसेच त्यांच्या आविष्कार विशेषांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्यांची सामर्थ्यस्थळे स्पष्ट केली आहेत.

## १.४ नाट्य व चित्रपटसमीक्षा

**नाट्यसमीक्षा :-**

नाटक ही एक दृक–श्राव्य कला आहे. नाटके लिखीत आणि सादरीकरणात्मक (प्रयोगात्मक) अशा दोन्ही स्वरुपात आढळतात. त्यामुळे त्यांची समीक्षा दोन्ही स्तरावरुन होते. प्राचीन नाटकांपेक्षा आधुनिक नाटके खूप वेगळी आहेत. आधुनिक काळात करमणुकीसाठी म्हणून इंग्रजी नाटकांच्या प्रभावातून अनेक मराठी नाटके निर्माण झाली. यातूनच नव्या रंगभूमीचा जन्म झाला. तेव्हापासून साहित्याच्या दृष्टिकोनातून मराठी नाटकांची निर्मीती झाली. नाटकाची संहिता हा कलेचा विषय, तर त्या संहितेचा प्रयोग हा नाट्यकलेचा विषय अशी विभागणी झाली.

नाटकाची समीक्षा संहिता आणि प्रयोग अशा दोन्ही प्रकारे करता येते. संहितेची विविध अंगाने स्वतंत्रपणे समीक्षा करता येते, तर प्रयोगाची समीक्षा मात्र संहितेला धरूनच करावी लागते. कारण नाटकातून व्यक्त झालेला नाट्यानुभव रसिकांपर्यंत पोहोचला आहे की नाही?, नाट्यानुभव कोणत्या कारणामुळे रसिकांपर्यंत पोहोचला ?, त्यात न्यून काय आहे ? हे सर्व समीक्षकाला सांगावे लागते.

**१.४.१ व्याख्या :**

१) "नाट्यकृतींच्या परिणामांचे मूल्यमापन करणे म्हणजे नाट्यसमीक्षा होय."

२) "नाटकाची वाङ्मयीन चिकित्सा आणि नाट्यप्रयोगांचे विवेचन म्हणजे नाट्यसमीक्षा होय." - डॉ. चंद्रकांत धांडे.

३) "नाटकाचे शब्दरुप साकारणारा नाटककार, नाट्यप्रयोगाचा नियंता दिग्दर्शक, नाटककारांच्या पात्रांना मूर्तरुप देणारा नट, नटाची कर्मभूमी असणारा रंगमंच आणि या साऱ्याचा आस्वाद घेणारा रसिक प्रेक्षक – या साऱ्यांना एकत्र गुंफते ते नाटक. नाटकाच्या यशात या साऱ्या घटकाचे महत्त्व असते. या घटकद्रव्याचे प्रमाण यथोचित आहे किंवा नाही हा विचार म्हणजे नाट्यसमीक्षा होय."

४) "नाटककारापासून रंगमंचावरच्या आणि पडद्यामागील तंत्रज्ञानापर्यंत सर्वांनी नाटकाच्या उभारणीत जो वाटा उचललेला असतो त्याचे मूल्यमापन म्हणजे नाट्यसमीक्षा होय."

५) "नाटकाची किंवा संहितेची समीक्षा ही जशी नाट्यसमीक्षा तसेच प्रयोगाचे वेधक वर्णन ही सुद्धा नाट्यसमीक्षाच समजली पाहिजे." – ज्ञानेश्वर नाडकर्णी.

६) "नाटकाच्या दृश्य व श्राव्य स्वरुपाची एकत्रीत समीक्षा म्हणजे नाट्यसमीक्षा होय." – माधव मनोहर.

### १.४.२ नाट्यसमीक्षेचे स्वरुप

नाट्य समीक्षा ही व्यापक संज्ञा आहे. नाटककाराची संहिता आणि रंगभूमीवरील प्रयोग ही नाटकाची दोन अंगे आहेत. संहिता (लिखित) हा आरंभ आणि प्रेक्षकांना येणारी रसप्रतीती ही फलश्रुती असा नाट्यप्रवास असतो. नाट्यसमीक्षा ही केवळ नाटकाच्या संहितेची समीक्षा नसावी तर ती नाट्यप्रयोगाचीही समीक्षा असावी. व. दि. कुलकर्णी यांच्या मते, "नाट्यसमीक्षा ही समीक्षेच्या जातीतील एक वेगळी जात (category) आहे." त्यांच्या मते, 'नाट्यसंहितेतील प्रत्येक शब्दाबरोबर त्या प्रत्येक शब्दाइतकेच रंगमंचावरील त्याच्या अवतारण्याला, अवतारण्याच्या तपशिलाला कलादृष्ट्या समान महत्त्व असते, हे संपूर्णपणे जाणणारे दोघेच जण असतात, एक दिग्दर्शक आणि दुसरा समीक्षक!" जर समीक्षकाचा नाट्यसंहितेपासून ते नाट्यपरिणामापर्यंत सर्व घटकांशी संबंध असेल तरच ती समीक्षा सर्वांगीण होते. समीक्षकास विविध नाट्यांगाचे ज्ञान असायला हवे.

### १.४.३ नाट्यसमीक्षेविषयी काही अभ्यासकांची मते:

**१. पुष्पा भावे-** "एकीकडे कला व्यवहाराच्या संस्काराने समीक्षकाच्या मूल्य व्यवस्थेवर संस्कार होत असतो आणि दुसरीकडे चांगला समीक्षक कला व्यवहारावर संस्कार करीत असतो. अभिरुचीच्या निश्चल अशा प्रक्रियेतला समीक्षक हा एक दुवा आहे."  नाट्य व्यहाराशी समरस होऊन आस्वाद घेणे आणि त्यापासून दूर राहून वस्तुनिष्ठ परिक्षण करणे हे समीक्षकाला एकाच वेळी साधावे लागते.

**२. शंकरराव मुजुमदार-** “कवीचे कल्पनाचातुर्य, सविधानकाचे सौंदर्य, नाटकातील विचार आणि नटाचे अभिनय चातुर्य इत्यादी गोष्टींचे मर्म जाणतेपणाने समजून घेतले पाहिजे.”

**३. माधवमनोहर-** “नाट्यसमीक्षेत मूळ नाट्यवस्तू व नाट्यवस्तूला अनुसरणारा रंगमंचावरील अभिनेता आविष्कार एकत्र अभिप्रेत असतो. केवळ नाट्यसंहितेची समीक्षा ही साहित्य समीक्षा मांडली पाहिजे. नाट्यसमीक्षा अनेकजिनसी असते. मूळ नाट्यवस्तू काव्यरूप असते पण नाटक जोवर रंगभूमीवर सादर होत नाही तोवर त्याला नाट्यरूप प्राप्त होत नाही. म्हणून नाटकाच्या दृश्य व श्राव्य स्वरुपाची एकत्रित समीक्षा म्हणजे नाट्यसमीक्षा होय.” असे त्यांचे मत आहे.

**४. लक्ष्मण देशपांडे-** “समीक्षा म्हटल्यावर नाट्यकृतीच्या गुणदोषांचे विश्लेषण अपेक्षीत आहे. नाटक हा साहित्यप्रकार असला तरी तो जेव्हा रंगभूमीवर येऊ लागतो तेव्हा दिग्दर्शकाच्या माध्यमातून नवी कलाकृती निर्माण होते. नाटकाची भाषा साहित्याला धरून

असते. पोशाख, नेपथ्य, रंगभूषा, अभिनय, स्वर, आवाज ही सुद्धा भाषाच असते. समीक्षकाने कलांचा समग्र प्रसन्न अनुभव प्रेक्षकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे समीक्षा असे मी समजतो."

**५. डॉ. चंद्रकांत धांडे-** "भाषांतरित नाटकांच्या प्रस्तावना, नाटककारांची आत्मचरित्र, नटांच्या आठवणी या सर्व साहित्यामध्ये समीक्षाविचार विखुरलेला आहे असे त्यांना वाटते."

**१.४.४ नाट्यसमीक्षकाचे गुण :**

१) नाट्यसमीक्षकाला नाट्यसमीक्षाही प्रेक्षक आणि रंगकर्मी यांच्यामधील दुवा असल्याचे भान असावे.

२) नाटक करणाऱ्याला करण्याची व पाहणाऱ्याला पाहण्याची दृष्टी देणे हे समीक्षेचे मुख्य कार्य असते.

३) नाट्यसमीक्षकाकडे रसिकता, संवेदनक्षमता, मर्मग्रही सौंदर्यदृष्टी असायला हवी.

४) समीक्षकाची नजर चौकस हवी, चौफेर वाचन हवे.

५) वाचन करताना ते अभ्यासपूर्ण असायला हवे. दैनिक वृत्तपत्रापासून इतिहासापर्यंत आणि चरित्र वाङ्मयापासून कवितापर्यंत सातत्याने वाचन करायला हवे.

६) आधुनिक काळात महत्त्वाच्या असणाऱ्या विज्ञान - तंत्रज्ञान, कृषी पर्यावरणवादी विषयाची ओळख ही त्याला असायला हवी.

७) चौफेर वाचनाबरोबरच नृत्य, संगीत, गायन, चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यकला, अभिनय यासारख्या कलांची ही माहिती त्याला असायला हवी. त्याने या कलांकडे रसिकतेने पाहायला हवे कारण त्या कला नाटकाशी संबंधित आहेत.

८) समीक्षकाने विविध प्रयोगशरण कलांच्या अंतरंगातून वाहणारे समाजजीवनाचे आणि मानवी मनाचे खेळ दाखविणारे प्रवाह, विविध कलांचे विविध प्रदेशात, देशात आणि एकूणच जागतिक स्तरावर असणारे वेगळेपण किंवा साम्य त्याची कारणे याविषयी जाणून घेतले पाहिजे.

९) भारतीय नाट्य परंपरा तिचे स्वरूप वैशिष्ट्ये, पाश्चात्त्य नाट्यपरंपरा तिचे स्वरूप वैशिष्ट्ये, भरतमुनींच्या नाट्यशास्त्राबरोबर पाश्चात्य नाट्यशास्त्र कालौघात त्यात होत असलेले बदल, आधुनिक काळातील रंगभूमीवरचे विविध वर्तमान प्रवाह याविषयीची माहिती मिळवून त्याने अभ्यास केला पाहिजे.

१०) नाट्यप्रयोगाच्यावेळी तो नाट्यानुभवाचा आस्वाद घेत असतो. त्यावेळी त्याची वृत्ती चोखंदळ असली पाहिजे, चांगले काय, वाईट काय हे त्याने अचूक टिपले पाहिजे.

११) पुष्पा भावे यांच्या मते, “कोणत्याही नाट्य प्रयोगाचा श्राव्य अनुभव केवळ त्याच्या भाषिक स्वरूपाशी आणि वाचिक अनुभवाशी निगडित असतो. समीक्षकाला नाटक ऐकताना भाषेचा 'कान' तर असावा लागतोच पण त्याचबरोबर इतरही आवाज 'ध्वनीविशेष' त्याच्या कानापर्यंत पोहोचवावे लागतात.

**१.४.५ नाट्यप्रयोगाचे समीक्षा लेखन करण्यापूर्वी कोणती काळजी घ्यावी/ नाट्यसमीक्षा लेखन कसे करावे :-**

१) ज्या नाट्यप्रयोगाची समीक्षा करायची आहे ते नाटकाचा प्रयोग पाहण्याआधी त्या नाटकाची संहिता वाचावी. समजा नाटकाचा पहिला प्रयोग असेल आणि ते नाटक पुस्तक रुपात प्रकाशित नसेल तर समीक्षकाने नाटककार, कलावंत, दिग्दर्शक यांच्याशी संवाद साधावा.

२) नाटककाराला अपेक्षित असलेला नाट्यानुभव नाटकाच्या सादरीकरणातून प्रत्ययास येतो का? ते पाहावे.

३) नाटकाची प्रकृती जशी असेल, ( ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, कौटुंबीक इ.) त्यानुसार नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत, वेशभूषा केली गेली आहे का ते पाहावे.

४) नाटकाच्या दिग्दर्शकाने नाट्यानुभव देताना अन्य काही तंत्राचा वापर केला आहे का? आणि केला असल्यास कोणत्या तंत्राचा वापर केला आहे तेही पाहावे.

५) नाटकातील मुख्य आणि अन्य पात्रे त्यांचा अभिनय त्या भूमिकेला न्याय देणारा आहे का? असल्यास त्याविषयी आणि नसल्यास का नाही, ते पाहावे.

६) शब्दाचे वजन, दोन शब्दातील अंतर, तसेच डोळ्यातून प्रकट होणारा भाव, शब्दफेक करताना हातांचा केलेला सुरेख वापर, आंगिक अभिनय या गोष्टींचाही उल्लेख करावा. यामुळेच अभिनयातील वेगळेपण, वैशिष्ट्य रसिकांना कळतील.

७) नाटककाराने नाटकाची संहिता नाट्यानुभवानुसार लिहिली आहे, की नाट्यानुभव साकारु शकणारे कलाकार डोळ्यांसमोर ठेवून केली आहे याकडेही दृष्टी टाकावी.

८) नाटक स्वातंत्र आहे, की काल्पनिक; आधारित आहे, की रुपांतरित की भाषांतरित आहे. भाषांतर असेल तर मूळ नाटक कोणाचे आहे?, मूळ नाटक कोणत्या भाषेतील आहे?, त्या नाटकाची किती रुपांतरे आणि भाषांतरे झाली आहेत? मूळ नाटक मिळवून ते वाचावे. त्या मूळ नाटकाचे सामर्थ्य कशात आहे ह्या सर्व गोष्टींचा शोध नाट्यसमीक्षकाने घ्यावा.

९) एखादे नाटक जर कथा किंवा कादंबरीवर आधारित असेल तर ती मूळ कथा किंवा कादंबरी वाचावी. जेणेकरुन कथा किंवा कादंबरीच्या तुलनेत नाटकाचे सामर्थ्य किंवा त्रुटी नोंदविता येतील.

१०) पाश्चात्त्य नाटकांप्रमाणे पाश्चात्त्य कथा/कादंबरीवरुन नाट्यसंहिता लिहिली गेली असेल तर त्यापैकी कोणता आविष्कार चांगला आहे याचाही उल्लेख करावा.

११) जर, जुन्या नाटकाचे नवीन नटसंचातील प्रयोग असेल तर तो पाहण्याआधी जुन्या नाट्यप्रयोगाची उजळणी करावी. जुना प्रयोग आणि नवा प्रयोग ह्यात काय फरक आहे ह्याची नोंद करावी.

१२) नाट्यप्रयोग प्रयोगशील, व्यावसायिक की फार्सिकल आहे याचाही उल्लेख करावा.

१३) नाटकाच्या प्रयोगाची समीक्षा ही त्यावेळच्या प्रयोगावरुन होत असते. जिथे प्रयोग सादर होत आहे तेथील रंगमंच हा महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्रयोगाच्या स्वरुपानुसार माहिती गोळा करुन समीक्षा करावी.

१४) नाटकाचे परीक्षण करताना समीक्षकाला मूळ संहितेतील मध्यवर्ती कल्पना, नाटककाराचे व्यक्तिमत्त्व, दिग्दर्शकाने नाट्यसंहितेची केलेली मांडणी, नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत, पात्रांच्या रंगमंचावरील हालचाली, शब्दफेक, पात्रांचा अभिनय, अभिनयाची जातकुळी, नाटकाच्या यशाचे सामर्थ्य कशात आहे?, स्वतंत्र भाषांतर, रुपांतर, प्रायोगिक-व्यावसायिक, शोकांतिका की सुखांतिका, कौटुंबिक, ऐतिहासिक की राजकीय, सामाजिक की व्यक्तिकेंद्री इ. याविषयाची ही टिप्पणी त्यात असावी लागते. त्यासाठी समीक्षकाचे व्यक्तिमत्त्व सुजाण, व्यासंगी, संवेदनक्षम, मर्मग्राही सौंदर्यदृष्टी असणारे अष्टावधानी असावे लागते.

### १.४.६ चित्रपटसमीक्षा :

'चित्रपट' हे दृकश्राव्य माध्यम असून ते जनसंवादाचे प्रभावी साधन आहे. साहित्याने जीवनाची सर्व अंगे व्यापली आहेत. सिनेमा अर्थात चित्रपट मध्ये अनेक कलांचा संगम झालेला दिसतो. भव्य देखावे, पेंटिंग, नेत्रदीपक फोटोग्राफी, नाट्य, संगीत, नृत्य, कथा, काव्य यांच्यातून चित्रपट सुंदररीत्या गुंफलेला असतो. मानवी मनाला सौंदर्याचे, नाविन्याचे आकर्षण आहे. वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ या सर्वच काळात डोकावण्याचे तसेच रसास्वाद देण्याचे प्रचंड सामर्थ्य चित्रपट या कलेमध्ये आहे. दादासाहेब फाळके, सत्यजित राय, व्ही शांताराम यांच्यासह अनेक दिग्गजांनी या साहित्याच्या आधारेच आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढवल्या आणि एकापेक्षा एक सरस आणि सकस अशा कलाकृती समाजापुढे सादर केल्या. चित्रपट विषयक साहित्य, तंत्रज्ञ कलाकार तसेच रसिकांनाही उपयुक्त आहे. कोठे आहोत? कोठे जायचे? याची उत्तरे साहित्यामुळे मानवाला मिळतात.

गेल्या वीस पंचवीस वर्षात मराठी भाषेमध्ये चित्रपट विषय ग्रंथलेखन होऊ लागले आहे. ग्रंथ हे शब्द बनलेले असते. नाटकापेक्षा चित्रपटांमध्ये कॅमेराद्वारे दृश्याच्या समीप जाऊन ते दृश्य टिपले जाते. या वरदानाचा अचूक वापर करून संवादाशिवाय दृश्य बोलके केले जाते. म्हणूनच म्हटले जाते नाटक ऐकायचे असते आणि चित्रपट पाहायचा असतो. सिनेमा ही केवळ करमणुकीची गोष्ट नव्हे तर ते एक शास्त्र आहे. चित्रपट विषयक लेखनाला एक स्वतंत्र अस्तित्व आहे. हे लेखन म्हणजे चित्रपटकार व वाचक यांच्यातील दुवा साधणे हे त्या लेखकाचे काम आहे.

ल्युमिए बंधूंनी पॅरिस येथे २९ डिसेंबर १८९५ रोजी जगातील पहिला चित्रपट सादर केला. चित्रपटांचे असे अद्भुत प्रयोग त्यांनी वेगवेगळ्या देशात केले. १८९६ मध्ये हा प्रयोग मेक्सिकोमध्ये करण्यात आला. तेव्हा तेथे सुप्रसिद्ध रशियन लेखक मॅक्झिम गॉर्की हे उपस्थित होते. त्यांनी हा चित्रपट पाहिल्यानंतर त्यांना चित्रपटाबद्दल जे वाटले ते त्यांनी लिहिले. हा लेख ४ जुलै १९९६ मध्ये वर्तमानपत्रात छापून आला होता. हीच जगातील पहिली चित्रपट समीक्षा असे म्हटले जाते.

एखादा चित्रपट पाहिल्यानंतर आपल्याला त्या चित्रपटाविषयी जे जे वाटते ते ते सांगणे किंवा लिहिणे म्हणजे चित्रपट समीक्षा होय.

## १.४.७ चित्रपटसमीक्षेचे स्वरुप

### १) विषय :-

चित्रपट समाजातील अनेक विषयांवर आधारित असतात. उदा. धार्मिक, स्त्रियांविषयी, देशप्रेम, ऐतिहासिक, इत्यादी. ज्या चित्रपटाविषयी आपल्याला समीक्षा करायची आहे, तो चित्रपट कोणत्या विषयाशी निगडित आहे त्याचे वर्णन करणे. तसेच तो विषय कशाप्रकारे हाताळला गेला आहे याचे वर्णन करणे.

### २) समाज मनावर होणारे परिणाम :-

चित्रपटामुळे समाजातील लहान मुले, युवक, स्त्रिया, पुरुष यांच्या मनावर काय परिणाम होईल याचा उल्लेख करावा. तसेच तो चित्रपट एका विशिष्ट वयोगटातील मुलांनी पहावा की पाहू नये हे सुद्धा नमूद करावे.

### ३) अभिनय :-

चित्रपटातील नायक-नायिका, खलनायक-खलनायिका यांच्या अभिनयाने त्या पात्राला पुरेपुर न्याय मिळाला आहे का? याचेसुद्धा वर्णन करणे. जसे की, चित्रपटात एखादा दु:खद प्रसंग असला की ते पाहणाऱ्याला रडू येते किंवा एखाद्या खलनायकाची भूमिका इतकी पुरेपुर असते की, प्रेक्षकांच्या मनात त्या व्यक्तिविषयी द्वेष निर्माण होतो.

### ४) भाषा :-

चित्रपटाची भाषा कोणती आहे. एखादा चित्रपट जर अनुवादित असेल तर त्याचेसुद्धा वर्णन करणे. विशिष्ट भाषेतील एखादे वाक्य कशाप्रकारे म्हटले गेले आहे ते पाहणे.

### ५) संवाद:-

चित्रपटातील संवादफ़ेक कसे आहेत, एखाद्या भाषेतील एखादा संवाद विशिष्ट प्रकारे म्हटला जातो. जो कायम समाजातील व्यक्तीमनावर बिंबवला जातो.

### ६) कथानक :-

चित्रपटातील कथानकाचे वर्णन करणे. चित्रपटात अनेक घटनांची क्रमवार रचना असते. या घटना विशिष्ट क्रमाने रचलेल्या असतात. या रचनेतून नटांच्या कृती, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये, भोवतालचे सामाजिक वातावरण, परस्परसंबंधांतून निर्माण होणारे संघर्ष हे सर्व घटक उलगडत जातात. कथेच्या भावाशयासहित नटांच्या कृतीतून निर्माण होणाऱ्या घटनेमधून कथानक उलघडत जाते.

## आपली प्रगती तपासा:

**प्रश्न : तुम्ही वाचलेल्या कोणत्याही ललित साहित्यकृतीची समीक्षा वृत्तपत्रासाठी लिहा.**

## १.५ समारोप:

अशा प्रकारे वर्तमानपत्रातील वृत्तलेखन, पुस्तक परीक्षण, नाट्यसमीक्षा आणि चित्रपटसमीक्षा यावर दृष्टीक्षेप टाकता येतो. वृत्त देणारे पत्र म्हणजे वृत्तपत्र होय. वृत्त म्हणजे बातमी. वृत्तांचा जन्मच वार्ता देण्यासाठी झाला. एखादी घटना कोठे घडले?, केव्हा घडले?, कसे घडले?, काय घडले? वृत्तपत्र हे ज्ञान व माहिती मिळविण्याचे प्रमुख माध्यम आहे. वर्तमानपत्रातील वृत्तलेखन करताना त्याच्या स्वरूपामध्ये शीर्षक,वृत्ताचा स्त्रोत, स्थळ, दिनांक, शिरोभाग, सविस्तर वृत्त यामाध्यमातून सहा क कारांची उत्तरे देत बातमी काळजीपूर्वक लिहिलेली असावी. पुस्तक परीक्षण संदर्भात मूळ ग्रंथ, ग्रंथाचे लेखक, ते ज्या संप्रदायामध्ये लिहितात तो संप्रदाय, त्याची पार्श्वभूमी, ग्रंथ लेखनाची पार्श्वभूमी, ग्रंथातून मांडले गेलेले विचार, ग्रंथाचे सामर्थ्य, मर्यादा, लेखकाचा विचार याविषयी अभ्यास करून नंतर भाष्य करणे योग्य ठरते. नाट्यसमीक्षा करताना संहिता आणि प्रयोग अशी दोन्ही अंगे लक्षात घेऊन नाट्यसमीक्षा करावी लागते. कधीकधी संहिता असेल तर फक्त संहिता विचारात घेता येते. चित्रपट समीक्षेमध्ये चित्रपट, त्याचा परिणाम लक्षात घेऊन त्याचे विषय, कथानक, भाषा, संवाद, अभिनय आणि समाज मनावर होणारा परिणाम लक्षात घेतले जाते. अशा रीतिने वर्तमानपत्रासाठी कोणत्या प्रकारचे लेखन करावयाचे आहे अर्थात त्याचे स्वरूप लक्षात घेऊन वृत्तलेखन, पुस्तक परीक्षण, नाट्य समीक्षा आणि चित्रपट समीक्षा यांचे लेखन करता येते.

## १.६ संदर्भ ग्रंथ सूची

१) व्यावहारिक मराठी. - ल.रा.नसिराबादकर

२) व्यावहारिक मराठी. -डॉ. स्नेहल तावरे ( संपादक)

३) ग्रंथपरिक्षण- स्वरुप आणि संकल्पना.- प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी.

How to read a film - James Monaco

सिनेमाची गोष्ट -अनिल झणकर

The Five C's of cinematography

## १.७ सरावासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१) वृत्त म्हणजे ............होय.
२) बातमीचा पहिला परिच्छेंद म्हणजे बातमीचा .............. होय.
३) संपूर्ण बातमीचा अर्क बातमीच्या ............ असतो.
४) ................ हे जनसंवादाचे एक महत्त्वाचे साधन आहे.
५) ..................... जगाचा एक दिवसाचा इतिहास असेही संबोधतात.
६) मराठीमध्ये ग्रंथ परीक्षणाची सुरुवात ........... कालखंडापासून झाली असे म्हंटले जाते.
७) ....................'निबंधमाले'तून ग्रंथपरीक्षणाची स्वतंत्र परंपरा निर्माण केली.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१) बातमी लिहीत असताना कोणते पथ्ये पाळावीत.
२) वृत्तलेखनाच्या पद्धती स्पष्ट करा.
३) कोणी केलेल्या ग्रंथपरीक्षणात चिकित्सेला काव्यात्मकतेची जोड मिळाल्याचे निदर्शनास येते?
४) कोणत्या दृष्टीने होणारी ग्रंथपरीक्षणे ग्रंथपरीक्षकांची वैयक्तीक पुननिर्मित कलाकृती म्हणून ओळखली जातात?
५) नाट्य समीक्षकाचे व्यक्तिमत्व कसे असावे लागते?
६) नाट्य समीक्षकाचे मुख्य कार्य कोणते?

**क) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) वृत्तलेखन म्हणजे काय? ते सांगून वृत्तलेखनाचे स्वरुप स्पष्ट करा.
२) ग्रंथपरीक्षण म्हणजे काय? ते सांगून ग्रंथपरिक्षणाचे स्वरुप स्पष्ट करा.
३) ग्रंथपरीक्षण म्हणजे काय? ते सांगून ग्रंथपरिक्षणाची उद्दिष्टे स्पष्ट करा.
४) नाट्यसमिक्षेचे स्वरुप स्पष्ट करा.
५) नाट्यसमीक्षकाच्या अंगी कोणते गुण असावेत.
६) चित्रपटसमीक्षेचे उद्दीष्ट स्पष्ट करा.
७) चित्रपट समीक्षेचे स्वरुप स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# आकाशवाणी माध्यमासाठी लेखन

**अ- श्रुतिका लेखन,   ब- नभोनाट्य   क – जाहिरात लेखन**

**घटक रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ नभोनाट्य-श्रुतिका-रूपक आणि इतर वाङ्मय प्रकार व माध्यम रूपांतरणे

२.३ आकाशवाणी कार्यक्रमातील निवेदकाचे स्थान व महत्त्व

२.४ आकाशवाणी कार्यक्रमातील उद्घोषणा

२.५ रेडिओ जॉकी

२.६ रेडिओ जॉकीचे कार्य

२.६.१ रेडिओ जॉकीचे व्यक्तिदर्शन (व्यक्तिमत्त्व)

२.६.२ रेडिओ जॉकीचे निवेदन व भाषाप्रभुत्व

२.६.३ सारांश

२.६.४ नमुना प्रश्न

## २.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१) आकाशवाणी माध्यमाची ओळख, स्वरूप, वैशिष्ट्ये, व्याप्ती, सामर्थ्य व मर्यादा ध्यानात येतील.

२) आकाशवाणी माध्यमातील श्रुतिका लेखन, नभोनाट्य व जाहिरात लेखन, सादरीकरण आणि विविध वाङ्मयप्रकार व प्रसारमाध्यमे यांचे वेगळेपण लक्षात येईल.

३) उपरोक्त तीनही माध्यम लेखनाची भाषिक (श्रवण) कौशल्ये व क्षमता विकसित होतील.

४) नोकरी व्यवसायाची व तद्नुषांगिक कौशल्याची माहिती व आवश्यक लेखन कौशल्यांचे संपादन व उपयोजन करता येईल. तसेच सर्जनशीलतेचा विकास होईल.

५) आकाशवाणीवरील उपरोक्त तीनही माध्यमांतून प्रत्यक्ष कार्यक्रमाचा अनुभव घेता येईल तसेच त्याचे निरीक्षण करता येईल.

६) मराठी भाषा आणि उपरोक्त तीनही माध्यमांचे विद्यार्थ्यांना अद्ययावत व प्रगत ज्ञानाची ओळख होईल.

७) विद्यार्थ्यांची श्रवणक्षमता विकसित होईल. या घटकांच्या लेखनाची व श्रवणाची आवड निर्माण होईल. तसेच माध्यमाचा जनमानसावरील प्रभाव-परिणाम अभ्यासता येईल.

८) उपरोक्त तीनही माध्यम व मुद्रित-इलेक्ट्रॉनिक माध्यमे यांचा परस्परसंबंध व वेगळेपण समजावून देणे.

## २.१ प्रस्तावना

भारतामध्ये नभोवाणीच्या (आकाशवाणी) केंद्राची सुरूवात 1922 मध्ये झाली. इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी मार्फत या कालावधीत मुंबई व कोलकाता (कलकत्ता) येथे आकाशवाणी कार्यक्रमाचे प्रसारण सुरू झाले. म्हैसूर संस्थानमार्फत 1935 साली रेडिओ केंद्राला आकाशवाणी हे नाव दिले. त्यानंतर 1937 मध्ये भारत सरकारने हे नाव स्वीकारले. यथावकाश आकाशवाणी केंद्रे विकसित झाली. केंद्रांची संख्याही सर्व भारतामध्ये मोठ्या प्रमाणात वाढली. यामध्ये लेह, तवांग यासारखी दुर्गम केंद्रे आणि अंदमान, निकोबार, लक्षद्वीप यासारखी दूरची ठिकाणेही समाविष्ट आहेत.

मुख्यतः भारतात आकाशवाणीवरून 21 मुख्य भाषांतून तसेच 246 बोलीभाषांतून कार्यक्रम प्रसारित होतात. यातून ज्ञान, माहिती, मनोरंजन, उद्बोधन ही उद्दिष्ट्ये साध्य होतात. याचबरोबर जास्तीत जास्त लोकांपर्यंत आज भारतीय आकाशवाणी जाऊन पोहोचली आहे. 'बहुजन हिताय-बहुजन सुखाय' हे आकाशवाणीचे ब्रीद आहे.

आकाशवाणीचे जुने रूप पाहताना 1876 मध्ये 'ग्रॅहम बेल'ने लावलेल्या दूरध्वनीच्या शोधातून व पुढे 1895 मध्ये 'मार्कोनी' या इटालियन शास्त्रज्ञाने लावलेल्या बिनतारी संदेश यंत्रणेच्या शोधाचे विकसित रूप म्हणून आकाशवाणीला ओळखले जाते. 1924 मध्ये मद्रास (आजचे चेन्नई) येथे पहिला रेडिओ क्लब स्थापन झाला. पुढे 1926 मध्ये इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी या खासगी कंपनीने भारत सरकारशी करार करून मुंबई व कलकत्ता येथे रेडिओ केंद्र सुरू केले. म्हैसूर संस्थानाने 1935 मध्ये स्थापलेल्या रेडिओ केंद्राचे 'आकाशवाणी' हे नाव भारत सरकारने देशातील सर्व रेडिओ केंद्रासाठी स्वीकारले. 2 ऑक्टोबर 1953 रोजी आकाशवाणीचे पुणे केंद्र सुरू झाले. 'गीतरामायण' हा कार्यक्रम येथेच प्रसारित झाला. 'विविध भारती' याच वास्तुत सुरू झाले अशी माहिती गोपाळ आवटी यांनी दिली आहे.

आकाशवाणीची विदेशी सेवा 54 देशांमध्ये उपलब्ध आहे. उर्दू आणि इंग्रजी भाषांव्यतिरिक्त भारतीय उपखंडातून बोलल्या जाणाऱ्या 7 भारतीय भाषांतून आणि 16 विदेशी भाषांतून विविध कार्यक्रम प्रसारित होतात. आकाशवाणी हे माध्यम भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खाते व शासकीय प्रभावाखाली असलेले संपर्क माध्यम आहे. राष्ट्राच्या

निर्मितीला व समाजाच्या विकासाला हातभार लावण्यासह दुसऱ्या बाजूने जबाबदार, सुज्ञ नागरिक बनविण्याची जबाबदारी आकाशवाणी ह्या माध्यमावर असते. तसेच नवराष्ट्र निर्मिती, सर्वांगीण विकास, राष्ट्रीय एकात्मता, सर्व धर्म समभाव, भाषिक एकात्मता यासाठीही भारतीय आकाशवाणी कार्यरत असते. सरकारी योजना, सरकारची धोरणे, उद्दिष्टे आणि शासकीय-राष्ट्रीय कार्यक्रम व त्यातील संदेश लोकांपर्यंत पोचविण्यासही आकाशवाणी आघाडीवर आहे. शासकीय नियंत्रण असल्यामुळे आकाशवाणीला कार्यक्रम सादर करताना सजग रहावे लागते व जबाबदारीने कामकाज पाहावे लागते, करावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्यांमार्फत प्रसार भारती ह्या महामंडळांतर्गत आकाशवाणी व दूरदर्शन केंद्राचे कामकाज चालते. आकाशवाणीचे महानिदेशक खात्याच्या मंत्र्यांनी सुचविलेल्या आणि प्रसारभारती मान्यताप्राप्त योजना कार्यान्वित करतात. आकाशवाणीवरून प्रामुख्याने संगीत, नाटक, निवेदन व निरूपणप्रधान कार्यक्रम, बातमीपत्र, महिलांसाठी आणि बालकांसाठी कार्यक्रम, ग्रामीण आणि शेतीविषयक कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम तसेच राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत येणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचाही यामध्ये समावेश असतो. त्यापैकी प्रस्तुत अभ्यासक्रमात आकाशवाणी माध्यमांसाठी श्रुतिका लेखन, नभोवाणी आणि जाहिरात लेखन यांचा अभ्यास आपल्याला करावयाचा आहे.

आकाशवाणीला मागच्या काळात (ब्रिटिश राजवटीत) 'इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी' असे म्हटले जात होते. याच्या पुढील काळात 'इंडियन ब्रॉड कॉर्पोरेशन' आणि स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात प्रामुख्याने 'ऑल इंडिया रेडिओ' या नावाने ओळखले जात होते. यथावकाश भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण विभागाकडून भारतीय आकाशवाणीचे कामकाज सुरू करण्यात आले. हिंदी आणि इंग्रजीतील राष्ट्रीय कार्यक्रम सादर होण्यासह स्थानिक प्रादेशिक भाषेतूनही कार्यक्रम प्रसारण होण्यास प्राधान्य मिळाले. मुंबई येथे आकाशवाणीचे मुख्य कार्यालय असून आकाशवाणी केंद्र देखील मोठ्या संख्येने विस्तारली आहेत. आज संपूर्ण देशभर एफ.एम. केंद्र आणि लघुलहरी केंद्रांमधून विविध कार्यक्रमांचे प्रसारण व सहक्षेपित करण्यात येतात. राष्ट्रीय व स्थानिक पातळीवरील कलाकार, नेते, नामवंत वक्ते, मंत्री महोदय, अधिकारी, जाणकार विशेष तज्ज्ञ मंडळी यांना कार्यक्रमांसाठी निमंत्रण दिले जाते. आकाशवाणीचे विविध कार्यक्रम भारतासह सर्व दूर ठिकाणी सादर करण्याचे धोरण आहे. भारतीय मुख्य एकवीस भाषेतून व अनेक बोलीभाषेतूनही, विदेशी भाषेसह कार्यक्रम सादर करण्याविषयी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. शासकीय धोरणास अनुसरून मर्यादित स्वातंत्र्य आणि अभिव्यक्तीच्या कक्षा सांभाळून अधिक सजगतेने कार्यक्रम सादर करण्याचे आव्हानच आकाशवाणीला पेलावे लागते.

आकाशवाणी (रेडिओ) हे फक्त श्राव्य माध्यम असून आजही भारतातील ग्रामीण, दुर्गम, डोंगराळ भागात विजेच्या अभावी किंवा वीज वितरणाच्या समस्येमुळे सर्वसामान्य जनतेला आकाशवाणी (रेडिओ) हेच साधन जवळचे व सोयीस्कर वाटते. छोटासा रेडिओ प्रवासात, शेत-मळ्यावर, कार्यालयात व इतरत्रही जवळ ठेवता येतो व हवे ते कार्यक्रम ऐकता येतात. विशेषतः कानसेनांसाठी संगीत-नाटक, चित्रपट गीत-संगीत कार्यक्रमांची पर्वणीच असते. शिवाय इतर विविध कार्यक्रमही लोकप्रिय रसिकप्रिय असतातच! जिथे-तिथे दूरदर्शन संच नाहीत वा सोशल मीडिया-साधने (मोबाईल रेंज) उपलब्ध नाहीत. मागच्या काळात

खेळांच्या धावत्या वर्णनाचे प्रक्षेपण ऐकताना जणू काही ते डोळ्यासमोर उभे राहते! त्यातील संवेदनशील अनुभूतीचाही प्रत्यय येतो. अर्थात यामध्ये समालोचकांचे खास कौशल्यही वाखाणता येते.

आकाशवाणीवरील कार्यक्रम रसिक श्रोत्यांना आपल्या आवडीनुसार व सोयीनुसार ऐकता येतात. साक्षर-निरक्षर-उच्च शिक्षित-अल्पशिक्षित यांचेसह समाजातील सर्व घटकांसाठी (कौटुंबिक पातळीवरही) कार्यक्रम श्रवणाचा लाभ घेता येतो. सर्वसामान्य जनतेचे मनोरंजन, प्रबोधन करण्यासह त्यांना माहिती पुरविणे, मार्गदर्शन करणे, सरकारी कार्यक्रम उपक्रम जनतेपर्यंत पोचविणे यासह जनमत तयार करणे. त्यात बदल घडवून आणणे याकरिता आकाशवाणीसारखे संपर्क माध्यम उपयुक्त आहे. विशेषतः राष्ट्रीय कार्यक्रमात जनतेला सहभागी करून घेणे त्यांना योग्य तो संदेश देणे यासाठी आकाशवाणीवरूनही प्रक्षेपणास प्राधान्य मिळते. ह्याशिवाय स्थानिक, प्रादेशिक भाषेसाठीही आकाशवाणीवर नियोजित वेळ उपलब्ध असतो. कार्यक्रमांतील विविधता, सुश्राव्य-स्पष्ट आवाज, सुगम-हळूवार, मधुर संगीताची जोड आणि उत्कृष्ट निवेदन. या वैशिष्ट्यांमुळे आजही आकाशवाणी आपले स्थान टिकवून आहे. 'बहुजन-हिताय-बहुजन सुखाय' हे आकाशवाणीचे ब्रीद असून ते किती सार्थ आहे याची खात्री पटते. उत्तम आवाज, उत्कृष्ट संवाद आणि संभाषण कौशल्य, कार्यक्रमाचे प्रभावी-परिणामकारक निवेदन, लक्षवेधी वक्तृत्वशैली, यासह बहुश्रूतपणा आणि दांडगा जनसंपर्क असणाऱ्यांना आकाशवाणीवर नोकरी-व्यवसायाच्या भरपूर संधी असल्याचे चित्र पाहायला मिळते. अर्थात त्यासाठी त्या त्या क्षेत्रातील पात्रता, गुणवत्ता आणि कौशल्ये अंतर्भूत आहेतच हे वेगळे सांगणे नकोच!

तरीही आकाशवाणीवरील कार्यक्रम फक्त एकदाच व तेही नियोजित वेळेतच ऐकणे शक्य असते त्यामुळे श्रोत्यांना आकाशवाणीवरील कार्यक्रमाची वेळ पाळणे बंधनकारक व कधीकधी गैरसोयीचेही ठरते. शिवाय यातील व्यक्ती कार्यक्रमाच्या वेळेस पाहता येत नाही. आवाजावरून ओळख कळून येते. त्या अर्थाने आकाशवाणीच्या काही मर्यादा, त्रुटी समजतात. फक्त 'श्राव्य' माध्यम म्हणूनच त्याकडे काही श्रोतृवृंद दुर्लक्ष करतात.

आकाशवाणी केंद्रात केंद्रप्रमुख, कार्यक्रम निर्मिती विभाग, जाहिरात विभाग आणि प्रसारण, प्रक्षेपण विभाग, वृत्तविभाग ह्या अंतर्गत वेगवेगळे कार्यक्रमाचे प्रसारण करण्यात ह्या कार्यक्रमांतर्गत सादरीकरण करण्यास अधिकारी व कर्मचारीवृंदाचे सहकार्य लाभते. तसेच आकाशवाणीसाठी लेखणात भाषण, मुलाखत, रूपक, संवाद, बातमीपत्रे, विशेषवृत्तांत, लेखन, श्रुतिका, नभोनाट्य लेखन, शैक्षणिक कार्यक्रमांचे लेखन, वार्तापत्र, संगीत विषयक कार्यक्रम, गीत-संगीत विषयक कार्यक्रम क्रीडा विभाग यांचा समावेश असतो. वाङ्मयीन व कलाविषयक कार्यक्रमांतून रसिक श्रोतृवृंदांची अभिरूची उन्नत करून त्यात योग्य ते वळण लावण्याचे कार्य केले जाते. तसेच रसिक जाणकार श्रोत्यांकडून आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमांचे मूल्यांकन करून घेताना त्यातील त्रुटी व मर्यादा दूर करण्याविषयीचे आश्वासन देण्यात येते. श्रोत्यांच्या पत्रव्यवहारातून व अद्ययावत संपर्क प्रणालीतून श्रोत्यांचे अभिप्राय येत असतात. त्यांचेसाठीही खास कार्यक्रमांचे आयोजन केले जाते आणि श्रोत्यांच्या मतांचा विचार करण्यात येतो. आकाशवाणीचे नियम व अटी यांच्या अधीन राहून श्रोत्यांना भेटीचे निमंत्रणही दिले जाते व त्यांना विभागातील कामकाजाविषयी माहिती दिली जाते. आकाशवाणीकडे विविध दुर्मिळ ध्वनिमुद्रितफितींचा समृद्ध संग्रहालय आहे. त्याविषयी

ऐतिहासिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वही त्यामुळे लक्षात घेता येते. विशेषतः गीत, संगीत, भाषण विषयक ध्वनिमुद्रितांचा संग्रह वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

ज्ञान-माहिती-तंत्रज्ञानाच्या आजच्या जागतिकीकरण, नव-जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक काळात करमणूक, मनोरंजन क्षेत्रात विविध माध्यमांची चलती आहे. तसेच रसिक-प्रेक्षकांना विविध माध्यमे व साधनेही उपलब्ध झाली आहेत. तरीही केवळ ध्वनीवर आधारित हे ऐकमेवाद्वितीय माध्यम म्हणजेच आकाशवाणी होय! यामध्ये फक्त शब्द, संवाद आणि संगीत व ध्वनीसंकेत यांच्या साहाय्यानेच कार्यक्रम प्रसारित केले जातात. यातील कार्यक्रमातील भाषा सोपी, छोटी वाक्यरचना, श्रवणसुलभ नादमय भाषा, लयबद्ध आवाज, इ. विशेष मानताना आकाशवाणीवरील कार्यक्रमांचे निवेदनही प्रवाही गतिमान शैलीत, श्रवणसुलभ अशा पद्धतीने सादर केले जाते.

अलीकडील काळात आकाशवाणीकडे अत्याधुनिक नवीन डिजिटल तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. ह्या सुविधेमुळे कार्यक्रम नावीन्यपूर्ण, लक्षवेधी, आकर्षक स्वरूपात सादर होऊ लागले आहेत. तसेच मुख्य म्हणजे विविध भारती ही विज्ञापनसेवाही सुरू झाल्याची माहिती मिळते. इतर माध्यमांप्रमाणेच आकाशवाणीवरही जाहिराती प्रसारित होतात. त्यामुळे ते देखील उत्पन्नाचे एक महत्त्वपूर्ण साधन झाले आहे.

आकाशवाणी माध्यमांतील प्रस्तुत अभ्यास घटकात श्रुतिकालेखन, नभोनाट्य लेखन व जाहिरात लेखन याविषयी ठळकपणे लिहिताना हे माध्यम प्रभावी ठरण्यासाठी प्रामुख्याने 'श्राव्यभान' अधिक सजग असणे जरूर असते. सर्व कार्यक्रम मुख्यतः 'ध्वनी' (आवाज) या द्वारेच व्यक्त होतात एवढे समजले तरी आकाशवाणीचे बलस्थान लक्षात घेता येते, अधिक तपशीलवार माहिती व लेखनही पुढे दिलेले आहेच!

महाराष्ट्र राज्यात 28 आकाशवाणी केंद्रे आहेत. पुणे, नागपूर, जळगाव, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, परभणी, रत्नागिरी ही त्यातील काही मोठी केंद्रे आहेत. यातील 'पुणे आकाशवाणी' हे मध्यम लहरी चॅनेल आणि 'विविध भारती पुणे 101 एफएम चॅनेल' असे दोन रेडिओ चॅनेल कार्यरत आहेत. 'ग्लोबल मराठी', 'संस्कृतीच्या पाऊलखुणा', 'युवावाणी', 'व्यक्तिवेध', 'सप्ताह विशेष चर्चा' हे कार्यक्रम जगभरात लोकप्रिय आहेत.

आणखी एका विशेष गोष्टीची नोंद करताना आकाशवाणीच्या 240 पेक्षा अधिक वाहिन्या 85 पेक्षा अधिक देशांत 'न्यूज ऑन एअर' या प्रसारभारतीच्या अधिकृत ॲपद्वारे ऑनलाइन पद्धतीने ऐकल्या जातात. रेडिओच्या इतिहासात प्रथमच प्रसारभारतीच्या श्रोता संशोधन टीमने ॲपवरील आकाशवाणीच्या ऑनलाइन श्रोत्यांच्या संख्येची वर्गवारी केली आहे.

## २.२ नभोनाट्य, श्रुतिका, रूपक आणि इतर वाङ्मयप्रकार व माध्यम रूपांतरणे – वैशिष्ट्ये

१) कथा-कादंबरी-कविता-नाटक-आत्मकथा-चरित्र व निबंध लेखन हे अर्वाचीन वाङ्मयप्रकार आहेत.

२) नाटक दृक-श्राव्य स्वरूपात सादर होताना त्यात नाटककार, निर्माता, दिग्दर्शक, संगीत, रंगमंच (नेपथ्य) व कलाकार आवश्यक असतात. नाटक हे अनेक प्रेक्षकांच्या

समोर सादर केले जाते. प्रेक्षकांना नाटक प्रत्यक्ष रंगमंचावर ऐकता येते-पाहायला मिळते.

३) एकांकिकेत कालावधी अंदाजे ३० मिनिटांचा असतो. त्यात मर्यादित पात्रे असतात. रंगमंचाची आवश्यकता असते. एकांकिका-नाटकात पात्रे आणि संवाद आवश्यक असतात.

४) पथनाट्य हे मुख्यतः रंगमंचविरहित असू शकते. सार्वजनिक ठिकाणी, चौकाचौकात, बाजारात सोयीस्कर ठिकाणी गर्दीच्या वेळेत सादर केले जाते. (वेळ - ३० मिनिटांचा अवधी)

५) एकांकिका-नाटक-पथनाट्य यांच्याही स्पर्धा असतात. त्यासाठी काही नियम असतात.

६) एकांकिका (वन ॲक्ट प्ले) तर नाटकात साधारण दोन अंक व त्यातही प्रवेशानुसार रचना असते.

७) एकांकिका व नाटकात केशभूषा, वेषभूषा, संगीताची जोड दिली जाते. ठराविक दिवशी, ठराविक वेळेतच रंगमंचावर सादर करण्याचा प्रघात असतो.

८) कविता लेखन व सादरीकरण एकपात्री असते, हा वाङ्मयप्रकार भावविणारा, भावस्पर्शी असतो. कविता गायनानुकूल पद्यमय व गेय असते.

९) कविता, कादंबरी, कथेचे वाचन आपण आपल्या सवडीने कोठेही करू शकतो. कथेचा आवाका छोटासा, मर्यादित स्वरूपाचा असतो. कादंबरी लेखन विस्तीर्णतेने, बहुपृष्ठसंस्थेत, अनेक प्रकरणात मुद्रित स्वरूपात लिहिली जाते. कादंबरीचे नाट्य रूपांतर व सिनेमा रूपांतरणही केले जाते. कथेचे रूपांतरणही नभोनाट्यात होऊ शकते.

१०) नाटक-एकांकिका यामध्ये अभिनय, संवाद, पात्रे, कथासंघर्ष अंतर्भूत असतात. तर नभोनाट्यात मर्यादित पात्रे व संवाद रूपाने ते सादर होताना, ते फक्त आकाशवाणीवरील श्राव्य माध्यम ठरते, वेळही फक्त ३० मिनिटे. नाटक व एकांकिका मधील पात्रे लेखकाच्यावतीने बोलत असतात. या दोन्हींमध्ये संघर्षनाट्य-उत्कर्षबिंदू लक्षवेधी ठरतो. एकांकिका-नाटक देखील आकाशवाणीवर श्राव्य स्वरूपात सादर होतात.

११) कादंबरी-कथा लेखनाच्या पद्धती व प्रकार आणि नाट्यलेखनाच्या पद्धती व प्रकारही वेगवेगळे व ठरलेले असतात. मात्र तरीही कादंबरी-नाटक-नभोनाट्य, एकांकिका, पथनाट्य यामध्ये व्यक्तिदर्शन, (पात्र) संवाद, नाट्यमयता, संघर्ष, भावदर्शन-कथानक इ. काही समान गुणधर्म अंतर्भूत असतात.

असे हे साधारण गुणविशेष व वेगळेपण सांगता येतील. आकाशवाणी हे सर्वात जलद, वेगवान असे श्राव्य माध्यम म्हणून ओळखले जाते. माहिती व संदेशाचे प्रसारणही शक्य तितक्या लवकर होऊ शकले. मागच्या काळात 'किल्लारी' येथे झालेल्या तीव्र भूकंपाची

माहिती आकाशवाणी वृत्तांकनामुळेच सर्वत्र वेगाने पोचली. त्यामुळे मदत कार्य, बचावकार्य देखील सुरू करण्यात आल्याची माहिती मिळते. आजही हवामान अंदाज, आपत्कालीन परिस्थिती संबंधी संदेश आणि माहिती सर्वसंबंधितांपर्यंत पोहोचवण्यात आकाशवाणीसारखे माध्यम उपयोगी पडते.

श्रुतिकादेखील आकाशवाणीचे श्राव्य माध्यम आहे. यामध्ये नाटक, काव्यवाचन, विषय चर्चा, संवाद, मुलाखती यांचा आवश्यक तो भाग घेऊन ते लेखन श्रुतिकेसाठी पुन्हा लिहिले जाते. श्रुतिकादेखील मर्यादित वेळेसाठी सादर करताना त्यात विषयाचे नावीन्य असते.

## २.३ आकाशवाणीवरील कार्यक्रमातील निवेदकाचे स्थान व महत्त्व

१) आकाशवाणीतील निवेदक (प्रवक्ता) - यांच्याविषयी लिहिताना कार्यक्रमाचे नियोजन-व्यवस्थापन करणे. यासह कार्यक्रम नियोजित वेळेस (योग्य त्या दिवसात) पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडतो.

२) निवेदकाकडे सोपविलेला कार्यक्रम विषयस्वरूप, योग्य त्या पद्धतीने सादर करण्यासाठी लक्ष द्यावे लागते. तसेच कार्यक्रमासाठी कलाकार निवड, वक्ते, संगीत नियोजन, लेखक, दिग्दर्शक यांची नावे निश्चित करून कार्यक्रम आयोजित करणे, सादर करणे गोष्टी काळजीपूर्वक पहाव्या लागतात.

३) व्यक्तिगतदृष्ट्याही श्रोतृवृंदांना आवडणाऱ्या कार्यक्रमात लक्ष वेधून घेण्यासह, कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत लक्ष वेधून घेण्यासह, कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत अवधान टिकविण्याचे आव्हान निवेदकाला स्वीकारावे लागते.

४) कार्यक्रमाचे निवेदनही स्पष्ट आवाजात, श्रवणसुलभ, अलंकार व बोजड शब्दविरहित, थोडक्यात, मुद्देसुद व सुगम शैलीत करावे असा संकेत असतो. भाषिक सरमिसळ असू नये. त्यात विद्वत्ता प्राचुर्य नकोच. कृत्रिम, नाटकी परिभाषा श्रोतृवृंदांना आवडत नाही.

५) आकाशवाणी हे फक्त श्राव्य माध्यम असताना निवेदकाची प्रवाही भाषाशैली, धारदार वक्तृत्व, चित्रमय शैलीत वर्णन व्यक्त होणारी असते. निवेदनातून घटना प्रसंगाचे अनुरूप दर्शन श्रोत्यांना घडविता आले पाहिजे. त्यातच कार्यक्रमातील निवेदकाच्या यशाची पावती मिळते. निवेदनात ठळक व महत्त्वाच्या मुद्द्यांना स्थान देत कार्यक्रम अभिरूचीसंपन्न करण्याची जबाबदारीच निवेदक पार पाडीत असतो.

## २.४ आकाशवाणी कार्यक्रमातील उद्घोषणा

आकाशवाणीवरील कार्यक्रमाचे नाव, (शीर्षक-उपशीर्षक) सादरकर्ते, कलाकार यांची नावे आणि वेळ यासाठी निवेदकांची नियुक्ती केली जाते. निवेदकाकडून योग्य त्यावेळी कार्यक्रमांची उद्घोषणा करून कार्यक्रम प्रसारित होतो.

काही कार्यक्रम दिल्ली, मुंबई व आकाशवाणीच्या इतर केंद्रावरून सहक्षेपित केले जातात. उदा. दिल्लीवरून दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांची वेळ सर्व भारतभर एकच असते.

त्यावेळी उद्घोषक स्थानिक कार्यक्रम संपवून दिल्लीवरील प्रसारित बातम्यांची वेळ घोषित करतो. अशा तऱ्हेने कार्यक्रमांच्या अदलाबदलीची घोषणा निवेदक करतो.

निवेदक कार्यक्रमाचे स्वरूप सांगून श्रोत्यांचे लक्ष वेधून घेतो. कार्यक्रमातील वेगळेपण, प्रारंभ याविषयीची भाषा श्रोत्यांना आकर्षक व प्रभावी रीतीने निवेदक सादर करतो. अनावश्यक, पाल्हाळीक तपशील टाळून योग्य त्या समर्पक शब्दात व्यावहारिक भाषेत निवेदक कार्यक्रमाची उद्घोषणा करतो. सर्वांना सहज समजेल अशी भाषा निवेदकाकडून वापरली जाते. अन्यथा श्रोत्यांशी संवाद साधताना कृत्रिमता वाटते. शिवाय श्रोतेही उत्कृष्ट निवेदनाअभावी कार्यक्रमाशी, एकरूप होत नाहीत व रसास्वादात अडथळा निर्माण होतो. निवेदनातील वाक्येही लहान-सहान ठेवावी लागतात. त्यामुळे ती श्रवणास व आकलनास सुलभ होतात.

आकाशवाणीतील कार्यक्रमाचा श्रोत्यांवर परिणाम साधताना व प्रभाव निर्माण करताना श्रोत्यांचे लक्ष सुरूवातीपासूनच वेधून घेण्याची जबाबदारीच निवेदकाची असते. त्यासाठी सरळ-सोप्या शब्दात विषय-आशयानुरूप निवेदन करावे लागते. त्यातील मुख्य व मध्यवर्ती कल्पना, विचारसौंदर्य, श्रोत्यांच्या मनावर ठसले पाहिजे यासाठी निवेदक काळजी घेतो. निवेदन क्लिष्ट असून चालत नाही. केवळ भाषिक अभिनयातून निवेदन करण्याचे कौशल्य असते. हेही लक्षात घेतले पाहिजे. निवेदकाने श्रोत्यांशी संवाद साधताना, थोडासा क्षणभर विराम (पॉज) घेताना, ती जागा संगीताने, ध्वनीने भरून काढली जाते.

स्थानिक मर्यादित अंतरातील एफ.एम.चे प्रसारण १९९० च्या सुमारास आकाशवाणीने सुरू केले. एफ.एम. प्रसारण मुख्यतः ८०-९० किमीच्या परिघात श्राव्य स्वरूपात स्पष्ट व सुश्राव्यतेने ऐकायला मिळते. विशेषतः सामाजिक स्थितीगतीला अनुसरून लोकसंस्कृती व लोकव्यवहार, लोकभाषा यांना मध्यवर्ती ठेवून प्रसारण केले जाते. ह्या कार्यक्रमात संगीत, साहित्य, संस्कार, व्यापार विषयाचा समावेश करण्यासह स्थानिक बोलीभाषांना देखील प्राधान्य मिळते. आकाशवाणीप्रमाणेच यातील 'विविधभारती'ची सेवा सुरू असते. गीत, संगीत, चित्रपट, खेळ, कलाविषयक माहिती आणि गप्पा या स्वरूपात श्रोत्यांशी संवाद साधण्यात येतो. स्थानिक कलाकारांना येथे संधी दिली जाते. प्रेक्षक, श्रोतेही त्या त्या परिसरातील स्थानिक असल्याने रसिकतेने कार्यक्रम ऐकले जातात. लोकसंगीताच्या कार्यक्रमासह जरूरीप्रमाणे इतर कार्यक्रमातही लोकसंगीताचा बाज वापरला जातो. विविध प्रसार माध्यमांप्रमाणे एफ.एम.चे प्रसारणही आजच्या घडीला लोकप्रिय ठरले आहे असे दिसून येते. दिवसभरात ठराविक वेळेत विविध स्वरूपात कार्यक्रम सादर होतात. उदा. साहित्य, लोककला, लोकसंस्कृती, परंपरा इ. विषयक कार्यक्रमांचा समावेश यात असतो. हे सर्व कार्यक्रम दर्जेदार, सुश्राव्य, रसिकप्रिय करण्यात रेडिओ जॉकीचा सहभाग महत्त्वाचा ठरतो. त्याचे कार्य, व्यक्तिमत्त्व, एफ.एम. रेडिओवरील कार्यक्रमाची भाषा, निवेदन आणि एकूणच ह्या कार्यक्रमाचे स्वरूप व तंत्र इ. सर्व काही तरूणाईला जवळचे वाटू लागले आहेत हेही मान्य करता येते. रेडिओ जॉकीला कार्यक्रम सादरीकरणाचे स्वरूप माहिती होताना निवेदनातील लय, आवाजातील चढ उतार त्यासोबत संगीत ध्वनीचा वापर यांची यथायोग्य माहिती असतेच. गीत-संगीत व लोकगीतांचे पारंपरिक पद्धतीने उपयोजन करण्यास एफ.एम. रेडिओ कार्यक्रमात आधुनिकताही येत असल्याचे जाणवते. (रिमिक्स संगीत).

## २.५ रेडिओ जॉकी

**उद्दिष्टे:**

१) रेडिओ जॉकीच्या कामाचे स्वरूप उलगडणे.

२) रेडिओ जॉकीच्या कामाचे महत्त्व समजावून सांगणे.

३) रेडिओ जॉकीचे व्यक्तिमत्त्व आणि त्याच्याकडून सादर होणाऱ्या कार्यक्रमाचे तंत्र यांची माहिती करून देणे.

**प्रस्तावना**

रेडिओ जॉकी (Radio Jockey) ही संकल्पना आकाशवाणी (नभोवाणीशी) संबंधित असून 'एफ.एम.बँड' चा उदय झाल्यापासून सर्वांना परिचित झाला आहेच. आकाशवाणीवरील कार्यक्रमातील उद्घोषणेसह श्रोत्यांना मनोरंजनात सहभागी करून घेण्याची जबाबदारीच रेडिओ जॉकीची असते. कार्यक्रमाच्या आस्वादाबरोबरच रेडिओ जॉकीच्या निवेदन कौशल्यास प्रसिद्धी देखील मिळू लागली आहे. रेडिओतील कार्यक्रमात श्रोत्यांना खिळवून ठेवण्याचे त्यास कसब वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते. अश्व (घोडा) शर्यतीतील घोडेस्वाराला 'जॉकी' संबोधतात. त्याचे कार्य व घोड्याला पळविण्याच्या पद्धतीबाबत आणि घोड्याच्या वेगाला दिशा देण्याचे कार्य व शेवटी अश्वशर्यत यशस्वीपणे जिंकण्यासाठी ह्या जॉकीला प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. हेच 'रेडिओ जॉकी' बाबत म्हटले जाते. कार्यक्रमातील उत्कृष्ट निवेदन, श्रोत्यांशी संवाद साधण्याची मनमोहक, आकर्षक शैली, कार्यक्रम संचालनाचे उत्कृष्ट कसब रेडिओ जॉकिकडे असणे योग्य ठरते. आपल्या देशात 1967 साली आकाशवाणीची 'विविध भारती' ही विज्ञापन सेवा सुरू झाली. ह्या सेवेचा मोठ्या प्रमाणात विस्तार होऊन 'एफ.एम. रेडिओ स्टेशन' किंवा 'लोकल रेडिओ स्टेशन' नावाने छोटी केंद्रे सुरू झाली आहेत. केवळ लोकरंजन किंवा मनोरंजन हेच मूल्य ठेवून आकाशवाणीची ही सेवा विनामूल्य व्यापक अशी सेवा समजली जाते. आजच्या जागतिक-नवजागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या व्यापारी, व्यावसायिक स्पर्धात्मक युगात सर्व क्षेत्रात बदल होताना मनोरंजन क्षेत्रही त्यास अपवाद नसून एफ.एम.रेडिओ केंद्रमध्येही उद्योजक-व्यावसायिक यांनी आघाडी घेतली आहे.

## २.६ रेडिओ जॉकीचे कार्य

एफ.एम. रेडिओ केंद्रात एकापेक्षा अधिक रेडिओ जॉकी कार्यरत असतात. काही वेळा ह्या रेडिओ जॉकीमुळेच कार्यक्रम ओळखले जातात व ते लोकप्रियही होतात. उदा. 'आर.जे.प्राजक्ता' (आर. जे. -रेडियो जॉकी) किंवा 'आर.जे.आयेशा के साथ' इ. बॉलिवूड तसेच मराठी कलाकार व विविध क्षेत्रातील कार्यरत प्रसिद्ध लोकप्रिय असामी देखील रेडिओ जॉकी म्हणून कामकाज पाहतात व उत्कृष्ट सेवा बजावतात. रेडिओ एफ.एम. केंद्र ज्या शहरात आहे त्या शहराचा सर्वांगीण परिचय त्यास असणे योग्य ठरते. त्या शहराचा सांस्कृतिक इतिहास, भूगोल आणि समकालीन घटना घडामोडी विषयी माहिती करून घ्यावी लागते. एकूणच रेडिओ एफ.एम.केंद्राशी त्याची सर्वांगीण जवळीक असावी लागते.

प्रत्यक्ष एफ.एम. रेडिओ केंद्रात रेडिओ जॉकीला कार्यालयात बराच वेळ थांबून कार्यक्रमाची पूर्वतयारीसाठी बराच वेळ द्यावा लागतो. संबंधित कार्यक्रमाचे स्वरूप लक्षात घेणे, माहिती व संदर्भ गोळा करणे, त्यांचा अभ्यास, टिपण तयार करणे, कार्यक्रमाचे नावीन्य टिकविणे, भाषिक कौशल्य आत्मसात करणे, निवेदनाची तयारी करणे व श्रोत्यांचे कार्यक्रमाकडे लक्ष वेधून घेणे यासाठी योग्य ती काळजी घ्यावी लागते.

### २.६.१ रेडिओ जॉकीचे व्यक्तिदर्शन (व्यक्तिमत्त्व)

रेडिओ जॉकी हा प्रामुख्याने एफ.एम.केंद्राच्या सूत्रसंचालकच होय. ह्या कार्यक्रमातील अनेक घटकांत उदा. गाणी, संवाद, बातम्या, मुलाखती, घडामोडी, माहितीपर कार्यक्रम यांना एकत्र गुंफून एक सलग अनुभव देण्याचे कौशल्य साध्य करतो. त्यायोगे व्यक्तिमत्त्वाचा प्रत्ययही श्रोत्यांना येऊ शकतो.

अशा अनेकविध श्राव्य (माध्यमातील) कार्यक्रमांतून रेडिओ जॉकीचे निवेदन व संवाद कौशल्य प्रकट होताना त्यांच्यातील बोलण्याचा आत्मविश्वास, प्रामाणिकपणा, हजरजबाबीपणा, बहुश्रुतपणा, अभ्यासूवृत्ती, रसिकता, सृजनशीलता आणि माहितीचा परिचय होऊ शकतो.

संबंधित कार्यक्रमाच्या संदर्भात रेडिओ जॉकीला सर्वसामान्य व्यवहार ज्ञान व गांभीर्य वृत्ती असणे देखील महत्त्वाचे असते. हसत-खेळत मुलाखती व गप्पांच्या कार्यक्रमात श्रोत्यांना सहभागी करून घेण्यासह दुःखद श्रद्धांजली विषयक कार्यक्रमात धीरगंभीर शांतपणे संवाद साधणे व श्रोत्यांना देखील गंभीर वातावरणाचा प्रत्यय येईल याचे भान ठेवावे लागते.

एफ.एम.केंद्रातील रेडिओ जॉकीला सामान्यज्ञानासह विविध क्षेत्रातील अद्ययावत व नावीन्यपूर्ण माहितीचा साठा असावा लागतो. कला, क्रिडा क्षेत्राविषयी बोलताना त्याविषयी संपूर्ण माहिती अद्ययावत व परिपूर्ण ठेवणे. क्रिकेट, कबड्डी, हॉकी, फुटबॉल क्षेत्राविषयी कार्यक्रम करताना खेळाचे नियम, पूर्वेतिहास, खेळाडूंची नावे व त्यांच्या कामगिरीबाबत योग्य ती माहिती असणे महत्त्वाचे असते. त्यायोगे श्रोत्यांच्या ज्ञानात भर पडून कार्यक्रमही रंगतदार, माहितीपूर्ण होईल यात शंका उरत नाही. यासाठीही बरीच पूर्वतयारी रेडिओ जॉकीला करावी लागते.

### २.६.२ रेडिओ जॉकीची निवेदन शैली व भाषाप्रभुत्व

१) रेडिओ हे केवळ श्राव्य माध्यम असल्याने रेडिओ जॉकीला निवेदनातून-बोलण्यातूनच व्यक्त होता येते. प्रमाणभाषेपेक्षा बोली व व्यवहार भाषेतूनच संवाद साधण्याचे त्याचे कौशल्य असते. घरगुती स्वरूपातील जवळीक साधणारी भाषा श्रोत्यांना पसंत पडते. अच्छा, ओ.के. बेस्ट, गुड, थॅंक्स, यार अशा शब्दांसह तरूणाईच्या स्मार्ट भाषेत बोलण्याची संधी मिळते.

२) रेडिओ जॉकी कार्यक्रमाचे संचालन करताना मराठी, हिंदी, इंग्रजीतही बोलण्याचे कौशल्य रेडिओ जॉकीकडे असते. ह्या विविध कार्यक्रमातील बहुभाषिक म्हणून सहभागी होताना आणखी एखादी भारतीय वा विदेशी भाषा देखील आत्मसात केल्यास फायदा होतो.

३) कार्यक्रमाचे स्वरूप व वेळ देखील लक्षात ठेवणे. उदा. राखी पौर्णिमा, संक्रांत, दिवाळी, रमजान ईद, नाताळ या सणांचे महत्त्व व ऋतुमान लक्षात घेऊन एखादे गीत, शेर, शायरी, काव्यपंक्ती, संदेश-विचार पेरून कार्यक्रमाची रंगत वाढविता येते. त्यासाठी प्रसिद्ध कलाकाराच्या शैलीत एखादा संवाद व गीत देखील सादर केल्यास कार्यक्रम हलका फुलका अभिरूचीसंपन्न होतो, कार्यक्रमातील निवेदनाला शोभा येते, श्रोतेही आनंदाने सहभागी होऊन रेडिओ जॉकीच्या निवेदनाशी एकरूप होऊन कार्यक्रमाचा आनंद लुटतात.

रेडिओ जॉकीच्या गोड, सुश्राव्य-भाषा, माधुर्यप्रधान आवाज, शब्दार्थाचा योग्य मेळ साधणे गरजेचे असते. शब्दोच्चार अचूक व यथायोग्य असण्याकडे लक्ष द्यावे. न, ण, श, स, क्ष, ड, द, क, ख, प, फ अक्षरांतील फरक समजून घेत त्याचे वेगळेपणही सांभाळावे. उदा. राजधानी, शासन, पर्यावरण, गव्हर्न्मेन्ट, प्रतिक्षा, भाषण इ. योग्य ते स्वरयंत्रातून स्पष्टोच्चार, श्वासगती, आवाजातील आरोह-अवरोह याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. तसेच निवेदनशैलीत अर्धविराम, विराम यासह भावसंसूचन-उद्गारवाचक शब्द, शोकभाव शब्द, सहमती-नकारार्थी क्रिया-प्रतिक्रिया यथायोग्य पद्धतीने उच्चारण्यात रेडिओ जॉकीचे यश असते. त्यासाठी उत्तम दर्जाची ध्वनियोजना देखील असतेच, संगीताची धूनही पूरक ठरते. इथेही भाषाप्रभुत्व व प्रसन्न खेळकर व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे असतेच! त्यासाठी रेडिओ जॉकीला वेळोवेळी सराव, इतर मान्यवर सूत्रसंचालकांचे, वक्त्यांचे मार्गदर्शन आणि वाचातज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाते. रेडिओ जॉकीच्या सिद्धहस्त चातुर्यपूर्ण हजरजबाबी शैलीमुळेच ‘रेडिओ मिर्ची’, ’रेडिओ सिटी’ सारखे केंद्र तुफान लोकप्रिय झाले असे म्हणता येईल. बहुभाषिक शब्द, वाक्य योजना व पुन्हा मातृभाषेतून संवाद साधणे, एकाच वेळी मुख्य विषयाशी अनुरूप इतर विषयाला हळूवार स्पर्श करण्यासह प्रस्तुत विषयाला हात घालून यथोचितपणे कार्यक्रमाचा समारोप केला जातो. संगीत योजनेसह हिंदी, इंग्रजी, मराठी शब्दांच्या एकत्रित वापरातून वापरण्यात येणारी भाषा येथे ऐकायला मिळते. कॉर्पोरेट संस्कृतीची व्यवहारोपयोगी, कामचलाऊ भाषा ती हीच होय! बहुभाषा मिश्रणाची लकबच इथे ऐकायला मिळते.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न : आकाशवाणीवरील तुम्हांस आवडलेल्या एखाद्या कार्यक्रमाचे गुणविशेष सांगा.**

## २.६.३ सारांश

आकाशवाणी माध्यमाचे स्वरूप, श्राव्य माध्यमांतील विविध लेखन प्रकारांची माहिती याचा विचार आपण इथे केलेला आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक काळात टेक्नोसॅव्ही माध्यमांचे आकाशवाणीसाठी उपयोजन करता येते. कार्यक्रमांतील भाषेची भूमिका, विविध

भाषिक आविष्कारांचे स्वरूप, विविध कार्यक्रमांतील लेखन संहितांचा अभ्यास करता येतो. तसेच आकाशवाणीवरील विविध कार्यक्रमांतील निवेदकांचे स्थान व त्यांचे कार्य समजून घेतले असता रेडिओ एफ.एम.चे स्वरूप व वैशिष्ट्ये ध्यानात येतात. एफ.एम.-कार्यक्रमातील नोकरी व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन म्हणून एफ.एम.जॉकीचे कार्य, त्याचे व्यक्तिमत्त्व व निवेदन कौशल्य हे देखील महत्त्वाचे असतात. आकाशवाणीच्या विविध कार्यक्रमांतून श्रवण कौशल्याचे महत्त्व, गरज, कार्य व स्वरूप विद्यार्थ्यांना समजावून देणे व भाषिक कौशल्ये विकसित करणेविषयी माहिती यातून मिळते.

## २.६.४ नमुना प्रश्न

### अ. दीर्घोत्तरी प्रश्न

१) जनसंपर्काचे प्रभावी माध्यम म्हणून आकाशवाणीचे महत्त्व विशद करा.

२) आकाशवाणीचे स्वरूप व उद्दिष्टे लिहा.

३) ‘आकाशवाणी हे श्राव्य माध्यम होय’ - साधार लिहा.

४) एफ.एम.रेडिओ जॉकीचे व्यक्तिमत्त्वाचे पैलू सांगा.

५) आकाशवाणीच्या बदलत्या स्वरूपाची चर्चा करा.

६) एफ.एम.रेडिओ जॉकीच्या निवेदनाचे स्वरूप लिहा.

### ब. टीपा लिहा

१) आकाशवाणीवरील उद्घोषक (निवेदकाचे) गुण

२) आकाशवाणीवरील कार्यक्रमातील उद्घोषणेचे महत्त्व विशद करा.

३) आकाशवाणीवरील निवेदकाचे स्थान व महत्त्व

४) आकाशवाणीवरील नोकरी व्यवसायाच्या संधी

❖❖❖❖

# अ) श्रुतिका लेखन

**घटक रचना :**

२.७.अ. श्रुतिका लेखन

२.७.अ.१ उद्दिष्टे

२.७.अ.२ श्रुतिका लेखनाची प्रस्तावना

२.७.अ.३ श्रुतिका लेखन तंत्र व स्वरूप

२.७.अ.४ श्रुतिका लेखन संहिता नमुना

२.७.अ.५ श्रुतिका आणि अभिवाचन (कथा, कादंबरी व कवितेचे अभिवाचन)

२.७.अ.६ नभोनाट्य, श्रुतिका व अभिवाचन

२.७.अ.७ श्रुतिकालेखन विशेष

२.७.अ.८ नमुना प्रश्न

## २.७.अ श्रुतिका लेखन

### २.७.अ.१ उद्दिष्टे

**हा घटक अभ्यासल्यानंतर आपणास पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील.**

१) श्रुतिका लेखनाचे स्वरूप, सामर्थ्य व मर्यादा ध्यानात येईल.

२) श्रुतिका लेखनातील संवाद, ध्वनीसंकेत, सादरीकरण यांची माहिती मिळेल.

३) सामाजिक, राष्ट्रीय विषयांवरील श्रुतिकांमधून श्रोतृवृंदाचे राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, महापुरूषांचे विचार, आदर्श व जीवनकर्तृत्व या मूल्यांचा परिचय होईल.

४) आकाशवाणीवरील श्रुतिका लेखन-रेडिओ नाट्य (नभोनाट्य) भाषण, परिसंवाद, अभिवाचन, चर्चा यातील फरक व वेगळेपण ध्यानात येईल.

५) श्रुतिकेचे निवेदन, प्रारंभ व समारोप कसा असतो, श्रुतिका लेखन विषयाची माहिती यातून मिळेल.

६) श्रुतिकेतील पात्र संवाद आवाज याविषयीचे स्वरूप, संवादाच्या स्वरूपाचे विश्लेषण करता येईल.

### २.७.अ.२ प्रस्तावना

श्रुतिका हे नभोनाट्याचे लघुरूप होय. अर्थात यात प्रत्येकवेळी कथानक असतेच असे नाही. काही वेळा आगळ्या-वेगळ्या विषयावर आधारित, गूढ, रहस्यमय, भय उत्पन्न करणारी

श्रुतिका देखील असू शकते. चाकोरीबाह्य तरीही गंभीर विषयावरील श्रुतिका श्रोत्यांना विचारप्रवण, अंतर्मुख करतात. अशा नभोवाणीवरील श्रुतिकांच्या कार्यक्रमांतून श्रोत्यांच्या अनुभवविश्वात भर पडते. आशयसंपन्न कसदार कथाविषय असणाऱ्या श्रुतिका रसिक श्रोते तन्मयतेने ऐकतात. यातच संवाद व सादरीकरणाचे यश असते. शिवाय अत्यंत मर्यादित वेळेत (सुमारे १५ ते २० मिनिटे) सादर होताना श्रुतिकामधील कलावंतांचे कसब पणाला लागते. सादरकर्ते व कलावंतांच्या आवाजावरून त्यांचे वय व भूमिकेविषयी श्रोत्यांना अंदाज बांधता येतो. विशेषतः वयस्कर व जाणकार श्रोते आकाशवाणीवरील नभोनाट्य व श्रुतिका ऐकण्यास प्राधान्य देतात. एखादा सुख-दुःखाचा अवघड कौटुंबिक स्वरूपाचा घटना प्रसंग ऐकताना श्रोत्यांना उत्सुकता लागून राहते. तत्पूर्वी एखाद दुसरी जाहिरात सादर होताना श्रुतिका ऐकण्याची पार्श्वभूमी (संगीताची धून) उपयुक्त ठरते. श्रुतिका देखील ज्ञान, मनोरंजन व माहितीचा साठा समजला जातो. समकालीन, चालू घडामोडींवरही भाष्य करणारी विचार प्रधान श्रुतिकाही सादर केली जाते. उदा. स्वच्छ भारत अभियान, आंतरराष्ट्रीय महिला दिन, निवडणूक व मतदान जागृती-महत्त्व, सेंद्रिय शेती आजची गरज - या विषयावर भाष्य व चर्चा केली जाते. यातील संवाद पात्रानुरूप यथायोग्य आवाजात व त्यांच्या भूमिकांच्या अनुरूपाने सादर करण्यात येतात.

ह्याशिवाय महिला वर्गांसह सर्व सामान्य नागरिकांना त्यांचेशी संबंधित विषयांवर लोकशिक्षणासह प्रबोधन करण्याचे कार्य श्रुतिकेकडून केले जाते. विशेषतः महिला वर्गांसाठी आरोग्यविषयक मार्गदर्शन, रोगनिदान व उपचार, बालसंगोपन, आहार, पथ्य, स्त्रियांचे हक्क व कायदे, स्त्रीशिक्षण अशा महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले जाते. तसेच ज्येष्ठ नागरिक सुरक्षा, आर्थिक गुंतवणूक व बचत, आजीबाईंचा बटवा, धार्मिक व्रतवैकल्ये, अशा काही सामाजिक, कौटुंबिक विषयदेखील श्रुतिकेचे असतात. राष्ट्रीय वारसा स्थळे, महापुरूषांचे स्मरण, राष्ट्रीय सण, उत्सव, शासकीय उपक्रम यांविषयी कथानक विरहित माहिती देणाऱ्या श्रुतिकाही विशेष प्रसंगी सादर होतात. त्यात समयोचित घटना प्रसंग, संगीताचा अंतर्भाव असतोच. काही महत्त्वपूर्ण सांगण्यासारखी ऐकण्याजोगी असणारी श्रुत-श्रुतिका कार्यक्रमाचे स्वरूप असते. ह्या कार्यक्रमाची भाषा, संवाद घरगुती वळणाची, सहज व्यक्त होणारी, उत्स्फूर्त, श्रोत्यांना खिळवून ठेवणारी अशीच असते. बऱ्याच वेळेला रसिक श्रोत्यांच्या परिचयाचे विषय असताना ते विचार करण्यास प्रवृत्त होतात! एखाद्या सूत्रमय विचारांना मध्यवर्ती ठेवून विचारांचे आदान-प्रदानही श्रुतिकेमध्ये होत असते. श्रुतिका कार्यक्रम महिला, विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ मंडळी, सर्वसामान्य नागरिक व कुटुंबातील एकत्रित सदस्यांसाठी कौटुंबिक स्वरूपात सादर होतात. हे कार्यक्रम कोणासाठी सादर करावयाचे या अनुषंगाने वेळेलाही महत्त्व असते. उदा. महिलांसाठी दुपारी, शेतकऱ्यांसाठी सकाळी व सर्वसामान्यांसाठी कौटुंबिक स्तरावर रात्री इ. वेळ. यामध्ये मोजके कलाकार, विविध व्यक्तींचे विविध टप्प्यांवरील प्रसंग, घटना घडामोडींवर आधारित संवाद म्हणताना त्यांच्या समवेत रेकॉर्डरूममध्येच पार्श्वसंगीत वाजवणारे कलाकारही असतात. कार्यक्रमाचे ध्वनिमुद्रण अगोदरही केले जाते. कलाकारांची नावे सर्वात शेवटी जाहीर केली जातात.

आकाशवाणीतील श्रुतिका लेखनात निवेदन आणि पात्र संवादांचा ढंग वेगळा असतो. यातील शब्दलेखन संहिता, भाषेची लय लक्षात घ्यावी लागते. भाषेतील चढउतार, लयबदल, स्त्री-पुरूष पात्रांचे उच्चारण, त्यांच्या आवाजाचा स्तर, पोत, बोलण्याची लकब या गोष्टीही श्रुतिका लेखनात सूचित होतात. यातून कोणती भूमिका व पात्र कोण कलाकार

बोलतात हे श्रोत्यांना निर्देशित होत असतात. वाचिक अभिनयातूनच प्रत्येक प्रसंग उच्चारित शब्दांतून माहिती करून देता येते. शिवाय भावपोषक प्रसंगांना अनुरूप पार्श्वसंगीताचीही सूचना द्यावी लागते. श्रुतिका लेखनात ह्या गोष्टी फार उपकारक ठरतात. सशक्त संवाद, आकर्षक निवेदनशैली, उत्तम व्यक्तिरेखा, साजेशी भाषा संवादशैली, चित्रमय लेखनाचा बाज, लेखकाची वैशिष्ट्यपूर्ण जीवनदृष्टी महत्त्वाची ठरताना निवेदन देखील वाचाकाच्या मनाशी संवाद साधत असते. उत्कृष्ट ध्वनिनियोजन व पार्श्वसंगीताच्या योग्य त्या ठिकाणी संसूचन याआधारे श्रुतिकेतील अनुभूती व संवेदनशीलता सूक्ष्म बारकाव्यासह श्रोत्यांपर्यंत जाण्यास निश्चितच मदत होते.

### २.७.अ.३ श्रुतिका लेखन तंत्र व स्वरूप

१) प्रामुख्याने श्रुतिकालेखन श्राव्य स्वरूपात सादर होताना कमीत कमी निवेदकासह दोन-तीन पात्रे असावीत, त्यांची ओळख संवादातून होते.

२) पात्रांच्या संवाद लेखन-संभाषणातून मुद्देसूदपणा, आटोपशीरपणा, विषयानुरूप आशय व्यक्त होत असतो, तसेच अर्थाभिव्यक्ती देखील महत्त्वाची असते.

३) श्रुतिका लेखनात ज्ञान, माहिती, मनोरंजनासह श्रोतृवृंदाचे उद्बोधनासही चालना दिली जाते. शीर्षकातून योग्य तो संदेश श्रोत्यांना मिळाला पाहिजे अशा स्वरूपाचे शीर्षक असले पाहिजे.

४) श्रुतिकेची सुरूवात एखाद्या ध्वनीसंकेताने करावी.

उदा. मोबाईल, टेलिफोन रिंगचा आवाज.

उदा. मुलगी-बाबा! मी प्रणिता बोलते. मी कार्यालयातून बोलते आहे. विमान प्रवास सुरक्षित झाला असून मी आता ठीक आहे !

(या संभाषणातून मुलगी भ्रमणध्वनीतून बाबांशी ती मुंबईच्या कार्यालयातून आपल्या घरी संपर्क साधत आहे.)

५) या प्रसंगातून पात्रांचे स्वभाव रेखाटन प्रत्ययाला येते. त्यातून त्यांची ओळख व परिचय होऊ शकतो.

६) विषयानुसार अर्थवाही समर्पक शीर्षक, कथानक, विचार अभिव्यक्ती तसेच समारोपही सूचक व यथायोग्य अनुरूप असतो, त्यासाठी ध्वनीसंकेत व संगीताची धून वाजविली जाते.

७) श्रुतिका लेखनाची मर्यादा जास्तीत जास्त १५-२० मिनिटांची असून पात्रसंख्यावरही मर्यादा असते.

८) राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय विषय, महापुरूष यांच्यावरील श्रुतिका लेखनात संवेदनशीलता, सजगता बाळगावी लागते. त्याविषयी योग्य ती दक्षता घेऊन लेखन करावे लागेल.

## २.७.अ.४ श्रुतिका लेखन संहिता (नमुना)

नमस्कार श्रोते हो! ... आम्ही आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून बोलत आहोत. दुपारचे बारा वाजून तीस मिनिटे झाली आहेत. आता आम्ही सादर करीत आहोत 'श्रुतिका' आणि श्रुतिकेचे नाव आहे... 'आजीबाईंचा बटवा'

संगीताची धून वाजत आहे...

सादर करीत आहेत- सौ. .............

ध्वनीसंगीताची हळूवार धून .............

सून - (सासुबाईंना उद्देशून) अहो आई... किती उशीर केला... दुपारच्या जेवायला उशीर बराच झाला आहे. मी किती वेळ वाट पाहते आहे.

सासुबाई - हो ना! अगं- राधा... तुला काय सांगू.. सकाळपासून शेजारच्या रघूला थोडासा ताप येत होता. अधून मधून म्हटलं जाऊन बघावं...

सून - मग आता काय बरी आहे का तब्येत रघूची? तुमच्याकडे आहे ना घरगुती औषधांचा संग्रह. काय बरं म्हणतात त्याला....

सासुबाई- अगं त्याला आजीबाईंचा बटवा म्हणतात. किरकोळ आजार दुःखण्यासाठी औषधांचा घरगुती गोष्टींचा संग्रह असतो त्यामध्ये मीही तो बटवा जवळ बाळगून असते.

सून - त्या बटव्याचा फार फायदा होत असेल ना! काय काय वस्तू वा पदार्थ आहेत त्यामध्ये सांगा ना! (एवढ्यात आजोबा देखील जेवणासाठी येऊन बसतात.)

आजोबा - अहो सुनबाई- राधा जेवायला वाढा लौकर! त्यानंतर औषधे घ्यायची राहिली आहेत.

सासुबाई - अहो आर्यनचे आजोबा! तुम्हाला किती वेळा सांगितले वेळेवर जेवायला घरी येत चला!

सुनबाई - अहो मामंजी तुम्हाला किरकोळ आजार नेहमीच होत असतात.. त्यासाठी आईकडे घरगुती गोष्टींचा - औषधांचा साठा असतोच ना त्याचाही उपयोग होत असेल ना!

आजोबा - हो त्याला घरगुती दवाखाना असेही म्हणतात. वयोमानपरत्वे किरकोळ आजारात त्याचा मला फार उपयोग होतो बरं का सुनबाई!

सासू - हो ना माझ्याकडे घरगुती औषधी संग्रहात जिरे, बडीशेप, ओवा, सुंठ यांना स्थान दिले आहे.

सुनबाई - या सर्व घरगुती पदार्थांचा प्रामुख्याने काय उपयोग असतो सांगता का जरा आई...

आजोबा - त्यात काय एवढे....मला सुद्धा माहिती आहे. मुख्य म्हणजे अन्न पचनासाठी आले, कफनाशक साठी जिरे आणि पोटदुखीवर बडिशेप, ओवा यांचा फार उपयोग होतो.

सासूबाई - एवढेच नव्हे तर दात व तोंडातील विकारांसाठी लवंग याशिवाय हिंग, गवती चहा यांचेही बरेच उपयोग आहेत बरं का सुनबाई.....

आजोबा - अहो अजून एक सांगायचे राहिलं आहे ते म्हणजे जेवणानंतर पचनासाठी तांबुलविडा उपयुक्त ठरतो. मी नेहमी अधुनमधून विड्याच्या पानाचं सेवन करतो.

सूनबाई - आपण बागेत आयुर्वेदिक व झाडपाल्याच्या औषधांसाठी काही झाडे लावली आहेत ना..

सासूबाई - हो ना! सूनबाई - त्याचा वनौषधी म्हणून उपयोग होतोच!

आजोबा - पण एवढे मात्र खरे की हे सर्व काही किरकोळ आजारासाठी स्वयंपाक घरातील दवाखाना म्हणून ठीक आहे....पण अगदीच गंभीर स्थितीत खरे म्हणजे डॉक्टरांकडेच जाणे योग्य ठरते बरं का सूनबाई !

सासुबाई - बरोबर आहे तुमचं! बरं चला आता जेवायची वेळ टळून गेली. नातूही शाळेतून घरी यायची वेळ झाली आहे.

सूनबाई - बरं झालं आई साहेब! चांगली व उपयुक्त माहिती मिळाली तुमच्याकडील!

सासूबाई - हो ना... त्याला आजीबाईंचा बटवा म्हणतात. नाव नीट लक्षात ठेव म्हणजे झाले!

संगीताची हळूवार धून...सर्वजण जेवणाच्या तयारीत बसतात.

(निवेदकाची उद्धोषणा होऊन श्रुतिका समाप्त होते यात कलाकारांची नावेही सांगितली जातात.)

### २.७.अ.५ श्रुतिका आणि अभिवाचन (कथा कादंबरींचे व कवितांचे अभिवाचन)

**अभिवाचन :**

कादंबरी अथवा कथेचे अभिवाचन वा कथाकथन करताना निवेदन आणि संवादाचा ढंग वेगळा असावा लागतो. त्या त्या शब्दांच्या उच्चारांचं वजन, भाषेची लय लक्षात घ्यावी लागते. भाषेतील चढउतार, लयबद्धताही अभिवाचनात महत्त्वाची ठरते. काही वेळा स्त्री-पुरूष-पात्रांचे उच्चारण यासाठी आवाजाचा स्तर, पोत, बोलण्याची ढंग या गोष्टींचाही अंतर्भाव अभिवाचनात होतो. यातून कोणती भूमिका व्यक्तिरेखा पात्र बोलते हे श्रोत्यांना उमगायला हवे. वाचिक अभिनयाचा हा विचार (कथा, कादंबरी, कविता) प्रत्येक प्रसंग

उच्चारित शब्दातून माहिती करून घेणे श्रेयस्कर ठरते. शिवाय कादंबरीतल्या भावपोषक प्रसंगांना पार्श्वसंगीताचीही जोड दिलेली असते. आकाशवाणी-नभोनाट्यास ही गोष्ट फार उपकारक ठरते.

आज आकाशवाणीवरही कादंबऱ्यांचे अभिवाचन करण्यात येते. त्यांचा कालावधीही भिन्न भिन्न आहे. कादंबरीतील प्रकरणे, विभाग, यासाठी अभिवाचनात अर्ध्या तासापेक्षाही अधिक वेळ उपलब्ध करून देण्यात येतो. हे अभिवाचन सोयीनुसार ध्वनिमुद्रित असते आणि तेच 'तयार' ध्वनिमुद्रण श्रोत्यांपर्यंत पोहोचत असते. मात्र एकूणच "उच्चारण" हेच या ठिकाणी सर्वांत महत्त्वाचे मानले जाते. वाचिक अभिनय म्हणतात तो हाच होय!

विशेषतः कथाकथनाचा एकपात्री अभिनयाकडे झुकणारा, वाचिक अभिनयाला वाव देणारा प्रेक्षकांचा प्रतिसाद लाभणारा हा कार्यक्रम द.मा.मिरासदार, शंकर पाटील यांनीही एकेकाळी लोकप्रिय केला.

### २.७.अ.६ नभोनाट्य श्रुतिका व अभिवाचन

या कार्यक्रमातील आवाजात योग्य त्या ठिकाणी विराम, सहज व स्पष्टोच्चार, शुद्ध भाषा यांचे उपयोजन केले जाते.

श्राव्य माध्यमातून बोलताना ह्या कार्यक्रमातही श्रोत्यांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला जातो. अलंकारिक, बोजड, क्लिष्ट, अगम्य वाटणार नाही असे बोलण्यातील संवाद व अभिवाचन पद्धत असते. भाषेचे अवडंबर नसते. नभोनाट्य, श्रुतिका व अभिवाचनातील वेगवेगळ्या आवाजातील फरकांमुळेच पात्रांची ओळख व कलाकारांचा परिचय होतो. ध्वनी व संगीताच्या वैविध्यामुळेच श्रोत्यांना ह्या नभोनाट्य व श्रुतिका कार्यक्रमात खिळवून ठेवता येते. यापेक्षा आकाशवाणीवरील अभिवाचन वेगळे मानताना ते क्रमशः वाचन केले जाते. अभिवाचन शैलीतूनच कलाकृतीतील वातावरणाचा व निवेदनाचा श्रोत्यांना प्रत्यय येतो असे म्हणता येते.

**पुणे आकाशवाणीवर क्रमशः वाचन**

'व्हाय नॉट आय'

लेखिका वृंदा भार्गव (प्रा.डॉ.नाशिक) यांनी घडवलेली "अंध देवकीची 'उजेड यात्रा'" शब्दबद्ध करताना संघर्षमय अशा या कहाणीतला महत्त्वाचा भाग म्हणजे देवकीचे शिक्षण होय. तिच्या परिचयाचा केंद्रबिंदू म्हणून त्या मुलीचे शिक्षण, तिचे स्वप्न, तिचे करिअर हा आहे. पुस्तक लिहिताना ज्या भावनेतून ते लिहिले त्या भावना नेमकेपणाने या क्रमशः वाचनातूनही व्यक्त होतात. (एप्रिल-मे-जून 2010) त्याचे वाचन आजही देवकीचा दृष्टिकोन व शरीरांवर झालेला परिणाम यावर यशस्वी मात करीत ती वाटचाल करीत आहे. त्याचेही यथोचित दर्शन क्रमशः वाचनातून घडते.

**अभिवाचन कार्यक्रम:**

वेगळ्या वाटेने लेखन करणाऱ्या तीन असामान्य प्रतिभावंतांच्या निवडक साहित्याच्या अभिवाचनाचा प्रयोग आकाशवाणीवर झाला होता. त्यामध्ये बा.सी.मर्ढेकरांच्या कवितांचा

'दवात आलीस भल्या पहाटे' हा काव्यवाचनाचा कार्यक्रम, पु. शि. रेगे यांच्या कवितांबरोबरच 'सृजनरंग' हा त्यांच्या गद्य लेखनातील उताऱ्यांच्या वाचनाचा कार्यक्रम आणि चिं.त्र्यं.खानोलकर यांच्या 'चाफा' या लघुकादंबरीचे अभिवाचन पुण्यातील महाराष्ट्र कल्चरल सेंटर यांचे मार्फत पुणे येथे आयोजित झाल्याची नोंद आहे.

अभिवाचन किंवा श्रुतिका वाचनात मूळ नाट्यसंहिता, कादंबरीत अनुरूप असे बदल करावेच लागतात. कंसातील सूचना ॲक्शन यांचा आवश्यक बदल संहितेत करावा लागतो. वेशभूषा, नेपथ्य हे सगळे नसतानाही कथानकातील प्रसंग, घटना उभे करणे शक्य असते. 'स्वयंसिद्धा', 'हिमालयाची सावली', 'मृण्मयी', 'कल्याणी', 'कट्यार', 'होनाजीबाळा' या कलाकृती आकाशवाणीने नभोनाट्यातून ऐकवून रसिकांना तृप्त केले, उत्तम दर्जाच्या साहित्यकृती लोकांपर्यंत पोचविल्या.

अभिवाचन हे रंगमंचावरही केले जाते पण त्यात समोरची व्यक्ती दिसत असतात व त्यांची नावेही माहीत होतात. त्या पात्राचा आवाज, त्याचे रंगमंचावरील दिसणे, उच्चार हे सर्व काही प्रत्यक्ष कलाकाराच्या माध्यमातून प्रेक्षकांना समजतेच. श्रुतिका किंवा अभिवाचन करताना मूळ नाट्यसंहिता, कादंबरीत अनुरूप बदल करावेच लागतात. कंसातील सूचना, ॲक्शन यांचा आवश्यक बदल संहितेत करावा लागतो. उदा. प्रवेश, येणे, जाणे, बसणे या शारीरिक हालचाली वाक्यातून बोलून व्यक्त कराव्या लागतात आणि म्हणून 'नभोनाट्य रूपांतर' हे आवश्यक ठरत असल्याचे आकाशवाणी कलावंत जयश्री कुबेर यांचे मत योग्य वाटते.

### पुणे आकाशवाणी क्रमशः अभिवाचन

खुले आकाश - प्रकाश नारायण संत-यांच्या साहित्यातील 'लंपन' या व्यक्तिरेखेवर आधारित मालिका- 'शारदासंगीत' हा कार्यक्रम प्रसारित झाला.

'जंगलातले दिवस' - व्यंकटेश माडगूळकर लिखित या पुस्तकाचे क्रमशः वाचन झालेले आहे.

'आनंदलोक' - आधुनिक मराठी कवितेतील भावसौंदर्याचा वेध घेणाऱ्या आनंदलोक मालिकेत सुरेश भट यांच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम सादर झाला. ("नवा सूर्य आणू चला यार हो" – लेखिका : डॉ. अरूणा ढेरे)

### ललित साहित्य कृतींचे अभिवाचन

कादंबरी वाचनात लिखित शब्द, घटनाप्रसंगांतून जसेच्या तसे वाचकांपर्यंत पोचवणे महत्त्वाचे ठरते. या बाबतीत कादंबरीचे अभिवाचनाचे कार्यक्रम करणाऱ्या प्रा.डॉ.सौ. वीणा देव यांनी नमूद केल्याप्रमाणे नाटकाच्या प्रयोगात ज्याप्रमाणे कलाकारांचे संवाद त्यांच्या विरचना, प्रकाश ध्वनी इ. चे नियोजन असते; तसेच अभिवाचन कार्यक्रमात शब्दाचे, त्याच्या लयीचे, भावाचे, त्यातून निर्माण होणाऱ्या अर्थवलयाचे नियोजन पाहिजे. तरच कादंबरीचे अभिवाचन केल्याचे यथायोग्य समाधान लाभते. तसेच शब्दाशब्दांनी तो वर्ण्यविषय कसा मांडला गेला आहे याकडेही लक्ष दिले जाते. त्यासाठी स्थळकाळ, वातावरण, समाजातील धारणा, कल्पना, रीतिरिवाज, नीतिनियम, भाषेची धाटणी, याचे चित्रण कादंबरीत उमटताना वाचनासाठीही त्याचं प्रकट ध्वनिरूप व्यक्त करावे लागते.

त्यानुसार 'अभिवाचन' हा एक वेगळा माध्यम प्रकार, कला प्रकार असून तो विशेष अशा पद्धतीनेच सादर केला जातो. अशा "अभिवाचन रीती" मध्ये सशक्त कथानक, ठसठशीत व्यक्तिरेखा, साजेशी भाषाशैली, चित्रमय वर्णनशैली, लेखकाची वैशिष्ट्यपूर्ण जीवनदृष्टी, महत्त्वाची ठरताना दुसऱ्या बाजूने निवेदनातून व्यक्त होणारा कादंबरीतला अनुभव तसाच निवेदनासह साकार व्हायला पाहिजे. त्यासाठी लेखकाची निवेदनशैली, वाचकाच्या मनाशी संवाद साधणारी हवी असे मानण्यात येते. अभिवाचनात कादंबरीचा गाभा कायम ठेवून तिचे संक्षिप्त रूप तयार केले जाते. निवडलेले निवेदन, कथाभाग, व्यक्तिरेखा, प्रसंग यातील नेमकेपणा ओळखून रंगमंचावर ते सादर करणे श्रेयस्कर ठरते. उत्तम ध्वनिव्यवस्था ही अभिवाचनाची महत्त्वाची गरज आहे. अन्यथा अभिवाचनाचा संपूर्ण भावानुभव सूक्ष्म बारकाव्यासह श्रोत्यांपर्यंत पोहोचणं शक्य नाही असेही डॉ. वीणा देव म्हणतात, तेच योग्य ठरते. ह्या कादंबरी अभिवाचनातून शुद्ध वाङ्मयीन अनुभव श्राव्य माध्यमांतून श्रोत्यांना देण्याचा हेतू असतो. अभिवाचन ऐकल्यावर त्यांना कादंबरी वाचावीशी वाटते हेही मोलाचे आहे.

त्यानुसार हे कादंबरीचे क्रमशः अभिवाचनाचे तंत्र सांभाळीत प्रा.डॉ.सौ. वीणा देव आणि परिवार यांनी त्यांचे तीर्थरूप व ज्येष्ठ साहित्यिक गो.नी.दांडेकर यांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाचे बरेचसे प्रयोग केले आहेत. त्यामध्ये "मोगरा फुलला", "पवनाकाठचा धोंडी", "पडघवली", "जैत रे जैत", "शितु", "मृण्मयी", "कुणा एकाची भ्रमण गाथा" (आत्मवृत्त), "देवकीनंदन गोपाला" (संत गाडगेबाबांचे चरित्रग्रंथ) या पुस्तकांचे अभिवाचन केले गेले. याची 1975 पासून सुरूवात होऊन आजपर्यंत सर्व मिळून पाचशेच्या वर प्रयोग झाल्याचे समजते. श्रोत्यांच्या मनात अनुभवाचे रूप सतत राहिले. अभिवाचक देव परिवार यांनी अनुभवाशी समरस होऊन उभी केलेली ध्वनिचित्रे, लेखक दांडेकरांच्या कादंबऱ्यांतील प्रसंग, व्यक्तिरेखा श्रोत्यांच्या मनात सूक्ष्म बारकाव्यांसह उभी करतात. यातील काही कादंबऱ्यांवर आधारित चित्रपट प्रसिद्ध असून चित्रपट माध्यमात अनेक पूरक घटक असूनही काही राहिलेले दुवे, या कादंबऱ्याच्या अभिवाचनातून प्रत्ययाला येत राहिले. यापैकी 'कुणा एकाची भ्रमणगाथा'चे अभिवाचन हे आरंभापासून उत्कटलेल्या सर्वोच्च उंचीवर राहिले" असा ज्येष्ठ चित्रकार श्री. रवी परांजपे यांचा असलेला अभिप्राय वाचायला मिळतो. कादंबऱ्यांच्या वाचनाचा श्रवण सुंदर अनुभव रसिकवाचकांना देण्याचा प्रयत्न करीत असल्याबद्दल देव कुटुंबियांचे कौतुक केलेच पाहिजे.

या दरम्यान पद्माकर गोवईकर देखील "मुंगी उडाली आकाशी"चे एकपात्री वाचन करीत राहिले. शिवाय रवींद्र भट आणि कुमुद भट देखील "इंद्रायणी काठी"चे गायनवादनाच्या साथीसह कार्यक्रम सादर करीत असल्याची नोंद आढळते.

गो.नि.दांडेकरांच्या शब्दांचा भावगर्भ प्रत्यय देणाऱ्या "पडघवली (1955)" आणि "पवनाकाठचा धोंडी (1955)" या कादंबऱ्यांचे क्रमशः वाचनाचे कार्यक्रम (अभिवाचक) विजय देव, मधुरा देव, डहाणूकर, रूचिर कुलकर्णी व प्रा.डॉ.सौ.वीणा देव यांनी कादंबऱ्यांच्या केलेल्या अभिवाचनाच्या ध्वनिफिती उपलब्ध आहेत.

## २.७.अ.७ श्रुतिकालेखन विशेष

आकाशवाणी श्रुतिका-लेखन सर्वसाधारणपणे नभोनाट्यासारखेच असते. पण तिचा प्रसारणाचा कालावधी फार कमी वेळाचा असतो. नभोनाट्याचीच छोटी आवृत्तीचे स्वरूप श्रुतिकेला मानताना एखादा छोटासा कथाभागही त्यात समाविष्ट असू शकतो. मात्र कधीकधी कौटुंबिक विषयासाठीही संवादातून श्रुतिका लेखन फुलविले जाते. सभोवतालच्या घडणाऱ्या घटना घडामोडींवरील चर्चा स्वरूपात श्रुतिका लेखन करण्यास वाव राहतो. त्यात श्रोत्यांचे उद्बोधन करणे गृहित असतेच! पात्रांच्या संवादातून त्यांची नावे, वय, सहजतेने व्यक्त होत असतात. श्रुतिकेचे कथानक (संहिता व सादरीकरण) आटोपशीर असते. घटना प्रसंगाचे स्वरूपही मर्यादित असते. त्यामुळे पार्श्वसंगीत, ध्वनिसंकेत, यांचा वापर मर्यादित असताना इतर सर्व तंत्र नभोनाट्यसदृश असते.

श्रुतिका लेखन प्रामुख्याने केवळ निवेदनस्वरूप अथवा निरूपण प्रधान कार्यक्रम असतो. आकाशवाणीवरील ह्या कार्यक्रमात संवाद, चर्चा, गप्पा, विचारांची देवाणघेवाण यांचा समावेश असतो. त्या श्रुतिका कार्यक्रमात मुख्यतः प्रसंगानुरूप व वर्तमान घटनाप्रसंग यावर आधारलेले असतात. समकालीन व स्थानिक प्रादेशिक परिसरातील विषय घेऊन त्यावर चर्चा करण्यात येते व मार्गदर्शनपर विचार व्यक्त होतात. शेती, आरोग्य, महिला जगत, विविध सामाजिक विषय, पर्यावरण यावर श्रोत्यांशी थेट संवाद इ. श्रुतिका कार्यक्रमाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

१९७२ ते १९८० या कालावधीत अनेक प्रसिद्ध साहित्यकृती आकाशवाणीवरून श्रुतिकांच्या स्वरूपात त्यास अनुबोध श्रुतिका (डॉक्युमेंटरीज) असेही म्हणतात. त्या प्रसारित झाल्या. ही संकल्पना त्याकाळात प्रसिद्ध लेखिका ज्योत्स्ना देवधर यांनीच समर्थपणे अंमलात आणली. अर्थात यामधून श्रुतिकेची लिखित संहिता महत्त्वाची ठरते. फक्त बोलण्यातूनच व्यक्तिरेखा सादर करताना उदा. वृद्ध व्यक्ती दाखवताना त्या आवाजातील थरथर, बोलण्याची संथ लय, पसरटपणा यांची सूचना द्यावी लागते. त्याचप्रमाणे पात्रांचे परस्पर प्रतिसाद (बोलण्याचा रिस्पॉन्स) किंवा प्रतिक्रियाही वयानुरूप भूमिकेनुसार असावी लागते. त्यानुसार श्रुतिकालेखन करावे लागते. मुख्य म्हणजे श्रुतिका संहिता लेखनातही लेखकाला पायांच्या हालचाली, पायांचे येणे, जाणे, घटनाप्रसंग यांचा निर्देश लिखित स्वरूपात करावा लागतोच. ह्या सूचना सुद्धा संहिता लेखनात कंसाच्या नोंदीत कराव्या लागतात. मात्र वर उल्लेख केल्याप्रमाणे उच्चारण हेच या ठिकाणी वाचिक अभिनयाच्या दृष्टीने महत्त्वाचे मानतात. शिवाय आणखी एक म्हणजे पात्रांच्या आवाज बदलासाठी लेखकाला योग्य सूचनाही देता येतात. त्यानुसार श्रुतिकांची श्रवणसुंदर अनुभूती रसिक श्रोत्यांना मिळू शकते.

श्रुतिका लेखनातून श्रोत्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा केली जाते. नभोनाट्याऐवजी एखादा विषय थोडक्यात मांडण्यास श्रुतिका लेखन उपयुक्त ठरते. श्रुतिकेचे स्वरूप संवादात्मक असते. कौटुंबिक वातावरणास साजेशा स्वरूपात श्रुतिका लिहिली जाते. छोटे छोटे संवाद, ध्वनींचा योग्य वापर श्रुतिका लेखनास पूरक ठरते. संगीताच्या साथीने श्रुतिका रंजक स्वरूपात सादर करण्यास वाव राहतो.

श्रुतिकेची सुरूवात आकर्षक आणि प्रारंभ कोणत्याही क्रियेने करावा. उदा. हळू आवाज, घरातील टेलिफोन किंवा मोबाईल रिंग वाजणे इ. तसेच प्रसंगातून स्वभावदर्शन घडावे अशी योजना लेखनात असते. संवाद, भाषा ही ओघवती, अर्थवाही, प्रसन्न अशी असावी ही पूर्वअट असते.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : 'कोविड योद्धा-19' चे गौरव करणारी श्रुतिका लेखनाचे फक्त निवेदन व सुरूवात आणि शीर्षक याविषयी माहिती लिहा.

## २.७.अ.८ नमुना प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१) आकाशवाणीवरील श्रुतिकालेखन कसे केले जाते ते लिहा.

२) आकाशवाणीवरील श्रुतिकांचे गुणविशेष लिहा.

३) नभोनाट्य आणि श्रुतिका यांचे वेगळेपण विशद करा.

४) श्रुतिका आणि अभिवाचन यांचे वेगळेपण लिहा.

**ब. टीपा लिहा**

१) श्रुतिकेचे स्वरूप आणि विशेष

२) श्रुतिका लेखनाचे तंत्र

३) श्रुतिकेची भाषा

४) श्रुतिकेतील संवाद लेखन

❖❖❖❖

# ब- नभोनाट्य लेखन

**घटक रचना :**

२.८.ब.१ उद्देश

२.८.ब.२ प्रस्तावना

२.८.ब.३ नभोनाट्य लेखन (लेखन व सादरीकरण)

२.८.ब.३.१ शीर्षक व मध्यवर्ती कल्पना

२.८.ब.३.२ कथानक

२.८.ब.३.३ व्यक्तिरेखा (पात्र रचना)

२.८.ब.३.४ संवाद

२.८.ब.३.५ संगीत व ध्वनी संसूचन (ध्वनी संकेत)

२.८.ब.३.६ श्रोतृवृंद

२.८.ब.४ नभोनाट्य संहिता - सादरीकरण (उदाहरणे)

२.८.ब.५ आकाशवाणीवरील नभोनाट्य आणि श्रुतिकेचे जुने रूप - स्वरूप

२.८.ब.६ आकाशवाणीवरील नभोनाट्य-श्रुतिका-आणि रूपक

२.८.ब.७ सारांश

२.८.ब.८ नमुना प्रश्न

## २.८.ब. नभोनाट्य व लेखन

### २.८.ब.१ उद्दिष्टे

**हा घटक अभ्यासल्यानंतर आपणास पुढील उद्देश साध्य करता येतील.**

१) नभोनाट्य लेखन व सादरीकरण - स्वरूप तंत्र व कौशल्याची माहिती मिळेल.

२) इतर माध्यमांपेक्षा नभोनाट्याची वेगळी ओळख ध्यानात येईल.

३) नभोनाट्याची संहिता, मध्यवर्ती कल्पना, कथानक, पात्ररचना, संगीत, ध्वनी आणि संवाद यांचे उपयोजन स्पष्ट करता येईल.

४) नभोनाट्याची श्राव्य वैशिष्ट्ये व पात्ररचना लक्षात घेऊन त्यानुसार संवाद लिहिता येतील.

५) नभोनाट्य लेखन-सादरीकरण, भाषण, चर्चा, परिसंवाद यातील फरक व वेगळेपण विशद करता येईल.

**२.८.ब.२ प्रस्तावना**

नभोनाट्यास श्रोतृवृंद स्वस्थ चित्ताने ऐकताना कथेशी, संवाद आणि पात्रांशी जवळीक साधतो, चिंतन करतो, मात्र श्रोत्यांच्या अभिरूचीशी संवाद साधणे हे आव्हान असते. नभोनाट्याचे विषय-ठराविक व नियोजित वेळेस ते ऐकावे लागतात. कृती आणि अभिनयास नभोनाट्यात मर्यादा येताना ते यशस्वी होणेचे आव्हान सादरकर्ते व कलावंत, दिग्दर्शकांना पेलावे लागते. त्याअर्थाने ते केवळ श्राव्य माध्यम असल्याने एकांगी एकसुरी ठरते.

आकाशवाणीवरील नभोनाट्यलेखन व सादरीकरणात आवाज आणि संवाद यांचा मेळ घालण्यात येतो. साधारणपणे अर्ध्या तासाच्या वेळेतील घटना-प्रसंगातून कमीत कमी पात्रे आणि त्यांच्या आवाजाची वैशिष्ट्ये सामावलेली असतात. पात्र आणि घटना-घडामोडीनुसार आवाज बदलतो. (उदा. दुःखद प्रसंगातील शोक भावना, निवडणुकीतील जोरदार प्रचार भाषण, मैदानावरील आक्रोश इ.) तसेच हा आवाजसुद्धा पात्र बोलत असताना सुस्पष्ट, शुद्ध उच्चार आणि जलद लयीत असतो. आवाजात भावना अभिव्यक्तीनुसार चढ-उतार ऐकवला जातो. नभोनाट्य सादरीकरणात संवादास लकब-लय असते, असे म्हणता येईल. नभोनाट्य लेखनात व सादरीकरणात शीर्षक, कथानक मध्यवर्ती कल्पना, पात्ररचना, संवाद, ध्वनी संकेत व संगीत इ. आवश्यक असतात. एकांकिका-नभोनाट्य-कथा-कादंबरी लेखनाविषयी लिहिताना कथाभाग असतोच! पण त्यांचे तंत्र व लेखन स्वरूप वेगवेगळे असते. कथेचा आवाका मर्यादित, तर कादंबरीला पृष्ठांचे बंधन नसते. कादंबरीचे नाट्यरूपांतर व नाटकाचे संक्षिप्त स्वरूपात नभोनाट्य होऊ शकले. नभोनाट्य हे फक्त श्राव्य माध्यम तर नाटक दृश्य व श्राव्य स्वरूपात रंगमंचावर आकाशवाणीवरही दोन भागात सादर करण्यास वाव राहतो. नाटकात संवाद असतात तर कादंबरी, कथा लेखनात निवेदनही केले जाते. नाटकात-नभोनाट्यात-श्रुतिकेत कलावंत असतात. श्रुतिका व नभोनाट्य स्वरूप (संवादात्मक पद्धत) साधारण असताना मात्र कोणताही सुविहितपणे सादर केलेला खास माहितीपूर्ण कार्यक्रम म्हणून श्रुतिकेकडे पाहिले जाते. श्रुतिकेत कथानक पात्रे याऐवजीही माहितीला महत्त्व देताना कधीकधी अनुबोधश्रुतिका 'डॉक्युमेंटरी फिचर' म्हणूनही सादर होते. उदा. (लोकसंगीत प्रधान, भारूडाची माहिती व सादरीकरण इ.)

**२.८.ब.३ नभोनाट्य लेखन (रेडिओ प्ले) लेखन व सादरीकरण**

**२.८.ब.३.१ शीर्षक व मध्यवर्ती कल्पना –**

नभोनाट्याच्या सुरूवातीला निवेदकाने शीर्षक (नाव) लेखकाचे नाव आणि सादरकर्ते दिग्दर्शक यांची नावे सांगावी लागतात. त्याचबरोबर नभोनाट्याची मध्यवर्ती कल्पनासुद्धा एक-दोन वाक्यास अगदी थोडक्यात नमूद करणे योग्य ठरते. पुन्हा नभोनाट्याच्या शेवटीही संगीताच्या धूनसह शीर्षक, लेखकाचे नाव, सादरकर्ते, दिग्दर्शक, संगीतकार व कलाकारांची नावे (पात्रांसह) पुन्हा एकदा सांगावी लागतात.

### २.८.ब.३.२ कथानक

नभोनाट्यात मध्यवर्ती कथानकाचा विस्तार, घटना प्रसंगाच्या अनुषंगाने करावा लागतो आणि तेही नियोजित वेळेत संवादातून पूर्ण करणे योग्य ठरते. नभोनाट्याच्या सुरूवातीनंतर हळूहळू संघर्षाचा उत्कर्षबिंदू आणि समारोप सुद्धा सूचक, समर्पक, अर्थवाही संवादासह होतो. ध्वनी व संगीताची धून वाजवून कथानक सादर केले जाते. नभोनाट्यात कथानक आवश्यक असून त्यास संघर्षाची जोड दिली जाते. आशय-पात्रांची वैशिष्ट्ये (स्वभावविशेष) या आधारे कथानक संहिता लिहिताना ते अतिशय प्रभावी-परिणामकारक संवादानुकूल असावे लागते.

### २.८.ब.३.३ व्यक्तिरेखा (पात्ररचना)

संवाद, कथानक व पात्ररचनेच्या साहाय्याने नभोनाट्य फुलविले जाते. पात्रांचे स्वभावविशेष, त्यांचा अंतर्मनातील संघर्ष, पात्रांमधील उठावदार संघर्ष दाखविणे अपेक्षित आहे. यामध्ये मुख्य पात्रे (नायक-नायिका) गौण व साहाय्यक पात्रे यांचाही समावेश असतो. मात्र ही पात्रसंख्या अतिशय मोजकीच असून त्यांच्यासाठी अनुरूप संवाद व कथानक यांची रचना करण्यात येते. नभोनाट्यातील कथानक प्रभावी, परिणामकारक, उठावदार होण्यासाठी ह्या व्यक्तिरेखा (पात्रे) साह्यभूत ठरतात. ह्या सर्वांच्या एकत्रिकरणातून नभोनाट्यसंहिता लिहिली जाते व सादर करण्यात येते. संवाद व कथानक यासह नभोनाट्यातील व्यक्तिरेखा आणि भूमिका करणारे कलावंत, प्रेक्षक श्रोत्यांच्या लक्षात राहतात. त्यांना दादही चांगली मिळते. तसेच पात्रांची संख्याही कमीतकमी-मर्यादित ठेवताना, (यात स्त्रीपात्रे ही केवळ एक किंवा दोनच असावीत) त्यांची नावे, परिचय, वय, नातेसंबंध यांचा अनुबंध, स्थळ, काळ, वातावरणाशी जोडता येतो. ह्या सर्व पात्रांची ओळख केवळ संवादातून होते. उदा.

अ) डॉक्टर - अहो सिस्टर-रूम नं. 3, बेड नं. 7 ची महिला (फोनवर) पेशंटची भूल उतरली का? शुद्धीवर आली असल्यास मला दुपारी लवकर कॉल करा......(संगीत धून)

सिस्टर - हो भूल दुपारीच थोड्या वेळापूर्वी उतरली डॉक्टर! (फोनवर) रक्तदाबही आता हळूहळू नॉर्मल झाला आहे. सकाळपासून मी तिच्यावर खास लक्ष देत आहे. आयसीयू मधून नातेवाईकही पाहून गेले आहेत. (संगीत धून)

यामधून पात्रांची नावे, वेळ, काळ, परिस्थिती यांचा समग्रतेने बोध होतो. हा दोन पात्रांमधील संवाद असून जलदगतीने, प्रसंगानुरूप, गंभीरतेने थोडासा विराम घेत, संगीताची हळूवार धून सादर करीत पात्रांना बोलते केले आहे.

### २.८.ब.३.४ संवाद

संवाद हे नभोनाट्यातील प्राण होय. आकाशवाणी हे केवळ श्राव्य माध्यम असताना लेखक पात्र आणि संवादाच्या माध्यमातून व्यक्त होतो. यातील संवाद श्रोत्यांशी एकरूप होत असतो. त्यायोगे संपूर्ण नभोनाट्याचा आस्वाद घेण्यास रसिक श्रोते गुंतून पडतात. यातील संवाद पात्रांनुसार अभिव्यक्त होतात. कथानक व पात्र यांना जोडणारा संवाद हे आकाशवाणीतील नभोनाट्याचे सामर्थ्य होय. संवादातूनच कथानक उलगडत जाते. तसेच

संवाद ऐकतानाच रसिक श्रोत्यांना पात्रांचे वय, त्यांची भूमिका, व्यक्तिमत्त्व लक्षात घेता येते. नभोनाट्यातील संवाद लेखन व सादरीकरणही घटना प्रसंगानुसार, छोट्याछोट्या स्वरूपात लिहिताना ते उच्चारण्यास सहज, सुलभ, भावस्पर्शी, गतिमान, प्रवाही असे असतात.

**अ) उदा. प्रसंगानुरूप संवाद लेखन**

**उत्साह-आनंद दर्शविणारे संवाद**

मुलगा - आई.....ऽऽ मी पहिल्या नंबरने उत्तीर्ण झालो. पाया पडतो, आशीर्वाद मागतो.

आई - बाळा...शुभाशीर्वाद, शुभचिंतन, असेच यश तुला मिळो, यशवंत, कीर्तिवंत हो!

**संताप, राग, चीडचीड दर्शविणारे संवाद**

पत्नी - अहो..... मला माहेरी जायचंय. सणासाठी आईने बोलाविले आहे. तुम्ही नेहमीच नकार दर्शविता आणि मी त्यामुळे नाराज असते. (संगीत ध्वनी)

पती - अगं! अलीकडे आईची तब्येत बरी नसते. ऑफिसमध्येही फार काम असते. काम न उरकल्यामुळे बॉस रागावतात, चिडतात!

अशा विविध भाव-दार्शनिक संवादामुळे (संगीतध्वनी) श्रोत्यांचे अवधान टिकून राहते व नभोनाट्य श्रवण करण्यास औत्सुक्य वाढते. संवाद, लेखन, उच्चार यामधून घटना प्रसंगाचे गांभीर्य अनुभूती घेताना परिस्थिती-वातावरणही समजून घेता येते.

### २.८.ब.३.५ संगीत व ध्वनी संसूचन (ध्वनी संकेत)

नभोनाट्यात ध्वनिसंकेत व संगीताची धून मुख्यतः वातावरणनिर्मितीसाठी व कथानक-संवादाला धार येण्यासाठी, कलाटणी मिळण्यासाठी वापरतात. उदा. रेल्वेच्या गाडीतील गार्डचा शिट्टीचा आवाज-प्रेमीजनांना निरोप देण्यासाठी व भावपूर्ण संगीताची धून ऐकवली जाते. घरातील चिमुकल्यांचा गोंधळ, शाळेची घंटा, गाडीचा हॉर्न यामधून यथायोग्य ध्वनीसंकेत सादर करून नभोनाट्य सजीव केले जाते. याविषयीचे ध्वनीसंकेतही निश्चित आणि योग्य त्या प्रसंगात, योग्य त्या वेळेत वाजवितात. उदा. गुरे सायंकाळी घराकडे परतण्याची वेळ, दिवे लागणीची वेळ, सायं प्रार्थना, गृहिणींची धावपळ आणि त्यांचे बोलणे इ. सर्व काही कौटुंबिक वातावरण व त्यास ध्वनी व संगीताची शांत-सुस्वरात जोड देत सादर करण्यात येते. नभोनाट्यातील शीर्षक, कथानक व त्याची सुरूवात, शेवट, तसेच प्रसंगानुरूप संहितेनुसार संगीत व ध्वनीसंकेत यांचे उपयोजन केले जाते. मात्र त्याचे प्रमाण मर्यादितच असते. अशा प्रकारच्या संगीतरचनेचा निश्चितच प्रभाव आणि परिणाम जाणवतो. तसेच विशिष्ट ध्वनी संकेत व संगीत वापरून प्रसंगांचे संसूचन करता येते. उदा. विवाह मंडपातील मंगलाष्टके म्हणताना, आनंदाचे भारावलेल्या क्षणांचे संवेदनशील वाद्य संगीत याचीही एक विशिष्ट लय, स्वर व सूर असतो. रेडिओवरील नाटकात (नभोनाट्य) काही प्रमाणात वातावरणनिर्मितीसाठी संगीताच्या आधारे प्रसंगात उठाव आणला जातो.

### २.८.ब.३.६ श्रोतृवृंद

प्रामुख्याने नभोनाट्य हे श्राव्य स्वरूपात सादर होत असते. श्रोत्यांचा येथे विचार करताना श्रोतृवृंद घरीच बसून नियोजित वेळेत नभोनाट्य ऐकण्यास सहकुटुंब लाभ घेतात. चित्रपटगृह किंवा रंगमंच नाट्यमंदिर प्रमाणे घरामध्ये बंदिस्त वातावरण नसते. त्यांचे उठणे-बसणे, क्वचित हालचालीही होत राहतात. म्हणून ह्या सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी नभोनाट्य लेखन आणि सादरीकरण आकर्षक, प्रभावी व परिणामकारकतेने करावे लागते. कौटुंबिक स्वरूपाचे, श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे अशा स्वरूपात नभोनाट्याची रचना असते. शिवाय नभोनाट्याचे शीर्षक, कथानक, मध्यवर्ती कल्पना, संघर्षबिंदू आणि समारोप यापर्यंत श्रोत्यांचे अवधान टिकून राहिल अशा पद्धतीने नभोनाट्य लेखन करण्यात लेखक व कलाकारांचा कस लागतो. श्रोतृवृंदाच्या जवळची, परिचयाची, आवडीची पात्रे, कलावंत व लेखक असताना अशा नभोनाट्याला अधिक प्राधान्य मिळते. (उदा. शिक्षक, पोलीस, सरकारी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व घरातील कौटुंबिक सदस्य इ.) नभोनाट्यातील संघर्ष, कथानक, नाट्यमयता, समस्या यांची उकल करून घेणारी समज प्रेक्षकांना असली पाहिजे. ही गोष्ट देखील येथे अधोरेखित करण्यात येते. मागच्या काळातील काही गाजलेली नभोनाट्य लेखक, सादरकर्ते व कलावंत अजूनही जाणकार श्रोत्यांच्या लक्षात आहेतच!

केवळ आवाज आणि वाक्-सिद्धी शैली या दोन गोष्टींच्या आधारे संपूर्ण कलाकृती श्रोत्यांपर्यंत पोचविण्याचे आव्हानच श्री. पुरूषोत्तम जोशी, ज्योत्स्ना देवधर, व्यंकटेश माडगूळकर-जयराम कुलकर्णी आणि प्रज्ञा ओक यांनी समर्थतेने स्वीकारले. केवळ पार्श्वसंगीत, ध्वनीमुद्रण तंत्र आणि संवाद या सगळ्यांच्या एकत्रीकरणातून नभोनाट्यलेखन संहिता श्रोत्यापर्यंत पोचविता येते. कथा-कादंबरी वाचतानाचा आनंद, नाटक पाहिल्याची अनुभूती, डोळ्यासमोर जशी उभी राहते तेच कल्पनाचित्र श्राव्य माध्यमातूनही (ऐकताना) त्यातील अनुभव दर्शन व त्याचा अर्थ समजून घेता येण्यातच नभोनाट्याचे यश समजले जाते. मुख्य म्हणजे नभोनाट्य लेखनात संपूर्णतः संवाद रूपातच कथानक सादर होत असते. हेही तितकेच खरे आहे. अर्थात या ठिकाणी लेखकाच्या शब्दांची ताकदही तितकीच महत्त्वाची असते. यातून साहित्य आणि समाजजीवन यांच्या परस्पर संबंधाचीही कल्पना येऊ शकते. आकाशवाणीचा कलाकार त्यांच्या वयानुरूप न निवडता त्यांच्या आवाजाच्या वयानुसार निवडतात. रेडिओत नाट्यचाचणी ही आवाजासह वाचिक अभिनय अशी असताना त्यातूनच आवाज निवडून त्यापुढे वय, कोणत्या भूमिकेत योग्य असे लिहिले जाते व निवड करण्यात येते. (जयश्री कुबेर – अभिवाचन, पृ. 169)

### २.८.ब.४ नभोनाट्य - सादरीकरण

आकाशवाणीतील नभोनाट्याची सुरूवात संगीताच्या ध्वनीतून करण्यात येते. त्याबरोबरच निवेदनही असतेच. संवादाच्या ओघात कथानकाचे धागे उलगडून दाखवताना त्यात संघर्ष नाट्य, गतिमान व प्रवाही संभाषणातून व्यक्त होत असतो. शिवाय प्रभावी नाट्यमयता संवेदनशीलतेने समजून घेताना केवळ वाचिक अभिनयातून सादर करावे लागते. शिवाय भाषिक कृतीचीही जोड द्यावी लागते. मागच्या काळात 'तनमाजोरी' (प्रेमानंद गज्वी), 'रात्र' (विजय तेंडुलकर), 'मृगतृष्णा' (लक्ष्मीकांत देशमुख), 'शस्त्रसंन्यास' (चंद्रकांत बर्वे) ही

आणखी काही नभोनाट्य लेखनाची उदाहरणे होत. 'विदुषक' (जी.ए.कुलकर्णी), 'आरण्यक' (लक्ष्मण लोंढे), 'स्टडफार्म' (अनिल बर्वे), 'गाढवाचे लग्न' (दादा इंदुरीकर) ही देखील नभोनाट्य लेखनाची नावे सांगता येतील. सर्वसामान्य रसिक जाणकार, जिज्ञासू, वाचनप्रिय श्रोत्यांना या संहितेचे कथानक व नाट्य सहजतेने माहिती होऊ शकते. फक्त लेखनात व सादरीकरणात वेगळेपण दाखवताना स्थलबदल, शब्द-ध्वनींचे संसूचन श्रवणसुलभ, चित्रदर्शी भाषा यासह घटना प्रसंगाचे चित्र श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे राहणारे संघर्ष आणि संवादातील उत्कर्षबिंदूचा परिपोष करणे यथायोग्य व महत्त्वाचे ठरावे.

रंगमंचावरील नाटकातील पात्रांचा अभिनय, रंगमंच व्यवस्था, संवाद या आधारे नाटक थेट प्रेक्षकांना भिडते. ते एक प्रभावी दृकश्राव्य माध्यम आहे. परंतु नभोनाट्यात प्रत्यक्ष पात्रे दिसत नसताना केवळ श्राव्य माध्यमातून रसिकांना संपूर्ण नाट्य ऐकविण्याचे व नाट्य सादर करण्याचे सामर्थ्य रेडिओ नाटकात (रेडिओ प्ले) (नभोनाट्य) असते. यासाठी एक स्वतंत्र नाट्य लेखन तंत्र असते. एवढेच नव्हे तर नभोनाट्य लेखन व सादरीकरणासही स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणूनही ओळखण्यात येते. लोकरंजन आणि उद्बोधनासह माहिती, ज्ञान देण्याचे कार्य ह्या नभोनाट्यातून केले जाते. मराठीत विजय तेंडुलकर, रत्नाकर मतकरी, सुरेश खरे, पु.ल.देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, ह.मो.मराठे अशा प्रसिद्ध लेखकांनी नभोनाट्ये लिहिली असल्याची नोंद घेता येते.

**नभोनाट्य लेखन (काही उदाहरणांसह चर्चा)**

- सुप्रसिद्ध साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'वाटसरू' ह्या कथेवरून मागच्या काळात काही वर्षांपूर्वी पुरूषोत्तम जोशी यांनी केलेले नभोनाट्य रूपांतर अक्षरशः लाजवाब ठरले. गेली अनेक वर्षे या नभोनाट्याची लोकप्रियता अद्याप टिकून आहे.

- ग.दि.माडगूळकरांच्या 'संगीतिका', पु.ल.देशपांडे यांचे 'ऑपेरा', यांसह व. पु. काळे, अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, वसुधा पाटील, उर्मिला सिरूर यांच्या काही कथांवरून नभोनाट्य प्रसारित झाल्याच्या नोंदी आहेत.

- **वगनाट्याचे नभोनाट्य रूपांतर**

वगनाट्य – 'पती गेले गं काठेवाडी' (व्यंकटेश माडगूळकर) याचे नभोनाट्य रूपांतर करून सादरीकरण केले गेले. पद्यरचना-वसंत सबनीस, संगीत-अजय पराड, निर्मिती-कलापिनी नाट्यसंस्था

- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीतून व विचारांतून प्रेरणा घेत समाजप्रबोधन व परिवर्तनाच्या हेतूने काही नभोनाट्यलेखन झाले. त्यामध्ये भि.शि.शिंदे लिखित व केंद्र सरकारचा पुरस्कार मिळालेले 'सूर्यफूल' नावाचे नभोनाट्य खूप गाजले. याशिवाय 'बलिदान', 'भूमिपुत्र', 'फिनिक्स', 'पक्ष्याचे अंडे', 'परिघाबाहेरील बिंदू' ही भि.शि.शिंदे यांची नभोनाट्ये प्रसिद्ध आहेत. त्याचे प्रसारणही मागच्या काळात पुणे आकाशवाणी केंद्रावरून झाले. वर उल्लेख केलेले 'भूमिपुत्र' ह्या नभोनाट्याचे 14 प्रादेशिक भाषांत विविध आकाशवाणी केंद्रावरून प्रसारण झाले होते. 'कथा ही उग्र शबरीची' ह्या

नभोनाट्यासही रसिक श्रोत्यांकडून चांगलाच प्रतिसाद लाभला. लेखक भि.शि.शिंदे यांची ही सर्वच नभोनाट्ये लोकप्रिय ठरलीत.

- **आणखी नभोनाट्य लेखन उदाहरणे**

**कादंबरीवर नभोनाट्य रूपांतर**

मूळ कादंबरी 'स्फोट' - लेखक-अरूण साधू

नभोनाट्य - 'स्फोट', नभोनाट्य रूपांतर-सुधीर मुंगी

- मूळ कादंबरी 'छावा' - लेखक - शिवाजी सावंत

नभोनाट्य रूपांतर 1) गौरी लागू, 2) प्रसाद मिरासदार

नभोनाट्य - 'छावा'

- 'आता आमोद सुनासी आले' (दि. बा. मोकाशी) या कलाकृतीचे पुणे आकाशवाणीवर नभोनाट्य रूपांतर कार्यक्रम झाल्याची नोंद आढळते

संकलन-विजय तेंडुलकर, दिग्दर्शन - अतुल पेठे

- आणखी एक विशेष नोंद - नभोनाट्यासाठी मुख्यतः लिहिण्यात आलेली बा.सी.मर्ढेकर लिखित 'कर्णं' (1944), 'बदकाचे गुपित' (1947) आणि 'औक्षण' (1946) या तीन संगीतिका-एकांकिकाच होत! त्यांचे लेखन करताना मर्ढेकरांनी पाश्चात्त्य ऑपेराचे स्वरूप डोळ्यासमोर ठेवून कर्णाचे करूण, गंभीर शोकनाट्य व काव्य आणि संगीत यांचा मिलाफ करून एका जोडप्याचा अनुभव सांगितला, तोही हळूवार पद्धतीने लेखन करून! हे नभोनाट्य केवळ संवाद, पार्श्वसंगीत, वातावरण निर्माण करणारी ध्वनियोजना यावर अवलंबून असूनही नाटकातील सर्व दृश्ये श्राव्य अंगाने सिद्ध झालेले दिसते.

ह्या सर्वच उदाहरणातून नभोनाट्य लेखन संहिता व सादरीकरणाचे स्वरूप व तंत्र स्पष्ट होऊ शकते.

- **नभोनाट्य - 'तो शेवटचा दिवस'**

श्री. वसंत जोशी यांनी स्वतः लेखन करून नभोनाट्ये (आकाशवाणीसाठी) सादर केली. मुंबई आकाशवाणी केंद्रावर त्याचे सादरीकरण बाळ कुडतरकर यांनी सादर केले. ही कथा श्री. वसंत जोशी यांनी लिहिताना त्यांनी संत नामदेवांच्या अभंगांचा आणि प्रा.श्री.म.माटे यांच्या एका लेखाचा आधार घेतला होता. नामदेवांची भूमिका स्वतः बाळ कुडतरकर यांनी साकारली. ज्ञानदेवांच्या सप्त जन्म शताब्दी निमित्त हे नभोनाट्य प्रसारित झाले. कथेचे निवेदन श्री. नामदेव महाराज करतात, अशी त्यात कल्पना होती. इतर पात्रांच्या भूमिकाही कसलेल्या नटांनीच केल्या. आकाशवाणी मुंबई केंद्रावरून हे नभोनाट्य सादर होताना ते बरेच लोकप्रिय झाले. ह्या नभोनाट्याचे नाव होते, 'तो शेवटचा दिवस'. ह्या नंतरही श्री. वसंत जोशी यांनी यशस्वी नभोनाट्ये लिहिली.

ह.मो. मराठे यांच्या 'हद्दपार' नावाच्या पुस्तकात तीन कथा असून, त्यात पति-पत्नींची जोडी असते. ह्या कथाभागात बदलत्या नात्याची वीण, नात्यातील वादळांमुळे दोघांमधील भावनिक नाते पूर्णपणे संपून गेलेले असते. या नात्याचे तीन रंग या तीन कथांमधून आविष्कृत झाले आहेत. ह्याच 'हद्दपार' कथांचे पुणे आकाशवाणीवर तीन भागात नभोनाट्य रूपांतर झाले असून त्याचे लेखनही स्वतः ह.मो.मराठे यांनीच केले. विशेष म्हणजे 'हद्दपार' ही कथा पुस्तक, नाटक, नभोनाट्य, टी.व्ही.मालिका अशा सर्व फॉर्ममध्ये रूपांतरित झाली असल्याची नोंद आहे.

## २.८.ब.५ आकाशवाणीवरील नभोनाट्य आणि श्रुतिकेचे जुने रूप-स्वरूप

भारतीय आकाशवाणीवर नभोनाट्याला इ.स.1936 पासून स्वतंत्र स्थान मिळाले. त्यावर्षी बंगाली भाषेतील एका नाटकाच्या अनुवादाने भारतीय नभोनाट्याला प्रारंभ झाला. त्यानंतर यथावकाश भारतीय विविध भाषांतील नभोनाट्ये प्रसारित होण्यास सुरूवात झाली. अशा प्रकारचा कार्यक्रम प्रसारित करताना त्याला आवश्यक असणारे असे काही खास तंत्र या प्रारंभकाळात मात्र विकसित झाले नव्हते तर परंपरागत नाटकांतील काही भागच नभोनाट्य म्हणून प्रसारित (ध्वनिक्षेपित) करण्याची प्रथा होती. त्यानंतर विद्यापीठांतून शिकविण्यात येणाऱ्या इंग्रजी भाषेतील एकांकिकांचे प्रयोग ध्वनिक्षेपित केले जात होते. 'ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन'-लंडनवरून प्रसारित होणाऱ्या लहान स्वरूपातील श्रुतिका वा प्रहसने इ. यांची जागा भारतीय भाषांतील अनुवादांनी घेतली. उपरोक्त बी.बी.सी.द्वारा तयार केलेल्या विशिष्ट ध्वनीमुद्रिकांचाही सुरूवातीला वापर झाला. पुढील काळात नभोनाट्य रचनेचे आणि प्रक्षेपणाचे, सादरीकरणाचे तंत्र हळूहळू विकसित होत गेले आणि आकाशवाणीवरून एकांकिका प्रक्षेपित होऊ लागल्या. विनोदात्मक श्रुतिका, प्रहसने वा हिंदी भाषेतील झलकियाँ ही नभोनाट्याची काही प्रगत रूपे समजली जातात.

स्वातंत्र्योत्तर काळात नभोनाट्याचे विषयक्षेत्र विस्तृत होताना त्यात नवेनवे तंत्र आणि बदल स्वीकारण्यात प्राधान्य मिळाले. त्यातूनच पुढे 'रूपक' निर्मिती, धारावाहिक नाट्य विविध श्रुतिका, प्रसंग चित्र मालिका ह्यांच्या एकत्रीकरणातून 'रंगारंग' कार्यक्रम प्रसारित होऊ लागला. पुढील काळात नभोनाट्यस्पर्धाही आयोजित होऊ लागल्याची माहिती मिळते. यातील यशस्वी नभोनाट्य रचना देखील विविध भारतीय भाषेत भाषांतरित होऊन ती एकाचवेळी वेगवेगळ्या भाषिक आकाशवाणी केंद्रांवरून सहक्षेपित केली जातात.

## २.८.ब.६ आकाशवाणीतील नभोनाट्य-श्रुतिका आणि रूपक

आतापर्यंतच्या विवेचनात आकाशवाणीचे स्वरूप, वैशिष्ट्ये समजून घेताना दुसऱ्या बाजूने त्यात समाविष्ट असलेल्या नभोनाट्य व श्रुतिका लेखनाचीही माहिती करून घेतली आहे. ह्या रूपकातील कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचा यथोचित संगम होताना भाषण, मुलाखत, चर्चा, नाटक, काव्यवाचन यांचे उपयोजन केले जाते. म्हणजेच रूपकात विविध कार्यक्रमाचे दर्शन घडते. असे म्हणावयास हरकत नाही. रूपकाचा विषय निश्चित ठरविताना 1) त्याचे स्वरूप निश्चित करणे, 2) रूपकाची संहिता लिहिणे 3) प्रत्यक्ष निर्मिती व सादरीकरण अशा पद्धतीने रूपक पूर्ण होते. तसेच रूपक कार्यक्रम सादर करण्यापूर्वी संपूर्ण माहिती गोळा करणे, संदर्भ साधनांतून माहितीचा शोध घेणे, नोंदी करणे, अशी रूपक निर्मितीची प्रक्रिया असते. सादरकर्त्याला ही सर्व सामग्री गोळा करूनच त्या आधारे मुलाखती, आशय विषयाचे

वेगळेपण, रूपकाची शीर्षक समर्पकता आणि संदेशाचे संसूचन ह्या सर्वांमधून रूपक पूर्ण होते. ह्याचबरोबर रूपकाचे लेखन कोणी केले, त्यांची व कलाकारांची नावे, आकाशवाणीकेंद्राचे नावासहित उद्घोषणा सुरूवातीला व शेवटीही करण्यात येते. रूपक लेखनासाठीही राष्ट्रीय-सामाजिक विषय उपयुक्त ठरतात. थोर व्यक्ती, महापुरूष किंवा महत्त्वाच्या घडामोडींवरही रूपक लिहिण्यात येते. त्यासाठी संदर्भ साधने शोधून त्याचा समावेश रूपकात केला जातो.

उदा. 'भारतीय स्वातंत्र्याची पन्नास वर्षे' यासाठी थोर क्रांतीकारक हुतात्मे यांच्या कार्याचा परिचय, काही देशभक्तीपर गीते यांचा प्रसंगानुरूप वापर होऊ शकतो. महापुरूषांच्या जीवन चरित्रांवर रूपकाचा कार्यक्रम करताना निवडक घटना घडामोडी सांगता येतात व त्यांच्या चरित्राची महती सांगता येते. त्यांच्या आवाजातील विचारांची ध्वनिमुद्रिका वा गीत लेखनाचे नमुनेही सादर करण्यात वाव असतो. उदा. भारतरत्न भीमसेन जोशी किंवा लता मंगेशकर यांच्या जीवन चरित्रावर रूपक लिहिताना ससंदर्भ नोंदी सादर करता येतात. उदा. गीत लेखन व गायनाचे सादरीकरण दृश्य.

**रूपक - लेखन नमुना**

**शीर्षक-मराठी हास्यरसाचे मिरासदार - द.मा.मिरासदार**

निवेदक-पुरूष - नमस्कार - आकाशवाणीचे हे पुणे केंद्र आहे. सायंकाळचे साडेपाच वाजले आहेत. आता सादर करीत आहे रूपकाचा कार्यक्रम. रूपकाचे नाव आहे 'मराठी हास्यरसाचे मिरासदार- द.मा.मिरासदार' सादर कर्ते (सादरीकरणात दोन व्यक्ती सहभागी आहेत)

पुरूष निवेदक - मराठी साहित्यात आणि विशेषतः ग्रामीण बाजाच्या अस्सल विनोदातून द.मा.मिरासदारांनी श्रोत्यांना निखळ हास्यरसाने रिझविले. मनोरंजन केले.

स्त्री निवेदका - एवढेच नव्हे तर व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि प्रा.द.मा.मिरासदार या मान्यवर कथाकारांनी ग्रामीण कथाकथनातून ग्रामीण विनोदाचे कार्यक्रम केले.

पुरूष निवेदक - विशेषतः द.मा.मिरासदारांनी ग्रामीण जीवनातील व्यक्तिरेखा त्यांच्या जगण्यातील बारकावे, इरसालपणा, स्वभाव-वैशिष्ट्यांचे नमुने पेश केले. (येथे त्यांच्या काही कथांची नावे सांगण्यात येतात उदा. द.मा.मिरासदारांच्या आवाजातील 'शिकवणी' कथेचा काही भाग सादर करण्यात येतो.) (हास्याचा आवाज 3 मिनिटे)

स्त्री निवेदिका - त्याचप्रमाणे- 'माझ्या बापाची पेंड', 'भुताचा जन्म', 'माझी पहिली चोरी', 'हरवल्याचा शोध' ह्या प्रा. द. मा. मिरासदारांच्या कथा उत्कृष्ट लेखन आणि उत्तम सादरीकरणामुळे लोकप्रिय झाल्या.

(येथे पुन्हा एकदा ‘माझ्या बापाची पेंड’ ह्या विनोदी कथेचे द. मा. मिरासदारांच्या आवाजात काही भागांचे सादरीकरण केले जाते. वेळ 3 मिनिटे-हास्याचा आवाज)

पुरूष निवेदक - अशा ह्या त्यांच्या कथाकथनातून त्यांना ऐकणे म्हणजे रसिकांना पर्वणी वाटत असे. श्रोते कमालीचे भारावून जात असत. गप्पा मारता मारता रंजकपणे गोष्टी सांगण्यात ते फार तरबेज होते. उदा. ‘निरोप’ ही त्यांची विनोदी कथा त्यांच्याच आवाजातील काही भाग (सादरीकरण - 3 मिनिटे-हास्य व टाळ्यांचा कडकडाट)

स्त्री निवेदिका - याशिवाय द.मां.नी ‘भोकरवाडी’ नावाच्या काल्पनिक गावाची निर्मिती करून विनोदाचा रंगढंग फुलविला. श्रोत्यांना हास्यकल्लोळात बुडविले.

पुरूष निवेदक - द.मा.मिरासदारांचा निर्मळ, निखळ विनोदाने रसिक श्रोत्यांची विनोदबुद्धी तजेलदार आणि टवटवीत ठेवली.

स्त्री निवेदिका - आणखी एक म्हणजे द.मा.मिरासदारांनी चित्रपट क्षेत्रातही कर्तृत्व गाजविले. अनेक चित्रपटांच्या कथा-पटकथा व संवाद त्यांनी लिहिले उदा. ‘एक डाव भुताचा’ हा त्यातला सर्वात लोकप्रिय व गाजलेला चित्रपट. यातील काही भागांचे सादरीकरण ऐका. (वेळ 3 मिनिटे सूचना) (संगीताची धून) यातील हेडमास्तरांची भूमिकाही त्यांनी ठसक्यात केली.

पुरूष निवेदक - अस्सल ग्रामीण शैलीच्या विनोदी कथा लिहून द.मा.मिरासदारांनी मराठी कथेचा व्यापक विस्तार केला. प्रसंगनिष्ठ विनोदाची श्रीमंतीच त्यांच्या कथेतून अनुभवायला येते.

स्त्री निवेदिका - लेखनाबरोबरच कथाकथनाचे द.मा.मिरासदारांनी तीन हजारांहून अधिक कार्यक्रम केले. देश परदेशात विशेषतः कॅनडा आणि अमेरिकेतही त्यांनी कथा-कथनाच्या 25 कार्यक्रमांचा विक्रम केला.

पुरूष निवेदक - ‘एक डाव भुताचा’ आणि ‘ठकास महाठक’ या दोन चित्रपटांच्या संवाद लेखनाबद्दल त्यांना पुरस्कारही मिळाले होते.

(येथे ‘ठकास महाठक’ या चित्रपटातील संवाद लेखनाचे नमुने श्रोते ऐकतात. (वेळ 3 मिनिटे)

स्त्री निवेदिका - प्रा.द.मा.मिरासदार हे मराठी कथाकारांचे चैतन्य होते. त्यांनी गंभीर विचार, अवखळ आविष्कारातून आणि नर्म विनोदातून मांडला.

पुरूष निवेदक - परळी वैजनाथ येथे 1998 मध्ये झालेल्या 71 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. (येथे

त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा काही भाग त्यांच्याच आवाजात सादर होतो. (वेळ 3 मिनिटे)

संगीताच्या धून बरोबरच निवेदक रूपक समाप्तीची घोषणा करताना सादरकर्ते आणि कलाकारांची नावे सांगतात. (आधारित)

### २.८.ब.७ नभोनाट्य लेखन समारोप

१) नभोनाट्य लेखनाच्या प्रस्तावनेत नभोनाट्याचे स्वरूप, गुणविशेष, अभ्यासताना ते केवळ श्राव्य माध्यम असल्याचे समजून घेता येते.

२) ह्या नभोनाट्यातील श्राव्य माध्यमानुसार कथाभाग, शीर्षक, मध्यवर्ती कल्पना, पात्र इ. संवाद आणि निवेदनातून व्यक्त होतात.

३) नभोनाट्यातील ध्वनी संकेत, संगीताची धून, पात्रे व त्यांचा आवाज यांनाही महत्त्वाचे स्थान असते.

४) सहज, सोपे संवाद लेखन, पात्रानुरूप संभाषण, हृदयस्पर्शी आवाज, उत्कृष्ट निवेदन आणि संवादातून कथानक उलगडले जाते.

५) नभोनाट्याची सुरूवात आकर्षक, लक्षवेधी व समारोपही संगीत ध्वनीसंकेताच्या प्रभावी उपयोजनातून केला जातो. ह्याचा श्रोत्यांच्या मनावर नक्कीच प्रभाव, परिणाम जाणवतो.

६) नभोनाट्य लेखन व सादरीकरण नियोजित वेळेत पूर्ण करावयाचे बंधन असते.

७) घटना-प्रसंगावर कथानक बेतताना संवाद व पात्रे यांच्या आवाजाची लकब, चढउतार, आरोह-अवरोह यांच्याकडेही लक्ष द्यावे लागते.

८) मुद्रित माध्यम (कथा-कादंबरी) दृक-श्राव्य माध्यम-(नाटक-सिनेमा), श्राव्य माध्यम (आकाशवाणी), एकांकिका, पथनाट्य, नभोनाट्य (वेगवेगळे माध्यम तरीही वेळ साधारणतः 30 मिनिटे) असे वेगळेपण असताना कादंबरीचे नाटक व कथेचे एकांकिका-नभोनाट्य असे माध्यम रूपांतर होऊ शकते.

९) नभोनाट्यात संवाद, संघर्ष, संगीत, कथाभाग, पात्ररचना यांच्या साह्याने सादर करता येते.

१०) नभोनाट्यात निवेदक (प्रवक्ता), संविधानक दृष्ट्या श्रोत्यांशी जुळून राहतो.

११) नभोनाट्यात साधारण एकच स्त्री पात्राचा समावेश असून त्यापेक्षा जादा स्त्रीपात्रांमुळे श्रोत्यांचा गोंधळ होऊ शकतो. कारण स्त्रीपात्रांच्या आवाजात फारसा फरक नसतो. शिवाय जादा स्त्री पात्रांमुळेही त्यांचा परिचय श्रोत्यांना होण्यास वेळ जातो. ते गोंधळतात त्यामुळे रसभंग होतो. असे होता कामा नये.

१२) नभोनाट्याचे स्वरूप साधारणपणे कौटुंबिक असताना कुटुंबातील सर्व सदस्यांना श्रवणाचा लाभ घेता येतो. चाकोरीबाह्य विषयावरील नभोनाट्य सादर करताना श्रोतृवृंदांच्या अभिरूचीचा, आवडी-निवडीचा विचार करणे योग्य ठरते.

१३) भाषांतरित-रूपांतरित स्वरूपाच्या (माध्यम रूपांतर) नभोनाट्य लेखन सादरीकरणात भाषेच्या सौष्ठवाकडे व आशय-अभिव्यक्तीकडे लक्ष देत हे सहजतेने सादर करण्यातच कौशल्य लागते.

१४) नभोनाट्य (रेडिओ प्ले, रेडिओ नाट्य) लेखनाचे स्वरूप समजावून घेताना ते एक श्राव्य माध्यम असून, पात्र, संवाद, ध्वनीसंकेत व संगीताची धून यामधून लेखन व सादरीकरण करण्यात येते.

१५) यातील पात्रांची संख्या आटोपशीर, मर्यादित असते. त्यांचे दर्शन (अभिनयासह) प्रत्यक्ष होत नसून त्यांचा परिचय केवळ आवाज, संवादातून सहजतेने ताबडतोब होत असतो.

१६) नभोनाट्यातील आवाज स्पष्ट, त्यातील चढ-उतार, आरोह-अवरोह, ध्वनी संयोजनातील बारकावे, घटना-प्रसंगातून प्रभावीपणे साधावे लागते.

१७) नभोनाट्यात अंक 1, अंक 2, प्रवेश 1, प्रवेश 2 व मध्यानंतर असे काही नसते. मात्र स्थलांतर, दृश्य सादरीकरणात यथायोग्य ध्वनी योजना व औचित्यपूर्ण वाद्यसंगीताचा योग्य तेथे वापर केला जातो. (उदा. रेल्वे स्टेशनवरचा प्रसंग, गाडी सुट्ण्याची गार्डची सूचना, निरोपाचे संभाषण इ.)

१८) नभोनाट्यातील निवेदक वा प्रवक्ता हा संविधानकाचे दुवे जुळवतो, त्यासाठी ही संगीताची विशिष्ट धून, विशिष्ट ध्वनीयोजना वापरली जाते. त्याशिवाय कंठ संगीत, वाद्य संगीत, ध्वनीसूचन यांच्या साहाय्याने नभोनाट्यातील सूचक दृश्य परिणाम साधतात.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे नभोनाट्यात कलावंतांचे संवाद पाठ नसले तरी चालतात. मात्र बोलण्याची लकब, वेगवेगळे ध्वनी खंड, संगीत स्वर कुठे वापरावेत याची तालीम होते. रेकॉर्डिंग रूम-कलागृह-विशिष्ट ठिकाणी पात्रे, संवाद बोलतात. त्या वेळेस निवेदक वा प्रवक्ता ध्वनी व संगीताचा तेथे यथोचित वापर करतो. तसेच आकाशवाणीच्या संग्रहात अशी ध्वनी-संगीत चित्रफिती असताना दुसऱ्या बाजूनेही अन्य ध्वनींचे आभासही वेळोवेळी तयार करून ठेवतात व वापरले जातात. अशा रीतीने सबंध नभोनाट्य सलगतेने ध्वनीमुद्रित करून सादर केले जाते. अलीकडे नभोनाट्य आधीच ध्वनीमुद्रित केले जाते व यथायोग्य नियोजित वेळेस सादर करण्यात येतात.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : तुम्ही ऐकलेल्या आकाशवाणीवरील एखाद्या नभोनाट्याचा परिचय थोडक्यात करून द्या.

## २.८.ब.८ नमुना प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१) नभोनाट्य लेखनाची (रेडिओ प्ले, रेडिओ नाट्य) वैशिष्ट्ये लिहा.

२) आकाशवाणीवर नभोनाट्य कसे सादर केले जाते ते लिहा.

३) नभोनाट्य लेखनात लेखक आणि दिग्दर्शक यांना कोणती बंधने पाळावी लागतात.

४) नभोनाट्यातील कलावंतांचे स्थान स्पष्ट करा.

५) नभोनाट्य आणि श्रुतिका यातील अनुबंध स्पष्ट करा.

६) नभोनाट्य आणि रूपक यातील वेगळेपण लिहा.

**ब. टिपा लिहा**

1. नभोनाट्यातील ध्वनीसंकेत व संगीत
2. नभोनाट्य व श्रुतिका जुने रूप-स्वरूप
3. ह.मो.मराठे यांचे नभोनाट्य लेखन
4. बा.सी.मर्ढेकर यांचे नभोनाट्य लेखन

❖❖❖❖

# क – आकाशवाणीवरील जाहिरात लेखन

**घटक रचना :**

२.९.क. आकाशवाणीवरील जाहिरात

२.९.क.१ उद्देश

२.९.क.२ आकाशवाणीवरील जाहिरात प्रस्तावना

२.९.क.३ आकाशवाणीवरील जाहिरात लेखनाचे स्वरूप-तंत्र व मांडणी आणि सादरीकरण

२.९.क.४ आकाशवाणी जाहिरात लेखन मर्यादा

२.९.क.५ आकाशवाणीवरील जाहिरात लेखनाचे काही नमुने

२.९.क.६ सारांश

२.९.क.७ नमुना प्रश्न

२.१० संदर्भ ग्रंथ सूची व इतर

## २.९.क आकाशवाणीवरील जाहिरात

### २.९.क.१ उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपणास पुढील उद्देश साध्य करता येतील.

१) आकाशवाणीसाठी जाहिरात लेखनाचे स्वरूप, जाहिरातीचे तंत्र व मांडणी ध्यानात येईल.

२) इतर मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांपेक्षा आकाशवाणीतील श्राव्य माध्यमातील जाहिरातींचे वेगळेपण ध्यानात येईल.

३) आकाशवाणीतील जाहिरात लेखनाचे कौशल्य, जाहिरातीच्या भाषेचे स्वरूप व जाहिरातीमधील उत्पादन, सेवा व वस्तूची माहिती कशी असते ते लक्षात येईल.

४) आकाशवाणीवरील जाहिरातींचे सामर्थ्य व मर्यादा ध्यानात येईल.

### २.९.क.२ प्रस्तावना

आकाशवाणी (रेडिओ) हे जाहिरात प्रसारणाचे जुने आणि लोकप्रिय श्राव्य माध्यम आहे. आकाशवाणीतील अल्प वेळातील दर्जेदार आणि श्रवणीय कार्यक्रम व त्यातील जाहिराती सर्वसामान्य लोकांपर्यंत जाण्यास मदत होते. मात्र दूरदर्शन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांप्रमाणे जाहिरातीतील छायाचित्र व दृश्य (हालचाली) आकाशवाणीच्या जाहिरातीत

नसतात. फक्त आवाज (ध्वनी) व संगीताच्या साह्याने संवादातून जाहिराती प्रक्षेपित करण्यात येतात. यातील आवाज स्पष्टोच्चारित सुश्राव्य संगीताची धून वाजवीत सादर करणाऱ्या जाहिराती लक्षवेधी ठरतात. त्यानुसार जाहिराती श्राव्य स्वरूपात झळकताना प्रेक्षकांना भावतात. ह्याशिवाय जाहिराती सर्व दूरवर पोचताना आकर्षक, हळूवार सुमधूर संगीत, शब्दकळेमुळेही रसिक श्रोत्यांना हृदयस्पर्शी वाटतात. यातील संदेशही थेट ग्राहकाच्या, श्रोत्यांच्या मनाला जाऊन भिडतात.

आकाशवाणीवरील श्राव्य माध्यमातील जाहिरातीत श्रोत्यांचे अवधान केंद्रित होईल व ती जाहिरात श्रोत्यांना खिळवून ठेवणारी असावी लागते. लेखन आणि सादरीकरणातही प्रत्येक टप्प्यामध्ये सहजपणे अर्थबोध होणारी, परिणामकारक व ओघवती भाषाशैली, नाट्यमय संवाद, कर्णमधुर, लयबद्ध शब्दयोजना इ.च्या वापराने जाहिरात आकर्षक, सुश्राव्य होते. कारण अशा श्राव्यस्वरूपाच्या जाहिरातीत विशिष्ट धून पार्श्वसंगीत व एखादी लोकप्रिय संगीताची धूनही वाजविली जाते. मात्र अशा जाहिराती मुख्यत: ध्वनीसंकेतावर आधारित व श्राव्य माध्यमातून श्रोत्यांना यथायोग्य पद्धतीने सादर न झाल्यास लक्ष विचलित होते, पर्यायाने अशा जाहिरातींचा मसुदा श्रोत्यांपर्यंत व्यवस्थित पोहचत नाहीच शिवाय जाहिरातदारांचेही आर्थिक व व्यावसायिक नुकसान होऊ शकते!

### २.९.क.३ आकाशवाणीवरील जाहिरात लेखनाचे स्वरूप-तंत्र, मांडणी आणि सादरीकरण

१) आकाशवाणीवरील जाहिरातीची संहिता काळजीपूर्वक लिहावी लागते. ही जाहिरात कोणत्या प्रकारच्या वस्तूची व सेवेची, कोणत्या ग्राहकवर्गासाठी आहे आणि त्यांचा प्रदेश, परिसर कोठे- कोणता आहे यांच्या आधारे जाहिरात मजकूर लिहिला जातो व त्याचे सादरीकरणही यथायोग्य करण्यात येते. उदा.-सौंदर्य प्रसाधने, अलंकार, दागिने, शेतकरी वर्गासाठी ट्रॅक्टर, खते, बी-बियाणे, युवकांसाठी घड्याळ, वाहने, शहरातील लोकांसाठी गृहप्रकल्प इ. सुखवस्तू, पर्यटक व हौशी लोकांसाठी पर्यटनाच्या जाहिराती इ.

२) जाहिरातीतील वेळेची मर्यादा (10 सेकंद, 20 सेकंद, 30 सेकंद) पाळताना कोणत्या कार्यक्रमासाठी, (प्राईम टाईम) कोणती जाहिरात महत्त्वाची व लाभदायक ठरेल व दरासंबंधीचा विचारही येथे अपेक्षित असतो.

३) जाहिरातीची लिखित संहिता (व मजकूर) यथायोग्य पद्धतीने लिहिताना कमीत कमी पात्रे आणि त्यांचा आवाज, संगीताची धून याकडे कटाक्षाने अवधान द्यावे लागते.

४) जाहिरातीमधील उत्पादित वस्तू व सेवा यांचे फायदे, गुणविशेष, किंमत इ. माहिती तसेच वस्तू मिळण्याचे ठिकाण, सवलत असेल तर व खरेदीची मुदत आकर्षक, स्पष्टपणे नमूद करणे योग्य ठरते.

५) आकाशवाणीवरील जाहिरातीचा मजकूर (संहित लेखन) अतिरंजित, दिशाभूल व ग्राहकांची फसवणूक करणारा, अनाकलनीय, क्लीष्ट असा होता कामा नये. संबंधित उत्पादक कंपनीच्या जाहिरातीतील वस्तू व सेवा यांचे फायदे व गुणविशेषण जरूरीप्रमाणे नमूद करताना अन्य कंपनीच्या वस्तू यांच्या त्रुटी सांगू नयेत.

६) आकाशवाणीवरील जाहिरात लेखनात कोणतेही राष्ट्रीय चिन्ह, प्रतीक वा स्मारक यांचा समावेश करू नये. तसेच कोणत्याही समाजाच्या श्रद्धाभाव, पवित्र व मंगलमय वस्तू, प्रतीक, चिन्ह याविषयी अवमानकारक मजकूर लिहिता कामा नये. तसेच कोणत्याही एका धार्मिक गटासाठी ह्या जाहिराती नसतात हे लक्षात ठेवूनच जाहिरात मसुदा लिहिणे योग्य ठरते.

७) शासकीय जाहिराती जनहितार्थ असतात, त्यात शासनाच्या कल्याणकारी योजना सर्वसामान्य जनतेसाठी असतात हे लक्षात घेऊन उद्बोधक, प्रबोधनात्मक व माहितीपूर्ण मजकूराला महत्त्व असते. त्यातील संदेश योग्य त्या शब्दात लिहिण्यात येतो. त्यात वास्तवता, गांभीर्य, समजण्यास कठीण नाही. संभ्रम करणार नाही असा लिहिला जातो. उदा. पोलिओ लसीकरण, राष्ट्रीय अल्पबचत योजना, महाराष्ट्र राज्य लॉटरी, स्वच्छता अभियान, कोरोना लसीकरण अभियान, राष्ट्रीय सण-उत्सव व कार्यक्रमाच्या जाहिराती, शासन पुरस्कृत योजनांच्या जाहिराती येथे उदाहरण म्हणून राष्ट्रीय मानचिन्हांसह शासनाच्या वतीनेच आकाशवाणीवर जाहिरातीतून प्रसारित होतात.

८) आकाशवाणीवरील जाहिरात लेखनात (मसुदा) ग्राहकांच्या मानसशास्त्राचाही व क्रयशक्तीचाही विचार करण्यात येतो. ग्राहकांना ही वस्तू व सेवा (किंवा उत्पादन) किती आवश्यक व गरजेचे, उपयुक्त आहे, हे संहितेत योग्य त्या शब्दरचनेत (संवादांसह) नमूद करता येणे शक्य असते. ह्या जाहिरातीसुद्धा ग्राहक, श्रोते यांच्या पसंतीला उतरणाऱ्या लेखनाशी एकनिष्ठ अनुरूप अशाच लिहिण्यात येतात.

९) सदरच्या आकाशवाणी जाहिरातीत उत्पादक कंपनीचे घोषवाक्य देखीत समाविष्ट करताना ते आटोपशीर, औचित्यपूर्ण व मोजक्या शब्दात वर्णन करणारे, नावीन्यपूर्ण शब्दात लिहिण्यात येते.

**उदा. स्टेट बैंक ऑफ इंडिया घोषवाक्य** - 'चला आणखी जवळ येऊ या!'

काही महत्त्वाची उत्पादने व त्याची घोषवाक्ये-

- एलआयसी - भारतीय आयुर्विमा महामंडळ - योगक्षेमं वहाम्यहम्.
- लाईफ बॉय साबण - 'लाईफ बॉय ज्याचे घरी तेथे आरोग्य वास करी'
- टाटा सॉल्ट - 'मैने देशका नमक खाया है।'
- पेप्सी - 'ये दिल माँगे मोअर'
- अमूल- 'टेस्ट ऑफ इंडिया'
- एचएमटी घड्याळ - 'राष्ट्राचे समय रक्षक'

आकाशवाणीवरील जाहिरात लेखनात शब्दांचे सुभग आकलन, योग्य वाक्यरचना व सुटसुटीतपणा असतो. त्याशिवाय आवाजातील चढउतार, आरोह-अवरोह, वेगळेपणा (स्त्री पुरूष, लहान मुले यांच्या आवाज) यांचेही महत्त्व अधोरेखित होते व योग्य त्या पद्धतीने संगीत ध्वनीतून सादरीकरणाचे मार्गदर्शन करण्यात येते. याच जाहिरातीत लोकसंगीताची धून, परिचित गाण्याची लय, चाल यांची जोड दिली जाते. पण त्यासाठी संहितेचा मजकूर अभ्यासणे योग्य ठरते.

१०) आकाशवाणीवरील जाहिरात लेखनात नकारात्मक दृष्टिकोन, पाल्हाळीक सैलसर, अस्थानी, गैरलागू वाक्यरचना नको. अन्यथा श्रोते-ग्राहकांवर जाहिरातीविषयी गैरसमज, प्रतिकूल मत निर्माण होईल.

११) आकाशवाणीवरील जाहिरात लेखनात नावीन्यपूर्णता, कल्पकता, शब्द सौष्ठव, संगीतानुकूल गेय शब्दरचना यांना प्राधान्य मिळावे. मजकुराची भाषा चित्रमय शैलीस्वरूप असणे अधिक चांगले.

अलीकडील काळात सर्व माध्यमात रोल मॉडेल असणाऱ्या सेलिब्रिटीज, तसेच विविध क्षेत्रातील सुप्रसिद्ध व्यक्तिमार्फत जाहिराती प्रसिद्ध करण्यात येतात. आकाशवाणीही त्यास अपवाद नाही. सरकारी, जनहितार्थ प्रसारित जाहिरातीत ही उदाहरणे सापडतात. उदा. सचिन तेंडुलकर, अमिताभ बच्चन, लता मंगेशकर, माधुरी दीक्षित, तसेच गायक, संगीतकार-उदा. भीमसेन जोशी यांनी आपल्या सुगम, सुश्राव्य आवाजात जनहितार्थ राष्ट्रीय जाहिरातीसाठी-भरीव योगदान दिल्याची माहिती आहेच! या जाहिरातींना मोठाच प्रतिसाद व लोकप्रियता लाभली. येथे शासकीय सेवा क्षेत्रातील आरोग्यविषयक, राष्ट्रीय एकात्मतेच्या काही जाहिरातींची उदाहरणे आपल्याला पाहता येतील.

उदा.

१. पोलिओ लसिकरणाची जाहिरात- “दो बूंद जिंदगिके”

२. कोरोना (कोविड - 19 ) ची जाहिरात व संदेश-‘स्वच्छता ठेवा, मास्क वापरा, सुरक्षित अंतर ठेवा’ , ‘घरी रहा सुरक्षित रहा!’ इ.

ऋतुमान, नैसर्गिक वातावरण व सण-वार-उत्सवानुसार आकाशवाणीवर जाहिराती प्रसारित केल्याने उत्पादकांकडून यांना भरपूर प्रतिसाद मिळतो.

उदा. 1) उन्हाळ्यात थंड पेयाच्या जाहिराती- पंखे, फ्रिज, ए.सी. कुलरच्या जाहिराती.

2) लग्न, सण- समारंभात दागदागिने, भरजरी साड्या व पोशाखांच्या जाहिराती.

3) सुट्टीच्या कालावधीत पर्यटन कंपन्यांच्या जाहिराती इ.

### २.९.क.४ आकाशवाणीवरील जाहिरात लेखनाची मर्यादा

१) आकाशवाणी (रेडिओ) वरील जाहिरातीचे माध्यम फक्त श्राव्य स्वरूपात असते. ग्राहक श्रोते यांना प्रत्यक्षपणे वस्तू पाहता येत नाहीत. ही एक मोठीच उणीव होय.

२) मुद्रित माध्यमांच्या तुलनेत ह्या जाहिरातीचे दर परवडत नाहीत.

३) सततच्या जाहिरातीच्या भडिमारामुळे व कधीकधी कर्णकर्कश संगीतामुळेही त्या जाहिराती सुद्धा ऐकणे नकोशा वाटतात. अयोग्य संवाद व बेसूर आवाजामुळे व अर्थहीन शब्दरचनेमुळेही ग्राहक श्रोत्यांच्या मनात जाहिरातींबद्दल नकारात्मक भावना निर्माण होते.

४) आकाशवाणीवरील ज्या केंद्रावर जाहिराती प्रसारित करण्याची योजना असते, तेथे वीज व अन्य काही कारणांमुळे कार्यक्रम होऊ शकत नाही व कार्यक्रम बंद असतात किंवा त्या ठिकाणची जनता आकाशवाणीवरील कार्यक्रमातील जाहिराती ऐकत नसतील तर अशा जाहिराती वाया जातात

५) कार्यक्रमाचे स्वरूप व जाहिरातींच्या वस्तू व सेवा यांचा अनुबंध नसेल तर ग्राहकांच्या मनात संभ्रम निर्माण होतो.

६) आकाशवाणीवरील जाहिरातींना मिळणारा वेळ फार कमी असतो. शिवाय संगीत व ध्वनी योजना आणि संहिता यांचा श्राव्य स्वरूपातील परिणाम व प्रभाव समाजायला वेळ लागतो. शिवाय स्पष्टीकरणात्मक विवेचनहीं करता येत नाही. एकूणच आकाशवाणीतील जाहिराती आव्हानात्मक असते असे म्हटले जाते. श्रोते एका जागी स्थिर नसल्यास त्यांचे लक्ष विचलित होऊन जाहिरातीचे उद्दिष्ट-हेतू साध्य होऊ शकत नाही.

### २.९.क.५ आकाशवाणी जाहिरात लेखनाचे काही नमुने

**पर्यटन कंपनीची जाहिरात**

विमान प्रवासातील संगीताची धून

पुरुष - वीणा वर्ल्ड सोबत देखो अपना देश

स्त्री - दिलसे! प्यारसे! सन्मानसे!... (संगीताची हळूवार धून.)

पुरुष - चलो, बॅग भरो, निकल पडो!...

स्त्रीपुरुष - एकत्रित आवाज वीणावर्ल्ड... प्रत्येक कुटुंबासाठी आणि कुटुंबातल्या प्रत्येकासाठी! (संगीत ध्वनी) वीणावर्ल्ड... वीणावर्ल्ड...

पुरुष - ट्रॅव्हल... एक्स्प्लेअर... सेलिब्रेट...

स्त्री - वीणा पाटील हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. Veena world.com.

(संगीत ध्वनी संकेताने जाहिरात पूर्ण होते.)

- **वॉटर प्युरीफायर जाहिरात नमुना -जाहिरातीची सुरुवातीची संगीत धून**

स्त्री- नवीनतम टेक्नॉलॉजीचा केंट. आर.ओ. घरी आणा.

पुरुष - शुद्धतेचा आनंद घ्या आणि मिळवा वॉटर प्युरिफायर

स्त्री-पुरुष एकत्रित आवाज : 100% शुद्ध पाणी, अत्यावश्यक मिनरल्स अल्कलाईन वॉटर, शुद्धतेचा डिजिटल डिस्प्ले (संगीताची मधुर धून)

स्त्री पुरुष एकत्रित आवाज

नो वॉटर वेस्टेज चार वर्षांची मोफत सर्व्हिस. संगीताची तान…

घोषवाक्य - सर्वात शुद्ध पाणी प्या आणि निरोगी राहा! (स्त्रीचा आवाज.)

पुरुषाचा आवाज- सर्व्हिससाठी कॉल करा. 92-789 12345 केंट मिनरल रो

(संदर्भ दै. लोकमत, पुणे. शनिवार 18 सप्टें 2021)

- **केंद्र सरकार व राज्य सरकार पुरस्कृत जाहिरात नमुना**

राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, केंद्र सरकार यांच्या वतीने ज्या योजना राबविण्यात येतात. त्याविषयीच्या जाहिराती देखील विचारात घेतल्या पाहिजेत. उदा. मतदान अभियान, रस्ते वाहतूक, सुरक्षितता, राष्ट्रीय एकात्मता तसेच शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयामार्फतही जाहिराती प्रसारित होतात. त्यातून योग्य ती माहिती आणि संदेश जनतेला मिळण्यास मदत होते. या जाहिराती समाजाला दिशा देण्यास उपयुक्त ठरतात. त्याचबरोबर राष्ट्रीय महापुरूषांच्या स्मरण व त्यांचेविषयी कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या शासकीय जाहिरातीही शासनातर्फे वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतात.

पुरूष- भारत सरकार व महाराष्ट्र शासन द्वारा प्रायोगिक जाहिरात प्रधानमंत्री पीकविमा योजना

स्त्री पुरुष (घोषवाक्य) – "सुरक्षित शेतकरी। देशाचा अभिमान!"

स्त्री - अधिसूचित स्थानिक आपत्ती. काढणी पश्चात नुकसान भरपाई निश्चित करणे,

पुरुष - पीक नुकसानीची माहिती कळविण्याची पद्धत-

अधिक माहितीसाठी संपर्क टोल फ्री क्रमांक - 1800 2660 700 वर संपर्क साधा

एचडीएफसी द्वारा एर्गो वेबसाईटवर वेबलिंकद्वारे

स्त्री पुरूष स्थानिक आपत्ती केलेल्या दाव्यांची माहिती दिली जाऊ शकते.

E-mail-pmfby Maharashtra@Qhdfcerio.com.

- **महाराष्ट्र शासनाची जाहिरात**

शनिवार 9 ऑक्टो-2021

- संदर्भ - दै. सकाळ, पुणे-1

स्त्री - शिक्षणाची सुरुवात करू या! उज्ज्वल भविष्य घडवू या !

पुरुष - माझे विद्यार्थी, माझी जबाबदारी!

(संगीताची प्रदीर्घ धून)

पुरुष - सातत्यपूर्ण अध्ययनासाठी विविध शैक्षणिक उपक्रम

स्त्री - राज्यातील विद्यार्थ्याचा शिक्षणासाठी शालेय शिक्षण विभाग कटिबद्ध (संगीताची हळूवार धून)

स्त्री-पुरुष एकत्रित आवाज

“महाराष्ट्र शिकतोय। महाराष्ट्र घडतोय।

महाराष्ट्र शिकतोय। महाराष्ट्र घडतोय।“

- **जनहित - जाहिरात नमुना.**

स्त्री - आपल्या बंद पडलेल्या पॉलिसीचं आजच पुनरुज्जीवन करा. (संगीत धून)

पुरुष - आणि तणाव मुक्त व्हा!. (संगीत-हळू आवाज)

स्त्रीपुरुष - (एकत्रित आवाज-) आपली बंद पडलेली पॉलिसी विलंब शुल्कात सवलतीसह पुनरुज्जीवित करण्याची संधी. (संगीताची धून).

स्त्री - विशेष पुनरुज्जीवन अभियान

पुरुष - अधिक माहितीसाठी आपल्या एजंटला किंवा जवळच्या शाखेला भेट द्या.

(स्त्रीपुरुष दोघांचा एकत्रित आवाज, )

- **भारतीय आयुर्विमा महामंडळ (एल.आय.सी.)**

जीवनाच्या सोबतही..... जीवनाच्या नंतरही-

(ब्रीदवाक्यासह) संगीतानुकूल वाजवी आवाजधून...

(घोषवाक्य) योगक्षेमवहाम्यहम्।

**आकाशवाणी - जनहितार्थ प्रसारित जाहिरात आणखी काही नमुने-**

(संगीताची धून...)

पुरूष - पुणे कोविड-19 मुक्त करण्याच्या उद्देशाने - बजाज ग्रुपने पुणे महानगर पालिका (पीएमसी) आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या (PCMC) सहकार्याने महालसीकरण उपक्रमाचे आयोजन.

स्त्री - महासाथीसोबत एकत्र लढा देऊ चला (संगीताची धून)

नांव नोंदणी करिता - बजाज फायनान्सर वेल्थ इन/कोविन

पुरुष - किंवा “www. कोविन.गर्व्हन्मेंट.इन” संकेत स्थळावर माहिती करून घ्या.

(...संगीताचा स्वर...)

स्त्री-पुरुष एकत्र आंवाज : “आमचे पुणे ... आरोग्यदायी पुणे)

“मास्क लावा, हात धुवा - गर्दीची ठिकाणे टाळा...”, “सामाजिक अंतर पाळा”

(जाहिरात समारोपाचे संगीत)

(मूळ संदर्भ दै. लोकमत- पुणे. सोमवार दि. 27/09 /2021 (जाहिरात))

**जैन इरिगेशन पाईप- जाहिरात नमुना.**

**आकाशवाणी संगीत ध्वनी..**

(शेतीला पाणी जात असल्याचा आवाज विहिरीवरील पाण्याचा पाईप आणि इलेक्ट्रिक मोटारीचा आवाज)

पुरुष - जैन इरिगेशन पाईप...

शैतीसाठी पाणी पुरवण्याची उकृष्ट मालिका

स्त्री - सोन्यासारखी पिके समृद्ध शेती... .

सुखी शेतकरी आनंदी-समाधानी जीवन (संगीताची धून)

पुरुष - (एकत्रित आवाज)- जैन इरिगेशन पाईप- जळगाव-मुंबई-पुणे

आजच जवळच्या विक्रेत्याशी संपर्क साधा...

पुरुष - पाणी - शेती आणि शेतकरी

स्त्री - जैन इरिगेशनची मैत्री

जैन इरिगेशन पाईप- (संगीताच्या आवाजात जाहिरात समाप्ती)

## आपली प्रगती तपासा

प्रश्न : तुम्हाला आवडणारी व माहीत असणारी आकाशवाणीवरील जाहिरात लिहा व तिचे वेगळेपण सांगा.

## २.९.क ६ सारांश

नभोवाणीवरील जाहिराती फक्त श्राव्य माध्यमात असतात. या जाहिरातीसाठी वेळेचे बंधन काटेकोरपणे पाळावे लागते. नेमकी शब्द-रचना, आटोपशीर संहिता, समर्पक, स्पष्ट, परिपूर्ण व ग्राहकांना पटणारी रचना व कल्पकता, भाषाप्रभूत्व, सुगम संगीताची जोड इ. गुण विशेष ह्या जाहिरातीचे सांगता येतील. तसेच उत्पादन व सेवेची, वस्तूंची सर्व गुणवैशिष्टे या जाहिरातीत असणे योग्य ठरते. आकाशवाणीवरील उत्पादक व व्यावसायिकांच्या जाहिरातीत राष्ट्रीय चिन्हे, धार्मिक प्रतीके यांचा वापर केला जात नाही. तसेच कोणा एका समाज-समूहाला जाहिरातीत स्थान देता येत नाही. खोटी आश्वासने, फसवणूक करणारी, ग्राहकहिताला बाधा आणणारी, काल्पनिक अवास्तव स्वरूपाच्या जाहिरातींना इथे स्थान असत नाही. तसेच जाहिरातीतील घोषवाक्य आकर्षक, छोट्याशा वाक्यरचनेत समर्पक आशयासह व नाविण्यपूर्णतेने व्यक्त झालेली असणे इ. गोष्टींना इथे अधिक महत्त्व असते.

## २.९.क ७ नमुना प्रश्न

### अ. दीर्घोत्तरी प्रश्न

१) आकाशवाणीवरील जाहिरातीची संकल्पना स्पष्ट करा.

२) आकाशवाणीवरील जाहिरातीचे स्वरूप लिहा.

३) आकाशवाणीतील जाहिरात लेखनाचे गुणविशेष विशद करा.

४) राष्ट्रहिताच्या - सरकारी जाहिरातीचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

५) राष्ट्राहिताच्या - सरकारी जाहिरातीचे महत्त्व व वेगळेपण सोदाहरण लिहा.

६) आकाशवाणीवरील जाहिरातींच्या मर्यादा व त्रुटी सांगा.

७) तुम्हास माहीत असलेली आकाशवाणीवरील एका कापड उद्योगाची जाहिरात संहिता लिहा.

८) आकाशवाणीवरील जाहिरातीचे स्वरूप कसे असावे व कसे नसावे याविषयी साधक बाधक चर्चा करा.

### ब. टीपा लिहा -

१) आकाशवाणीतील जाहिरातीमधील संवाद

२) आकाशवाणी जाहिरातीमधील संगीत

३) आकाशवाणीवरील शासकीय जाहिरात

४) आकाशवाणीवरील जाहिरात संहितेचे भाषाविशेष

५) आकाशवाणीवरील जाहिरात उत्पादकांची घोषवाक्ये उदाहरणे द्या.

६) आकाशवाणीवरील पर्यटन व्यवसायाची जाहिरात लिहा.

७) आकाशवाणीवरील सराफी व्यवसायाची जाहिरात लिहा.

## २.१० क संदर्भ ग्रंथ सूची व इतर


१) काळे, कल्याण व पुंडे, द.दि., 'व्यावहारिक मराठी', निराली प्रकाशन, पुणे.

२) काळे, शुभश्री व रोकडे, महादेव (संपादक) 'मराठी भाषा : माध्यम आणि तंत्रज्ञान-नवे प्रवाह', शब्दवैभव प्रकाशन, पुणे-30, प्रथमावृत्ती-फेब्रु.2017 या संपादित ग्रंथातील लेख

१. प्रा.सौ. लीना शेंडे – 'जाहिरातीसाठी लेखन'

२. रवींद्र खासनीस – 'दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन' (आकाशवाणी व दूरदर्शन)

३) गोविलकर, लिला व पाटणकर, जयश्री : 'व्यावहारिक मराठी', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-30.

४) लागू, गौरी : 'श्राव्य माध्यमातून लिखित साहित्य उलगडताना' मासिक साहित्य सूची, पुणे, दिवाळी अंक – 2007.

५) जोशी, वसंत : 'अरूपाचे रूप दावीन', मासिक साहित्यसूची, पुणे, दिवाळी अंक 2007.

६) देव, वीणा : 'वेध-कादंबऱ्यांच्या अभिवाचनाचा' मासिक साहित्य सूची, पुणे. दिवाळी अंक 2007.

७) पिंगळे, किरण नामदेव (संपादक) : 'संवाद कौशल्ये आणि प्रसार माध्यमे', शब्दश्री प्रकाशन, जुन्नर, जि. पुणे. प्रथमावृत्ती, डिसें. 2015.

लेख–1) प्रा. शिरीष सुरुद – 'मराठी भाषेचे विविध क्षेत्रातील उपयोजन आणि सर्जन'

2) संजय मेस्त्री – 'आकाशवाणी एक महत्त्वपूर्ण माध्यम'

८) पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे- 'व्यावहारिक मराठी'

९) भार्गवे, वृंदा : , 'व्हाय नॉट आय', अमेय प्रकाशन, पुणे. आवृत्ती 2010.

१०) भोंजाळ, चंद्रकांत : 'आकाशवाणी आणि दूरदर्शन' (पुस्तिका), लोकवाङ्मय गृह प्रकाशन, द्वितीयावृत्ती, जून-2007. (प्रभादेवी, मुंबई-25)

११) मोकाशी, सयाजी राजे, नेमाडे, रंजना : 'व्यावहारिक मराठी'- शेतकरी साहित्य इर्जिक परिषद, महाराष्ट्र, द्वि. आ. ऑक्टो. 2010. प्रकरण (प्रसार माध्यमासाठी लेखन)

१२) नसिराबादकर, ल.रा. : 'व्यावहारिक मराठी', फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती 2008.

१३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन(नाशिक), 'प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्ये', पुस्तक दुसरे-MAR 254 (लेखन), प्रथम प्रकाशन 2002, पुनर्मुद्रण 2014.

१४) रोकडे, सुभाष : 'व्यावहारिक मराठी:अध्यापनाच्या दिशा', ऋतू प्रकाशन, अहमदनगर, आवृत्ती, 2012.

१५) शेळके, भास्कर (संपादक) : 'प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे-30, प्रथमावृत्ती, एप्रिल-2012.

१६) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूरशिक्षण केंद्र पीडीएफ फाईल, 'मराठी भाषा, उपयोजन आणि सर्जन', अभ्यासपत्रिका क्र. 10 आणि 15. तृतीय वर्ष कला मराठी. प्रकाशक-कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, तृतीयावृत्ती-2014.

१७) 'अरूंधती जगणं मस्तच मजेचं', कौटुंबिक श्रुतिका, सादरकर्ते-गौरी लागू, भाग-1. आकाशवाणी, पुणे. www.youtube.com. https:// you tube 171/ 3Jywhy dg

१८) गोपाळ, आवटी, पुणे आकाशवाणी केंद्र, संचालक दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे-वृत्तांकन, पुणे प्लस-मंगळवार 28/9/2021. माझे पुणे (चौकस पुणे शहर),

(वृत्त शीर्षक 'भाऊसाहेब खुडे यांची स्मृती जपणारा चौक')

१९) दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे वृत्त, बुधवार दि. 27 ऑक्टोंबर 2021. वृत्तशीर्षक – 'पुणे आकाशवाणीला देशात सर्वाधिक श्रोते', ॲपद्वारे ऐकण्यास पसंती, (म. टा. प्रतिनिधी, पुणे.)

**२०)** कुबेर, जयश्री, अभिवाचन, 'मासिक साहित्य सूची', पुणे. दिवाळी अंक-2009, पृ. 169)

**विशेष संदर्भ आणि आधार**

१) Abbot W. Rider, R. L.

२) Hand Book of Brodcasting New York. 1957.

३) भारत सरकार, प्रकाशन विभाग, रेडिओ नाटक एवं संकलन-नवी दिल्ली- 1973

४) मालशे स.गं., जोशी चंद्रहास.

५) काणे पुष्पा – 'नभोवाणी कार्यक्रम, तंत्र आणि मंत्र', संजय लांडगे- उपयोजित मराठी, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

६) गोविलकर, लिला – 'अनिवार्य मराठी', के. सागर पब्लिकेशन, पुणे.

❖❖❖❖

# ३

# दूरचित्रवाणी व समाज माध्यमासाठी लेखन

## ३.१ दूरचित्रवाणीसाठी मुलाखत लेखन

**घटक रचना :**

३.१.० उद्दिष्टे

३.१.१ प्रस्तावना

३.१.२ घटक विवेचन

३.१.३ दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम व त्यांचे स्वरूप

३.१.३.१ करमणूकप्रधान कार्यक्रम

३.१.३.२ माहितीप्रधान कार्यक्रम

३.१.३.३ शैक्षणिक कार्यक्रम

३.१.३.४ कार्यक्रमांचे स्वरूप

३.१.४ दूरचित्रवाणीवरील मुलाखत

३.१.४.१ पूर्वनियोजित, सविस्तर मुलाखती

३.१.४.२ आयत्यावेळच्या संक्षिप्त मुलाखती

३.१.५ मुलाखतीचे तंत्र

३.१.५.१ मुलाखतीची पूर्वतयारी

३.१.५.२ मुलाखतदात्याची/विषयाची संपूर्ण माहिती मिळविणे

३.१.५.३ तंत्रांची माहिती करून घेणे

३.१.५.४ मुलाखत घेणे

३.१.६ पारिभाषिक शब्द

३.१.७ समारोप

३.१.८ संदर्भग्रंथ सूची

३.१.९ सरावासाठी प्रश्न

## ३.१.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१) विद्यार्थ्यांच्या लेखनक्षमतेचा व सर्जनशीलतेचा विकास करणे.

२) समाजमाध्यमावरील लेखनाचे कौशल्य शिकून घेणे.

३) दूरचित्रवाणीचे महत्त्व, कार्य व उपयुक्तता समजून घेणे.

४) दृक्-श्राव्य माध्यमासाठीची लेखन कौशल्य शिकणे.

५) दूरचित्रवाणीवरील व्यावसायिक लेखनासाठी मराठी भाषेचे उपयोजन करणे.

## ३.१.१ प्रस्तावना

आधुनिक काळातील संपर्काचे प्रभावी माध्यम म्हणून समाज माध्यमांचा शोध लागला. विकासप्रक्रियेत ही माध्यमे अधिकाधिक प्रभावी व आधुनिक बनत गेली. सुरूवातीचे वृत्तपत्र आज इ. वृत्तपत्र माध्यमामध्ये उपलब्ध आहे. जे संग्रही ठेवण्यासाठी सोयीचे व वापरासाठी कुठेही उपलब्ध होते. सुरूवातीला केवळ दृक् स्वरूपात उपलब्ध असणारे माध्यम आज दृक्-श्राव्य माध्यमापर्यंत प्रगत झाले आहे. अशा दृक् व श्राव्य माध्यमाची बलस्थाने व उपयोग समजून घेणे काळासोबत प्रगती करण्यासाठी आवश्यक आहे. दृक्-श्राव्य माध्यमासाठी लेखन कौशल्य अवगत करणे हे व्यवसायाच्या संधी मिळविण्यासाठी आवश्यक आहे.

तेव्हा आज आपण इथे दूरचित्रवाणी मालिकेसाठी मुलाखत लेखन व दूरचित्रवाणी मालिकेसाठी संवाद लेखनाची कौशल्ये आत्मसात करणार आहोत.

## ३.१.२ घटक विवेचन

दूरचित्रवाणी हे दृक्-श्राव्य माध्यम आहे. तसेच ते एक इलेक्ट्रॉनिक माध्यम देखील आहे. उपग्रहावर चालणाऱ्या अनेक वाहिन्या त्यामध्ये आपले विविध कार्यक्रम प्रसारित करत असतात. त्यामुळे त्याचा प्रभाव श्राव्य व दृक् या माध्यमांपेक्षा अधिक आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात हे माध्यम अधिक गतिशील देखील आहे. सर्वाधिक वेगाने माहिती पुरविणारे माध्यम म्हणून हे माध्यम अधिक पुढे आले. जागतिक घडामोडी, जागतिक प्रथितयश व्यक्तींशी संवाद, सोहळ्यांचे थेट प्रक्षेपण, विविध प्रकारचे मनोरंजनाचे कार्यक्रम, अभिरूचीनुरूप कार्यक्रमांची विविधता व उपलब्धता या सर्वांमुळे या माध्यमाची लोकप्रियता दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. लोक या माध्यमाचा अधिकाधिक उपयोग करून घेण्यासाठी उत्सुक असलेले पाहायला मिळतात.

दूरचित्रवाणी हे सर्वदूर पोहोचणारे माध्यम आहे. त्यामुळे या माध्यमावरील कार्यक्रमांची विविधता देखील अधिक आहे. यातील प्रत्येक कार्यक्रमाचे स्वरूप वेगवेगळे असते. त्याप्रमाणे या प्रत्येक कार्यक्रमांचे लेखन होणे गरजेचे असते. प्रत्येक कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार त्याचे केले जाणारे लेखन यास संहिता लेखन असे म्हणतात. भाषिक

कौशल्यामधील लेखन कौशल्याअंतर्गत संहिता लेखनाचा समावेश होतो. हे संहिता लेखन एक कौशल्य असते. हे कौशल्य जितक्या अधिक चांगले आत्मसात केले जाते तितक्या अधिक प्रमाणात कार्यक्रमाचा दर्जा चांगला होतो.

## ३.१.३ दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम व त्यांचे स्वरूप

दूरचित्रवाणीवरून विविध प्रकारचे कार्यक्रम सादर केले जातात. ही विविधता हेच या माध्यमाची विशेषता देखील आहे. या विविध कार्यक्रमांची विभागणी करताना ती लक्ष्यगटानुसार केली असता बालकांसाठी, युवकांसाठी, महिलांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी अशी करता येते. विषयानुसार कौटुंबिक, सामाजिक, क्रीडाविषयक, आरोग्यविषयक इत्यादी अनेक उपगट करता येतात. भाषानुसारी म्हणजेच प्रादेशिकतेनुसारही ही विभागणी करता येते.

या विविध प्रकारच्या कार्यक्रमांमागील मनोरंजन करणे, माहिती देणे आणि शिक्षण देणे अशी तीन महत्त्वाची उद्दिष्टे असतात. त्यानुसार त्यांची विभागणी करणे सोयीचे ठरते. ही विभागणी - 1. करमणूकप्रधान 2. माहितीप्रधान 3. शैक्षणिक कार्यक्रम अशी करता येते.

### ३.१.३.१ करमणूकप्रधान कार्यक्रम :

कोणत्याही प्रकारच्या समाजमाध्यमाला उपयुक्त माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी मनोरंजनाचा आधार घ्यावा लागतो. करमणूक प्रधान कार्यक्रम मनोरंजनासाठी व काहीवेळा फुरसतीच्या वेळासाठी असले तरी ते सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रामध्ये उत्तम कामगिरी करतात. कल्पित व वास्तव यांचे अनोखे मिश्रण या कार्यक्रमांमध्ये पाहावयास मिळते. करमणूक प्रधान कार्यक्रमांमध्ये मालिका, संगीत, खेळ, चर्चात्मक अशा कार्यक्रमांचा समावेश होतो. यामध्ये समाविष्ट होणाऱ्या कार्यक्रमांचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

**मालिका** (कौटुंबिक, रहस्यप्रधान, विनोदी, भयकारक, ऐतिहासिक, पौराणिक)

**संगीतविषयक** (लोकप्रिय गीतांचा कार्यक्रम, भजन, कीर्तन, अभिजात वाद्यांचा कार्यक्रम, लोकसंगीत व लोकनृत्य, अभिजात गायनाचे कार्यक्रम )

**खेळासंबंधी** (प्रश्नमंजुषा, शारीरिक व बौद्धिक खेळ)

**चर्चात्मक** (टॉक शो, खटले चालविणे)

### ३.१.३.२ माहितीप्रधान कार्यक्रम :

प्रेक्षकांपर्यंत माहिती पोहोचविणे या उद्देशाने समाजमाध्यमांची सुरूवात झाली. माहितीचा प्रसार व प्रचार हा प्रमुख हेतू समाजमाध्यमांवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी असणे गरजेचे आहे. असे कार्यक्रम आपत्कालीन परिस्थितीमध्ये व अटीतटीच्या परिस्थितीमध्ये किती महत्त्वाचे असतात हे आपण कोरोना काळ व पूर परिस्थितीमध्ये अनुभवले आहे. शासकीय योजना, आरोग्यविषयक माहिती, विशेषतः साथीच्या रोगात पोहोचवायची माहिती, जीवनशैलीतील बदलाने मानवाला कायमस्वरूपी जडलेल्या विकारांवरील उपाय व माहिती, नागरिक म्हणून समाज व देशविषयक जाणीव जागृती, प्रवास, इतिहास, संस्कृती, खाद्यसंस्कृती याविषयीची देशोदेशीच्या माहितीतून प्रदेश

ओळख, पर्यावरणविषयक माहिती व मानवी जीवन संतुलन, निवडणूक कालावधीतील राजकीय जाणीव जागृती या सर्वांसाठी दूरचित्रवाणीवरील असे माहितीपूर्ण कार्यक्रम उपयोगी ठरतात.

माहितीप्रधान कार्यक्रमांची विभागणी पुढीलप्रमाणे करता येते.

**बातमीपत्र, वृत्ताधारित कार्यक्रम (मुलाखत, चर्चा), माहितीपट**

### ३.१.३.३ शैक्षणिक कार्यक्रम :

शिक्षण हा मानवी समाजरचनेचा व संस्कृतीचा पाया आहे. या पायाची उत्तमरित्या उभारणी करण्यामध्ये दूरचित्रवाणी महत्त्वाची भूमिका निभावते. आकाशवाणीवरून शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्याची परंपरा कायम चालू आहे; परंतु दूरचित्रवाणी हे दृक् व श्राव्य माध्यमातील असल्याकारणाने ते अधिक प्रभावी ठरते. भारत देशात खेडोपाडी शिक्षणाचा प्रसार झाला आहे. भारत देश अनेक ग्रामांचा व विकसनशील देश असल्याकारणाने अनेक ठिकाणी वीज नसल्याने दूरचित्रवाणीवरील असे कार्यक्रम पोहोचणे अशक्य होते. तरीही कोरोना काळात दूरचित्रवाणी एखाद्या शाळेची भूमिका पार पाडताना दिसली. सामूदायिक दूरचित्रवाणी अशा भूमिकेत पाहायला मिळते. शैक्षणिक प्रसार व प्रचाराची भूमिका पार पाडताना दूरचित्रवाणी प्रौढांना अक्षरओळख करून देते. अक्षरओळखी सोबतच आरोग्यविषयक शिक्षण, बालसंगोपनाचे प्रशिक्षण, कायदेविषयक ज्ञान, संगणकाचे शिक्षण, लैंगिक शिक्षण, व्यवहारात उपयोगी कौशल्ये एखादी माहिती देणे या सर्वांसाठी दूरचित्रवाणी उपयोगी पडते. यामध्ये रयतेचे शिक्षण हा प्रमुख हेतू असतो. व्यावसायिक वाहिन्यांना यामध्ये रस असत नाही त्यामुळे अशा कार्यक्रमांची जबाबदारी शासकीय वाहिनीवर येते.

शैक्षणिक कार्यक्रमांची विभागणी पुढीलप्रमाणे करता येते.

**संगीत, नाट्य, चर्चा, खेळ, प्रश्नमंजुषा**

### ३.१.३.४ कार्यक्रमांचे स्वरूप :

दूरदर्शन वरील कार्यक्रमांमध्ये साधी, सोपी भाषा वापरणे गरजेचे असते. ही भाषा दृश्यांची देखील असते. प्रेक्षक दृश्य पाहू शकत असल्याने आणखी जबाबदारी वाढते. सूत्रसंचालक, निवेदक यांना कटाक्षाने आपली भाषा, व्यक्तिमत्त्व व संभाषण याकडे लक्ष द्यावे लागते. अशावेळी केवळ संहितेवर अवलंबून राहता येत नाही. हजरजबाबीपणा, वक्तशीरपणा, आत्मविश्वास, निरीक्षणाची व अभ्यासू वृत्ती, विविधांगी ज्ञान यासारखे गुण असणे आवश्यक असते. छोटी व सुटसुटीत वाक्ये असावी लागतात. भाषेच्या व्याकरणाची जाण असणे गरजेचे असले तरी बोलतानाचा ओघवतेपणा व रसाळपणा जपणे देखील गरजेचे असते. शब्दोच्चार योग्य असावे. मांडणीत मुद्देसूदपणा असावा. शब्दफेकीचे ज्ञान असावे. शरीर बोलीचा अनावश्यक वापर टाळणे गरजेचे असते. प्रसन्न व्यक्तिमत्त्व कार्यक्रमाची शोभा व गुणवत्ता वाढवत असते. दृक् माध्यमांपासूनचे दूरचित्रवाणीचे वेगळेपण व बलस्थान ओळखणे गरजेचे आहे.

दूरचित्रवाणीवरून विविध कार्यक्रम प्रसारित होत असतात. त्या प्रत्येक कार्यक्रमाचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यानुसार त्या कार्यक्रमाची मांडणी व संहिता लेखन होत असते. काही कार्यक्रम थेट प्रसारित होणारे असतात तर काही रेकॉर्डेड असतात. त्यानुसार प्रसारणाची

भूमिका व जबाबदारी ठरत असते. अशावेळी कार्यक्रमाचे उद्दिष्ट व ध्येय लक्षात ठेवून कार्यक्रमाची मांडणी करावी लागते. दूरचित्रवाणीवरून प्रसारित होणाऱ्या विविध कार्यक्रमांपैकी आपण याठिकाणी *दूरचित्रवाणीवरील मुलाखत* या कार्यक्रमाविषयी माहिती घेणार आहोत. वृत्तपत्र व आकाशवाणीवरील मुलाखतींपेक्षा दूरचित्रवाणीवरील मुलाखतीचे स्वरूप भिन्न असते. कारण या मुलाखती आपण थेट पाहू शकतो तसेच थेट प्रश्न विचारण्याची सोयही आता उपलब्ध आहे. हे या माध्यमावरील मुलाखतींचे बलस्थान आहे. मुलाखतींमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याचे काम हे माध्यम पार पाडते.

## ३.१.४ दूरचित्रवाणीवरील मुलाखत

कोणत्याही प्रकारच्या मुलाखतींमध्ये एक मुलाखत दाता व मुलाखत घेणारा असतो. म्हणजेच मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा असे दोघे असणे गरजेचे असते. प्रेक्षकांना त्रोटक माहिती ऐवजी नेहमीच विस्तृत माहिती अपेक्षित असते. विस्तृत माहिती घेणे व देणे या गरजेतून मुलाखत हा कार्यक्रम उदयास आला असावा. अनेकदा घटनांचे विश्लेषण करणे, त्यांची सांगोपांग चर्चा करणे व त्यांचा अन्वयार्थ लावणे या गरजेतून अनेक कार्यक्रम होत असतात.

मुलाखत हा संवादात्मक कार्यक्रम आहे. मुलाखतींचे स्वरूप विविध असते. मुलाखतींमध्ये मुलाखत घेणारा प्रेक्षकांचे प्रतिनिधित्व करत असतो. तर मुलाखत देणारा हा तज्ज्ञ वा समाजासाठी विशेष व्यक्ती असते. या दोन व्यक्तीमधील हा संवाद असतो. या संवादातून मुलाखत घेणारा प्रेक्षकांना सांगोपांग माहिती पुरवत असतो.

मुलाखतींचे दोन भागात साधारणत: वर्गीकरण करता येते.

१. पूर्वनियोजित, सविस्तर मुलाखती

२. संक्षिप्त व आयत्यावेळी घेतलेल्या मुलाखती

पूर्वनियोजित मुलाखतींचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात.

### ३.१.४.१ पूर्वनियोजित, सविस्तर मुलाखती :

#### ३.१.४.१.१ माहिती मिळविण्यासाठी घेतलेली मुलाखत -

अशा मुलाखतींमध्ये तज्ज्ञांना दूरचित्रवाणी केंद्रावर बोलावून त्यांची मते घेतली जातात. घटनेविषयी वा विषयासंबंधी अधिकची माहिती मिळविणे हा त्यामागे हेतू असतो. माहिती मिळविण्याचे एक साधन म्हणून तज्ज्ञांचे भाषण देखील उपयोगी ठरते. परंतु ते कंटाळवाणे होऊ शकते व तज्ज्ञांना विषयमांडणीची मुभा असते. त्यामुळे भाषणातून प्रेक्षकांच्या प्रश्नांची उत्तरे मिळतीलच याची खात्री नसते. व भाषणातील एकसुरीपणा तज्ज्ञांनाही काहीवेळा टाळता येत नाही. परंतु मुलाखतीमध्ये अधिक जिवंतपणा आणता येतो. तज्ज्ञाकडून एखादा मुद्दा राहिला असल्यास प्रेक्षकांकडून त्याची माहिती होते. त्यामुळे संबंधित विषयाला धरून आवश्यक ती सर्व माहिती पोहोचविणे वा तिचा उलगडा करून घेणे सहज शक्य होते. अशा मुलाखतींसाठी त्या विषयात वा क्षेत्रात पारंगत तज्ज्ञांची व अधिकारी व्यक्तीची निवड केली जाते. अशावेळी मुलाखत घेणाराही त्या विषयातील माहिती असणारा निवडला जातो.

### ३.१.४.१.२ कामगिरीची दखल घेण्यासाठी घेतलेली मुलाखत-

समाजासाठी, देशासाठी विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींची व त्यांच्या कार्याची दखल घेण्यासाठी अशा मुलाखतींचे आयोजन केले जाते. आपआपल्या क्षेत्रामध्ये कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्तींविषयी समाजाला व देशाला नेहमीच अभिमान असतो. तर समाज, धर्म व संस्कृती यांच्या प्रवाहाला विरोध करत कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्ती या आव्हानात्मक असतात. अशा व्यक्ती समाजाला नवा मार्ग दाखवत असतात. काळाच्या प्रवाहाला दिशादिग्दर्शन करत असतात. अशा व्यक्तींची व त्यांच्या कार्याची, त्यांच्या प्रवासाची, त्यांच्या ध्येय धोरणांची समाजाला ओळख करून देणे हा या मुलाखतींचा हेतू असतो. त्यांचे मार्गदर्शन समाज व देश विकासात साहाय्यभूत ठरत असते. या मुलाखतींचा त्यांच्या असामान्य कामगिरीवर प्रकाश टाकणे हा उद्देश असतो. मुलाखतदात्याच्या नित्याच्या परिसरात अशा मुलाखती चित्रित केल्यास प्रभावी ठरतात. उदा. बचत गटात काम करताना स्वयंरोजगाराचा मोठा उद्योग उभारणारी एखादी स्त्री, सैन्यदलात विशेष कामगिरी करणारी स्त्री, निराधारांसाठी आश्रम उभा करणारी व्यक्ती इ.

### ३.१.४.१.३ प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती -

प्रत्येक क्षेत्रामध्ये विशेष काम करणाऱ्या, विशेष गुण असणाऱ्या व्यक्ती असतात. कोणत्या ना कोणत्या कारणांनी त्या प्रसिद्ध असतात. अशा व्यक्तींशी गप्पा करत त्यांच्या प्रसिद्धीचे वलय उलगडणे हा या मुलाखतींचा हेतू असतो. त्यांच्या या प्रसिद्धीच्या प्रवासात काही गमती-जमती असतात तर बरीच आव्हानं असतात. त्यामध्ये प्रेक्षकांना रस असतो. अशा व्यक्तींची कामगिरी त्या क्षेत्रात यशस्वी होऊ इच्छिणाऱ्या काहींना मागदर्शक ठरते. उदा. क्रिडाक्षेत्रात एखादे पदक मिळविणाऱ्या खेळाडूची मुलाखत, नुकतीच सत्ता हाती घेतलेली व्यक्ती, परदेशी कलावंत पाहुणे इ.

या सर्वच मुलाखती पूर्वनियोजित व मुलाखतदात्याची वेळ निश्चित करून घेतलेल्या असतात. या मुलाखत सविस्तर असणे अपेक्षित असते. मुलाखत दात्याने तसा अपेक्षित वेळ दिल्यास अशा विस्तृत मुलाखती घेणे शक्य असते; परंतु वेळेची मर्यादा माध्यमांना असल्याने हा वेळ पाच ते दहा मिनिटांसाठीच केवळ वाढवता येतो. शक्य असल्यास त्या विविध भागात घेऊनही प्रसारित केल्या जातात. त्यासाठी निश्चित दिवस व निश्चित वेळ असल्यास असे कार्यक्रम वाहिन्यांना लोकप्रियता देखील मिळवून देत असतात.

### ३.१.४.२ आयत्यावेळच्या संक्षिप्त मुलाखती-

घटनेचे वार्तांकन करताना अशा मुलाखती घेतल्या जातात. विविध कारणांनी विविध प्रसंगी अशा मुलाखती घेतल्या जातात. या मुलाखती पूर्वनियोजित नसतात. त्याचे प्रमुख प्रकार खालील प्रकारे-

### ३.१.४.२.१ प्रत्यक्षदर्शींची मुलाखत -

एखादी घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या किंवा घडामोडीत सहभागी असलेल्या व्यक्तींची मुलाखत यामध्ये समाविष्ट होते. यामध्ये आयत्यावेळी मुलाखतदाते निवडले जातात. एखादा विशेष खटला चालू असल्यास त्या खटल्याशी संबंधित वकील वा पोलीस यांना खटल्यासंबंधाने

प्रश्न विचारून खटल्याची दिशा जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. लोकप्रिय नाटकात काम करणाऱ्या रंगकर्मींची मते व अनुभव जाणून घेता येतात. संसदेतील अधिवेशन प्रसंगी काही सभासदांना एखाद्या विशिष्ट विधेयकाच्या चर्चेसंबंधी प्रश्न विचारता येतात.

### ३.१.४.२.२ धावती मुलाखत -

या मुलाखती निमित्ताने घेतल्या जातात. एखादी महत्त्वाची व्यक्ती विशिष्ट ठिकाणी येणार आहे असे कळताच दूरचित्रवाणीचे वार्ताहर-छायाचित्रकार सज्ज असतात. ते त्या व्यक्तीस काही प्रश्न विचारून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतात. बातम्यांमध्ये अशा प्रकारच्या धावत्या मुलाखती अनेकदा पाहायला मिळतात. उदा. प्रसिद्ध व्यक्तीने मतदान केल्यानंतरच्या भावना, लोकप्रिय व्यक्तीच्या निधनानंतरच्या तितक्याच लोकप्रिय व्यक्तीच्या भावना, एखादा पुरस्कार मिळाल्यानंतर तत्क्षणीच्या त्या व्यक्तीच्या भावना जाणून घेण्यासाठी अशा मुलाखतींमध्ये काही प्रश्न विचारले जातात.

### ३.१.४.२.३ जनमत चाचपणी -

एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी लोकांची मते जाणून घेण्यासाठी अशा मुलाखतींमध्ये लोकांना प्रश्न विचारले जातात. या मुलाखतींमध्ये मुलाखतदाता ठरलेला नसतो. अशा मुलाखतींमध्ये सामान्य नागरिक अशीच मुलाखत दात्याची भूमिका असते. या मुलाखतींसाठी वार्ताहर व छायाचित्रणकार ठिकठिकाणी फिरत असतात. कार्यक्रमाचा टी.आर.पी. ठरविण्यासाठी काहीवेळा अशा मुलाखती घेतल्या जातात. देशात, राज्यात, शहरात चालू असलेल्या संप, आंदोलन, उपोषण याविषयी लोकांची मते जाणून घेतली जातात. कायदा, शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात काही बदल होत असल्यास त्यासंबंधाने जनमत घेतले जाते. निवडणुकीवेळी पक्षबदलासंबंधातील लोकांची मते जाणून घेता येतात. एखादे लोकप्रिय नाटक पाहून प्रेक्षागृहातून बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकाची नाटक व चित्रपटासंबंधीची मते जाणून घेता येतात. अशावेळी निवेदकाला योग्य मुलाखत दाता शोधता यावयास हवा. या मुलाखतींमध्ये समाजाच्या विविध थरांतील, विविध वयोगटांच्या व्यक्तींचा समावेश करण्याकडे लक्ष दिले जाते. या मुलाखतींमध्ये नेमके व एखादाच प्रश्न विचारून माहिती मिळविणे अपेक्षित असते. 'नाटक चांगले आहे का?' असा प्रश्न विचारण्याऐवजी 'नाटक पाहून काय वाटले?' असा प्रश्न विचारल्यास योग्य माहिती मिळू शकते. एखादी टीव्ही 'मालिका चांगली आहे का?' या प्रश्नाऐवजी 'तुम्हाला ही मालिका का आवडते?' असा प्रश्न विचारणे योग्य ठरते.

## ३.१.५ मुलाखतीचे तंत्र

मुलाखत घेणे हे एक कौशल्य आहे. या कौशल्यावर मुलाखतीचे यशापयश अवलंबून असते. यासाठी काही आदर्श मुलाखती नजरेसमोर ठेवता येतात. पूर्वनियोजित व आयत्यावेळच्या या दोनही मुलाखती घेणे वार्ताहर-पत्रकारासाठी जोखमीचे असते. माध्यमांमध्ये काम करणाऱ्या वार्ताहर-पत्रकार व्यक्तींना मुलाखत घेण्याची वेळ कधीही येऊ शकते त्यासाठी मुलाखतीचे तंत्र आत्मसात करून घेणे गरजेचे असते.

### ३.१.५.१ मुलाखतीची पूर्वतयारी :

मुलाखतकाराला पूर्वनियोजित मुलाखतीसाठी बरीच पूर्वतयारी करावी लागते. त्यामध्ये लक्ष्यगट, कालावधी, उद्दिष्ट माहिती असणे गरजेचे असते. अशा मुलाखतींमध्ये मुलाखतकाराला प्रेक्षकांच्या व दिग्दर्शकाच्या मनातील कल्पना प्रत्यक्षात उतरावयाच्या असतात. त्यामुळे लक्ष्यगट कोणता हे नजरेसमोर ठेवून प्रश्न विचारायचे असतात. मुलाखतकारासमोर जर होतकरू तरूण क्रिडापट्टू बसला असेल तर तरूण वर्ग नजरेसमोर ठेवून प्रश्न विचारावे लागतात. अशा मुलाखतींमध्ये सैद्धांतिक चर्चा करायची नसते. तर सैद्धांतिक विषयाला रसाळ बनवत तज्ज्ञांकडून विषयाच्या संबंधाने विस्तृत नव्हे तर नेमकी व आवश्यक माहिती मिळवायची असते. मुलाखतदात्याने आपले अनुभव प्रेक्षकांना सांगताना त्यातून देखील विशिष्ट लक्ष्यगटाला संदेश कसा जाईल याकडे लक्ष ठेवले पाहिजे. मुलाखतीसाठी मिळणारा कालावधी प्रश्नसंख्या निश्चित करत असतो. त्यामुळे नेमके प्रश्न विचारता येणे गरजेचे असते. त्यामध्ये देखील स्वतःपुरते पूर्वनियोजित विभाग करून प्रश्न विचारता येतात व मुलाखतीमध्ये मुद्देसूदपणा आणता येतो. मुलाखत भरकटण्यापासून रोखता येते. मुलाखतीचे उद्दिष्ट देखील साध्य होणे गरजेचे आहे. हे मुलाखतकाराने प्रश्न विचारताना ध्यानात ठेवावे लागते.

### ३.१.५.२ मुलाखतदात्याची/ विषयाची संपूर्ण माहिती मिळविणे-

हे मुलखतदात्याचे प्रथम कर्तव्य असते. त्यानुसार मुलाखतीचे स्वरूप निश्चित होत असते. संबंधित व्यक्तीची माहिती मुलाखतीमध्ये मिळविताना वेळेचा देखील अपव्यय होतो. त्यामुळेच ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नाव, व्यवसाय व त्या व्यक्तीशी संबंधित माहिती अगोदरच मिळवावी लागते. त्याकरिता त्या विषयासंबंधी उपलब्ध असलेली माहिती वाचणे, पूर्वी प्रसारित झालेल्या मुलाखती ऐकून वा वाचून त्या व्यक्तीची मुलाखत देतानाची वृत्ती समजून घेणे किंवा गरज पडल्यास त्या व्यक्तीची पूर्वभेट घेणेही गरजेचे असते.

### ३.१.५.३ तंत्रांची माहिती करून घेणे -

दूरचित्रवाणी हे एक तंत्र आहे. त्यामध्ये छायाचित्रकार, ध्वनीमुद्रणाचे ध्वनिप्रक्षेपक, प्रकाशव्यवस्था, कॅमेरा या सर्वांची किमान जुजबी माहिती मुलाखत घेणाऱ्याला असणे आवश्यक असते. मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा यांच्यातील मोकळेपणा मुलाखतीला जिवंत करत असतो. हा मोकळेपणा तंत्राची भीती न बाळगता त्यास धीटपणे सामोरे जाण्यातूनच येत असतो.

### ३.१.५.४ मुलाखत घेणे -

मुलाखत घेणे ही एक कला आहे. यशस्वी मुलाखतीची काही वैशिष्ट्ये आहेत. जसे की रसाळ, ओघवती, जिवंत तितकीच माहितीपूर्ण मुलाखत प्रेक्षक व मुलाखत देणाऱ्याच्याही लक्षात राहतात. अशा अनेक मुलाखती संग्रही ठेवलेल्या देखील आहेत. त्यामुळेच मुलाखत हा माहितीचा एक दस्तऐवज देखील असतो. मुलाखत हा प्रत्यक्षदर्शी कार्यक्रम असल्याने त्यातील पारदर्शकता अनेकदा पुराव्यादाखल देखील वापरली जाते. त्यामुळेच मुलाखत यशस्वी होण्यासाठी काही विशेष प्रयत्न करणे आवश्यक असते. त्यासाठी या तंत्रातील काही आवश्यक गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे असते. त्या पुढीलप्रमाणे-

### ३.१.५.४.१ मुलाखतीचा प्रारंभ -

मुलाखतीचा प्रारंभ कसा करावयाचा हे अगोदरच ठरवणे योग्य असते. मुलाखत घेणाऱ्याकडे काही प्रश्न लिहिलेले असतील तर उत्तमच आहे. त्यामुळे मुलाखत घेताना प्रश्न वाचल्यासारखे वाटून मुलाखतीत कृत्रिमता येणार नाही याची काळजी घ्यावयास हवी. मुलाखतदात्याला प्रश्न विचारताना त्यामध्ये ओघवतेपणा व सहजता असणे गरजेचे असते. एखाद्या ज्वलंत प्रश्नाविषयी चर्चा असेल, तर मुलाखतीच्या दिवसापर्यंतच्या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. विषयासंबंधीची सर्वात ताजी बातमी हाताशी असेल तर तिचा संदर्भ देत मुलाखतीला सुरूवात करणे प्रभावी ठरते.

मुलाखतीच्या सुरूवातीस मुलाखतदात्याची ओळख थोडक्यात आणि समर्पक करून द्यावी लागते. त्याबरोबर मुलाखतीचे औचित्य वा विषय, त्याविषयी चर्चा करण्याची गरज या सर्वाविषयी थोडक्यात माहिती द्यावी लागते.

### ३.१.५.४.२ प्रश्नांचा क्रम-

मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे हे ठरविण्याऐवजी कोणत्या मुद्द्यांसंबंधी प्रश्न विचारणे अत्यावश्यक आहे याचे एक टिपण मुलाखतकाराने तयार केले पाहिजे. मुलाखतकाराने प्रश्नांचा क्रम निश्चित केला असला तरी देखील मुलाखतदात्याने ओघवतेपणात पुढच्या प्रश्नाचे उत्तर दिले तर तितक्याच सहजपणे त्या मुद्द्याला अनुषंगून पुढचा प्रश्न मुलाखतकाराने विचारून तो मुद्दा तिथे पूर्ण करावयास हवा. अशावेळी प्रश्नांचा क्रम खालीवर झाला तरी गोंधळून जाता कामा नये. त्यासाठीच मुलाखतीतून साध्य करावयाचे मुद्दे व विषयाची पुरेपूर जाण असणे गरजेचे असते.

### ३.१.५.४.३ प्रश्नांची शब्दरचना/ वाक्यरचना-

मुलाखत घेणाऱ्याकडे मुलाखतदात्याला विचारावयाच्या प्रश्नांची लिखित संहिता तयार असली तरी प्रत्यक्षात मुलाखत घेताना प्रश्न विचारण्यामध्ये नेमकेपणा व तितकाच ओघवतेपणा असणे गरजेचे असते. अशावेळी मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा यांची भाषा, शैली, वाक्यरचना, शब्दांची फेक यामध्ये तफावत प्रेक्षकांना जाणवल्यास खूपच चमत्कारिक वाटते. तेव्हा असा फरक पडणार नाही याची काळजी घ्यावी लागते. ऐनवेळी मुलाखतदात्याची भाषाशैली ओळखून प्रश्न विचारण्याचे स्वरूप निश्चित करावे लागते.

### ३.१.५.४.४ मुलाखतकाराचा प्रतिसाद -

मुलाखत हा वरकरणी औपचारिक प्रकार असला तरी तो अनौपचारिक वातावरणात होणे गरजेचे असते. तेव्हाच मुलाखतकाराला मुलाखतदात्याचा योग्य प्रतिसाद मिळवता येतो. मुलाखत घेताना प्रश्नांच्या स्वरूपाने व संख्येने मुलाखतदात्याला घाबरवून चालत नाही. मुलाखतीतला संवाद हा मोकळ्या वातावरणात होणे अपेक्षित असते. त्यासाठी मुलाखतकाराचा चेहरा हसतमुख हवा. लक्ष मुलाखतीच्या प्रश्नाकडे जितके असायला हवे तितकेच ते मुलाखतदात्याला मोकळं करण्याकडेही असावयास हवे. एखादा मुद्दा किंवा माहिती मुलाखतदात्याला आठवत नसेल तर ती तत्काळ मुलाखतकाराने सांगावयास हवी. मुलाखतकाराने मुलाखतीमध्ये समरस होऊन अपेक्षित परिणाम साधावयास हवे.

### ३.१.५.४.५ प्रश्नांचे स्वरूप-

मुलाखतकाराने जी माहिती मुलाखतदात्यासंबधांने व विषयासंबंधाने मिळवली आहे ती सत्य व बिनचूक असावयास हवी. अशा माहितीतील चूक ही मुलाखतीला अयशस्वी बनविते. अशी चूक अक्षम्य असते. माहितीतील बिनचूकता मुलाखतकाराविषयी विश्वासार्हता आणि आदर निर्माण करते.

प्रश्नातच अप्रत्यक्षरित्या उत्तर सांगितले गेले तर मुलाखतदात्याला स्वतःचे मत मांडायला जागा राहत नाही. पाहुण्याला आपल्या मर्जीप्रमाणे उत्तर देता यावे असे प्रश्न असावेत. त्याची मते कळणे प्रेक्षकांना अपेक्षित असते त्यास मुभा देणारे प्रश्न विचारावयास हवे. हो किंवा नाही अशी उत्तरे येणारे प्रश्न देखील अशावेळी टाळावेत.

मुलाखतदात्याचा संबंध नसणाऱ्या घटना/प्रसंग/विषयावर आधारित प्रश्न शक्यतो विचारू नयेत. अशा प्रश्नांनी काहीवेळा मुलाखतदाता दुखावण्याचीही शक्यता असते. थेट व विषयाशी संबंधित प्रश्न विचारणे अधिक सयुक्तिक असते.

### ३.१.५.४.६ मुलाखतकार-मुलाखतदाता संबंध -

मुलाखतदाता हा पाहुणा असतो. घरातील पाहुण्याचे जितके आगत-स्वागत केले जाते, ज्या पद्धतीने वागविले जाते तसेच मुलाखतदात्यालाही वागवायला हवे.

मुलाखतदात्याला तंत्राची माहिती नसेल तर ती मुलाखत चालू होण्यापूर्वी सांगणे ही मुलाखत घेणाऱ्याची जबाबदारी असते. या माध्यमाच्या गरजा काय, मुलाखतदात्याने कसे बसले पाहिजे, कुठे बघून बोलले पाहिजे, हे सर्व पाहुण्याला सहजपणे समजावून सांगितले पाहिजे. कलागारातील यंत्रसामुग्रीचा, वातावरणाचा त्याच्यावर ताण येऊ नये यासाठी मुलाखतीपूर्वी त्याच्याशी बोलून, मुलाखतीसाठी त्याची मानसिक तयारी करून घेणे आवश्यक असते.

आपण विचारणार असणाऱ्या प्रश्नांची कल्पना मुलाखतदात्याला देऊ नये. त्यामुळे सहजपणाला बाधा येण्याची शक्यता असते. काही वादग्रस्त मुद्द्याविषयी, खाजगी जीवनाविषयी प्रश्न विचारायचे असतील तर मात्र त्याविषयी पूर्वकल्पना देणे आवश्यक असते. अन्यथा मुलाखतदाता दुखावल्याने प्रश्नांना योग्य उत्तरे न देण्याची शक्यता असते.

मुलाखतकार आणि मुलाखतदाता यांच्यामध्ये समान पातळीवरून संवाद व्हायला हवा. मुलाखतदात्याचे म्हणणे ऐकण्यात प्रेक्षकांना अधिक रस असणार हे लक्षात घेऊन मुलाखतीतील स्वतःची भूमिका कमीत कमी ठेवायला हवी. मुलाखत घेणे ही तारेवरची कसरत असते. हे लक्षात घेऊन एकाचवेळी अनेक गोष्टींकडे लक्ष ठेवून राहावे लागते.

## ३.१.६ पारिभाषिक शब्द

मुलाखतदाता- मुलाखत देणारा

मुलाखतकार- मुलाखत घेणारा

ध्वनिक्षेपक- विद्युत चुंबकीय ऊर्जेचे ध्वनिऊर्जेत रूपांतर करणारा एक ऊर्जापरिवर्तक.

ध्वनिमुद्रक- ध्वनीचे विविध स्वरूपांत संग्रहण करून ध्वनीचे पुनरूत्पादन करण्याचे तंत्र वापरणारा.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न: खेळातील सर्वोत्कृष्ट पुरस्कार मिळालेल्या खेळाडूच्या मुलाखतीचे लेखन करा.**

## ३.१.७ समारोप

दूरचित्रवाणी हे संपर्काचे प्रभावी माध्यम आहे. अशा इलेक्ट्रॉनिक माध्यमासाठी लेखन करणे ही एक कला आहे. या माध्यमासाठी मुलाखत लेखन करताना तंत्राचे भान ठेवणे गरजेचे असते. मुलाखतकार व मुलाखतदाता या दोहोंमध्ये सुसंवाद व दोघांनाही तंत्राची जाण असेल तर मुलाखत यशस्वी होते. मुलाखत घेणे हे हे पूर्वनियोजित असते तेव्हा मुलाखत घेणाऱ्याने तयारी करणे गरजेचे असते. त्यास ज्या व्यक्तीची व ज्या कारणाने मुलाखत घ्यावयाची आहे याची राखोल माहिती असणे आवश्यक असते. त्यानुसार अगोदरच प्रश्नांची मांडणी करणे व क्रम ठरविणे गरजेचे असते. त्यासोबतच मुलाखत देणाऱ्या व्यक्तीस देखील तंत्राची माहिती देणे व त्यांची त्यासाठी मानसिकता तयार करणे हा देखील मुलाखतीचा भाग असतो. अशा यशस्वी मुलाखती या संग्राह्य असतात. तर समकालीन घडामोडीवरील मुलाखती या प्रेक्षकांसाठी दिशादर्शक व माहितीपूर्ण देखील असतात. समोरासमोरील अशा मुलाखतींमध्ये संयम व आत्मविश्वास व हजरजबाबीपणा यांची देखील कसोटी लागत असते हे लक्षात घेणे गरजेचे आहे. या माध्यमाद्वारे दृश्य माहिती पुरवत असल्याने आवाज व व्यक्तिमत्व या दोहोंना तितकेच लक्ष देणे आवश्यक असते. अशा पद्धतीने मुलाखत यशस्वी करणे ही कला आहे. ती आत्मसात केल्यास व्यवसायाच्या संधी उभ्या राहतात.

## ३.१.८ संदर्भ ग्रंथ सूची

१) संपा. दत्ता पाटील व इतर मराठी भाषिक कौशल्य शिवाजी विद्यापीठ प्रकाशित, २०२०.

२) संपा. दत्ता पाटील मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रकाशित, २०२०.

## ३.१.९ सरावासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागा भरा.**

1) मुलाखत ही एक......... आहे. (कला)

2) मुलाखतीमध्ये मुलाखत घेणारा हा...........चा प्रतिनिधी म्हणून उपस्थित असतो. (प्रेक्षकांचा)

3) मुलाखतही ............. पेक्षा वेगळी असते. (भाषण)

**ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) मुलाखतीसाठी मुलाखतकाराने प्रश्नांचे स्वरूप ठरवताना कोणती काळजी घ्यावयास हवी?

२) मुलाखतदाता व मुलाखत घेणारा यांच्यातील संबंध जपण्यासाठी मुलाखत घेणाऱ्याने कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत?

❖❖❖❖

# ३.२

# दूरचित्रवाणीवरील मालिकेसाठी संवाद लेखन

**घटक रचना :**

३.२.१ प्रस्तावना

३.२.२ दूरचित्रवाणीचा इतिहास

३.२.३ दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे स्वरूप

३.२.४ दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे प्रकार

३.२.५ दूरचित्रवाणीवरील मालिकेचे विविध प्रकार

३.२.६ दूरचित्रवाणी मालिकेसाठी संवाद लेखन-

३.२.७ दूरचित्रवाणी माध्यमाचा जनमानसावरील प्रभाव

३.२.८ पारिभाषिक शब्द

३.२.९ समारोप

३.२.१० संदर्भ ग्रंथ सूची

३.२.११ सरावासाठी प्रश्न

## ३.२.१ प्रस्तावना

सध्याचे युग हे 'माहिती तंत्रज्ञानाचे युग' म्हणून ओळखले जाते. या माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराचा एक स्त्रोत म्हणजे दृकश्राव्य माध्यम म्हणजेच दूरचित्रवाणी होय. या दूरचित्रवाणीचे माध्यम दृकश्राव्य असल्याने ते अतिशय परिणामकारक आहे. प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन केलेल्या चलत् चित्रणामुळे प्रेक्षकांना आपण स्वतः घटनेचे साक्षीदार असल्याप्रमाणे म्हणजे 'ऑखो देखा हाल' ही घटना बघितल्याचा अनुभव मिळतो. व्यक्ती साक्षर असो की निरक्षर किंवा आबालवृद्धसुद्धा; घडलेली घटना, प्रसंग (दृश्य) आणि उच्चारलेले शब्द यामुळे सर्व प्रकारच्या कार्यक्रमांचा आस्वाद घेऊ शकतात.

सध्या भारतात दूरदर्शनबरोबरच अनेक दूरचित्रवाणी वाहिन्या दिसू लागले आहेत. दूरचित्रवाणीवर करमणूकप्रधान कार्यक्रमाबरोबरच अलीकडच्या काळात बातम्या आणि इतर माहितीप्रधान कार्यक्रमांची लोकप्रियता वाढत आहे. अहोरात्र बातम्या देणाऱ्या वाहिन्या ही इतर देशांप्रमाणे भारताच्या संदर्भातही आता नवलाईची गोष्ट राहिलेली नाही. इ.स. १९५९ साली प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेल्या दूरचित्रवाणी प्रक्षेपणापासून ते थेट घरापर्यंत येणाऱ्या डीटीएच (डायरेक्ट टू होम) प्रक्षेपणापर्यंत या तंत्रज्ञानाचा विकास झाला

आहे. त्यामुळे या क्षेत्रात रोजगारांच्या अनेक संधीची उपलब्धता निर्माण झाली आहे. साहजिकच दूरचित्रवाणी या माध्यमाची परिपूर्ण जाण असणाऱ्यांना, दूरचित्रवाणी क्षेत्रात करियर करण्याची मानसिकता असणाऱ्यांना आणि दूरचित्रवाणीकरिता वार्तांकन करण्यासाठी आवश्यक असलेले गुण अंगी असणाऱ्यांना संपादक, साहाय्यक संपादक, वार्ताहर, छायाचित्रकार, तंत्रज्ञ यांची गरज विविध वाहिन्यांना जाणवत आहे.

## ३.२.२ दूरचित्रवाणीचा इतिहास

परस्परांशी संवाद साधणे ही मनुष्यप्राण्यांची एक मूलभूत गरज आहे. व्यक्ती - व्यक्तींतील किंवा गटांतर्गत संवादासाठी माणूस पहिल्यापासून हावभाव, चिन्ह इत्यादी विविध साधने वापरीत होता. परंतु त्यात अनेक मर्यादा होत्या आणि जसजसे मानवी समुदाय अधिकाधिक वाढत गेले, त्यांच्या भौगोलिक कक्षा विस्तारत गेल्या आणि मुख्यतः व्यापाराची जशी सुरुवात झाली आणि मोठ्या प्रमाणावर वाढ झाली तशीतशी माणसाला जलद गतीने दूरच्या ठिकाणी संदेश पोहोचवणाऱ्या माध्यमाची प्रकर्षाने गरज भासू लागली. या दृष्टीने (१) पहिले पाऊल सतराव्या अठराव्या शतकात उचलले गेले. विद्युतीय संदेश काही विशिष्ट माध्यमातून पुढे जाऊ शकतात हे अनेक वर्षांच्या संशोधनानंतर युरोपातील संशोधकांच्या लक्षात आले होते. ते पाठविण्याचा नेमका मार्ग सॅम्युएल मोर्स या वैज्ञानिकांने शोधला. त्याने बनविलेले तारेचे यंत्र (टेलीग्राफ मशीन) इ.स.१८४३मध्ये पहिल्यांदा वापरण्यात आले. एकेका अक्षरासाठी वापरण्यात येणाऱ्या बिंदू, रेघ, याऐवजी विशिष्ट समुच्चयाच्या चिन्हांच्या रूपाने (मोर्स कोड) लिखित संदेश अक्षरशः प्रकाशाच्या वेगाने विशिष्ट लांबच्या ठिकाणी पाठविणे शक्य होऊ लागले. हे तंत्रज्ञान वापरण्यासाठी तारांचे प्रचंड मोठे जाळे, अक्षरशः अगदी तलाव, समुद्र यांच्या खालून टेकड्यांवरही उभारावे लागले. (२) याच जाळ्यांचा वापर बिंदू, रेघ या ऐवजी प्रत्यक्ष आवाज पाठवण्यासाठी करता येईल का? या दृष्टीने चाचपणी सुरू झाली. त्यामध्ये इ.स.१८७६ साली अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल या शास्त्रज्ञाला यश आले आणि दूरध्वनीच्या युगाला सुरुवात झाली.

त्याच्या पुढची पायरी म्हणजे (३) तारांचा वापर न करता एखाद्या ठिकाणचा संदेश दुसरीकडे पोहोचविणे शक्य आहे का? याची चाचपणी करणे. गमतीची गोष्ट अशी की, एकाच वेळी विविध देशांत अशा प्रकारचे संशोधन सुरू होते आणि दुसऱ्या देशात काय घडते आहे ते त्वरेने समजण्याची सोय नसल्याने प्रत्येक देशातील शास्त्रज्ञ स्वतंत्रपणे काम करत होते. साधारणपणे गुग्लिएल्मो मार्कोनी हा इटालियन संशोधक बिनतारी संदेश यंत्रणेचा जनक आहे असे मानले जाते. (४) बिनतारी यंत्रणेद्वारा प्रथम लिखित 'मोर्स कोड'यशस्वीपणे प्रक्षेपित केल्यावर त्याद्वारे ध्वनिलहरी प्रक्षेपित करण्याचे प्रयत्न सुरू झाले त्यातूनच नभोवाणीचा (रेडिओ) जन्म झाला. पहिल्या महायुद्धाच्या काळात लष्करी कामासाठी नभोवाणी तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला. त्यानंतर या माध्यमाचा करमणुकीसाठी व्यवसायिक वापर व्हायला सुरुवात झाली.

(५) दरम्यान शास्त्रज्ञांनी आवाजाबरोबरच चित्रेही कशी पाठवता येतील याचा विचार करायला सुरुवात केली. इ.स.१८८४ निपकोव या जर्मन तंत्रज्ञाने तयार केलेल्या एका तबकडीमुळे चित्रे प्रक्षेपित करता येण्याची शक्यता निर्माण झाली. तबकडीवर एका विशिष्ट पद्धतीने भोके (छिद्रे) पाडून ती फिरवली तर आपण वाचताना ज्या पद्धतीने डोळ्यांची

हालचाल करतो, तशी तबकडीमधून जाणाऱ्या त्या प्रकाशकिरणांची होते, असे त्यांच्या लक्षात आले. चित्र पाठवण्याच्या आणि पाहण्याच्या अशा दोन ठिकाणी दोन तबकड्या बसविल्या तर चित्र प्रक्षेपित होऊ शकते असे त्यांनी सिद्ध केले. तीच पद्धत वापरून मग विविध आकाराच्या आणि घनतेच्या बिंदूंच्या साहाय्याने चित्रे अधिकाधिक चांगल्या पद्धतीने प्रक्षेपित करण्याचे प्रयोग सुरू झाले. इतर शास्त्रज्ञांनीही पुढची जवळपास ५० वर्षे ही पद्धत केंद्रीभूत मानून ते अधिकाधिक चांगली करण्याचा प्रयत्न चालू ठेवला, पण आवश्यक तेवढी स्पष्टता चित्रांना मिळत नव्हती.

इ.स. १९२९ च्या सुमारास (६) इंग्लंडमध्ये जॉन लोगी बेअर्ड या ब्रिटिश शास्त्रज्ञाने बनविलेली, तबकडीच्याच तत्त्वावर आधारित पण अधिक चांगले चित्र प्रक्षेपित करू शकणारी उपकरणे बी.बी.सी. या कंपनीने वापरात आणली. याच वेळेस (१९२८) अमेरिकेतही प्रक्षेपणाला मर्यादित स्वरूपात सुरुवात झाली होती. 'जनरल इलेक्ट्रिक' या कंपनीच्या वतीने पहिल्या दूरचित्रवाणी नाटकाचे प्रायोगिक प्रक्षेपण अमेरिकेत झाले. त्या वेळेचा पडदा अतिशय लहान आकाराचा, जवळपास पोस्ट कार्डाच्या आकाराचा होता. यांत्रिक पद्धतीने तबकडी फिरवण्याच्या तंत्राला अनेक मर्यादा होत्या. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने क्रमवीक्षण म्हणजे स्कॅनिंग करण्याची संकल्पना पुढे आली.

'रेडिओ कार्पोरेशन ऑफ अमेरिका' या कंपनीचा अध्यक्ष डेव्हिड सरनॉफ हा अतिशय महत्त्वाकांक्षी होता. त्याने दूरचित्रवाणी प्रक्षेपण करण्याचा मान आपल्याच कंपनीला मिळाला पाहिजे असा चंग बांधला होता. त्यासाठी त्यांनी कंपनीतील हुशार तंत्रज्ञ व्लादिमिर झ्वोरिकिन याला याच कामासाठी जुंपले. त्यातूनच पुढे इ .स.१९२९ मध्ये किनेस्कोप आणि इ.स.१९३१ मध्ये आयनोस्कोप या दोन प्रकारच्या संपूर्णता: इलेक्ट्रॉनिक यंत्रणेवर चालणाऱ्या कॅमेरा नलिका तयार केल्या गेल्या. त्यामुळे पूर्वीपेक्षा बरेच समाधानकारक चित्र प्रक्षेपित करता येऊ लागले. प्रक्षेपणाबरोबरच अधिकाधिक चांगले कॅमेरे बनविण्याचाही प्रयत्न चालू होता. दरम्यान दूरचित्रवाणी या माध्यमाचा व्यावसायिक वापर करण्याची योजना आखायला विविध कंपन्यानी सुरुवात केली होती. २२ मार्च १९३५ रोजी जर्मन पोस्ट खात्याने बर्लिनहून नियमित प्रक्षेपणाला सुरुवात केली. एका सेकंदाला २५ चित्रपट्ट्या आणि एका पट्टीत १८० रेषा अशा प्रक्षेपणाचे मध्यम रेषाजाल होते. या चित्रांचा दर्जाही सुमार होता. कार्यक्रमांमध्ये मुख्यतः चित्रपटांचाच समावेश होता. त्यामुळे या सेवेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. परिणामतः अवघ्या पाच महिन्यांत हे केंद्र बंद पडले.

त्यानंतर पुन्हा १९३६ च्या जुलै महिन्यामध्ये जर्मनीत ऑलिंपिक खेळाच्या वेळेस थेट प्रक्षेपणाचा प्रयत्न झाला. ऑलिंपिक ग्रामात आणि काही चित्रपटगृहांत ते प्रक्षेपण बघायला मिळाले. परंतु चित्रांचा दर्जा याही वेळेस असमाधानकारक होता. दुसरीकडे लंडनमध्ये नोव्हेंबर १९३६ मध्ये मार्कोनी - इ.एम.आय. या कंपनीने एका चित्रपट्टीत ४०५ रेषा असलेल्या उच्च 'रेषाजाल' तंत्राचे यशस्वी प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर १९३९ साली अमेरिकेत दूरचित्रवाणी प्रक्षेपणाला सुरुवात झाली. तारांच्या माध्यमातून दोन दूरचित्रवाणी केंद्रे जोडण्याचा आणि एका केंद्रावरून प्रसारित होणारे कार्यक्रम दुसऱ्या केंद्राने सहप्रक्षेपित करण्याचा प्रयोगही झाला.

त्यानंतर दूरचित्रवाणीचा प्रसार झपाट्याने झाला असता; परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे त्याला खीळ बसली. दुसरे महायुद्ध संपल्यानंतर १९५० च्या सुमारास मात्र दूरचित्रवाणीचा प्रसार सर्वत्र अगदी झपाट्याने झाला. १९६० पर्यंत जगाच्या सर्व भागात दूरचित्रवाणी प्रक्षेपणाला सुरुवात झाली होती. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतासारख्या राष्ट्रांना हे माध्यम खर्चीक व आवाक्याबाहेरचे वाटत होते. परंतु राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे, ही बाब सर्वांच्या लक्षात आली होती.

भारतात १५ सप्टेंबर १९५९ रोजी प्रथम 'फिलिप्स इंडिया' या कंपनीने सरकारला एक प्रक्षेपक बनवून दिला. युनेस्कोने केलेली मदत आणि सरकारने समाजशिक्षणाचे डोळ्यांसमोर ठेवलेले ध्येय यातून केंद्राचे काम सुरू झाले. सुरुवातीला शैक्षणिक आणि समाजशिक्षण या उद्दिष्टांना समोर ठेवून सुरू झालेल्या या केंद्राने १९६५ मध्ये मनोरंजनपर कार्यक्रम प्रक्षेपित केले. १९७२ मध्ये मुंबई, व त्यानंतर श्रीनगर, अमृतसर, कलकत्ता, लखनौ या ठिकाणी केंद्राची उभारणी झाली. १ एप्रिल १९७६ मध्ये भारत सरकारच्या अखत्यारीत असलेल्या आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी या दोन्ही माध्यमांचे स्वतंत्र विभाग करण्यात आले. त्यावेळी 'दूरदर्शन'हे नाव या माध्यमाला मिळाले. माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारीत हे माध्यम स्वतंत्रपणे काम करू लागले.[१]

## ३.२.३ दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे स्वरूप

चित्र आणि आवाज प्रक्षेपकांमार्फत / उपग्रहांमार्फत दूर अंतरावर पोहोचविणाऱ्या माध्यमाला 'दूरचित्रवाणी' म्हणतात. दूरचित्रवाणी या माध्यमाला अवघ्या ६० - ७० वर्षांचा इतिहास आहे. चित्रपटाच्याही नंतर त्याचा शोध लागला. परंतु या माध्यमाचा प्रसार त्याच्या शोधानंतर फार झपाट्याने साऱ्या जगभर झाला. ध्वनी आणि चित्रे घरबसल्या दाखवणाऱ्या या माध्यमाचा फार मोठा पगडा सामान्य माणसावर आहे. भारतातही सध्या दूरचित्रवाणी या माध्यमाला मनोरंजन आणि माहिती यांचे प्रमुख साधन म्हणून अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. दूरदर्शन या सरकारी वाहिनीचे जाळे तर जवळपास सर्व देशभर पसरलेले आहेच पण उपग्रह वाहिन्याही झपाट्याने नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करीत आहेत.

दूरचित्रवाणीवर सध्या आपल्याला अनेक प्रकारचे कार्यक्रम पाहायला मिळतात. उपग्रह वाहिन्या सुरू झाल्यापासून तर विविध रचनाबंधांमधील कार्यक्रम सादर होतात. त्यात मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे संख्या अधिक असते. दूरचित्रवाणी वाहिन्यांना अधिकाधिक प्रेक्षकांना आवडतील असे कार्यक्रम सादर करावे लागतात. कारण जितका मोठा प्रेक्षकवर्ग तेवढ्या जास्त जाहिराती आणि पर्यायाने तेवढे अधिक उत्पन्न असा साधा सरळ हिशोब आहे. मनोरंजन करणाऱ्या कार्यक्रमाबरोबरच माहिती देणाऱ्या कार्यक्रमांना उदाहरणार्थ, बातमीपत्रे, चर्चा, माहितीपट इत्यादींना मोठा प्रेक्षकवर्ग आहे. किंबहुना विविध वाहिन्यांवरील वृताधारित कार्यक्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

## ३.२.४ दूरचित्रवाणी कार्यक्रमांचे प्रकार

कोणत्याही एका सर्वसाधारण दूरचित्रवाणी वाहिनीचे कार्यक्रम तुम्ही सातत्याने काही काळ पाहिले असतील तर असे लक्षात येईल की, विविध प्रकारचे कार्यक्रम तिच्यावरून सादर होत असतात. त्यांची विभागणी अनेक प्रकारांनी करता येईल. लक्ष्यगटानुसार

बालकांसाठी, युवकांसाठी, महिलांसाठी, ज्येष्ठ नागरिकांसाठी असे प्रकार पडतात. विषयानुसार कौटुंबिक, सामाजिक, क्रीडाविषयक, आरोग्यविषयक इत्यादी अनेक उपगट पडतात. भाषानुसारी विभागणीही करता येते परंतु सर्वात महत्त्वाची विभागणी कार्यक्रमांच्या उद्दिष्टानुसार करणे अधिक उचित होईल. कोणत्याही प्रसारमाध्यमांचे मनोरंजन करणे, माहिती देणे आणि शिक्षण देणे अशी तीन महत्त्वाचे उद्दिष्टे असतात. दूरचित्रवाणीलाही तीच त्रिसूत्री लागू होते. कार्यक्रमात ज्या उद्दिष्टांवर भर दिला असेल त्यानुसार आपण त्यांची (१) करमणूक प्रधान (२) माहिती प्रधान (३) शैक्षणिक अशा तीन प्रमुख घटक विभागणी करू. हे तीन गट परस्परांपासून पूर्णतः स्वतंत्र असू शकत नाहीत. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. करमणूकप्रधान कार्यक्रमातून माहिती अथवा शिक्षण मिळतच नाही असे म्हणणे वास्तवतेला धरून होणार नाही. प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम करमणुकीसाठीच आखला जात असला तरी त्यातून प्रेक्षकांना नवनवीन माहिती मिळते. तसेच उपयुक्त माहिती प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी करमणुकीचा आश्रय घेतला जातो. हे 'आमची माती आमची माणसे', 'कामगार विश्व' यासारख्या कार्यक्रमांतून आपण अनेक वेळा पाहिले असेल.

**(१) करमणूकप्रधान कार्यक्रम –**

या गटात समाविष्ट होणाऱ्या बहुसंख्य कार्यक्रमांचा हेतू करमणूक करणे हाच असतो. त्यामुळे त्यातील बहुतेक आशय कल्पित असतो किंवा निखळ करमणुकीसाठी काही कार्यक्रम प्रत्यक्ष घडवून आणले जातात.

करमणूक प्रधान कार्यक्रमांचे आपण पुढीलप्रमाणे वर्गवारी करू शकतो.

| **करमणूकप्रधान कार्यक्रम** | | | |
|---|---|---|---|
| **(१)मालिका** | **(२)संगीत विषयक** | **(३) प्रश्नमंजुषा** | **(४)चर्चात्मक** |
| **कौटुंबिक, रहस्यप्रधान, विनोदी, भयकारक, पौराणिक, ऐतिहासिक** | **गीतांच्या लोकप्रियतेविषयीचे, चित्रपटगीते** | **सोपे शारीरिक बौद्धिक खेळ, अंताक्षरी,नृत्य स्पर्धा** | **TALK SHOW** |

वर उल्लेख केलेल्या विविध प्रकारांपैकी करमणूकप्रधान कार्यक्रमामध्ये मालिका हा लोकप्रिय कार्यक्रम आहे, आपण मालिका या प्रकाराचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

सर्वसाधारण वाहिन्यांवरचा मालिका हा एक महत्त्वाचा कार्यक्रम प्रकार आहे. अनेक दिवस चालणारा, नाट्यमय प्रसंगाची रेलचेल असलेला उत्कंठावर्धक कार्यक्रम म्हणजे दूरचित्रवाणी मालिका असे ढोबळमानाने मालिकेचे वर्णन करता येईल. या मालिकांचे प्रकार पुढील प्रकारे पडतात.

## ३.२.५ दूरचित्रवाणीवरील मालिकेचे विविध प्रकार

**(अ) कौटुंबिक -**

इंग्रजीत ज्याला 'सोप ऑपेरा' किंवा 'डेली सोप' म्हणतात त्या प्रामुख्याने कौटुंबिक मालिका असतात. एक किंवा त्याहून अधिक कुटुंबातील अनेक व्यक्तींच्या महत्त्वकांक्षा, संघर्ष, आपत्ती इत्यादींचे विस्तृत चित्रण हा बहुतेक प्रत्येक कौटुंबिक मालिकेचा गाभा असतो. भारतात 'हमलोग' या मालिकेपासून कौटुंबिक मालिकांच्या युगाला सुरुवात झाली. श्वेतांबर, बुनियाद, 'ये जो है जिंदगी', 'शांती', 'स्वाभिमान', 'जुनून', 'बेरीज-वजाबाकी', 'अश्वमेध', 'काम फत्ते', 'बनगरवाडी', 'पैलतीर', 'आव्हान', 'रथ चंदेरी' अशा अनेक मालिका वर्षांनुवर्षे दूरचित्रवाणीवरून सादर होत होत्या. मोठी कुटुंबे, त्यातील व्यक्तींचे टोकांचे स्वभाव, बदलते नातेसंबंध, संशयास्पद भूतकाळ, प्रेमात किंवा धंद्यात झालेली फसवणूक अशा विषयावर मालिकांची बांधणी केलेली असते.

अनेकदा या मालिकांना विशिष्ट आखीव अशी कथा - पटकथा नसते. वाहिनीकडून मुदतवाढ मिळेल त्याप्रमाणे कथा वाढविली जाते. क्वचित प्रेक्षकांच्या प्रतिसादानुसार कथेत बदलही केले जातात. या मालिका अनेक दिवस चालत असल्याने त्यात काम करणारे कलाकारही कधी कधी बदलतात; पण प्रेक्षकांच्या रसास्वादात त्याने फरक पडत नाही. 'चार दिवस सासूचे', 'गोजिरवाण्या घरात', 'दामिनी', 'आभाळमाया', 'ऋणानुबंध', 'गंगूबाई नॉनमॅट्रिक', 'वहिनीसाहेब', 'उंच माझा झोका', 'जगावेगळी', 'जिवलगा', 'मधु इथे तर चंद्र तिथे', 'स्वप्नांच्या पलीकडले', 'पुढच पाऊल', 'होणार सून मी या घराची', 'माझे मन तुझे झाले', 'असावा सुंदर स्वप्नांचा बंगला' या अलीकडच्या काळातील मालिकांचे उदाहरण म्हणता येतील.

**(आ) रहस्यप्रधान –**

रहस्यप्रधान मालिकांमध्ये गुन्ह्यांचा शोध अथवा खटला यांचे चित्रण असते. या प्रकारातील मालिकेत एकच गोष्ट सादर न होता दोन-तीन भागांच्या छोट्या छोट्या गोष्टी सादर होतात. रहस्य शोधणारी पात्रे समान असल्याने मालिकेत एक सातत्य राहते. 'शोध', 'एक शून्य शून्य', 'तिसरा डोळा', 'कमांडर', 'मी प्रभाकर', 'दिनमान', 'परमवीर', 'हॅलो इन्स्पेक्टर' या गाजलेल्या मराठी तर 'सी.आय.डी.', 'क्राईम पेट्रोल' या हिंदी रहस्यप्रधान मालिका आहेत.

**(इ) विनोदी-**

विनोदी मालिका हाही प्रेक्षकप्रिय प्रकार आहे. प्रसंगाधिष्ठित विनोद हा या मालिकांचा कणा असतो. या प्रकारातही काही पात्रे समान ठेवून त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या विनोदी घटनांचे चित्रण केले जाते. 'चाळ नावाची वाचाळ वस्ती', 'चिमणराव गुंड्याभाऊ' या मराठीत तर 'फ्लॉप शो', 'श्रीमान श्रीमती', 'तारक मेहता का उलटा चष्मा' या हिंदी विनोदी मालिका दूरचित्रवाणीवर प्रसारित झाल्या होत्या.

### (ई) भयकारक –

अनाकलनीय गुढ गोष्टींचे माणसाला नेहमीच आकर्षण वाटते, हे लक्षात घेऊन मालिकानिर्माते असे भयप्रद, गूढ मालकांची निर्मिती करतात. चित्रविचित्र चेहरे, आवाज, घटना या मालिकांचे वैशिष्ट्ये आहेत. 'होनी अनहोनी', 'झी हॉरर शो', 'रात्रीस खेळ चाले' ही विविध वाहिन्यांवर गाजलेल्या मालिकांची उदाहरणे आहेत.

### (उ) पौराणिक –

दूरचित्रवाणीवरून आतापर्यंत दाखवल्या गेलेल्या अनेक पौराणिक मालिकात रामायण व महाभारत यांचा समावेश होतो. ओम नमः शिवाय, जय हनुमान अशा सारख्या मालिकानाही मोठा प्रेक्षकवर्ग लाभला. संघर्ष आणि प्रेक्षकाला त्याविषयी वाटणाऱ्या आत्मीयता त्यामुळे भारतात पौराणिक मालिका हा लोकप्रिय प्रकार आहे.

### (ऊ) ऐतिहासिक –

'स्वामी', 'राऊ', 'द ग्रेट मराठा', 'चाणक्य', 'छत्रपती शिवाजी महाराज', 'स्वराज्य रक्षक संभाजी' इत्यादी ऐतिहासिक मालिकाही लोकप्रिय झाल्याने ऐतिहासिक मालिकांची निर्मिती अन्य प्रकारच्या मालिकांपेक्षा अधिक क्लिष्ट आणि खर्चीक असते. कालानुरूप वेशभूषा, रंगभूषा करणे, युद्ध, दरबार असे शेकडो कलाकारांचा सहभाग असलेले प्रसंग चित्रित करणे हे निर्माता दिग्दर्शकांपुढे मोठे आव्हान असते.[२] याशिवाय कृतीवर आधारित मालिकाही दूरचित्रवाणीवर सादर केल्या जातात. 'श्रीयुत गंगाधर टिपरे', 'व्यक्ती आणि वल्ली', 'मालगुडी डेज' यासारख्या साहित्यकृतीवर आधारित मालिका अशी या प्रकारातील मालिकांची कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

### ३.२.६ संवाद म्हणजे काय? व्याख्या –

'कम्युनिकेशन' या लॅटिन शब्दापासून 'संवाद' हा शब्द मराठीत आला आहे. त्याचा अर्थ देणे,भाग घेणे, आदान - प्रदान, देवाण-घेवाण करणे किंवा सामायिक करणे होय.

**१)** संवाद म्हणजे प्रतीकांच्या सामान्य प्रणालीद्वारे व्यक्तींमधील अर्थाची देवाणघेवाण होय". संवादाचे अनेक प्रकार पडतात.[३].

**२)** "एका व्यक्तीद्वारे इतर व्यक्तीकडे अथवा व्यक्तीसमूहाकडे चिन्हाद्वारे माहितीचे प्रेषण किंवा प्रक्षेपण होय.

**३)** "संदेशाद्वारे चालणारी आंतरक्रिया म्हणजे संवाद होय."

संवाद ही संस्कृतीशी संबंधित प्रक्रिया आहे, याचाच अर्थ ज्या व्यक्तीला संवाद साधायचा आहे तिची आणि ज्या व्यक्तीशी संवाद साधायचा आहे या दोघांची सांस्कृतिक पार्श्वभूमी एकच असल्यास संवाद अधिक प्रभावी होतो. ज्यावेळी विविध प्रसार माध्यमांचा वापर करून संवाद केला जातो व तो संदेश दूर लोकांपर्यंत पोहोचला जातो त्यास जनसंज्ञापन म्हणतात. मानवी जीवनामध्ये समाजाला खूप महत्त्वाचे स्थान आहे समाजाला मानवी जीवनामध्ये संवादाला फार महत्त्वाचे स्थान आहे. संवादामुळे विचारांची देवाणघेवाण होते.

संवाद हा परस्परांमध्ये होणे खूपच गरजेचा असतो कारण कोणताही मनुष्य हा एकमेकांशी संवाद साधल्याशिवाय राहू शकत नाही.[४]

एखाद्या विशिष्ट विषयावर दोन किंवा अधिक लोकांनी व्यक्तींनी केलेली सुसंगत संभाषण जेव्हा लिहिले जाते तेव्हा त्यास संवादलेखन असे म्हणतात. म्हणजेच दोन व्यक्तींमध्ये जे बोलणे असते त्याला संवाद असे म्हणतात. संवाद दोन किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींमध्ये होत असतो. उदा. ‘संगणकाचा महिमा’ या विषयावर आजोबा आणि नात यांच्यातील संवाद पहा :

**आजोबा** : बरेच दिवस झाले चेन्नईला येऊन ! मला मुंबईला गेला पाहिजे.

**शिवानी** : आजोबा 'तुम्ही खूप दिवस राहणार आहे' असं म्हणाला होतात.

**आजोबा** : अगं दिवसभर एकटा असतो घरात. इथे मराठी वर्तमानपत्रसुद्धा मिळत नाही. मी वेळ कसा घालवणार ?

**शिवानी** : एवढेच ना आजोबा ! तुम्हाला रोज मराठी वर्तमानपत्र वाचायला मिळेल. मी व्यवस्था करते.

**आजोबा** : ते कसं काय शक्य आहे बुवा ?

**शिवानी** : आजोबा हे संगणकाचे युग आहे. नेटवरून काही सेकंदातच जगातील कोणतीही गोष्ट आपण घरबसल्या उपलब्ध करून घेऊ शकतो. आता जगात अशक्य असे काहीच राहिले नाही.

**आजोबा** : पोरी हे सगळं मी ऐकले खरं...

**शिवानी** : आजोबा,मी नेट सुरू केलंय .कोणतं वर्तमानपत्र वाचायचंय तुम्हाला ?

**आजोबा** : 'सर्वकाळ'.

**शिवानी** : थांबा हं मी आता हे अक्षरे संगणकावर टाईप करते.

**आजोबा** : अरे व्वा ! सगळी पाने दिसायला लागली की इथे... सगळे बातम्या वाचतो आता.

**शिवानी** : आजोबा, तुम्ही आता तुमच्या मित्रांना ई- मेल पण करू शकता.

**आजोबा** : खरंच पोरी, संगणकाचा महिमा आगाध आहे या संगणकाने संपूर्ण जगालाच एकदम जवळ आणलंय!.[५]

**संवाद २. शिक्षणाचे महत्त्व सांगणारा दोन मित्रांमधील संवाद :**

**अभय -** अरे दिनू ! कालच आपला दहावीचा निकाल लागला ना ? मग चल पुढील शिक्षणासाठी आपण कॉलेजचा फॉर्म आणायला जाऊया. मी निघालोय तू पण येतोस ना ?

**दिनू** : नाही रे अभय. तू जा मी नाही येत.

**अभय** : अरे पण का ? काही अडचण आहे का?

**दिनू** : अरे मी आता पुढील शिक्षण न घेण्याचे ठरविले आहे. मला काहीतरी काम धंदा करायचा आहे.

**अभय** : काय? तू पुढील शिक्षण घेणार नाहीस? अरे पण तुला तर आपल्या सर्व मित्रांमध्ये जास्त गुण मिळाले आहेत. मग तू असे का म्हणतोस?

**दिनू** : मला माझ्या वडिलांना घरखर्चात मदत करायची आहे. म्हणून मी हा निर्णय घेतला आहे.

**अभय** : ऐक दिनू! तुझे बोलणे मला पटले आहेत तरीही माझ्या मते, तू कॉलेजचे शिक्षण घेत घेत एखादे कामही करू शकतोस. म्हणजेच तुझे शिक्षणाचे नुकसान होणार नाही.

**दिनू** : पण माझा अभ्यास बुडाला तर तो कसा कळेल मला?

**अभय** : अरे मित्रा! आम्ही तुझे मित्र आहोत ना ? आम्ही तुला तुझ्या बोललेल्या अभ्यासात मदत करू.जेणेकरून तू शिकू ही शकशील आणि तुझ्या घरच्यांना घरखर्चात मदतही करू शकतील.

**दिनू** : पण हे सगळे खरंच जमेल का मला?

**अभय :** का नाही जमणार तुला? तू हुशार आहेस, मेहनती आहेस आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजेच तुला तुझ्या घरची परिस्थिती बदलायची आहे. बरोबर ना?

**दिनू** : हो बरोबर.

**अभय:** मग ऐक मित्रा ! शिक्षणामुळेच तुला तुझ्या घरची आर्थिक परिस्थिती बदलू शकतोस. चांगले शिक्षण घेतलेस तर पुढे जाऊन तुला चांगली नोकरी मिळेल. हळू हळू कुटुंबाचे आर्थिक जबाबदारी तू निर्धारस्तपणे घेऊ शकशील ओळख व तुझ्या वडिलांना आराम मिळेल

**दिनू** : मला तुझे म्हणणे पटले आहे अभय. आता मला शिक्षणाचे महत्त्व चांगले कळले आहे. मला जर माझ्या कुटुंबासाठी काही हातभार लावायचा असेल तर आता अर्धवट शिक्षण सोडून मी छोटी मोठी कामे करून चालणार नाही. त्यापेक्षा मी शिक्षणाचा आधार घेऊन माझे भवितव्य सुधारू शकेल.

**अभय** : चल तर मग कॉलेजला प्रवेश घेऊया.

**दिनू:** धन्यवाद मित्रा. चल[६].

## ३.२.६ दूरचित्रवाणी मालिकेसाठी संवाद लेखन-

दूरचित्रवाणीचे कार्यक्रम हे दृश्य आणि श्राव्य (ऑडिओ व्हिडिओ) एकाच वेळी असतात आणि त्यामुळे त्याचा प्रेक्षकवर्ग हा बहिर्मुख असतो. कान आणि डोळे दोन्ही व्यापून टाकणारं हे माध्यम आहे. म्हणून रेडिओची भाषा आणि दूरचित्रवाणीची भाषा यामध्ये बराच फरक जाणवतो. दूरचित्रवाणी आणि सिनेमा दोन्ही माध्यमातून श्राव्य आणि दृश्य भाषा आहेत. त्या माध्यमांची भाषा दृश्य आणि ध्वनींची भाषा असते. दृश्यभाषेला 'जागतिक भाषा' म्हणतात ते त्यामुळेच. दूरचित्रवाणी या प्रसारमाध्यमाची स्वतंत्र अशी भाषा असते. त्याची एक वेगळी शैली असते. ती दृश्य आणि श्राव्य अशा दोन्हींच्या माध्यमातून व्यक्त होते. एखादा विषय किंवा एक दृश्य हे अनेक दृश्य आणि ध्वनींच्या माध्यमातून, विविध दृश्यसाखळीमधून उलगडत नेते. त्याला अनुरूप, साजेसं निवेदन आणि संवाद यांच्या मदतीने हे माध्यम प्रेक्षकांपर्यंत एखादी कथा, माहिती, बातमी पोहोचवत असते. माणसाची भाषा ही इतर प्राण्यांच्या भाषेपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण मानली जाते. कारण मानवाची भाषा आणि तिची अभिव्यक्ती केवळ हावभाव, खाणाखुणा किंवा ठराविक चिन्हे, प्रतीके यांच्याच मदतीने होत नाही तर त्यापलीकडे जाऊन विशिष्ट स्वरोच्चारांच्या आकृतिबंधातून होत असते.

आपल्या विविध प्रसारमाध्यमातून व्यक्त होणाऱ्या दृश्यभाषा, चित्रभाषा, चिन्हभाषा, स्पर्शभाषा किंवा ज्याला आपण शारीरभाषा (बॉडी लँग्वेज) म्हणतो याचे एक वेगळे शास्त्र असते. एक परिक्षेत्र आणि वर्तुळ असतं. प्रसारमाध्यमाचं सर्वात महत्त्वपूर्ण भांडवल किंवा ऐवज म्हणजे मजकूर (टेक्स्ट). वृत्तपत्र, रेडिओ, टेलिव्हिजन यांच्याकडे जर चांगला कसदार मजकूर असेल तर ही माध्यमात जनमानसात चांगलं स्थान निर्माण करू शकतात. हा सगळा मजकूर भाषेच्या माध्यमातून मांडावा लागतो. अशाच प्रकारे शब्द आणि ध्वनीचित्र यांचा वापर करून एखादा विचार, मुद्दा प्रेक्षकांसमोर ठेवता येतो.

पाहणं ही एक गुंतागुंतीची दृश्य प्रक्रिया असल्याने ती कौशल्यपूर्ण हाताळावी लागते. लेखणीपेक्षा कॅमेऱ्यानं लेखन करणे किंवा दृश्य टिपणे हे मोठं अवघड काम असते. त्याची तीव्रता, अंतर, दृष्टिकोन, ते हाताळण्याची पद्धत यातून एक अर्थपूर्ण दृश्यमालिका तयार होण्यास वाव असतो.

दूरचित्रवाणी यंत्राधीष्ठीत माध्यम आहे आणि त्यासाठी यंत्राची तोंडओळख, मानसिक पूर्वतयारी, प्रेक्षकांचा विचार, संहितालेखनाची भाषा आणि तंत्र या बाबी लक्षात घ्याव्या लागतात. संहितालेखन (स्क्रिप्ट) करताना, पहिले महत्त्वाचे पाऊल म्हणजे लेखनाची भाषा साधी, प्रवाही आणि आवश्यक तिथे बोली स्वरूपाची असावाच पाहिजे. संहितालेखनात प्रेक्षकांशी थेट संवाद साधणाऱ्या भाषेला महत्त्व असते. कारण एकाच वेळी बघणे आणि ऐकणे या दोन क्रिया साधाव्या लागतात. रेडिओमध्ये संवाद साधणारा श्रोत्यांना दिसत नसतो. दूरचित्रवाणीमध्ये तो दिसतो आणि म्हणूनच तो सहजपणे बोलणारी भाषा, शब्दांचा वापर आणि प्रेक्षकांशी संवाद साधण्याची कसरत करीत असतो. दूरचित्रवाणीची भाषा म्हणजे दृश्यभाषा, दृश्य आकार, कॅमेराचा कोन, कॅमेऱ्याची हालचाल, प्रकाश, वातावरण, पुढील आणि मागील परिसराची परिस्थिती, दृश्य मिश्रण, क्रोमा, स्पेशल इफेक्ट्स इत्यादींचा एकसमुच्चय परिणाम म्हणजे प्रेक्षकांना बघावयास मिळणारा कार्यक्रम. 'प्रथम बघा आणि मग बोला' असा या माध्यमाचा गुरुमंत्र असतो.[७] दूरचित्रवाणी हे दृकश्राव्य

माध्यम आहे. यात ऐकता, वाचता येण्याबरोबरच दृश्यदेखील आपण पाहू शकतो, हे या माध्यमाचे खूप मोठे बलस्थान आहे. दृश्य पाहिल्याने ते अधिक काळ स्मरणात राहते. त्यामुळेच तंत्राची जबाबदारीदेखील वाढते. माध्यमांमध्ये तंत्राचा जबाबदारीने वापर करणे गरजेचे असते. दृकश्राव्य माध्यमाची एक स्वतंत्र भाषा असते. ती भाषा तंत्राची असते. ही तंत्राची भाषा या माध्यमाचा वापर करणाऱ्याला अवगत (ज्ञात) असणे गरजेचे असते. ही जशी तंत्राची भाषा असते तसे ती दृश्याचीदेखील असते. ही दृश्ये अधिकाधिक प्रभावी व परिणामकारक कसे बनवता येतील याकडे तंत्र वापरणाऱ्याचे लक्ष असते. दृश्याला ध्वनी आणि आवाज याची जोड दिली तर ते अधिक परिणामकारक होते. या बाबी लक्षात घेऊन दूरचित्रवाणीवरील मालिकांचे संहिता लेखन केले जाते.

दूरचित्रवाणी मालिकेसाठी एका प्रसंगाचे संहितालेखनाचे एक उदाहरण बघू. मालिकेचा स्टोरी बोर्ड तयार करताना आधी काही गोष्टी नमूद करणे आवश्यक असते.

**मालिकेच्या चित्रिकरणासाठी स्थळ –**

बंगल्याचा बाहेरचा भाग

**मालिकेच्या भागातील पात्रे-**

१) साधारण तीस-पस्तीस वयाच्या दोन व्यक्ती
२) एक कुत्रा घराच्या गेटवर मुरगळून पडलेला

**वेषभूषा –**दोघांनी काळे कपडे घातलेले आहेत तोंडाला रुमाल बांधलेले आहेत एकाच्या

हातात टॉर्च आहे तर दुसऱ्याच्या हातात दोरी आहे.

प्रत्यक्ष संहिता लेखन (स्टोरी बोर्ड) कसे करावे ते पाहू;

| दृश्य क्र. | कॅमेरा व दृश्यभाग | संवाद | ध्वनी |
|---|---|---|---|
| दृश्य क्रमांक 1 | रात्रीचा अंधार, बंगल्याचा समोरचा भाग, फाटक | ... | रात्रीला दृश्य करणारे संगीत |
| दृश्य क्रमांक 2 | बंगल्याच्या फाटकावर चढून दोन चोर येतायत. वर चढताच एकाला फाटकात कुत्रे झोपलेले दिसते. तो दुसऱ्याला खुणेने दाखवतो. | एक- शू...... | सतारीची तार छेडली जाते. ध्वनीचा परिणाम दचकणे. |
| दृश्य क्रमांक 3 | दोघेही दबक्या पावलांनी बंगल्याच्या खिडकीजवळ येतात. | एक- दोरी. | ... |
| दृश्य क्रमांक 4 | एक बॅटरी खिडकीच्या दिशने दाखवतो. कुत्र्याकडेही त्याची नजर आहे. दुसरा दोरी खिडकीत टाकण्याचा प्रयत्न करतो आहे. | ... | भयकारक संगीत |
| दृश्य क्रमांक 5 | दुसरा दोरीवरून खिडकीत चढण्याचा प्रयत्न करतो आहे. | ... | कुत्रा भुंकल्याचा आवाज |

याप्रमाणे प्रत्येक दृश्याचे तपशीलवार लेखन केले जाते.

मालिकेचे संवाद व दृश्यांचा क्रम ठरवणारा वेगळा असतो. तर संगीताचे नियोजन करणारा वेगळा असतो. त्यामुळेच एका मालिकेच्या निर्मितीमागे अनेक लोक राबत असतात. मालिकेचे संवाद व दृश्यांचा क्रम ठरवणारा वेगळा असतो. तर संगीताचे नियोजन करणारा वेगळा असतो. त्यामुळेच एका मालिकेच्या निर्मितीमागे अनेक लोक राबत असतात. परंतु संवाद लेखकाला या सर्वाचे भान ठेवूनच संवाद लेखन करावे लागते. आपल्या संवादांना दृश्याची, संगीताची, प्रकाशाची, रंगसूचनांची जोड आहे हे लक्षात ठेवावे लागते. त्यामुळे कमीत कमी शब्दांमध्ये संहिता लेखन करणे हे देखील त्याच्या समोरचे आव्हान असते. हे दृश्यरूप माध्यम असल्याने संवाद व तंत्राच्या साहाय्याने कथा उलगडणार असते तेव्हा ही कथा परिणामकारक करण्यासाठी नेमक्या शब्दात त्याला जास्तीत जास्त आशय पोहोचवायचे असते. त्यासाठी कथेतील घटना-प्रसंगांची क्रमबद्ध मांडणी अगोदरच निश्चित करावी लागते. प्रत्येक प्रसंगासाठी स्वतंत्र लेखन करावे लागते. त्यामुळे हे लेखन तुकड्या-तुकड्यातील असते. तेव्हा या तुकड्यांची संगती पडद्यावर लागणे गरजेचे असते. तसेच ही दृश्य इतर तंत्रज्ञांना समजेल अशा स्वरूपात असावयास हवी कारण त्यांच्यासाठी हे लेखन काही प्रमाणात मार्गदर्शक देखील असते. 'रात्रीची वेळ होती. कुत्रा भुंकत होता. चोर सावध झाले.' अशा अनावश्यक संवादांची गरज नसते हे ध्यानात घ्यावयास हवे. हे सर्व दृश्यातून चित्रित होणारे असते. कारण प्रेक्षक पडद्यावर प्रसंग पाहत असतात. हे सर्व ध्वनी, रंग, प्रकाश व अभिनय यातून व्यक्त होणारे असते. हे लक्षात ठेवून नेमक्या व प्रभावी संवादांची मांडणी करणे लेखकासाठी आव्हानात्मक असते. म्हणूनच दूरचित्रवाणीसाठीचे संवाद लेखन वेगळे असते व ते तंत्रज्ञास परस्परपूरक असते हे लक्षात घ्यावयास हवे. आजच्या काळात दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांची लोकप्रियता व वाढता प्रेक्षकवर्ग पाहता दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांच्या संवाद लेखनाचे कौशल्य अवगत करणे हा व्यवसायाचा भाग झाला आहे. हे लक्षात घेऊन हा घटक समजून घ्यावयास हवा.

## ३.२.७ दूरचित्रवाणी माध्यमाचा जनमानसावरील प्रभाव

दूरचित्रवाणी हे प्रबोधन आणि मनोरंजनाचे प्रभावी साधन आहे. दूरचित्रवाणी म्हणजेच सरकारी भाषेतील टेलिव्हिजन, टीव्ही, दूरदर्शन होय. चित्र आणि आवाज प्रेक्षेपकांमार्फत अथवा उपग्रहामार्फत दूर अंतरावर पोहोचवणाऱ्या माध्यमाला दूरचित्रवाणी म्हणतात. विद्युत चुंबकीय तरंगाच्या साहाय्याने चल किंवा अचल दृश्य प्रतिमा व संबंधित ध्वनिसंकेतांचे प्रेषण व ग्रहण असा दूरचित्रवाणीचा अर्थ आहे. ध्वनी आणि चित्रे घरबसल्या दाखवणारे हे एक माध्यम आहे. दूरचित्रवाणी हे दृकश्राव्य माध्यम आहे. या माध्यमाची भाषा दृश्य आणि ध्वनीची भाषा असते. दूरचित्रवाणीची स्वतंत्र अशी भाषा असते. त्याची एक वेगळी शैली असते. ती दृश्य आणि ध्वनींच्या माध्यमातून विविध दृश्यसाखळींमधून एखादा विषय उलगडत नेते. दूरचित्रवाणीची भाषा म्हणजे दृश्यभाषा, दृश्य आकार. कॅमेऱ्याचा कोन, कॅमेऱ्याची हालचाल, प्रकाश, वातावरण, पुढील आणि मागील परिसराचे परिस्थिती, दृश्यमिश्रण, क्रोम, स्पेशल इफेक्ट्स इत्यादींचा एकसमुच्चय परिणाम म्हणजे प्रेक्षकांना बघायला मिळणारा कार्यक्रम होय. दूरदर्शनमुळे दूरवरच्या गोष्टीचे दर्शन घडते म्हणून दूरदर्शनला 'दूरवरच्या गोष्टीचे दर्शन घडविणारा' असे म्हटले जाते. दूरदर्शनमधून आपल्याला जगात काय घडामोडी होत आहेत. तसेच धार्मिक स्थळे, ऐतिहासिक इमारती, वेगवेगळे पुरातत्त्व अवशेष इत्यादी माहिती देणार लघुपट टीव्हीवर प्रदर्शित होतात.

डिस्कवरी सायन्स, नॅशनल जिओग्राफी यासारख्या प्रसारित होणाऱ्या लघुपटावरून माहितीचा खजिना मिळतो. वैज्ञानिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, शैक्षणिक अशा सर्व प्रकारचे डॉक्युमेंट्री घरबसल्या पाहायला मिळतात. त्यामुळे दूरचित्रवाणी हे शिक्षणाचे अत्यंत चांगले माध्यम आहे. वेगवेगळ्या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी दूरदर्शनसारख्या चॅनेलवरून शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित केले जातात. विज्ञानापासून अगदी स्वयंपाकघरापर्यंत कार्यक्रम त्यावर दाखविले जातात. दूरचित्रवाणीवर पर्यटनाविषयीचे कार्यक्रम पाहताना आपल्याला वेगवेगळ्या देशातील लोक, त्यांची संस्कृती त्यांचीवेशभूषा, वेगवेगळे भूप्रदेश येथील खाद्यसंस्कृती या सर्वांची माहिती मिळते. मुलांचे कार्यक्रम इतिहास या विषयावर माहिती दूरचित्रवाणीवरून कार्यक्रमांमधून मिळते. २४ तास ताज्या बातम्या देणाऱ्या वाहिन्यांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती बातमी आपण पाहतो त्याशिवाय बातम्यांचे थेट प्रक्षेपण आहे. आपल्याला घरबसल्या पाहता येते. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या राष्ट्रीय दिवसाच्या दिल्लीला होणाऱ्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दूरचित्रवाणीवरून देशभर दाखविले जाते. प्रसिद्ध नेते, खेळाडू, कलाकार यांच्याही मुलाखती दूरचित्रवाणीवरून दाखविल्या जातात. या महान व्यक्तींचा संघर्ष आणि त्यातून त्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या मुलाखतीतून ऐकल्यानंतर आपल्याला एक प्रकारची प्रेरणा मिळते. एकंदर प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याची विलक्षण शक्ती दूरचित्रवाणी माध्यमात आहे.

एकेकाळी टीव्हीवरून मराठी भाषेत केवळ एक किंवा दोन तास बातम्या दाखवल्या जायच्या. आता संपूर्ण २४ तास वृत्तप्रसारण करणाऱ्या मराठी वाहिन्या सुरू झाल्या आहेत. मराठी भाषेतील २४ तास बातम्या देणारी 'झी २४ तास' ही पहिली मराठी वृत्तवाहिनी आहे. ती २००७ साली सुरू झाली. त्यानंतर जून २००७ मध्ये 'स्टार माझा' ही दुसरी मराठी वृत्तवाहिनी सुरू झाली. कालांतराने म्हणजेच एक जून २०१२ नंतर 'स्टार माझा' या वाहिनीचे नाव 'एबीपी माझा' असे बदलण्यात आले. २००८ साली ‘आयबीएन लोकमत' ही वृत्तवाहिनी सुरू झाली. ही वाहिनी 'न्यूज १८' आणि 'लोकमत' या दोन कंपन्यांनी मिळून सुरू केली. कालांतराने या वाहिनीचे नाव 'न्यूज १८ लोकमत' असे ठेवले गेले. आतापर्यंत सह्याद्री, झी मराठी, कलर्स मराठी, झी टॉकीज, स्टार प्रवाह, नाईन एक्स झकास, झी युवा, सोनी, शेमारू मराठी बाणा, प्रवाह पिक्चर, झी २४ तास, एबीपी माझा, न्युज १८ लोकमत, टीव्ही ९ मराठी, साम टीव्ही, जय महाराष्ट्र इत्यादी अशा अनेक नावाजलेल्या वाहिन्या आहेत.

दूरचित्रवाणी माध्यमाचा जनमानसावर फार मोठा प्रभाव आहे. हा प्रभाव चांगला तसा वाईटही आहे. या माध्यमाचा योग्य उपयोग करून घेणे आपल्याच हातात आहे. मनोरंजन आणि माहिती हा दूरचित्रवाणीचा मुख्य हेतू असला तरी त्याचे आपले कुटुंब, मुले आणि आपल्या स्वतःवरही काही घातक परिणाम होऊ शकतात. विशेष करून लहान मुलांवर अधिक परिणाम दिसून येतात. लहान मुले दिवसभर टीव्ही बघतात, घराबाहेर खेळायला जात नाहीत, सिनेमातील वाईट गोष्टींचा त्यांच्या कोवळ्या मनावर लगेच परिणाम होतो. मुले सिनेमातील वाईट गोष्टी लगेच शिकतात, अभ्यासासाठी पोषक वातावरण निर्माण होत नाही, त्याशिवाय ते चिडखोर, हट्टी, आक्रमक आणि अनुकरणप्रिय बनतात. या व्यतिरिक्त दूरचित्रवाणी वरील अनेक कार्यक्रम हे मुलांवर संस्कारही घडवत असतात. आपल्या संस्कृतीची अनेक अंगे अनेक पत्रांकरवी दाखवून देत असतात. एखाद्या गोष्टीचे जसे फायदे असतात तसेच त्याचे तोटेही असतात. ही बाब दूरचित्रवाणीसाठीही लागू पडताना दिसते.

## ३.२.८ पारिभाषिक शब्द

1. स्टोरीबोर्ड- कथा फलक

## आपली प्रगती तपासा:

**प्रश्न : मालिकेतील क्रिकेट खेळाच्या प्रसंगासाठीचे संवाद लेखन करा.**

## ३.२.९ समारोप:

दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम हे प्रेक्षकांच्या आकर्षणाचा भाग असतो. यातूनच दूरचित्रवाणीचा मोठा प्रेक्षकवर्ग तयार होत असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमामधील रस टिकवणे हे अशा कार्यक्रमांच्या निर्मितीकार्यासमोरचे आव्हान असते. अशा कार्यक्रमामध्ये संवादासोबतच अनेक घटक समाविष्ट असतात हे या माध्यमाचे बलस्थान आहे त्याचे भान संवाद लेखकाला ठेवावे लागते. अशावेळी संवाद लेखन करताना काही गोष्टींचे भान ठेवणे देखील गरजेचे असते. दृश्य व शब्द यांची सांगड घालण्याची कसरत लेखकाला करावी लागते. या माध्यमावरील कार्यक्रम पुनःप्रसारित होत असतात. तसेच हे कार्यक्रम दृश्यात्मक असतात. त्यामुळे यामध्ये चुका होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. या माध्यमासाठीच्या लेखनाचे कौशल्य हस्तगत करणे हे आजच्या काळासमोरचे आव्हान आहे.

## ३.२.१० संदर्भ ग्रंथ सूची:

१. बनकर, मनिषा (संपा.), 'प्रसार माध्यमे आणि भाषाव्यवहार', दूर व मुक्त अध्ययन संस्था प्रकाशन, मुंबई विद्यापीठ मुंबई. पृ. १५२-१६२.

२. बनकर, मनिषा (संपा.), 'प्रसार माध्यमे आणि भाषाव्यवहार', दूर व मुक्त अध्ययन संस्था प्रकाशन, मुंबई विद्यापीठ मुंबई. पृ. १६३-१६६.

३. https://textbook.com

४. संवाद कौशल्य- https://maharashtratimes.indiantimes.com ११ जानेवारी २०१९.

५. गोरक्षनाथ शिंदे-संवाद लेखन मराठी https://www.marathistudy.com

६. https://mr.quora.com

७. प्रा. बबन नाखले- 'माध्यमांची भाषा : दूरचित्रवाणी महाराष्ट्र टाइम्स, http://maharashtratimes.com

८. संपा. दत्ता पाटील व इतर, *'मराठी भाषिक कौशल्य'*, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रकाशित, 2020.

९. पिंगळे, किरण नामदेव (संपादक) : 'संवाद कौशल्ये आणि प्रसार माध्यमे', शब्दश्री प्रकाशन, जुन्नर, जि. पुणे. प्रथमावृत्ती, डिसें. 2015.

## ३.२.११ **सरावा**साठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

1) दूरचित्रवाणीवर प्रसारित होणाऱ्या मालिकांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

2) दूरचित्रवाणीचा इतिहास सांगून दूरचित्रवाणीवरील मालिकेतील संवाद लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) थोडक्यात उत्तरे लिहा.**

1) मालिकेतील एखाद्या प्रसंगासाठीचा स्टोरीबोर्ड तयार करा.

❖❖❖❖

# ३.३

## ई-मेल लेखन, ब्लॉग लेखन व विकिपीडिया लेखन

**घटक रचना**


३.३.० उद्दिष्टे

३.३.१ प्रस्तावना

३.३.२ ई-मेल

३.३.२.१ ई-मेल म्हणजे काय?

३.३.२.२ ई-मेल सेवेचा इतिहास

३.३.२.३ ई-मेल खाते व त्याचे स्वरूप

३.३.२.४ ई-मेलचे फायदे

३.३.२.५ ई-मेलच्या मर्यादा आणि तोटे

३.३.२.६ ई-मेल खाते कसे तयार करावे?

३.३.२.७ ई-मेल चे उपयोग

३.३.३ ब्लॉग

३.३.३.१ ब्लॉग लेखन म्हणजे काय?

३.३.३.२ ब्लॉगचा इतिहास

३.३.३.३ ब्लॉगिंगचे प्रकार

३.३.३.४ ब्लॉग कसा लिहितात?

३.३.३.५ ब्लॉग लिहिण्याच्या पायऱ्या

३.३.४ विकिपीडिया

३.३.४.१ विकिपीडियाचे स्वरूप

३.३.४.२ विकिपीडियाचा इतिहास

३.३.४.३ विकिपीडियाचे फायदे आणि तोटे

३.३.४.४ विकिपीडियावर नोंदी लेखन

३.३.५ समारोप

३.३.६ संदर्भ सूची

३.३.७ सरावासाठी प्रश्न

## ३.३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

१) ई-मेल चे स्वरूप व त्याचे कार्य समजून येईल.
२) ई-मेल करण्याची पद्धत समजून येईल व ई-मेल करता येईल.
३) ब्लॉग चे स्वरूप व ब्लॉग तयार करण्याची पद्धत समजेल.
४) ब्लॉग तयार करून ब्लॉग लेखन करता येईल.
५) विकिपीडियाचे स्वरूप समजेल.
६) विकिपीडियावर नोंद लिहिता येईल.

## ३.३.१ प्रस्तावना

आजच्या तंत्रज्ञानाच्या जगात माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट आंतरजालामुळे झाला आहे. आंतरजाल (Internet) चा वापर आज व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात महत्त्वाचा आहे. जगभरातून वैविध्यपूर्ण माहिती मिळविणे आणि माहितीचे वा प्राप्त ज्ञानाचे जगासमोर पुन्हा सादरीकरण करण्याचे साधन म्हणून आंतरजाल महत्त्वाचे आहे. आज साहित्यविषयक क्षेत्रात आंतरजाल हा एक अविभाज्य भाग बनून राहिला आहे. साहित्यविषयक नेमकी माहिती, संदर्भ शोधावयाचे असल्यास गुगल शोधयंत्राद्वारे शोधता येतात. याबरोबरच आपल्याकडील माहिती दुसऱ्यापर्यंत तात्काळ पोचवण्यासाठी ई-मेलचा वापर करणे गरजेचे आहे. भाषेचे विद्यार्थी म्हणून आपणास ब्लॉग आधारे व्यक्त व्हावयास यायला हवे, व विकिपीडिया या मुक्त ज्ञानकोशावर लेखन करता यायला हवे. यासंदर्भातील ई-मेल लेखन, ब्लॉग लेखन व विकिपीडिया लेखन या घटकांचा विस्ताराने विचार इथे करणार आहोत.

जेव्हा आपल्याला एखाद्या व्यक्तीला कोणतीही माहिती द्यायची असते, तेव्हा ती एका पत्राद्वारे दिली जात असे. त्याला उत्तर देण्यासाठी बराच वेळ लागत असे, पण आजच्या काळात तसे नाही, इंटरनेटच्या आगमनानंतर, कोणतीही माहिती कोणत्याही व्यक्तीला कमी वेळेत सहज पाठवता येते. पूर्वी लोक एखाद्याच्या घराचा किंवा कार्यालयाचा पत्ता विचारत असत, परंतु आता ते ई-मेलचा पत्ता विचारतात. ई-मेल किंवा इलेक्ट्रानिक्स मेल म्हणजे इलेक्ट्रानिक्स मसेज होय. ग्राफिक्स, फोटो, व्हीडियो किंवा फाइल, डाटा या ई-मेल मधून सहज जगात कुठेही एका मिनिटामध्ये जाऊ शकतो. आपण ई-मेल च्या माध्यमातून आपल्या प्रियजन व्यक्तीला अथवा कुणालाही मेल पाठवू शकतो. ज्याप्रमाणे आपण मोबाईल मध्ये SMS पाठवतो त्याचप्रमाणे ई-मेल असतो. त्याचा परिचय या घटकात आपण करुन घेणार आहोत.

### ३.३.२.१ ई-मेल म्हणजे काय?

पूर्वी पोस्ट ऑफिस हे पत्र पाठविण्याचे किंवा मिळण्याचे एकमेव माध्यम होते. परंतु एकंदरीतच पोस्टाच्या कामकाजाची गती संथ असते. ती मानवी कार्यतत्परतेवर आधारलेली असते. म्हणूनच पोस्टखात्याद्वारे होणाऱ्या पत्रव्यवहाराला 'स्नेल मेल' असे नाव मिळाले. गोगलगाईच्या गतीने चालणारी ती पत्रव्यवहाराची पद्धती होती. ई-मेलच्या आगमनाबरोबर स्नेल मेलचे तात्काळ- 'क्विक' मेलमध्ये रूपांतर झाले. आता ई-मेलद्वारे तुमचे पत्र सहस्त्रावधी किलोमीटरचा प्रवास करून अक्षरश: क्षणार्धात तुमच्या मित्राला मिळू शकते. ई-मेल हे सध्या संपर्काचे सर्वांत लोकप्रिय साधन आहे. आज दररोज इंटरनेटच्या माध्यमातून अब्जावधी ई मेलचे आदानप्रदान होत असते. सामान्यतः लहानसा मजकूर असलेला संदेश असे ई-मेलचे स्वरूप असते. परंतु 'अ‍ॅटॅचमेंट' या प्रकारामुळे ई-मेल संदेशाची लांबी बरीच मोठी होऊ शकते. तसेच ई-मेलद्वारे छायाचित्रे पाठविण्याची सोय उपलब्ध असल्यामुळे त्यासाठी अधिक मेमरी लागते.

ई-मेल हे मुळात 'इलेक्ट्रॉनिक मेल' या इंग्रजी शब्दाचे संक्षिप्त रूप आहे. दैनंदिन जीवनात ई-मेलसाठी आपण साधारणतः मेल या इंग्रजी शब्दाचा वापर करतो. व्याकरणदृष्ट्या 'ई-मेल' हा पुल्लिंगी शब्द नाम (एक संदेश) म्हणून वापरला जातो. इंग्लिश भाषेमध्ये 'टु ई-मेल' ही संज्ञा क्रियापद म्हणूनही (ई-मेल पाठवणे ह्या अर्थी) वापरली जाते. ई-मेल हे पत्रस्वरूपी संवाद साधण्याचा एक आधुनिक व डिजिटल असा मार्ग आहे. दोन व्यक्तीदरम्यान संवाद साधण्यासाठी ई-मेल ह्या पद्धतीचा वापर केला जातो. पूर्वी आपण कागदावर आधारित जे पत्र व्यवहार करत होतो, त्या पत्र व्यवहाराची जागा ह्या आधुनिक जगात ई-मेल प्रणाली ने घेतली आहे. दैनंदिन जीवनात व कॉर्पोरेट स्तरावर देखील पत्र व्यवहारासाठी ई-मेलचा वापर होऊ लागला आहे. ई-मेलचे प्रमुख विशेष म्हणजे ई-मेलद्वारे संवाद साधने मोफत आणि जलद होते. ई-मेल आयडी ही एखाद्या ओळखपत्राप्रमाणे काम करत असते. सोप्या शब्दात ई-मेल आयडी म्हणजे ई-मेल प्रणालीमध्ये एखाद्या वापरकर्त्याची ओळख होय. ई-मेल प्रणाली ही ई-मेल आयडी शिवाय अपूर्ण आहे किंवा कार्य करू शकत नाही असे आपण म्हणू शकतो. ई-मेल म्हणजे डिजिटल पत्रव्यवहार होय. ज्याप्रमाणे हस्तलिखित पत्र पाठविण्यासाठी आपल्याला, समोरील व्यक्तीचा घरचा पत्ता आणि नावाची गरज असते, अगदी त्याच प्रमाणे ई-मेल पाठविण्यासाठी आपल्याला ई-मेल आयडीची गरज भासते.

ई-मेल आयडी, वापरकर्त्याचे नाव, @- At The Rate आणि सर्व्हिस प्रोव्हायडरच्या नावाने बनते. उदा. ..........@Gmail.com, ..........@yahoo.com. इथे ......... च्या जागी वापरकर्त्याने ठरविलेले नाव, नंबर अथवा अक्षरे असू शकतात. @ हे चिन्ह सर्व्हिस प्रोव्हायडर आणि वापरकर्त्याचे नाव विभागण्याचे काम करते आणि gmail हे सर्व्हिस प्रोव्हायडरचे नाव आहे. gmail ला google Mail असेही म्हटले जाते. ई-मेल प्रणालीत जो पर्यंत समोरील व्यक्तीची ई-मेल आयडी आपल्याकडे उपलब्ध नसते, तो पर्यंत ई-मेलद्वारे पत्र व्यवहार होऊच शकत नाही, ह्यावरून आपण ई-मेल आयडीचे महत्त्व समजू शकतो. ई-मेल हे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या साहाय्याने संदेश पाठवण्याचे तंत्रज्ञान आहे. सध्याच्या बहुतांश ई-मेल यंत्रणा इंटरनेटचा (Internet) वापर करतात. आजचे आधुनिक ई-मेल हे साठवणे (Store) आणि पुढे अग्रेषित करणे (फॉरवर्ड; Forward) या धर्तीवर बनवले गेलेले आहे.

ई-मेल सर्व्हर संदेश प्राप्त करतात, संदेश पाठवतात आणि संदेश साठवून सुद्धा ठेवू शकतात. त्यासाठी आता संदेश पाठवणारे, वाचणारे आणि हे ऑनलाइन असण्याची गरज नाही. ते थोड्या काळासाठी एकमेकांबरोबर जोडले गेले, तरी संदेश पाठवता येतो. हा थोडा काल एक संदेश पाठवण्यास लागणाऱ्या वेळेपर्यंत सीमित असतो. पोस्ट ऑफिस कसे कार्य करते तशाच प्रकारचे कार्य ई-मेल करते.

### ३.३.२.२ ई-मेल सेवेचा इतिहास :


ई-मेल सेवेचा इतिहास आपल्याला "अर्पानेट" पर्यंत मागे घेऊन जातो. १९८०च्या दशकात "अर्पानेट"चे इंटरनेटमध्ये झालेल्या रूपांतरामुळे ई-मेल सेवेचा जन्म झाला. १९७० मध्ये पाठवले गेलेले ई-मेल आणि आजचे फक्त शब्दबद्ध मजकूर असलेले ई-मेल यामध्ये कमालीचे साम्य आहे. संगणकीय जाळ्यांच्या मदतीने पाठवलेला ई-मेल प्रथमत: "अर्पानेट"वर फाईल ट्रान्स्फर प्रोटोकॉलच्या (FTP) प्रणालीनुसार पाठवला गेला. सन १९८२ पासून ई-मेल पाठवण्यासाठी सिम्पल मेल ट्रान्स्फर प्रोटोकॉलचा वापर केला जात होता. ई-मेलचा इतिहास हा फार नव्हे तर, आजपासून पन्नास ते साठ वर्षे इतका जुना म्हणजे साधारणतः 1960च्या दरम्यानचा. जेव्हा कॉम्पुटर टाइम शेअरिंग प्रणाली अस्तित्वात होती, तेव्हाच ई-मेलचा उदय झाल्याचे सांगितले जाते. हा काळ साधारणतः 1960च्या दरम्यानचा होता. टाईम शेअरिंग कम्प्युटर म्हणजे त्याकाळी संगणक हे अगदी मर्यादित संख्येत उपलब्ध होते, ज्यामुळे लोकांना पैसे देऊन ते ठराविक वेळेसाठी वापरावे लागत होते. आपली वेळ संपली की दुसरी व्यक्ती येऊन तो संगणक वापरत होता. पाठविलेल्या Emails मधील महत्त्वपूर्ण फाईल पाहण्यासाठी अथवा चोरण्यासाठी पहिल्या ई-मेल प्रणालीमध्ये विविध अनौपचारिक पद्धती उदयास आल्या होत्या, सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, ई-मेल प्रणाली ही Hackable बनली होती. 1995 दरम्यान संपूर्ण आंतरजालावरील व्यावसायिक ट्राफिक यावरील निर्बंध हटविले गेले आणि विविध घटकांच्या संयोगाने SMTP, POP3 आणि IMAP आधुनिक काळातील ई-मेल प्रणालीसाठी लाभदायक ठरले, ज्यामुळे ई-मेल प्रणाली इतकी प्रगत बनली आहे.

### ३.३.२.३ ई-मेल खाते व त्याचे स्वरूप :

आपण इंटरनेटवर ई-मेल खाते सहजपणे तयार करू शकतो. ई-मेल खाते तयार झाल्यानंतर, आपल्याला एक ई-मेल पत्ता प्राप्त होतो, ज्याचा वापर अनेक ठिकाणी केला जाऊ शकतो. दोन प्रकारची ई-मेल सेवा अस्तित्वात आहे, विनामूल्य आणि दुसरे सशुल्क (सशुल्क–खरेदी केलेले) आहेत. आपण सशुल्क ई-मेल सेवा खरेदी करता तेव्हा आपल्याला बरेच अधिकच्या सुविधा मिळतात. ई-मेल सेवा प्रदान करणाऱ्या अनेक कंपन्या आहेत, जसे की जीमेल (Gmail) – सध्या संपूर्ण जगामध्ये सर्वात जास्त वापरली जाते. जीमेल (Gmail) व्यतिरिक्त, हॉटमेल (Hotmail), रेडिफमेल (rediffmail), याहू मेल (yahoo mail) हे प्रोव्हायडर देखील ई-मेल सेवा प्रदान करतात. ई-मेल संदेशाचे दोन भाग असतात. पहिल्या भागात शीर्षलेख (हेडर; Header) म्हणजेच ठळकपणे लिहिलेले संदेशाचा विषय (Subject), पाठवणाऱ्याचा ई-मेल आणि संदेश ज्याला पाठवला आहे त्याचा ई-मेल (To मध्ये) हे सगळे असते. ज्यांना पाठवावयाचे आहे त्याच्या व्यतिरिक्त इतर जणांना ई-मेल अग्रेषित करावयाचे असल्यास सीसी (CC) आणि बीसीसी (BCC) ची


सुविधा देण्यात आली आहे. बीसीसी म्हणजे "ब्लाईंड कार्बन कॉपी; Blind Carbon Copy" आणि सीसी म्हणजे "कार्बन कॉपी; Carbon Copy". बीसीसी हा ई-मेलच्या प्रती इतर लोकांना पाठविण्याचा एक मार्ग आहे. जेव्हा सीसी वापरला जातो तेव्हा आपण प्राप्तकर्त्यांची यादी पाहू शकता, परंतु बीसीसीमध्ये प्राप्तकर्त्यांची यादी पाहू शकत नाही, हा या दोघांमधील फरक आहे.

**आकृती-१**





दुसरा भाग म्हणजे संदेशाचा मुख्यभाग (मेसेज बॉडी; Message Body) ह्यामध्ये संदेश लिहिलेला असतो. प्राथमिक स्वरूपात असताना फक्त लिहिलेले संदर्भ (टेक्स्ट; Text) पाठवता येणारा ई-मेल आधुनिक काळात जास्त विकसित होऊन मल्टिमीडिया ॲटॅचमेन्ट्स (Multimedia attachments) म्हणजेच छोट्या आकाराचा मल्टिमीडिया फाईल पाठवण्याइतपत सक्षम बनला. ह्या पद्धतीला मल्टिपर्पज इंटरनेट मेल एक्सटेन्शन्स (MIME) असे म्हणतात. ई-मेल "ॲट द रेट"- @ या चिन्हाचा वापर करून इष्टस्थळी पाठविण्यात येतो.

**आकृती-२**



आकृती-३




ई -मेल खाते वापरकर्त्याला मेलबॉक्स सोबतच आउटबॉक्सही असतो. आउटबॉक्समध्ये आपण पाठवलेले किंवा फॉरवर्ड केलेले सर्व मेल असतात, ते मेलबॉक्समध्ये देखील असतात. जेव्हा तुमच्याकडे कोणाकडून ई-मेल आला असेल आणि तुम्हाला उत्तर द्यायचे असेल तर तुम्ही रिप्लाय वर क्लिक करून सहज उत्तर देऊ शकता, यामध्ये तुम्हाला पाठवणाऱ्याचा ई-मेल टाईप करण्याची गरज नाही. फॉरवर्डिंग-जर कोणी तुम्हाला ई-मेल पाठवला असेल आणि तुम्हाला तो मेल कोणत्याही तिसऱ्या व्यक्तीला पाठवायचा असेल, तर तुम्हाला मेल फॉरवर्डिंगवर क्लिक करावे लागेल आणि तुम्हाला पाठवायचा असलेल्या व्यक्तीचा ई-मेल आयडी टाईप करावा लागतो. 'रिपोर्टिंग' म्हणजे ई-मेल पाठवलेल्या व्यक्तीला ई-मेल प्राप्त झाल्याची माहिती देणे. 'प्रदर्शित करणे' म्हणजे ई-मेल प्राप्तकर्ता हा मेल पाहण्यापूर्वी किंवा पाहण्यापूर्वी मॉनिटरवर ई-मेल प्रदर्शित करू शकतो, प्राप्तकर्ता तो हटवू शकतो आणि इच्छित असल्यास तो जतन देखील करू शकतो.

## ३.३.२.४ ई-मेलचे फायदे

अनेक वर्षांपूर्वी म्हणजेच ई-मेल आणि संगणक प्रणालीचा उदय होण्यापूर्वी पत्र पाठवणे आणि स्वीकार करणे, यात अनेक दिवसांचा कालावधी लागायचा, कधी कधी तर महिन्यांचा कालावधी देखील लागत होते. पूर्वी पत्र लिहायला आणि त्याचे उत्तर मिळवण्यासाठी खूप वेळ लागत असे, पण आता तसे नाही, आता ई-मेलद्वारे तुम्ही ई-मेल पाठवू शकता आणि काही वेळात आपण कागद आणि पेन्सिलशिवाय कोणत्याही किंमतीत माहिती पाठवू आणि प्राप्त करू शकतो. आपण एकाच वेळी अनेक लोकांना ई-मेल पाठवू आणि प्राप्त करू शकतो. ई-मेल सेवा पूर्णपणे विनामूल्य आहे, वापरण्यास अतिशय सोपे आहे आणि आपण आपल्या इलेक्ट्रॉनिक दस्तऐवज जसे की फोटो, चिन्ह, आधार कार्ड, मतदार कार्ड आणि संदेश चांगल्या प्रकारे पाठवू शकतो. ई-मेल सुरक्षित आणि विश्वासार्ह आहे. तो तुमचा मेल सर्व परिस्थितीत वितरित करण्याचा प्रयत्न करतो आणि तुमचे पाठवलेले ई-मेल इतर व्यक्ती पाहू शकत नाही. ई-मेल हरवण्याची भीती नाही, तुम्ही पाठवलेला प्रत्येक ई-मेल मेल सर्व्हरवर सेव्ह केला जातो, आपण ही प्रत कधीही पाहू शकतो.

ई-मेल वापरून आपण एकमेकांशी संवाद साधू शकतो, ई-मेल द्वारे दूर राहणाऱ्या लोकांशी बोलू शकतो. विविध विषयांवर गप्पा मारण्यात रस असणाऱ्यांसाठी ई-मेलने एक अभिनव संधी उपलब्ध करून दिली. ज्यामध्ये अशा लोकांचे 'डिस्कशन ग्रुप' प्रस्थापित करता येऊ शकतात. 'डिस्कशन ग्रुप' या शब्दाचा सरळ अर्थ आहे 'चर्चा गट'. चर्चेमध्ये सहभागी असणाऱ्यांनी समोरासमोर बसून चर्चा करण्याची आवश्यकता उरली नाही. तुम्ही आपापली मते ई-मेलद्वारे परस्परांना कळवू शकता. ई-मेलच्या आश्रयाने चर्चा करणाऱ्या गटांना 'मेलिंग लिस्ट' असे नाव आहे. ई-मेलचा उपयोग करून परस्परांशी विविध विषयांवर चर्चा करणारे सहस्त्रावधी गट अस्तित्वात आले आहेत. ई-मेलचा दुसरा फायदा म्हणजे तात्काळ उत्तर मिळवणे, आम्हाला ई-मेल द्वारे फाईल्स संलग्न करण्याची सुविधा मिळते, जेणेकरून आम्ही आवश्यक फाईल्स आणि फोटो ई-मेलला जोडू शकतो. तसेच आवश्यक दुवे शेअर करू शकतो. Photo, PDF आणि इतर Files जोडून पाठवू शकतो, ई-मेल मध्ये फाइल अटॅच करण्याची सुविधा असल्यामुळे ई-मेलचा वापर कॉर्पोरेट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होतो. ई-मेलद्वारे आपण केलेल्या पत्रव्यवहाराची नोंद राहते. अनेकदा आपल्याला ई-मेलद्वारे मिळालेले डॉक्युमेंटस किंवा इतर फाइल्स डिलीट होतात, अशा परिस्थितीत इमेल मधून आपण त्या फाइल्स पुन्हा रिकव्हर करू शकतो, जोपर्यंत आपण ई-मेल डिलीट करत नाही, तोपर्यंत त्या फाइल आपल्यासाठी उपलब्ध असतात.

संवाद साधण्याचे मोबाईल हे मुख्य साधन मानले जाते, परंतु मोबाईलवर संभाषणाद्वारे माहितीचे स्पष्टीकरण देणे, थोडे वेळ घेणे कठीण असते. अशात आपण एका ई-मेलद्वारे समोरील व्यक्तीला अगदी सेकंदातच अनेक गोष्टींचे स्पष्टीकरण देऊ शकतो. ई-मेलचे अनेक फायदे आहेत, ते वापरणे खूप सोपे आहे, ई-मेल द्वारे कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला कोणताही संदेश पाठवू शकतो, रिसीव्हर कुठेही असो. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून ई-मेल हे कागदाची बचत करणारे आहे.


### ३.३.२.५ ई-मेलच्या मर्यादा आणि तोटे-

ई-मेलच्या फायद्या बरोबर अनेक तोटे होण्याची शक्यता देखील आहे. ई-मेल वापरण्यासाठी तुम्हाला संगणकाचे सामान्य ज्ञान असणे आवश्यक आहे. ई-मेल पाठविण्यासाठी किंवा प्राप्त करण्यासाठी, आपल्या संगणकावर किंवा मोबाईल फोनमध्ये डेटा पॅक किंवा इंटरनेट असणे आवश्यक आहे, तसेच प्रेषक आणि प्राप्तकर्ता दोघांचा ई-मेल पत्ता असणे आवश्यक आहे. जर तुमच्या ई-मेलचा पासवर्ड दुसऱ्या कोणाला कळला तर तो त्याचा गैरवापर करू शकतो. काही वेळा ज्यांना आपण ओळखत नाही अशा लोकांचे अनावश्यक ई-मेल तांत्रिक भाषेत स्पॅम मेल येतात. ई-मेलद्वारे आपण विविध प्रकारच्या फाईल्स पाठवू शकतो. जास्त मोठ्या आकाराच्या फाइल्स ई-मेलद्वारे पाठवू शकत नाही. ई-मेल पाठवण्यासाठी, ज्याप्रमाणे इंटरनेटची गरज असते, अगदी त्याचप्रमाणे ई-मेल रिसिव्ह करण्यासाठी देखील इंटरनेटची गरज असते. आपण जरी ई-मेल पाठवला, तरी जोपर्यंत समोरील व्यक्तीकडे internet connection नसेल, तोपर्यंत समोरील व्यक्ती email रिसिव्ह करू शकत नाही. हल्ली अधिकतर cyber attack हे ई-मेल वरच अधिक होतात, असे एका रिपोर्टमधून निदर्शनास आले आहे. केवळ ई-मेल पत्ता असल्यास प्रत्येकाद्वारे ई-मेल पाठविला जाऊ शकतो. कधीकधी, अनधिकृत व्यक्ती आपल्याला मेल पाठवू शकते, जी आपली वैयक्तिक माहिती चोरण्याच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते.

### ३.३.२.६ ई-मेल खाते कसे तयार करावे

ई-मेल सेवा पुरविणाऱ्या अनेक कंपनी आहेत, ज्यातील Google, Yahoo आणि Outlook या काही प्रसिद्ध कंपन्या आहेत. या सर्व्हीस प्रोव्हायडर द्वारे अगदी मोफत ई-मेल आयडी तयार करता येतो. इंटरनेटवर ई-मेल खाते तयार करणे खूप सोपे आहे, Gmail.com साईट उघडा त्यानंतर तुम्ही Create Account वर क्लिक करा. आता तुमचे तपशील जसे की नाव, पासवर्ड इत्यादी भरा. त्यानंतर ई-मेल आयडी तयार करा. आता तुम्ही I Agree वर क्लिक करा आणि काही वेळात तुमचे Gmail खाते तयार होईल.

**आकृती-४**




वेबपेजच्या वरच्या बाजूला Create Account असे दिसून येईल त्याखाली आपल्याला माहिती भरायची आहे. ई-मेलच्या ठिकाणी तुमचे नाव आणि आडनाव लिहा. आपण जितके ई-मेल आयडी सोपी ठेवली तर सहज लक्षात राहील व प्रोफेशनल देखील दिसेल. साधारणतः १० ते १५ अक्षरांचा इ-मेल आयडीचा पासवर्ड असावा. ह्या पंधरा अक्षरांमध्ये इंग्रजीतील मोठी लिपी, छोटी लिपी, अंक, चिन्हे ह्यांचा समावेश असावा. दर दोन ते तीन महिन्यानंतर पासवर्ड बदलत राहावा, ज्यामुळे जरी तुमचा पासवर्ड कोणी चोरला तरी त्याचा फार काळ उपयोग होऊ शकणार नाही. पासवर्ड तयार केल्यावर Next वर क्लिक करा. तुम्हाला तुमची जन्मतारीख आणि तुम्ही कोणत्या देशाचे नागरिक आहात ते विचारले जाईल, इथे तुमची खरी माहिती भरा, कारण अनेक लोक खोटी माहिती भरतात, ज्यामुळे भविष्यात त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, त्यामुळे विचारलेली माहिती खरी भरत रहा. शेवटी Captcha भरून Done पर्यायावर क्लिक करा, ई-मेल अकाउंट अथवा ई-मेल आयडी तयार होईल.

### ३.३.२.७ ई-मेल चे उपयोग

१) दिवसा कोणत्याही वेळी आपल्याला अपेक्षित व्यक्तीशी संपर्क साधू शकतो आणि ती व्यक्ती तो मेल वाचू शकतो आणि त्याच्या सोयीनुसार प्रतिसाद देऊ शकतो. हे एखाद्याचा वेळ वाचविणे व अनावश्यक संप्रेषण टाळण्यासाठी ई-मेल करता येईल .

२) जगात कोठेही लोकांशी संपर्क साधण्याची पारंपरिक पद्धत महाग असायची. एका क्लिकवर, ज्यांना मेल पत्ता आहे अशा कोणालाही मेल पाठविला जाऊ शकतो, सिस्टम इंटरनेटशी कनेक्ट असेल तर वेगात हे कोणत्याही किंमतीशिवाय केले जाईल.

३) ई-मेल बऱ्याच कारणांसाठी वापरल्या जाऊ शकतो हे त्या वापरणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असते. संप्रेषणाचे एक साधन म्हणून ई मेल वापरले जाऊ शकते, अद्ययावत माहिती देणे, कार्यसंघास मार्गदर्शन करण्यासाठी मार्गदर्शक सूचना, सहलीसाठी मार्ग नकाशा, साफसफाईसाठी किंवा रुग्णालयात दाखल करण्याच्या सूचनांचे अनुसरण करणे आणि वापरकर्त्यास संबंधित माहिती तत्काळ मिळते.

४) शैक्षणिक क्षेत्रामध्ये प्रवेशासाठी अर्ज, परिणाम आणि नोकरीच्या ऑफर प्राप्त करण्यासाठी ई-मेल पाठविले जाऊ शकतात. सुलभ माहितीसाठी ई-मेल खूप मदत करते.

## समारोप

इलेक्ट्रॉनिक मेल याचे संक्षिप्त रूप ई-मेल. पत्र पाठविण्याची ई-मेल हे आधुनिक माध्यम आहे. ई-मेल एका प्रकारची अंकीय (Digital) संदेशांची देवाण-घेवाण आहे. ई-मेल प्रणाली संगणक वापरकर्त्यास साधा मजकूर, ग्राफिक्स, ऑडियो आणि ॲनिमेटेड प्रतिमा दुसऱ्या वापरकर्त्यास पाठविण्यास मदत करतात. घरापासून ते सरकारी कार्यालयात याचा वापर केला जातो. कार्यालये, न्यायालये, शाळा-महाविद्यालयातील ई-मेलवर माहिती पाठविण्याचा आणि प्राप्त करण्याचा हा सोपा मार्ग आहे. पत्र कागदावर लिहिले जाते आणि ई-मेल संगणकाचा वापर करून लिहिला जातो. ई-मेल संगणक नेटवर्कमध्ये प्रकाश गतीने प्रवास करतो आणि हजारो किलोमीटर दूर बसलेल्या कोणत्याही व्यक्तीस ताबडतोब इलेक्ट्रॉनिक संदेश मिळतो.

## ३.३.३ ब्लॉग लेखन

## प्रस्तावना

पूर्वी लिखाणाद्वारे व्यक्त व्हायचे झाल्यास एखादे पुस्तक लिहावे लागायचे किंवा मासिक, वृत्तपत्र अशा माध्यमांचा आधार घ्यावा लागायचा. पण आता काळ बदलला आहे. इंटरनेटसारखे दमदार माध्यम हाती आल्यापासून व्यक्त होणे हे सर्वांनाच अगदी सहजशक्य झाले आहे. आपल्या मनातील भावना मांडण्यासाठी आज अनेकजण सोशल नेटवर्कचा वापर करतात. त्यासाठी व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटर, इत्यादी माध्यमे उपयोगात आणली जातात. पण अशा माध्यमातून पुढे आलेल्या साहित्यास फारसे गांभिर्याने घेतले जात नाही. शिवाय आपले विचारही कौलाघात मागे पडतात, हरवून जातात. त्यामुळे जे मनःपूर्वक

आपले विचार मांडतात, अशा सर्व लोकांनी 'अनुदिनी' म्हणजेच 'ब्लॉग' हे माध्यम वापरणे आवश्यक आहे. २१व्या शतकात माध्यमांचे स्वरूप पूर्णत: बदलून गेले. २०१० सालापर्यंत मराठीतील वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांना समांतर असा स्वतंत्र मीडिया ब्लॉगच्या रूपाने उभा राहिला. मराठीत शेकडो ब्लॉग लिहिले जातात. मेन स्ट्रीम मीडियापेक्षाही जास्त वाचकवर्ग ब्लॉगला आहे. मराठीतील अनेक नामांकित साहित्यिक संशोधक ब्लॉग लिहितात. इंटरनेटवर मराठी भाषेत लिखाण करणे शक्य झाल्यानंतर मराठी ब्लॉग दिसू लागलेले आहेत.

### ३.३.३.१ ब्लॉग लेखन म्हणजे काय?

ब्लॉग लेखन म्हणजे एखाद्या विषयावर सविस्तर माहिती लिहिणे, जेणेकरून यूजर तुमच्या ब्लॉगवर आकर्षित होईल. यामध्ये तुम्ही ज्या विषयावर माहिती लिहिणार आहे त्याचा परिचय, व्याख्या, टाइप्स, इतिहास, उपयोग, उद्दिष्ट इत्यादीविषयी माहिती देणे. ब्लॉग ला (Blog) मराठीमध्ये 'अनुदिनी' असे म्हणतात. ब्लॉग (Blog) हा शब्द दोन इंग्रजी शब्दांपासून तयार झालेला आहे. पहिला शब्द म्हणजे वेब (आंतरजाल) आणि दुसरा शब्द आहे लॉग (नोंद). ब्लॉग हे एका प्रकारचे संकेतस्थळ (Web Site) किंवा संकेतस्थळाचा भाग असते. ब्लॉग वरील पोस्ट लिहिण्याच्या क्रियेला 'ब्लॉगिंग' असे म्हणतात. ब्लॉगर ब्लॉग पोस्ट लिहिणाऱ्या व्यक्तीला 'ब्लॉगर' म्हणतात. Blogger या प्लॅटफॉर्म वर अगदी मोफत ब्लॉग सुरु करता येतो. या आधी Blogger हे स्वायत्त platform होते, त्यानंतर ते गुगलने विकत घेतले. आता Blogger चा पर्याय गुगलच्या टूल्स मध्ये येतो. यात आपल्या वैयक्तिक (personal blog) नावाने अथवा एका विशिष्ट नावाने blog सुरू करू शकता. Blogger मध्ये आपले अकांउंट बनवताना उपलब्ध नाव तपासू शकता. उदाहरणार्थ आपल्याला xyzअसे नाव हवे आहे, याची उपलब्धतता असेल तर आपला blog url हा पुढील प्रमाणे असेल "xyz.blogspot.com ब्लॉग चा उपयोग हा विविध प्रकारे केला जाऊ शकतो. ब्लॉग हे संवाद आणि ज्ञान प्रसार करण्यासाठी एक चांगले माध्यम आहे. ब्लॉग च्या माध्यमातून आपण एकमेकांशी चर्चा करू शकतो किंवा कोणत्याही ब्लॉगचे सभासद होऊन तिथे स्वतःचे विचार मांडू शकतो. बरेच ब्लॉग हे बातम्यांच्या प्रसारासाठी किंवा समाजोपयोगासाठी बनविण्यात आलेले आहेत. ब्लॉग्ज हे जरी सामान्यतः लिखाणासाठी बनवलेले असले, तरीही बऱ्याच ब्लॉग्जचा केंद्रबिंदू हा कला, चित्र, चित्रफिती, संगीत आणि आवाज असतो. ब्लॉगचा वापर हा वैयक्तिक डायरीप्रमाणे करता येतो. दोन ब्लॉग मधील संपर्क विजेट्स द्वारे शक्य होतो. एखाद्या मासिकाप्रमाणे ब्लॉगवरील नोंदी बहुतेक वेळा उलट्या कालक्रमानुसार टाकलेल्या असतात. म्हणजे सर्वात ताजी पोस्ट सर्वात आधी दिसेल. ब्लॉग (Blog) स्वतःचे विचार, एखाद्या कार्यक्रमाची माहिती, रेखाचित्र व चित्रफिती वगैरे गोष्टी इंटरनेटच्या (Internet) आधारे सगळ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी बनवतात. ब्लॉग लेखन हे कोणत्याही विषयावर असू शकते. यामध्ये तुम्ही मनोरंजन, मुव्हीज, इव्हेंटविषयी, हेल्थविषयी, टेक्नॉलॉजी, डिजिटल मार्केटिंग, एफिलिएट मार्केटिंग, एज्युकेशन, सायन्स, न्यूज, इत्यादी विषयी माहिती लिहू शकता.

'ब्लॉग' हे एक असे माध्यम आहे, जिथे आपण स्वतःस व्यक्त करतो किंवा व्यक्त होतो. ब्लॉगला मराठीमध्ये अनुदिनी, जालपत्रिका किंवा जालनिशी असे म्हटले जाते. ब्लॉगची आणखी एक प्रमुख ओळख म्हणजे यावर तारखांच्या अनुषंगाने लेख लिहिलेले असतात.

आपण नेहमी जी ‘डायरी वापरतो, त्यात जशा तारखा असतात आणि त्यानुसार त्या डायरीत आपण जसे लिहितो, आपले विचार व्यक्त करतो, अगदी तसेच ब्लॉगच्या संदर्भातही म्हणता येईल. यात फरक इतकाच की, डायरीमध्ये माहिती ही कागदाच्या, पानांच्या स्वरुपात साठवली जाते, तर ब्लॉग संदर्भात ही माहिती आभासी स्वरुपात साठवली जाते. डायरी आणि वही यामध्ये ढोबळमानाने जसा फरक करता येईल, काहीसा तसाच फरक आपणास ब्लॉग आणि वेबसाईट संदर्भात करता येईल. यामध्ये एक अस्पष्ट सीमारेषा असून, डायरीच्या तारखा खोडून ती वहीसम वापरता येते. किंवा वहीवर तारखा घालून ती डायरीसारखी वापरता येते. पण आपण त्यांच्या स्वरुपामध्ये केलेला हा वरकरणी बदल असून शेवटी डायरी ती डायरी आणि वही ती वही! अगदी असंच ब्लॉग आणि वेबसाईट संदर्भातही म्हणता येईल.

ब्लॉगचे आणखी एक वेगळेपण असे की, आपली डायरी एकावेळी एकच जण वाचू शकतो, पण इंटरनेटच्या साहाय्याने आपला ब्लॉग हा एकाच वेळी कितीही जण वाचू शकतात, शिवाय त्यास स्थळाचेही बंधन नाही. म्हणजेच आपला ब्लॉग अमेरिका, ऑस्ट्रेलिया, युरोप, आफ्रिका इ. अशा सर्व ठिकाणचे लोक एकाचवेळी वाचू शकतात. लेखाच्या प्रकाशनानंतर त्यास काळाचेही बंधन उरत नसून २४ तासात कधीही, कोणीही, कुठूनही इंटरनेट-संगणकाच्या साहाय्याने आपला ब्लॉग आणि त्यावरील लेख वाचू शकतो. अर्थात हे सर्व नियंत्रित करण्याची सुविधा आपणास देण्यात येते.

आपल्या ब्लॉगवरील लेख वाचून झाल्यानंतर वाचकाच्या मनात त्यासंदर्भात काही विचार निर्माण होणं स्वाभाविक आहे. आपले हे विचार तो ब्लॉग लेखकापर्यंत कॉमेंटच्या माध्यमातून, प्रतिक्रियेच्या माध्यमातून पोहचवू शकतो. या माध्यमातून ब्लॉग लेखकाचे विचार आणि वाचकांचे विचार यांमध्ये एक सुसंवाद निर्माण होतो आणि त्यातून भविष्यकालीन सामाजिक वाटचालीचा मध्यममार्ग निघू लागतो. प्रतिक्रियांवर नियंत्रण ठेवण्याची सुविधाही ब्लॉगकर्त्यास देण्यात आलेली असते. आपल्या संमतीशिवाय कोणीही प्रतिक्रिया देऊ शकत नाही किंवा आपला ब्लॉग वाचू शकत नाही. समाजाला वैचारिक दिशा देण्याचं काम लेखक करत असतात. आणि ‘ब्लॉग हे त्यासाठीचं आजच्या युगातलं एक दमदार माध्यम आहे. ब्लॉग हे एक व्यक्ती किवा व्यक्तींचा समूह मिळून चालवत असतो, ही व्यक्ती किंवा  समूह आपल्यापरीने विविध विषयावर माहिती पुरवण्याचे काम करत असतात. आज जवळ जवळ ५७० मिलियन ब्लॉग इंटरनेटवर उपलब्ध आहेत. तसेच ब्लॉगमध्ये आपल्याला ब्लॉगच्या शेवटी comment सेक्शन असतो जीथे यूजर आपली प्रक्रिया नोंद करतो. ब्लॉग म्हणजे साध्या सोप्या भाषेत “लेख”. एखाद्या विषयावर सविस्तर आणि मुद्देसूद मांडणी केलेला लेख म्हणजेच ‘ब्लॉग’ होय.

### ३.३.३.२ ब्लॉगचा इतिहास

ब्लॉग हा आपल्याला हवे ते इतरांना सांगण्यासाठी बनलेला इंटरनेटवरील एक प्रकार. ब्लॉग हा ब्लॉगर या वेबसाइटवर बनविता येतो. ब्लॉग हा थोडक्यात नोंदवहीप्रमाणे काम करतो. आपण आपल्याला हवे ते आणि हवे तितके लिहू शकता. आपण आपल्या ब्लॉगवर कविता, गोष्टी, बातम्या, कथा, विनोद, स्वतःबद्दलची माहिती, चित्र, व्हिडिओ इ. प्रसिद्ध करू शकता. आपण आपल्या ब्लॉगवर टाकलेले सर्व साहित्य ब्लॉगवर एखाद्या वेबसाइटप्रमाणे

सर्वांसाठी दिसू लागते. ब्लॉगमध्ये त्याचे डिझाईन म्हणजेच-टेम्प्लेट- बदलण्याची देखील सोय असते. ज्याद्वारे आपण काही मिनिटांमध्येच ब्लॉगचा चेहरामोहरा बदलू शकता. ब्लॉगचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ब्लॉग ही गुगलची सेवा असल्याने आपण त्यावर गुगलच्या मोफत जाहिराती वापरून पैसे देखील कमवू शकतो. 'वेबलॉग' या शब्दाचे जनक जॉर्न बारजर हे आहेत. हा शब्द त्यांनी १७ डिसेंबर १९९७ साली बनवला. ह्या शब्दाचे संक्षिप्त रूप म्हणजेच ब्लॉग. ह्या शब्दासाठी मात्र पीटर मेर्होल्झ हे जबाबदार होते. मेर्होल्झ ह्यांनी हा शब्द पीटरमी.कॉम च्या साइडबारवर प्रदर्शित केला. त्यानंतर थोडक्या काळात ईव्हान विल्यम ह्यांनी पायरा लॅब्ज येथे ब्लॉग हा शब्द नाम व क्रियापद दोन्ही प्रकारे वापरला. ('टु ब्लॉग' म्हणजे एका वेबलॉगमध्ये बदल करणे अथवा एक ब्लॉग पोस्ट करणे) आणि ब्लॉगर हा शब्दही पायरा लॅब्जने एक ब्लॉगर प्रॉडक्ट म्हणून तयार केला. हे शब्द आता चांगलेच रूढ झाले आहेत. सुरुवातीला ब्लॉग हा शब्द प्रचलित नव्हता. 1994 मध्ये जुस्टिंग हॉल यांनी जगातला पहिला ब्लॉग Links.net हा बनिवला होता. जुस्टिंग हॉल हे Swarthmore कॉलेज जे स्टुडेंट होते. त्या वेळी ह्या ब्लॉगला ब्लॉग म्हणत नव्हते. पहिल्यांदा 1197 मध्ये जॉन बर्गर यांनी "Weblog" हा शब्द प्रचलित केला, जे रोबोट विजडमचे लेखक आहेत. आपण जो ब्लॉग हा शब्द वापरतो तो १९९९ मध्ये पीटर मेर्होल्झ द्वारे "Weblog" ह्या शब्दाला लहान करून "ब्लॉग" हे नाव देण्यात आले. त्यानंतर ह्या शब्दाला आधार बनवून प्यारा लब्स यांनी "Blogger.com" यांच्या द्वारे हे टूल बनवण्यात आले. सध्या "Blogger.com" हे गूगल जवळ आहे. व तेव्हापासून ब्लॉगिंग लिहिण्यास सुरुवात झाली. यामुळे ब्लॉग लिहिण्यासाठी आपल्याला प्रोग्रामिंगची गरज पडत नाही, हे सगळे काम "Blogger" करत आहे. अमित अग्रवाल यांना भारतातील पहिले ब्लॉगर मानले जाते ज्यांनी ब्लॉगिंगची सुरुवात केली.

### ३.३.३.३ ब्लॉगिंगचे प्रकार

२१ व्या शतकात माध्यमांचे स्वरूप पूर्णत: बदलून गेले. २०१० सालापर्यंत मराठीतील वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांना समांतर असा स्वतंत्र मीडिया ब्लॉगच्या रूपाने उभा राहिला. मराठीत शेकडो ब्लॉग लिहिले जातात. मेन स्ट्रीम मीडियापेक्षाही जास्त वाचकवर्ग ब्लॉगला आहे. मराठीतील अनेक नामांकित साहित्यिक संशोधक ब्लॉग लिहितात. मनोरंजन ब्लॉग, मुव्हीज ब्लॉग, फूड ब्लॉग, हेल्थ ब्लॉग्स, एज्युकेशन ब्लॉग, टेक्नॉलॉजी ब्लॉग, ट्रॅव्हल ब्लॉग, सायन्स ब्लॉग, फॅशन ब्लॉग, न्यूज ब्लॉग, गव्हर्मेंट जॉब्स ब्लॉग्स. इंटरनेटवर मराठी भाषेत लिखाण करणे शक्य झाल्यानंतर मराठी ब्लॉग दिसू लागले आहेत. ब्लॉगचे प्रकार सांगणे खूप कठीण आहे कारण कोणत्याही उद्देशाने ब्लॉग बनवला जाऊ शकतो. पण त्याचा वापरकर्ता व वापराचे कारण यावरून आपल्याला पुढील प्रकार दिसतात.

### १) पर्सनल ब्लॉग- वैयक्तिक ब्लॉग

पर्सनल ब्लॉगमध्ये ब्लॉगर हा आपल्याविषयी किंवा व्यक्तीविषयी माहिती देण्याचा प्रयत्न करत असतो. यामध्ये ब्लॉगर हे आपल्याविषयी माहिती लिहीत असतात. त्यामध्ये ते त्यांचे रोजचे जीवन, त्यांच्या आवडी-निवडी, त्यांच्या आयुष्यातील एखादा प्रसंग इत्यादी. ही सगळी माहिती लिहून लोकांना आकर्षित करत असतात.

**२) पर्सनल ब्रॅंड ब्लॉग- सहयोगी ब्लॉग**

ब्लॉग मधून ब्रॅंड तयार करण्यासाठी कोचिंग, मार्गदर्शन, वैयक्तिक, विकास, अध्यात्म इत्यादी माध्यमातून विशिष्ट लोकांना आकर्षित करता येते. हे सगळे ब्लॉग स्वत:ची लिखित माहिती किंवा जाहिरातींमधून पैसे कमवत असतात.

**३) कॉर्पोरेट ब्लॉग**

हे ब्लॉग कंपनी आपल्या बिजनेसचे प्रॉडक्ट विकण्यासाठी ब्लॉग बनवत असते. या ब्लॉगचा मुख्य उद्देश प्रॉडक्ट प्रोमोट करणे आणि आपल्या प्रॉडक्टची विक्री वाढवणे हा आहे. कॉर्पोरेट ब्लॉगला बिजनेस ब्लॉगही म्हटले जाते.

**४) नीची ब्लॉग**

या प्रकारचे ब्लॉग कोणत्याही एका विषयावर लिहिण्याविषयी असतात. ब्लॉगर कोणताही एक टॉपिक निवडून त्यावर माहिती प्रसारित करत असतो. म्हणजेच कोणत्याही एका विषयावर माहिती देणे याला आपण 'नीची ब्लॉग' असे म्हणू शकतो.

**५) एफिलिएट मार्केटिंग ब्लॉग**

एफिलिएट मार्केटिंग म्हणजे दुसऱ्या कंपनीचे प्रॉडक्टची माहिती ब्लॉग द्वारे लोकांना देणे व लोकांनी तो प्रॉडक्ट ब्लॉगरने दिलेल्या लिंकद्वारे विकत घेतल्यास कंपनीचे कमिशन मिळवणे. ब्लॉगर आपल्या ब्लॉगमध्ये प्रॉडक्टची मार्केटिंग करत असतो. यामध्ये यूजर दिल्या गेलेल्या लिंक आधारे प्रॉडक्ट विकत घेतो व ब्लॉगरला त्या बदल्यात कमिशन मिळते. अशाप्रकारे ब्लॉगर एफिलिएट मार्केटिंग करून लाखो रुपये कमवत आहेत. एफिलिएट मार्केटिंग ब्लॉग पर्सनल किंवा ग्रुप ब्लॉगिंग असू शकतात.

**६) मायक्रो ब्लॉग**

या प्रकारच्या वेबसाइटमध्ये माहिती थोडक्यात दिलेली असते. मायक्रो ब्लॉगिंग साइटला सोशल मीडिया पण म्हटले जाते. सोशल मीडियावर पब्लिश केलेली ब्लॉग पोस्ट मायक्रो ब्लॉग म्हटले जाते.

**७) इवेंट ब्लॉग**

कोणत्याही खास इवेंट वर बनवलेल्या ब्लॉगला इवेंट ब्लॉग म्हटले जाते. काही ब्लॉगर होळी, दिवाळी, गुढीपाडवा इत्यादी सनाविषयी माहिती आपल्या ब्लॉगमध्ये पब्लिश करत असतात.

**८) मीडिया ब्लॉग**

या प्रकारच्या ब्लॉगमध्ये मीडिया फाइल पब्लिश केली जाते. यामध्ये व्लोग/ब्लॉग मुख्य आहे ज्यामधे विडियो पोस्ट केल्या जातात. इमेज ब्लॉगिंग पण असते त्यामध्ये फोटो पब्लिश केले जातात.

### ९) गेस्ट ब्लॉग्स

काही ब्लॉगर दुसऱ्याच्या वेबसाइट मध्ये माहिती लिहीत असतात. लोकांना अधिक आकर्षित करण्यासाठी या प्रकारची ब्लॉगिंग केली जाते.

### ३.३.३.४ ब्लॉग कसा लिहितात?

लिखाणातून व्यक्त होण्यासाठी ब्लॉग हे प्रभावी माध्यम आहे. लेखक होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या प्रत्येकासाठी ब्लॉग ही छान सुरुवात होऊ शकते. ब्लॉगिंगमधून लिखाणाची आवड जपता येते तसेच स्वतःच्या व्यवसायाचे मार्केटिंगही करता येते. त्यामुळे त्याकडे करिअरच्या दृष्टिकोनातूनही बघता येते. कोणत्याही विषयावर ब्लॉगमधून व्यक्त होऊ शकता. लेखन, फोटो, व्हिडिओ अशा कोणत्याही माध्यमातून ब्लॉगची सुरुवात करता येते. ब्लॉग लिखित स्वरूपात असेल, तर त्याबरोबर एखादा विषयानुरूप फोटो किंवा व्हिडिओ जोडल्यास ब्लॉग अधिक उठावदार होतो. बहुतेकांच्या ब्लॉगला केवळ देशातीलच नव्हे, तर इतर देशांतील अनेक लोक वाचतात. त्यामुळे ब्लॉगच्या माध्यमातून 'ग्लोबल सिटिझन'ही होता येतं.

कोणत्याही विषयावर ब्लॉग लिहिण्याची सुरुवात करत असताना तुम्हाला पहिल्यांदा त्या विषयाचा परिचय (Introduction) द्यावे लागते. की तुम्ही ज्या विषयावर लेख लिहीत आहात, त्या टॉपिक वर तुम्ही कोणते उप-विषय पूर्ण करणार आहात. जो विषय तुम्ही निवडला आहे त्याची व्याख्या, त्याचा अर्थ यूजरला पटवून द्यावा लागेल. तुम्हाला त्या विषयाचा ईतिहास, त्याचे प्रकार, त्याचे फायदे, इत्यादी विषयी माहिती द्यावी लागेल. शेवटी तुम्हाला या विषयामध्ये आपण काय बघीतले हे लिहावे लागेल. गुगलची 'blogger.com'ही साइट तुम्हाला फुकट ब्लॉग लिहिण्याची संधी उपलब्ध करून देते. आपण कुठल्याही विषयावरती ब्लॉग लिहू शकतो. त्यासाठी कुठल्या प्रशिक्षणाची गरज नाही. अगदीच सुरुवात असेल तर तुम्हाला ज्ञात असलेल्या विषयाबद्दल लिहू शकता. जेणेकरून तुम्हाला थोडा सराव होईल आणि त्यानंतर इतर विषयांमध्ये जाऊ शकता. काही महत्त्वाचे मुद्दे आहेत जे ब्लॉग लिहिताना लक्षात घ्यावयाचे असतात.

कुठलाही लेख हा त्याच्या शीर्षकामुळे वाचकाला वाचावासा वाटतो, शीर्षक प्रभावी नसेल तर ब्लॉगला जास्त प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे ठळक आणि वैशिष्ट्यपूर्ण असे शीर्षक महत्त्वाचे ठरते. ब्लॉगचा विषय आणि शीर्षक याचा जास्तीत जास्त संबंध असातो, कारण वाचक आधी शीर्षक आणि विषय कुठला ते पाहतो आणि नंतर ब्लॉगकडे आकर्षित होतो. ब्लॉगला मिळणाऱ्या लोकांच्या प्रतिक्रियांकडे सकारात्मकतेने बघितले पाहिजे. वाचक ब्लॉगवर त्यांची मतं व्यक्त करत असतात. तसा तो त्यांचा हक्क आहे. त्यांच्या प्रतिक्रिया नकारात्मक असल्या, तरी त्यांच्या मतांचा आदर ठेवलाच पाहिजे. नकारात्मक प्रतिक्रियांकडे दुर्लक्ष करून तुमचं लिखाण सुरू ठेवायला हवे.

### ३.३.३.५ ब्लॉग लिहिण्याच्या पायऱ्या

१) www.blogger.com या वेबसाइटला भेट देऊन 'जी-मेल'ने लॉग इन करावे.

२) लॉग इन झाल्यावर तिथे डॅशबोर्ड (Dashboard) दिसेल. त्यावर तुमचे किती ब्लॉग्स आहेत, किती लोकांनी त्याला भेटी दिल्या आदी माहिती दिसेल.

३) नवीन ब्लॉग तयार करण्याकरिता 'New Blog'वर क्लिक करा. त्यानंतर स्क्रिनवर 'Title' आणि 'Address' यांची विचारणा होईल.

४) त्यानंतर 'Title' म्हणजे तुमच्या ब्लॉगचे नाव दिसेल.

५) 'Address' म्हणजे तुमच्या ब्लॉगचा internets address जसा उदा: balasahebsutar2018.blogspot.com जो स्थिर राहील. तुम्हाला तो बदलता येणार नाही. तसेच Theme ही तुमच्या ब्लॉगच्या विषयावरून निवडता येईल.

६) या तयार ब्लॉगवर नवीन लेख लिहिण्यासाठी 'New Post'वर क्लिक करा. त्यानंतर एक नवीन पेज उघडेल. तेथे तुम्ही तुमचा 'blog' लिहू शकाल.

७) या पेजवर पहिल्या भागात 'Post Title' दिसेल जे तुमच्या 'blog'चे अर्थातच लेखाचे नाव असणार आहे. दुसऱ्या भागात 'blog formatting' चे 'Tools' दिसेल. जिथे तुम्हाला 'typing' करून तुमचा 'blog' लिहिता येईल.

८) ब्लॉग लिहीत असतांना लिखाण पूर्ण झालेले नसेल, तर 'Save'वर क्लिक करून ते सुरक्षित ठेवता येईल. एखादा विषयानुरूप फोटो जोडल्यास ब्लॉग अधिक उठावदार होतो. तो फोटो तुम्हाला येथे जोडता येतो.

९) तसेच ब्लॉग पब्लिश करण्यापूर्वी तो वाचकांना कसा दिसेल, हे पडताळून बघण्यासाठी 'Preview'वर क्लिक करा आणि 'blog' पूर्ण लिहून झाल्यावर 'Publish' या बटणवर क्लिक करून प्रसिद्ध करा.

आधुनिक तंत्रज्ञानाने उपलब्ध केलेले ब्लॉगलेखन हे प्रतिभेच्या प्रवाहाला गती देणारे एक अनमोल वरदान असून ब्लॉगद्वारे प्रत्येकाला आता सृजनशील साहित्य निर्मिती करणे सहज शक्य आहे. अचूक शब्दांमध्ये ब्लॉगची मांडणी, रेखाचित्रे आणि रंगसंगतीद्वारे सुशोभीकरण, ब्लॉगचे शीर्षक, उपशीर्षक आणि की-वर्डसचा योग्य वापर ही तंत्रे वापरुन ब्लॉगलेखक आपला ठसा उमटवताना दिसत आहेत. ब्लॉगलेखन हाताळायला सोपे आणि सहज शिकता येण्यासारखे तंत्र आहे. आपले लेखन ब्लॉगच्या माध्यमातून लाखो लोकांपर्यंत पोहोचविणे आणि वाचकांच्या प्रतिक्रिया तात्काळ आजमावता येणे हे ब्लॉगलेखनाचे अनोखे वैशिष्ट्य आहे. "जे जे आपणासी ठावे । त्यावरी ब्लॉगलेखन करावे। शहाणे करून सोडावे। सकल जन" ॥ या न्यायाने लेखक आणि वाचक यातील अंतर ब्लॉगलेखनाने मिटवून टाकले आहे.

सध्या जगात २ कोटी आणि भारतात ४० लाख लोक ब्लॉगलेखन करताना आढळतात. तर ५ लाखाहून अधिक मराठी लेखकच नव्हे तर कवी, कथा-कादंबरी लेखक, वैचारिक-ललित लेखक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, चित्रकार, व्यंगचित्रकार, स्तंभलेखक, पत्रकार, विशेष विषयातले तज्ज्ञ पत्रकार, वार्ताहर, विद्यार्थी, कीर्तनकार, प्रवचनकार, समाजसेवक, इतिहास, संस्कृती आणि परंपरा तज्ज्ञ, तंत्रज्ञ, शेतकरी, फोटोग्राफर, गायक, कलाकार,

राजकीय व्यक्ती, कार्यकर्ते, गृहिणी, पाककला तज्ज्ञ, अशा अगदी प्रत्येक व्यक्ती ब्लॉगलेखन करताना दिसून येतात. एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक असे कितीही ब्लॉग्ज बनवू शकतो. एख़ाद्या व्यक्तीस एकापेक्षा जास्त गोष्टीत रस आणि अभ्यास असेल तर त्याने प्रत्येक विषयाचे वेगळे ब्लॉग काढणे योग्य ठरते. अनेक पत्रकारही ब्लॉग लिहितात. सचिन परब , सूर्यकांत पळसकर ही काही पत्रकार मंडळी ब्लॉग लिहितात. बहुतांश मराठी ब्लॉगर स्वतःच्या नावानेच ब्लॉग लिहितात. काहींनी आपल्या ब्लॉगला स्वतंत्र नावे दिली आहेत. नेहमी, भुंगा, एक अनामिक, बेधुंद, भटकंती तर मिसळपाव, सह्याद्री बाणा, मनोरंजन, चपराक, सुवर्णमयी, सर्वव्यापी, छोटा डॉन, आनंदयात्री, अवांतर सारख्या संस्थामुळे नव्या दमाची वेगवेगळ्या क्षेत्रातून आलेल्या लेखकांची एक नवी पीढी तयार होत आहे.

### समारोप

माध्यमांबरोबरच ब्लॉगवर लिहित्या होणाऱ्याची संख्या वाढते आहे. कुठेतरी व्यक्त व्हावसं वाटणं, लिखाणाची आवड असणं, आपण लिहिलेलं इतरांकडून कौतूक केलं जातंय, सध्या ट्रेण्ड आहे म्हणून किंवा गरज म्हणून, सुरूवात केलेल्या लिखाणाची नंतर सवयच जडते. लिहावंसं वाटत म्हणून किंवा विचारांचे काहूर माजले की, ते कुठेतरी शेअर करावेसे वाटतात. या निकडीतून ब्लॉग लिहिले जातात. एकंदरित आपली सृजनता, लिखाणाची हौस व खरोखर मनापासून वाटणारे मोकळेपणाने व्यक्त करण्याची जागा म्हणून ब्लॉग मोठ्या प्रमाणात लिहिले जात आहेत. प्रत्येक सृजनाचे एक आत्मिक समाधानाबरोबर त्याची कोणी नोंद घेणे हा सुद्धा हेतू असल्याने ब्लॉग लिहिणारे फक्त मन मोकळे करण्यासाठीच लिहीत नसून त्यावर ओळखीच्या आणि अनोळखी चार लोकांची मते अवलोकण्यासाठीही लिहिताना दिसतात. आपल्या भावना अनुभव वाटण्यासाठी आपल्या "मानसिक पातळीच्या" बरोबर असणाऱ्या व्यक्तीसोबत शेअर केले पाहिजेत आणि जर हे सर्व मनात कुढत राहिले तर एक दिवस मानसिक संतूलन ढासळून जगाच्या लेखी आपण वेडे ठरण्याची शक्यता असते. म्हणून “ब्लॉग लिहिणे” हा सोईस्कर मार्ग होय. कुणी वाचून प्रतिसाद दिला तर आपल्याला जे वाटते ते काही अनाठायी नाही, याचे समाधान मिळते व नाही कुणी वाचले तर कमीत-कमी मनातील बोच तरी निघते. एकटेपणावर या माहितीजाळ्यासारखे सोपे, स्वस्त आणि फारसा इजा न करणारे साधन नाही. पुस्तकासारखाच एक चांगला मार्गदर्शक म्हणून व माणसे जोडण्याचे एक चांगले माध्यम म्हणून ब्लॉगकडे बघता येईल.

## ३.३.४ विकिपीडिया नोंद लेखन

### प्रस्तावना

आंतरजालावरील विकिपीडिया हा एक मुक्त ज्ञानकोश आहे. इंग्रजी भाषेतील हा सर्वात मोठा माहितीसाठा आहे. जिमी वेल्स आणि लॅरी सँगर यांनी १५ जानेवारी २००१ रोजी विकिपीडियाची सुरुवात केली. यामध्ये अनेक भाषांतील एखाद्या विषयाची माहिती शोधण्याची सुविधा देण्यात आली आहे. मात्र या आंतरजालावर मराठी भाषेतील नोंदी अत्यल्प आहेत. विकिपीडियावर मराठी भाषेतून नोंदी घेण्यासाठी विकिपीडियाने स्वतःच

मोठा पुढाकार घेतला आहे. या नोंदी व्हाव्यात, या हेतूने वेगवेगळ्या संस्थांमध्ये, विविध शिक्षण संस्थांमध्ये कार्यशाळाही घेतल्या जात आहेत.

### ३.३.४.१ विकिपीडियाचे स्वरूप

आंतरजालावरील विकिपीडिया हा एक मुक्त ज्ञानकोश आहे. सर्वात मोठा हा माहितीसाठा आहे. या महाजालामध्ये कोणालाही,लेखन करता येते. तसेच लिहिलेल्या लेखांचे संपादनही करता येते. विकिमीडिया फाउंडेशन ना नफा, ना तोटा' तत्त्वावर चालणारी संस्था हे काम करत आहे. विकिपीडियाचा आज सर्वांनाच मोठा फायदा होत आहे. विकिपीडिया बहुभाषिक ऑनलाइन ज्ञानकोश असून तो इतिहासातील सर्वात मोठे आणि सर्वाधिक वाचले जाणारे संकेतस्थळ आहे. अलेक्साद्वारे १५ व्या क्रमांकावर असलेल्या सर्वात लोकप्रिय वेबसाइटपैकी एक आहे.

मराठी विकिपीडिया हा विकिपीडिया या मुक्त ऑनलाईन ज्ञानकोश प्रकल्पातील मराठी भाषेतला ज्ञानकोश आहे. मे १, इ. स. २००३ रोजी मराठी विकिपीडियाची सुरुवात झाली. विकिपीडिया ह्या संकेतस्थळांतर्गत जगातील विविध भाषांमध्ये हा ज्ञानकोश वापरण्याची आणि त्यात भर घालण्याची सोय उपलब्ध आहे. विकिपीडियाचे संकेतस्थळ विकी ही आज्ञावली (सॉफ्टवेअर) वापरून तयार केलेले आहे. विकी ह्या आज्ञावलीमुळे अनेक व्यक्ती एकत्रितरीत्या महाजालावर काम करू शकतात. या प्रकल्पात कोणत्याही जाहिराती नाहीत हे त्याचे वैशिष्ट्य होय. विकिपीडिया हा ज्ञानकोश सामूहिक सहकार्यातून निर्माण झाला आहे. महाजालावरील ह्या ज्ञानकोशसमूहातील कोणत्याही ज्ञानकोशात कोणत्याही व्यक्तीला उपलब्ध असलेल्या लेखाचे संपादन करता येते. उपलब्ध असलेल्या एखाद्या लेखात भर घालता येऊ शकते, त्यातील मजकूर सुधारता येऊ शकतो. जर एखाद्या विषयावर लेख उपलब्ध नसेल तर नव्याने लेख लिहिताही येतो. विकिपीडियातील मजकूर हा मुक्त स्वरूपात उपलब्ध आहे. योग्य श्रेयनिर्देश करून हा मजकूर कुणालाही कोणत्याही कारणासाठी आहे तसा अथवा त्यात बदल करून वापरण्यास मोकळीक आहे.

विकिमीडिया फाउंडेशन ही संस्था या ज्ञानकोशाच्या व्यवस्थेचे आणि नियंत्रणाचे काम पाहत आहे. आजघडीला जगातील विविध भाषांत ह्या ज्ञानकोशाच्या शाखा उपलब्ध आहेत. मराठी विकिपीडियावर सध्या ८४,८६९ लेख आहेत. तर संपूर्ण विकिपीडिया प्रकल्पांतर्गत, जगातील विविध भाषांत मिळून, आजतागायत एकूण तीन कोटींहून अधिक लेख लिहिले गेले आहेत. विकिपीडियाची वैगुण्ये गृहित धरूनसुद्धा मुक्त सार्वत्रिक उपलब्धतेमुळे, विविध विषयांच्या व्यापक परिघामुळे, सहज शक्य असलेल्या चर्चा आणि सतत सुधारणा ह्यांमुळे विकिपीडिया हा आज महाजालावरील सर्वाधिक वापरला जाणारा ज्ञानकोश आहे. मराठीतील विकिपीडिया इतर भाषांप्रमाणेच गुगल सारखी शोधयंत्र वापरून शोधता येतो.

### ३.३.४.२ विकिपीडियाचा इतिहास

जिमी वेल्स आणि लॅरी सँगर ह्यांनी विकिपीडियाची सुरुवात १५ जानेवारी २००१ ह्या दिवशी इंग्रजी भाषेत केली. सेन्जर यांनी त्याचे नाव "विकी” आणि “विश्वकोश” च्या मिश्रणाने बनविले. हे सुरुवातीला केवळ इंग्रजीमध्ये उपलब्ध होते. इतर भाषांमधील आवृत्त्या त्वरित

विकसित केल्या गेल्या. एकत्रित विकिपीडियाच्या आवृत्त्यांमध्ये ५६ दशलक्षांहून अधिक लेखांचा समावेश आहे. जे सरासरी सुमारे २ अब्ज अद्वितीय डिव्हाइस भेट देतात. दरमहा १७ दशलक्षाहून अधिक संपादने १.९ प्रति सेकंद दराने विकसित होत असतात. डोमेन विकीपीडिया.कॉम (wikipidia.com) आणि 'विकिपीडिया.ऑर्ग' (wikipidia.org) अनुक्रमे १२ जानेवारी, २००१ आणि १३ जानेवारी, २००१ ला  रजिस्टर झाले आणि १५ जानेवारी २००१ ला विकिपीडियाची सुरुवात झाली. www.wikipedia.com ही विकिपीडियाची वेबसाइट होय.

सुरूवातीला विकिपीडियासाठी तुलनेने काही नियम होते आणि विकिपीडिया स्वतंत्रपणे न्यूपेडियावर चालत असे. विकिपीडियाला नफ्यासाठी व्यवसाय बनवण्याचा सुरूवातीचा उद्देश होता. विकिपीडियाला न्युपेडिया, स्लॅशडॉट पोस्टिंग आणि वेब सर्च इंजिन इंडेक्सिंगमधून सहकार्य मिळाल्याने २००४ च्या अखेरीस एकूण १६१ सहभाषाच्या आवृत्त्या निर्माण झाल्या. २००३ मध्ये पूर्वीचे सर्व्हर कायमचे काढून टाकून न्यूपेडिया आणि विकिपीडिया एकत्र येऊन तो मजकूर विकिपीडियामध्ये समाविष्ट झाला. विकिपीडियाने ९ सप्टेंबर २००७ रोजी दोन दशलक्ष लेखांची नोंद केली आणि मिंग राजवंशाच्या काळात बनविलेले योंगले ज्ञानकोशापेक्षा विकिपीडिया हा सर्वात मोठा विश्वकोश ठरला आहे.

**विकिपिडियाचे प्रकल्प**

विकिपिडियाचे अनेक प्रकल्प आहेत. ते पुढीलप्रमाणे. १. आपल्याला जर भारताचा इतिहास जाणायचा असेल तर येथे सर्व उपलब्ध आहे. ही माहिती मराठीतही उपलब्ध आहे. २: **शब्दकोश** (Wiktionary) ह्या प्रकल्पात विविध भाषी मोफत शब्दकोश प्रत्येक भाषेत तयार करायचा आहे. याचा अर्थ एका भाषेचा उपयोग करून सर्व भाषेतील सर्व शब्दांची व्याख्या करणे या प्रकल्पाची सुरूवात १२ डिसेंबर २००२ ला झाली. आतापर्यंत यात १५० विविध भाषेत ३० लाख शब्द साठा आहे. ३. **अवतरणे** (Wikiquote) यात विविध प्रसिद्ध लोकांचे पुस्तकातील या चित्रपटातील अवतरणे घेतली आहे. यात म्हणी, वाक्यप्रचार, घोषणा इत्यादीचा समावेश आहे. याची सुरूवात जुलै २००३ मध्ये झाली. ४. **ग्रंथसंपदा** (Wikibooks) या प्रकल्पात मोफत ई-पुस्तके, विविध भाषा अभ्यासक्रम इत्यादीचा साठा तयार करणे, हाच मुख्य उद्देशः विद्यार्थ्यांना व शिक्षकांना स्व-सहायता व्हावी याकरीता येथे विविध पुस्तके मिळू शकतात. ५**. स्त्रोतपत्रे** (Wikisource) हा विविध भाषेतील प्रकल्प नोव्हेंबर २००३ ला मोफत व उपलब्ध असलेली कागदे जमा करण्यासाठी सुरू झाला. यामुळे आता महत्त्वाची अनेक कामे जसे की कोणत्याही देशाचे संविधान इत्यादी गोष्टी साठवून ठेवता येतात व त्याचे भाषांतर सुद्धा करता येते. यात आतापर्यंत ८८ लाख विविध कागदे जमा झाली आहेत. **६ विद्यापीठ** (Wikiversity) हा प्रकल्प माहिती, शिकणारे समूह सोबतच संशोधन करण्यासाठी वाहिलेले आहे. याची सुरूवात १५ ऑगस्ट २००६ ला झाली. हा फार महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. हा फक्त विश्वविद्यालयासंबंधीच नाही तर कोणत्याही पातळीवरील विद्यार्थ्यास मदत होईल, असा आहे. यात २०१० पर्यंत ३०,००० प्रवेश आहेत. **७. सामायिक भंडार** (Wikimedia commons) या प्रकल्पात मोफत छायाचित्रे, नकाशे, व्हिडिओज, ॲनिमेशन इत्यादीचा समावेश आहे. याची सुरूवात सप्टेंबर २००४ ला झाली. **८.प्रजातीकोश** (Wikispecies) याची सुरूवात १४ सप्टेंबरला झाली. या प्रकल्पात विविध सजीव प्राण्यांबद्दल माहिती

भेटते. ९.२००४ ला झाली. हा प्रकल्प खास करून वैज्ञानिक गोष्टींसाठी आहे. यात २०१० पर्यंत २४ लाख लेख आहेत, बातम्या (Wikinews) यात विविध बातम्या लिहिता येतात. याचे मुख्य काम म्हणजे बातमीची खात्री करणे व विश्वासार्हता तपासणे हे होय, १०. मीडिया विकि (Media wiki) हे एक सॉफ्टवेअर आहे, जे की सर्व Wikimedia समूह व इतर संकेतस्थळे वापरतात.

### ३.३.४.३ विकिपीडियाचे फायदे आणि तोटे

विकिपीडिया एक सर्च इंजिन आहे. संक्षिप्त, सुलभ मार्गाने माहिती शोधणे. विकिपीडियाशी जोडलेल्या दस्तऐवजाचे संदर्भ शोधणे, न ऐकलेल्या नवीन गोष्टी शिकणे, शोधणे आणि बरेच काही विकिपीडियावर सहज सापडते.

१. कोणीही विकिपीडिया लेख तयार, संपादित किंवा हटवू शकतो.

२. विकिपीडियाचे लेख हे प्रमाण मानले जातील असे नाही.

३. विकिपीडियातिल लेखातील माहितीमध्ये सतत बदल होत असतात. जेव्हा एखादा लेख प्रथम प्रकाशित होतो, त्यानंतर ती माहिती मागे - पुढे सरकत व दुरुस्त होत राहते.

४. कधीकधी वादग्रस्त लेखांची मनोरंजनासाठी किंवा फसवणूक करण्यासाठी त्या लेखांची तोडफोड केली जाते.

५. इच्छित प्रेक्षक बदलू शकतात - काही लेख अत्यंत तांत्रिक भाषेत लिहिलेले असतात, तर काही अधिक सामान्य प्रेक्षकांसाठी लिहिलेले असतात. कोणी काय शोधत आहे यावर अवलंबून हे निराशाजनक आणि मौल्यवान दोन्ही असू शकते.

विकिपीडिया जवळजवळ काहीही शोधण्यासाठी आश्चर्यकारक वेबपेज असून लोक त्यापासून समाधानी आहेत. विकिपीडिया हळू हळू विकसित होत आहे. आपल्या जीवनात आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी कोणत्याही अडचणीशिवाय तिथे समाविष्ट केल्या जात आहेत.

विकिपीडिया पूर्णपणे मुक्त आहे, इंटरनेट क्षमता असलेल्या कोणासही कोट्यावधी विषयांवरील माहिती देताना दिसते. विकिपीडिया सतत काही तासानंतर अपडेट होत असते. तुलनेत, काही ज्ञानकोश सामान्यतः दरवर्षी अपडेट केले जातात. विकिपीडिया हे आपले संशोधन सुरू करण्यासाठी आपल्याला आपल्या विषयाची पार्श्वभूमी माहिती आणि संभाव्य माहिती देऊन संशोधकाला अधिक सखोल संशोधन करण्यास मदत करत असते. पूर्वी विद्यार्थी आणि संशोधकांना एखाद्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी लायब्ररीतील अनेक पुस्तकांमधून ती माहिती पाहावी लागत असे. इंटरनेटमुळे आज एका क्लिकवर ही माहिती सहज प्राप्त होते. विकिपीडिया विकसित झालेनंतर लोकांना अनेक विषयांवर माहिती देण्यासाठी असंख्य वेबसाइट तयार झाल्या. यामध्ये प्रसिद्ध वेबसाइट विकिपीडिया ही आहे मोफत इंटरनेट विश्वकोश म्हणूनही विकिपीडियाला ओळखले जाते. विकिमीडिया

फाउंडेशनच्या देखरेखीखाली, लेखांची निर्मिती आणि विकास सुलभ करण्यासाठी विकिपीडिया ही वेबसाइट ओळखली जाते.

### ३.३.४.४ विकिपीडियावर नोंद लेखन

विकिपीडिया आज संकेतस्थळावरील सर्वात जास्त वापरला जाणारा ज्ञानकोश आहे. मराठीमध्ये अधिकाधिक नोंदी करून त्याला समृद्ध करणे आवश्यक आहे. विकिपीडियावर कोणीही नोंद करू शकते. विकिपीडियावर योग्य विषयाची विहित पद्धतीने योग्य विषयांची नोंद करणे आवश्यक असते. विकिपीडियावर नोंद करण्यासाठी प्रथम विकिपीडियाचे सदस्यत्व घ्यावे लागते. सदस्यत्व घेतल्यानंतर आपण आपला युजर आयडी आणि पासवर्ड वापरून लॉग-इन करावे लागते. त्यानंतर आपण नोंदी लिहू शकता. आपण मराठी विकिपीडियावर नवीन लेख लिहिणे, विकिपीडियावर असलेल्या लेखांमध्ये भर व संदर्भ देऊन लेखांना बळकटी देणे, प्रकल्पासंदर्भात असलेली चित्रे स्वत: काढून अथवा मिळवून विकिमीडिया कॉमन्स वर देऊन त्याची लिंक मुख्य लेखात देणे अशी कामे कोणीही करू शकतो.

याबरोबरच कोणीही  इतर भाषांमधील लेखांची लिंक, आपआपल्या भाषेतील लेखांची लिंक इतर भाषांमधील लेखात देणे, सर्व लेखांना योग्य लेखणपद्धती वापरुन त्यांना ससंदर्भ देणे, असलेल्या लेखातील अशुद्ध लेख दुरूस्ती करणे. इंग्रजी विकि मधील चांगले लेख मराठी विकिवर भाषांतरित करणे. माहिती आणि तंत्रज्ञानाची जोड देणे. मराठी विकिपीडिया प्रकल्प तयार करून त्या प्रकल्पाअंतर्गत नवीन लेख लिहिणे आणि असेलेले लेख परिपूर्ण करणे. वारंवार करावी लागणारी संपादने करणारी यंत्रणा अधिक अद्ययावत करणे आणि संघटनेला बळकटी आणणे. या गोष्टी आपण विकिपीडियावर करू शकतो. तसेच पूर्वीच्या नोंदी सुधारित करू शकतो. विकिपीडियावर नोंदी करताना शीर्षक मराठी भाषेतून व निःसंदिग्ध देणे आवश्यक आहे. येथे करावयाच्या नोंदी एकांगी नसाव्यात. त्यामध्ये वारंवार बदल करणे आणि अद्ययावत करणे आवश्यक असते. याठिकाणी नवीन विचार मांडू नयेत. आवश्यक असतील तेथे संदर्भ देण्यात यावेत. तसेच एखाद्या संस्थेचे, व्यक्तीचे उदात्तीकरण करण्यासाठी नसावे. अशा नोंदी व्यवस्थित असल्यास त्या नोंदी विकिपीडियाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येतात. विकिपीडिया हा सर्वात चांगला आणि परिपूर्ण माहितीचा कोश बनावा, यासाठी मराठी भाषिक लेखक, वाचकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

### ३.३.४.५ समारोप

विकिपीडिया हा एक मुक्त ज्ञानकोश आहे. विकी हे सॉफ्टवेअर वापरून हा ज्ञानकोश तयार केला आहे. विकिमिडिया फाऊंडेशन ही ना नफा-ना तोटा तत्त्वावर चालणारी संस्था ह्या ज्ञानकोशाच्या व्यवस्थेचे आणि नियंत्रणाचे काम पाहत आहे. विकिपीडियाची सुरूवात २००१ साली इंग्रजी भाषेत झाली. आजही विकिपीडियाची इंग्रजी आवृत्ती (जिच्यात आत्तापर्यंत ४० लाख लेख लिहिले गेले आहेत) ही सर्वात विशाल व लोकप्रिय या मुक्त ज्ञानकोशाचे वैशिष्ट्य असे की ह्या ज्ञानकोशाचे कुणीही सहज संपादन करू शकते. इंटरनेट उपलब्ध असलेली कोणतीही व्यक्ती याच्यात लेख लिहू शकते वा लेखांमधील माहितीत सुयोग्य बदल घडवू शकते. विकिपीडियाचा मुक्त ज्ञानकोश जगातील सर्व भाषांमध्ये लिहिला

जात आहे. मराठीचा पण यात समावेश आहे. अनेक मराठी भाषिक यास हातभार लावत आहेत. मराठी विकिपीडियावर सध्या यात ४१,९८१ (१-०७-२०१५) लेख आहेत तर संपूर्ण विकिपीडिया प्रकल्पांतर्गत आजतागायत एकूण एक कोटींहून अधिक लेख जगातील विविध भाषात मिळून लिहिले गेले आहेत. विकिपीडिया, विकिपिडियाची वैगुण्ये गृहित धरून सुद्धा त्याच्या मुक्त सार्वत्रिक उपलब्धतेमुळे, विविध विषयांच्या व्यापक परिघामुळे, सहज शक्य असलेल्या चर्चा आणि सतत सुधारणांमुळे आज इंटरनेटवरील सर्वाधिक वापरला जाणारा ज्ञानकोश झाला आहे. मराठीतील विकिपिडीया इतर भाषांप्रमाणेच गूगल सारखी शोधयंत्रे वापरून शोधता येतो.

## ३.३.५ समारोप

जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण हे ९० च्या दशकातले शब्दही आज मागे पडले आहेत. कारण यांची देणाऱ्या मिडियाचे आज जनमानसावर प्रचंड साम्राज्य आहे. त्यामुळेच आजचे युग जसे स्पर्धेचे तसेच माहितीज्ञानाचे व मिडियाचे युग असल्याचे म्हटले जाते. अन्न, वस्त्र, निवारा या एकेकाळच्या मूलभूत गरजांची जागा आज सुशिक्षित समाजाबाबत वर्तमानपत्र, दूरदर्शन इंटरनेट इ. प्रसारमाध्यमांनी घेतल्याचे म्हणता येते. कारण सकाळच्या चहाच्याही अगोदर माणसाला ओढ लागते ती वृत्तपत्राची आणि रात्री निवांत झोप येते ती इंटरनेटद्वारे माहिती मिळवून, ई-मेल पाठवून, सर्फिंग करून, ब्लॉग लिहून झाल्यावर, थोडक्यात, प्रसारमाध्यमे ही आजच्या मानवी जीवनाचा इतके अविभाज्य घटक बनले आहेत की, त्याशिवाय माणसाचे पान हालत नाही. अशा या प्रसारमाध्यमांचा वाढता विस्तार व प्रभाव पाहता त्यांच्या वापरासाठी आपण भाषिक व तांत्रिक कौशल्ये अवगत असण्याची आवश्यकता आहे. तसेच त्यांच्यामुळे निर्माण झालेल्या अनेकविध रोजगाराच्या संधी प्राप्त करण्यासाठीही कौशल्यप्राप्तीची गरज निर्माण झाली आहे.

## ३.३.६ संदर्भ सूची


१) दिव्य मराठी रविवार' संवाद 'पुरवणी ११ सप्टेंबर २०१६,डॉ समाजमाध्यमे आणि लेखकाची जबाबदारी पृथ्वीराज तौर

२) भारतातील प्रसारमाध्यमे काळ आणि आज,अनुवाद जयमती दळवी ,डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती २००८.

३) https://www.webkatta.com › What-Is-

४) Bloghttps://mr.m.wikipedia.org/wiki/

५) अनुदिनी ब्लॉग म्हणजे काय? - संगणक मित्र - Blogger.com

६) https://sanganakmitra.blogspot.com › blo...

७) https://www.mahamahiti.in/2020/11/what-is-blog-in-marathi.html?m=1

८) https://www.marathiword.com/2021/09/email-id-mhanje-kay.html?m=1

९) https://www.google.com/url?sa=t&source=web&rct=j&url=https://mr.m.wikipedia.org/wiki/%25E0%25A4%2588%25E0%25A4%25AE%25E0%25A5%2587%25E0%25A4%25B2&ved=2ahUKEwiB2tq57-X4AhXf-zgGHf5QCbEQFnoECBEQBQ&usg=AOvVaw0AfLbMLY4Eb3X51_CcR6Dn

१०) https://satishgaikwadblog.wordpress.com › ...

११) ई-मेल म्हणजे काय? | SatishGaikwad's Blog

१२) https://www.talksmarathi.in › email-i...

१३) ई-मेल विषयी माहिती | Email information in Marathi

१४) https://mr.m.wikipedia.org › wiki

१५) मराठी विकिपीडियाhttps://marathivarsa.com › education

१६) Information About Wikipedia In Marathi |

१७) https://mr.m.wikipedia.org/wiki


## ३.३.७ सरावासाठी प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) ई-मेल म्हणजे काय ते सांगून ई-मेल च्या मर्यादा व तोटे नमूद करा.

२) ब्लॉग लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

३) विकिपीडियाची माहिती विस्ताराने स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) ई-मेलचे फायदे

२) ब्लॉगिंगचे प्रकार

३) विकिपीडियाचा इतिहास

❖❖❖❖

## तृतीय वर्ष कला, सत्र – VI

## मराठी अभ्यासपत्रिका क्र. – IX

# व्यावसायिक मराठी

प्रश्न १. घटक – १ वर आधारित प्रश्न (पर्यायासह) (२० गुण)

प्रश्न २. घटक – २ वर आधारित प्रश्न (पर्यायासह) (२० गुण)

प्रश्न ३. घटक – ३ वर आधारित प्रश्न (पर्यायासह) (२० गुण)

प्रश्न ४. घटक – १, २, ३ वर आधारित टिपा लिहा. (कोणत्याही २) (पर्यायासह) (२० गुण)

प्रश्न ५. घटक – १, २, ३ वर आधारित भाष्य करा. (कोणतेही ४) (पर्यायासह) (२० गुण)